३७५८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

१९९८

चंद्रभूषण प्रकाशन

# शाहीर खाडिलकर

## यांचे


# पोवाडे

## आणि इतर शाहिरी कवन



REFBK-0016978

शाहीर पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर,
एम. ए., बी. टी.



चंद्रभूषण प्रकाशन

# शाहीर खाडिलकर यांचे पोवाडे

## आणि इतर शाहिरी कवन



REFBK-0016978

शाहीर पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर,

एम्. ए., बी. टी.

मुद्रक : दामोदर त्र्यंबक जोशी, मॅनेजर, चित्रशाळा प्रेस,
५६२, सदाशिव पेठ, पुणें २.

☆

लेखक : पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर, एम्. ए., बी. टी.,
प्रिन्सिपॉल, कर्णाटक हायस्कूल, चेंबूर, मुंबई ७१.

प्रकाशक : चंद्रभूषण प्रकाशनतर्फे
मधुकर पां. खाडिलकर, B. E.,
टेरेस् रूम्स्, सुशीला निवास,
सखाराम कीर रोड, मुंबई १६.

(सर्व हक्क लेखकाधीन)

विक्रेते : मेसर्स तुकाराम पुंडलीक शेट्ये, बुकसेलर्स,
सी. पी. टँक, माधवबाग, मुंबई ४.

☆

मूल्य सात रुपये

८००८१

मान्य
२।१।६८

# प्रस्तावना

आमच्या शाहिरी कवनाचा हा द्वितीय खंड जनतेच्या हातीं देतांना मला अत्यंत समाधान होत आहे.

१९२६ सालापासून आजतागायत पोवाड्यांच्या रचनेचें काम वेळोवेळीं करीत आलों आहे. पराक्रमी पुरुषांचीं चरित्रें प्रथमपासूनच मला आकर्षून घेत आहेत. त्यांचे रोमहर्षक पराक्रम माझ्या नेत्रांतून आणि कानांतून माझ्या हृदयापर्यंत पोहोंचले आणि त्यांनींच हे पोवाडे माझ्याकडून घडविले आहेत. थोरांचे गुण असेच असतात कीं ते सहृदय माणसाला आपणाकडे आकर्षून घेतातच. 'तद्गुणैः कर्णमागत्य चापलाय प्रचोदितः' हें कालीदासवचन सुप्रसिद्धच आहे.

छत्रपति शिवाजीमहाराज हे तर आमचें आद्य स्फूर्तिस्थान ! त्यांचे सर्व चरित्र म्हणजेच आदर्श कर्मयोग्याचें धगधगतें जीवन ! त्याचप्रमाणें तानाजी, बाजीप्रभु, मुरारबाजी ! ह्यांच्या त्यागाला सीमाच नाहीं ! संभाजीमहाराजांनीं आत्मबलिदान करून 'मराठा तितुका मेळवावा' हें समर्थवचन सार्थ केलें ! खंडो बल्लाळ चिटणीसांनीं तर आपलें सर्व घरदार स्वराज्यापायीं अर्पण केलें. सिंधदेशाचा राजा दाहर यानें चोहोंकडून निराशा चालून येत असता क्षात्रधर्माची शिकस्त करून प्राणार्पण केलें. शिखांचे दहावे धर्मगुरु गुरु गोविंदसिंह आणि त्यांचा पट्ट शिष्य वीर बैरागी यांनींही उच्च ध्येयासाठीं आत्मबलिदान केलें ! तसेंच रजपूतवीर पृथ्वीराज चव्हाण, राणा प्रताप, रजपूत सौदामिनी शशिप्रभा देवी, अहिल्यादेवी, झांशीची राणी, तात्या टोपे इत्यादि ऐतिहासिक पराक्रमी व्यक्ति, तसेंच विसाव्या शतकांतील लोकमान्य टिळक, काकासाहेब खाडिलकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, जगवंद्य महात्माजी, पं. जवाहरलाल, नेताजी सुभाष, डॉ. आंबेडकर ह्या सर्व व्यक्ति असामान्यच ! ह्या सर्वांनींच माझें जीवन घडविलें आहे.

ह्या थोर विभूतींचें प्रत्यक्ष जीवन मला जगतां आलें नाहीं हें खरें आहे; तथापि त्यांच्या पराक्रमांचा पोवाड्यांत गौरव करून आपण

कृत्यकृत्य व्हावें आणि त्यांचा आदर्श सतत राष्ट्रापुढें ठेवावा याच विचारानें प्रेरित होऊन हे पोवाडे मी लिहिले.

कोणाचें जीवन क्षणभर चमकणाऱ्या विद्युल्लतेसारखें, कोणाचें जीवन प्रखर सूर्यासारखें, कोणाचें जीवन आयुष्यभर धगधगणाऱ्या अग्निकुंडासारखें, तर कोणाचें सतत तेवणाऱ्या ज्योतीसारखें ! ह्यांच्या जीवनाचा अभ्यास करून तरुण पिढीनें जर आपलें जीवन घडविलें तर तें राष्ट्राला निश्चित उत्कर्ष प्राप्त करून देईल ! ह्या थोर विभूतींच्या जीवनाचा प्रभावी परिणाम मी लिहिलेल्या पोवाड्याच्या वाचनानें खास होईल अशी उमेद वाटत आहे.

प्रथम खंडांत एकूण १७ पोवाडे दिले गेले आहेत. आणि या द्वितीय खंडांत लहान मोठे सर्व मिळून एकूण आम्ही रचलेले ३६ पोवाडे दिले गेले आहेत. ३७ वा पोवाडा आमचे धाकटे बंधु चि. **महादेव दत्तात्रय खाडिलकर** तथा **दत्तकुमार** यांनीं पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जीवनावर लिहिला आहे. श्री. **दत्तकुमार** यांनीं हा पोवाडा आमच्या या द्वितीय खंडांत छापण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्याचा फार आभारी आहे.

याच खंडाच्या दुसऱ्या विभागांत आम्ही वेळोवेळीं रचलेलें इतर शाहिरीकवन मुद्रित केलें आहे. त्यांत लावण्या, भेदिक लावण्या आणि कांहीं विनोदी कवनेंहि आहेत.

गेल्या चाळीस वर्षांत हजारों लोकांनीं आम्ही रचलेले बहुतेक सर्व पोवाडे मोठ्या उत्साहानें हजारोंच्या संख्येनें कार्यक्रमांना हजर राहून ऐकलेले आहेत आणि त्यांचें सर्वांनीं स्वागतच केलें आहे. हिज मास्टर्स व्हॉईस या ग्रामोफोन कंपनीनें आमच्या बऱ्याच पोवाड्यांच्या रेकॉर्डस् काढून तद्द्वारां असंख्य रसिकांना आमचे पोवाडे ऐकविलेले आहेत. तसेंच ऑल इंडिया रेडिओ ( आकाशवाणी ) ही लक्षावधि श्रोत्यांना आमचे पोवाडे ऐकविण्याचें काम आजतागायत करीत आहे.

१–१–१९६८,
मुंबई १६.

**शाहीर खाडिलकर**

# शाहीर खाडिलकर यांचा जीवनकालादर्श

(आमचा जीवनकालादर्श आम्ही स्वतःच लिहून ठेवीत आहोंत याबद्दल आश्चर्यच वाटेल. पण तसें न केल्यास लेखकाच्या जन्मकालादिविषयीं बरेच वादंग माजतात. एवढ्यासाठींच स्वतःच माहिती देणें इष्ट वाटल्यामुळें आम्ही तसें करीत आहोंत.)

(१) जन्म—२८ डिसेंबर १९०३; पूर्वीच्या सांगली संस्थानांतील उगार खुर्द या खेडेगांवात जन्म.

(२) कर्नाटकांत धारवाडनजीक दोदवाड येथें आणि बेळगांवनजीक सांबरें येथें वडिलांचें नोकरीनिमित्त इ. स. १९१० पर्यंत वास्तव्य.

(३) इ. स. १९१० मध्यें वडिलांची बदली सांगलीस झाल्यामुळें सांगलींत वास्तव्य. सांगली हायस्कूलमध्यें इ. स. १९२१ पर्यंत शिक्षण. हायस्कूल स्कॉलर. वक्तृत्व, गायन, पोहणें, क्रिकेट, फुटबॉल, देशी व्यायाम याच कालखंडांत हस्तगत.

(४) इ. स. १९२१ ते १९२५ पर्यंत विलिंग्डन कॉलेजांत कॉलेज शिक्षण. कॉलेज स्कॉलर.

(५) इ. स. १९१० मध्यें मिरज येथें मातृनिधन; इ. स. १९१६ मध्यें सांगली येथें प्लेगाच्या साथींत पितृनिधन; घरची वाताहात.

(६) इ. स. १९२६ मध्यें वाई येथील सुप्रसिद्ध राष्ट्रीय प्राज्ञपाठशाळेंत प्रवेश. तेथें शिकविणें व शिकणें चालू. प. पू. कै. केवलानंद स्वामी यांच्या चरणाजवळ एम्. ए. चा अभ्यास. इ. स. १९२८ मध्यें एम्. ए. परीक्षा उत्तीर्ण.

(७) वाईस गेल्यावर लगेच दुसऱ्याच दिवशीं रायगडला श्री. शिवछत्रपतींच्या छत्रीसंमारंभास हजर राहण्यासाठीं प्रयाण. ३६० मैलांचा (वाई ते रायगड आणि परत) सर्व प्रवास पायींच केला. तेथें पोवाडे लिहिण्याची स्फूर्ति झाली. लगेच तानाजीचा पहिला पोवाडा लिहिला. तेव्हांपासून आजतागायत पोवाडे वाङ्मय लिहीत आहे.

( ८ ) इ. स. १९३० मध्यें कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें १ वर्ष सश्रम तुरुंगवास.

( ९ ) इ. स. १९३२ ते १९३६ महाराष्ट्रांत सरकारी जाचामुळें राहणें अशक्य झाल्यामुळें अहमदाबादेस प्रयाण आणि तेथें सरकारी नजरेखालीं वास्तव्य. मध्येंच १९३४–१९३५ पर्यंत कोल्हापुरांत बी. टी. साठीं महाराणी ताराबाई टीचर्स ट्रेनिंग कॉलेजांत दाखल. १९३५ सालीं बी. टी. ( द्वितीय श्रेणींत ) उत्तीर्ण. परत अहमदाबाद.

(१०) इ. स. १९३७ ते १९३९ नंदुरबार म्युनिसिपल हायस्कूलचें प्रमुखपद.

( ११ ) इ. स. १९३९ ते आजतागायत मुंबईंत वास्तव्य. चेंबूर कर्णाटक हायस्कूल, मुंबई ७१ या संस्थेंत प्रमुखाध्यापक म्हणून सध्यां काम पाहात आहे.

## लेखनविषयक

हायस्कुलांत होतों तेव्हांपासूनच काव्यरचनेची ओढ होती. १९२० सालीं लोकमान्यांचें देहावसान झालें तेव्हां त्या विषयावर एक लहानसा पोवाडा लिहिला. तोच जशाच्या तसा पोवाड्यांच्या प्रथमखंडांत छापलेला आहे. १९३६ सालापासून पोवाडे लिहिण्यास सुरुवात केली. आजपावेतों लेखन करीत आहे. एकूण ५३ पोवाडे दोन्ही खंडांत छापलेले आहेत. त्याशिवाय इतरहि बरेंच शाहिरी कवन लिहिलेलें आहे. स्फुट कविताहि बरीच लिहिली आहे. ‘ संस्कृत चंद्रिका ’ दोन भाग आणि ‘ इतिहासमंजरी ’ हें शालेय वाङ्मयही लिहिलें आहे. याशिवाय सुमारें ५० पूर्वरंग आणि आख्यानेंही लिहिलीं आहेत. याशिवाय जागतिक पोवाडे वाङ्मय या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

आमचें सर्व शाहिरी वाङ्मय आणि आख्यानें अत्यंत लोकप्रिय झालेलीं आहेत. याशिवाय श्री. गीतार्थसुधाकर हा गीतेवरील पद्यमय ग्रंथ, श्री. **संगीत गीतासार** आणि **संगीत रत्नाकर** हीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.

८६००९ काव्य
२०।९।६८

# पोवाडे ( द्वितीय खंड )

## अनुक्रमणिका

### विभाग पहिला


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| नमन | १ |
| १. पृथ्वीराज चव्हाण | २ |
| २. जयाजी शिंदे | १४ |
| ३. शशिप्रभा देवी | २२ |
| ४. पानपतचा रणसंग्राम | २८ |
| ५. हुतात्मे गुरुगोविंद व वीर बैरागी | ४१ |
| ६. देवी अहिल्याबाई होळकर | ५२ |
| ७. जिवबादादा बक्षी | ५८ |
| ८. राणा प्रताप | ६४ |
| ९. तात्या टोपे | ६८ |
| १०. श्री. शिवजन्म | ७३ |
| ११. यशवंतराव होळकर | ८२ |
| १२. नाना फडणीस | ९४ |
| १३. श्रीशिवराज्याभिषेक | १०३ |
| १४. सुरतेवर छापा | १०७ |
| १५. स्वामी श्रद्धानंद | १११ |
| १६. लो. टिळक | १२० |
| १७. नाट्याचार्य खाडिलकर | १२३ |
| १८. महात्मा गांधी | १३२ |
| १९. बार्डोलीचा लढा | १४० |
| २०. पं. जवाहरलाल | १४७ |
| २१. स्वातंत्र्यवीर सावरकर | १४९ |
| २२. नेताजी सुभाष भाग १ ला | १६२ |
| २३. नेताजी सुभाष भाग २ रा | १७३ |
| २४. भागानगर ( हैद्राबादचा सत्याग्रह ) | १८४ |
| २५. डॉ. आंबेडकर | १९४ |
| २६. स्वातंत्र्याची पहांट ! | २०२ |
| २७. जय भारत ! | २०५ |
| २८. जय महाराष्ट्र ! | २०८ |
| २९. महाराष्ट्राचा पोवाडा | २१४ |
| ३०. ॲटम् बॉंब | २२३ |
| ३१. दूर रहा | २२५ |
| ३२. भूदानयज्ञ | २२८ |
| ३३. चिनी भस्मासुर | २३१ |
| ३४. वीरवंदन | २३६ |
| ३५. वंदन करूं शूर वीरांस | २३७ |
| ३६. हैद्राबादची मोहीम | २४० |
| ३७. पंडित जवाहरलाल नेहरू (दत्तकुमारकृत) | २४५ |

# विभाग दुसरा


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. लावणी-आली मंद वाऱ्याची | २५८ |
| २. लावणी-घोड्याची मनोरम | २५९ |
| ३. होतं माझं सिंहासन | २६१ |
| ४. बाई, कुणा सांगू या कळा | २६१ |
| ५. तूं कोण सखे सुंदरी | २६२ |
| ६. कधा भेटिन | २६५ |
| ७. सांग मानवा ! | २६६ |
| ८. नील अंबरीं | २६७ |
| ९. चंद्रिका कुण्या | २६८ |
| १०. नार पराची धार | २६९ |
| ११. एक होती नाजूक नार | २६९ |
| १२. अंबाबाईचा गोंधळ ! | २६९ |
| १३. जोगवा | २७० |
| १४. असावा-नसावा | २७१ |
| १५. होशी नवरा असावा | २७२ |
| १६. असावी-नसावी | २७३ |
| १७. भेदिक लावणी | २७४ |
| १८. नारळी पौर्णिमा | २७५ |
| १९. दसरा | २७७ |
| २०. दिवाळी | २७९ |
| २१ शंखदेवाचा चुटका | २८२ |



ती. मातोश्री यशोदाबाई खाडिलकर

तथा

माई



शाहीर खाडिलकर, सौ. खाडिलकर




दत्तकुमार
( महादेव खाडिलकर )

साथीदार । आवाजीचे जादूगार !



१. बापूजी भिडे, २. लीला खाडिलकर ( मधुवंती पटवर्धन ), ३. शाहीर खाडिलकर, ४. सुलोचना खाडिलकर ( सुलोचना पटवर्धन ), ५. मधुकर खाडिलकर.

## साथीदार । आवाजीचे जादूगार !



१. अनंत केळकर, २. श्रीधर घीर्णाकर, ३. शाहीर खाडिलकर, ४. मधुकर खाडिलकर, ५. वासुदेव खाडिलकर, ६. शिऊभाऊ पटवर्धन, ६. राम भडकमकर.

# विभाग १ ला-पोवाडे

९६९८८

## नमन

शारदे काव्यदेवते, तुझ्याविण रितें, जगत्रय म्हणुनि शक्ति दे ग गाना । इथें जमले श्रोतृगण नाना ॥ १ ॥ दे बुद्धि आज मज कवना । मागणं तुझ्या ग चरणा ॥ जी ॥ ये स्फूर्तिदेवते आज । राखाया लाज । नको नाराज । होऊं ये ग कवना । इथें जमले श्रोतृगण नाना ॥ जी ॥ ये वीरवृत्ति झडकरी । जाग अंतरीं । वरदकर शिरीं । धरीं ये श्रवणा । मागणें तुझ्या हे चरणा ॥ जी ॥ झणझणा झांज झणकरी । वाजे खंजिरी । नाद भरभरुनि । राहि या स्थाना । डफ कडड कडड कडकडे । ढोलके झडझडे ॥ तुणंतुणं बोलुं लागलं । गोड आवाज,मोहविलें काना ॥ जी ॥ ॥ चाल ॥ तुम्ही श्रोते मी शाहीर । झालों एक रूप या वेळा । जनरूपें आला ईश्वर । करीन मी त्याच्या सेवेला ॥ चाल ॥ घ्या सेवा करूनिया गोड । मनाला ओढ । कवन गाण्याची लागली या स्थाना । इथें जमले श्रोतृगण नाना ॥ जी० ॥

### क्षात्रकुलमणि

# पृथ्वीराज चऽहाण

### यांचा

# पोवाडा

चौहाणवंशकुलमणी । सकलगुणखनी । धुरंधर रणीं । रणीं वाहवले रक्ताचे पाट । घातला पर दुष्ट दैवानं घाट । कीर्ति पर भरली त्याची आटोकाट ॥

• •

## चौक १ ला

पृथ्वीराज दिल्लीपति वीर । धीर झुंजार । जसा काय तीर । हिरा वीरांचा, झळकला फार । वीजेपर ज्याची चमके तलवार । भाला कितिकांना करी रणिं ठार ! ॥ चाल ॥ ज्याचं शरीर सडपातळ । पर सिंहासम चपल । अरिगजाचें गंडस्थळ ॥ कडकडा काढी सोलून । बाण फेंकून । भाला मारून । वीर भूपाल ! ॥ त्या विशाल भालाम्बरीं । द्वेषाच्या मेघावरी । भुवयांच्या रूपीं राहिलीं । दोन इंद्रधनुष्यें छान । दृष्टीचे बाण । घेति झणिं प्राण । करिती हैराण । शत्रुला फार ! ॥ यवनांच्या त्रासें गांजुनी । ती दैवीसंपदा गुणी । राहण्याला आली धांवुनी । नाकाचं रूप घेऊन । राहिली येऊन । तिचें रक्षण । करती हो मिशा मोठ्या पिळदार ! ॥ दुष्टांच्या धाकानं भिऊन । चांदण्या आल्या धावून । दातांचं रूप घेऊन । राहिल्या मुखाच्या आंत । शांत निभ्रान्त । भीति सोडून ! ॥ जंवा पावलं टाकी झरझरा । मेदिनी कांपे थरथरा । तो वीर्यवृत्तिचा झरा । पाहुनी ज्याच्या शौर्यास । देवही खास । गेले मोहून ! ॥ चाल ॥ जसजसा त्याच्या कीर्तीचा सूर्य तळपला ॥ तसतसा

इतर राजांचा द्वेष वाढला ॥ त्यांनीं त्याचा नाश करण्याचा डाव टाकला ॥ कांहीं वीर गेले गझनीला । आणि त्यांनीं आणलं शाहाबुद्दिनाला । घनघोर संग्राम झाला । किती वीर पडले धरणीला । रक्ताचा पाट खळखळला । मांसाचा चिखल जाहला । पृथ्वीराज दंग रणीं झाला । शाहाबुद्दिन धांवून आला । दोघांचा संग्राम झाला । पृथ्वीराजाच्या पाहुन तडफेला । शाहाबुद्दिन घाबरून गेला । त्याचं धनुष्य पडलं धरणीला । तंवा राजानं प्रकार काय केला । आपलं धनुष्य अडकवलं त्याच्या गळ्याला । आणि त्याला ओढून दरदरा । राजानं नेलं दिल्लीलं । सारे लोक जमले बघण्याला । 'जय पृथ्वीराज' नाद झाला । शाहाबुद्दिन बोलूं लागला । "जीवदान द्यावं हो मला । मी आलों शरण तुम्हाला" । **कैमास** प्रधान बोलला । "महाराज ! उडवा मुंडक्याला । शत्रु हा लागला हाताला । साप आणि शत्रु एक झाला । जर सोडाल आज तुम्ही याला । तर वैरी धरेल दंशाला । आणि नडेल जागो–जागेला" । पर पृथ्वीराज बोलला । "कैमास ! शरण आलेल्याला । मारणं हा अधर्म झाला !" । कैमास पुन्हा बोलला, । "महाराज ! जर साप शरण तुम्हां आला । तर त्याला सोडून घात होईल जीवाला । हा **खोटा क्षात्रधर्म** झाला । म्हणून करा ठार आज याला" । पर पृथ्वीराजानं नाहीं ऐकलं त्याच्या बोलण्याला । आणि त्यानं दिलं सोडून काळसापाला ! ॥ १ ॥

• •

## चौक २ रा

कनोजचा राजा **जयचंद** वीरवर झाला । राजसूययज्ञ करण्याचा बेत त्यानं केला । किति जमले राजेरजवाडे नाहीं गणतीला । पर पृथ्वीराज तो नव्हता आला त्या स्थळा ॥ पृथ्वीराज आणि जयचंद । होते भाऊबंद । तरी जयचंद । पृथ्वीराजाचा वैरी झाला । म्हणून पृथ्वीराजाला

हिणविण्याला । त्यानं त्याला देवडीवाला केला ॥ संयुक्ता रूपसुंदरी । अतुल भूवरीं । मदनमंजरी । जयचंदाची कन्या होती सुकुमार । रूप-लावण्य शोभे भरदार । जणुं कामाची तिखट तरवार ! ॥ चाल ॥ जयचंद बोल्ला कन्येला । " मुली ! तारुण्याची आली तुला कळा । तूं झालीस योग्य लग्नाला । लवकरच यज्ञ सुरू होईल । त्यांत तुझ्या स्वयंवराचा बेत मी केला । कंठीर योग्य वर तुला ॥ कंठीर सर्वगुणी झाला । कुल, कान्ति आणि वयानं योग्य तो तुला ॥ सोन्याचं कोंदणच शोभा देई रत्नाला ॥ तोच वर नेमला मी तुला" । पर मुखराग राजपुत्रीचा कोमेजुन गेला । आनंद गेला अस्ताला । निराशेचा रंग पसरला ! । तंवा राजा बोलुं लागला । " कां मुली ! असं का तोंड केलंस ? । आनंदाची बातमी ही तुला । असं असून असं कां ? सांग मला " । संयुक्ता बोलली बापाला, । " बाबा ! मी तुमची लाडकी ना ? बोला । मला सुख होईल असंच तुम्ही करणार ना ? । बाबा ! तुम्ही जो वर पसंत केला । तो......" । जयचंद मधेंच बोल्ला, । "मुली ! अविचार सोड या वेळा ! । तुला दुःख होईल असं तुझा बाप कसं करील ? । त्याच्या-सारखा कोणीहि न झाला " । राजपुत्री बोलली मग त्याला । "बाबा, तो असेल पसंत तुम्हांला । पण स्वयंवर तुमचें व्हायचंय का माझं ? । मग पसंत कोण तें सांगतें तुम्हांला । ॥ चाल ॥ ज्याचं नांव भरलं त्रिभुवनीं । राजांचा मणी । तोच मन्मनीं । मदनदेवानं अढळ केला । चंदभाट ज्याचा मित्र झाला । ज्यानं शाहाबुदिन चीत केला । ज्याला तुम्ही देवडीवाला केला । तोच हृदयांत ठसून गेला " ॥ चाल ॥ कन्येचे शब्द ऐकून । भडकला राजा रागानं ॥ चाल ॥ मग राजा बोलूं लागला । "कारटे ! काय ग वर पसंत केलास । वाहवा ! आपलं हित कुठं कळतयं तुला ? । अग पृथ्वीराज कट्टा दुस्मन झाला । आज ना उद्यां त्याच्याशीं लढाई करण्याचा प्रसंग जर आला । अन् जर बरंवाईट झालं याच्या जीवाला । तर तुझी अवस्था काय बरं होईल ? तें सांग मला ॥"

संयुक्ता बोल्ली राजाला, । " बाबा ! तो शत्रु असेल तुमचा । पण माझा नाहींना ? । बाबा ! क्षत्रियांना मरण हेंच पुजलं पांचवीला ! । जर आपण म्हणतां तसा प्रसंग आला । तर सती जाण्याचं भाग्य लाभेल मला ॥ " मग जयचंद बोलला हो तिला, । " मुली ! तें कांहीं नाहीं ! तुझ्या आयुष्याची जबाबदारी माझ्यावर आहे ! । कंठीराशींच लग्न करावं लागेल तुला ॥" असं म्हणून जयचंद निघून गेला ! । मग संयुक्तेनं प्रकार काय केला । वश केलं एका ब्राह्मणाला । अन् त्याच्याबरोबर दिली पत्रिका पृथ्वीराजाला । कीं, " प्राणसख्या ! धांवा या वेळा । स्वयंवर होईल परवांला । मी माळ घालीन देवडीवाल्याला । तुझ्यावीण जिवलगा ! प्राण कासाविस झाला " ॥ ३ ॥

● ●

## चौक ३ रा

ती वार्ता पृथ्वीराजाला । कळली, लाल झाला । विचार करण्याला । त्यानं जमविले सारे सरदार । सभा थाटली मोठी भरदार । जणु काय इंद्राचाच दरबार ॥ मग पृथ्वीराज बोल्ला, । " ऐका हो बोला । जयचंदानं यज्ञ सुरू केला । त्यांत संयुक्तेचं स्वयंवर । त्यानं नेमलं आहे सत्वर । त्यांत मला केलं द्वारपाल ! हा झाला मोठा अपमान । चढाई करून । जावं वेगानं । वाटतंय मजला ॥ मग चंद बोल्ला राजाला, । " अविचार असला नाहीं चांगला । जयचंदाच्या यज्ञकार्याला । सारा झाडून मांडलिक आहे जमला । त्याच्या फौजेचा मोठा तळ पडला । तिथं आपल्या मूठभर लोकांचा काय पाड बोला ? । कपटाचा खेळ जर केला । तरच आपला कार्यभाग झाला । आणि संयुक्ता मिळेल रे तुला ! । ब्राह्मणाचा वेश तुम्ही सारे करा । आणि तूं हो माझा चंबूवाला ! । काय गड्या ! माझा चंबूवाला ! । तरच तुझा बेत साधला ! " हा सल्ला पटला सर्वांला । मग वेष पालटून सारा वीर चालला ॥ धडाधडा

गेले कनोजाला। जयचंद होता सभेंत बसलेला। तिथं चंद भाट तो गेला। त्याच्या मागं होता चंबूवाला। चंद बोलला तंवा जयचंदाला। "राजा ! आशीर्वाद द्यायला आलों तुला। तुझ्या कीर्तीचा डंका वाजला चारी दिशेला ॥ किती सामंत आज झाला गोळा। तुझा हुकूम शिरसावंद्य त्याला। पर गालबोट लागलं रे तुला। रणसिंह हजर नाहीं झाला !। काय करतोयस् घेऊन या पाचोळ्याला। जंवर दिल्लीपति नाहीं आला। तंवर सम्राट कोण म्हणेल तुला "॥ जयचंद फार खट्टू झाला। आणि त्याला बोलूं लागला,। "पृथ्वीराज पृथ्वीराज तो काय ? । अन् त्याची प्रतिष्ठा रे तुला। ? इथं हा जो सामंत सारा जमला। त्यांत त्याच्या सारखा काय रे भाटा ? कोणीहीं दिसत नाहीं तुला ?। अरे चुटकी-सरशीं धरून आणीन त्याला" ॥ मग चंद बोलला राजाला,। "इथं पृथ्वीराजासारखा या राजेलोकांत तरी दिसत नाहीं मला। पण कल्पनाच द्यायची जर तुला ॥ तर हा माझा चंबूवाला त्याच्यासारखा दिसतोय मला। पण हा माझा नोकर। अन् मी पृथ्वीराजाचा नोकर। तर तो पृथ्वीराज कसा असेल याची कल्पना आली का तुला ?"। पर इकडं चंबूवाला होता लाल झाला। त्याचा ओठ होता स्फुरूं लागला। जोरानं श्वास सुरू झाला। अन् थरथरत्या हातातनं चंबू भूमीवर पडला" ॥ संशय आला जयचंदाला। पकडायचा बेत त्यानं केला। पण वाटलं त्याला कीं 'हा जर पृथ्वीराज नसेल तर ! हासतील लोक सारे मला' ॥ इतक्यांत प्रकार काय झाला। दहा स्त्रिया विडे घेऊन मंडपांत आल्या। त्यांत एकीनं चटकन् डोक्यावर पदर घेतला। पर चंदानं खुणावलं जंवा तिला। तंवा तिनं पदर काढला। जयचंद बोलला मग तिला। "काय ग कर्णाटकी ! पदर घेतलास का अन् काढलास का ?"। ती बाई बोलली मग त्याला, । "महाराज ! एकटया पृथ्वीराजाचाच मान ठेवण्यासाठीं मी पदर घेतें ! पण आज इथं चंद पाहिला। चंद त्याचा जिवलग मित्र। म्हणून चंदाचा मान ठेवण्याला। मी असा प्रकार केला ॥" पुढं काय प्रकार झाला। तो सांगीन पुढच्या चौकाला ॥ ३ ॥

## चौक ४ था

दुसरे दिवशीं होतं स्वयंवर। म्हणून नरवीर। जमले रणशूर। नाना देशिचे शूर भूपाळ। केला तंवा थाट जेवणाचा फार। लग्नसोहळा होता छानदार ॥ तिथं जे जे पदार्थ केले। गोड गोड भले। सांगीन मी सारे। सुटेल पण पाणी तोंडाला खास। मिटक्या माराल तुम्ही तासन् तास। म्हणून कांहीं थोडें सांगतों तुम्हांस ॥ कटाव ॥ एक राजा मग अंगण झाडी। शुभ्र आसनें दुसरा मांडी। तिसरा मग रांगोळी काढी। चौथा अति उत्साहें वाढी। कां इतका उत्साह तयाला ?। अशानं तरी संयुक्ता बाला। रूपसुंदरी पाहिल त्याला। खटाटोप हा म्हणूनच सगळा ॥ लांब केळीचीं पानं पसरलीं। वरणभाताची मूद शोभली। चंद्रासम ती गोड वाटली। दाटी पक्वान्नांची झाली। पहा ! पहा ! बासुंदी आली। 'पुरी ! पुरी !' ओरडती सारी। देहभान विसरली मंडळी। मिटक्या मारित खाती सारी ॥ गोड गोड मग लाडू आले। दोंदिल त्यांचें फार वाढलें। म्हणुनी पानावर गडगडले। लाल सांडगे पापड आले। किती चिरोटे ते फुगलेले। नानाविध ते भात धांवले। साखरभात, बटाटेभात। वांगीभात, नारळीभात। रावणभात, भातच भात ! ॥ भजी कुरकुरित नाचत आली। चुर चुर करुनी खाती मंडळी। खातांना खूप लज्जत आली। या पुरीकाकू ! कां हो फुगला ?। कां तुम्ही एक विहीण झाला ?। कां तुमचा अपमान झाला ?। या रुसूं नका ! खाऊन टाकूं आम्ही तुम्हांला। हं ! आलं ! आलं श्रीखंड ! सावरा। पक्वान्नांचा राजा आला ! वाढा ! वाढा !। आग्रह झाला। कां दादांनो, चंचल झाला ?। पाणी सुटलं का तोंडाला ?। कां पुरीभजांचा सुवास आला ?। पण कांहीं उपयोग नाहीं। शब्दांचा हा खेळ जाहला। असो ! पुढं काय प्रकार झाला ! ॥ भोजन आटपून जमली सगळी। स्वयंवराच्या स्थानीं मंडळी ! ॥ चाल ॥

मग आली संयुक्ता बाला। पाहुन तिला वाटलं ज्याला त्याला। कीं आतां ही माळ घालणार आपणाला। म्हणून जो तो हुरळून गेला। ज्याचा त्याचा डोळा तिच्यावर खिळून हो गेला॥ मनानं भिडले सारे तिला। पण ती मात्र भिडेना कोणाला। पण पुढं चालली जसजशी सोडून एकेकाला। तसतसा तो तो आला शुद्धीला। अन् लागला खालती बघायला। अन् एक दीर्घ उसासा टाकला। संयुक्ता हळु हळु गेली बाहेरच्या बाजूला। अन् माळ घातली देवडीवाल्याला। सात थोबाडींत माराव्यात तसा राजांचा चेहरा झाला!। पर इतक्यांत कोण हा आला?। घोड्यावर टाकलं संयुक्तेला। आणि बघा दौड चालला। नुकताच सारा लोक होता यथेच्छ जेवला। म्हणून तिथंच होता थंड बसला॥ चाल॥ हंसानं लालडी नेली। मंडपांत खळबळ झाली॥ तल्वार तलवारीस भिडली। रक्ताची नदी खळखळली॥ घनघोर लढाई झाली। मृत्युदेवता रणिं रमली॥ चाल॥ मोठमोठे वीर सामंत। पडले युद्धांत। झाला आकांत। चांदभाट एकटा परत फिरला। स्वयंवर मंडपांत असला। खेळ दैवाचा दुष्ट झाला!॥ ४॥

• •

## चौक ५ वा

किती पडले लोक रणावर। लहान आणि थोर। मोठे झुंजार। घोर रक्ताचा पाट सरला। पृथ्वीराज विस्मरून गेला। शृंगारसागरांत बुडला! ॥ चाल॥ संयुक्ता रूपसुंदरी, वर्णुं कसं तिला॥ १॥ मुखचंद्र पाहुनी चंद्र लाजुन गेला॥ गालाची लाली पाहून गुलाब हिरमुसला॥ ते डोळे वाटोळे झाले शल्य हरिणाला॥ सुकुमार ओठांनीं बिंबराग पळविला॥ दातांला पाहुन ताऱ्यांचा गर्व उतरला॥ केसांनीं मत्त भुंग्यांचा नक्षा हरविला॥ चाल॥ जशी तिलोत्तमा घडविली। ऊर्वशी भुवनिं पातली। मोहिनीच मनमाधुरी। ती कामदेवाची सुरी॥ चाल॥ असं तिचं रूप

पाहून । पृथ्वीराज झाला बेभान ॥ चाल ॥ जन सारं नमलं हो त्याला । पण तोच एका अबलेचा अंकित झाला ! ॥ चाल ॥ तल्वार हातांतून गेली । त्या जागीं सारंगी आली ॥ धनुष्याची दोरी दूर गेली । कुसुमांची माळ तीं आली ॥ पुष्पाची शय्या सजली । म्हणून रणशय्या रुसून हो गेली ॥ जो बद्ध करित जगताला । तोच बाहुपाशीं पडला ! ॥ ज्याचा बाण मारी लोकांला । नेत्रबाण वेधति त्याला ॥ जो अजिंक्य जगतीं झाला । कोमलांगी हारवी त्याला ! ॥ चाल ॥ असो ! आतां ऐका गोष्टीला । पृथ्वीराज शृंगारांत रमला । राज्याची काळजी कोणाला ! । सारा अंदाधुंदीचा कारभार झाला । तंवा असं वाटलं कांहीं लोकांला । कीं एकदां भेटावं समक्ष राजाला । आणि सारं सांगावं त्याला । चंद आणि हाहुलीराय गेले भेटायला ॥ पण राजाची गांठ कुठली पडायला ? । बायकांचे तीन पाहरे ! । त्या तीन पाहऱ्यांच्या आंत प्रणयचेष्टेंत राजा रंगला ! ॥ त्यांनीं निरोप पाठवला राजाला । कीं " राजा ! आम्ही आलों आज भेटायला । भेटीची आशा आम्हांला " । पर सारंच स्त्रीराज्य ! । निरोप पाठवला सकाळच्या प्रहराला । आणि संध्याकाळीं त्याचा जबाब आला ! । तंवर चंद आणि हाहुलीराय होता बसलेला ! ॥ जबाब कसा आला सांगतों तुम्हांला । चार मुली छड्या घेऊन आल्या । आणि छपाछप मारलं दोघांला ! । आणि हाकलून लावलं त्या वेळा । पृथ्वीराजापर्यंत निरोपच मुळीं नव्हता गेला । मधल्यामधेंच हा सारा प्रकार झाला ॥ चाल ॥ हाहुलीराय लाल झाला । त्याचा घोर अपमान झाला ॥ त्यानं तिथंच केलं प्रतिज्ञेला । " कीं संयुक्तेच्या हातांतील चुडे उतरवीन तरच नांवचा हाहुलीराय ! । आतांच्या आतां जातों गझनीला ! " तंवा चंद त्याला बोलला । " हाहुलीराय ! हाय ! हाय ! असं करणं योग्य नाहीं तुला । अरे ! किती झालं तरी तो आपला राजा ! आपणच सांगू आणि भांडू ! । राजाला मुळीं आपला निरोपच नसेल पोचला ! । म्हणून करूं नको दुष्ट बेताला । अरे ! कोण चुकत नाहीं ? " । पण

हाहुलीराय बेभान झाला । अन् तडक गेला गझनीला ! । पुढं काय प्रकार झाला । तो सांगीन पुढच्या चौकाला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

सामंत मोठमोठे वीर । पडले रणावर । झाला कमजोर । हाहुलीराय फितुर झाला । गेला तो थेटच गझनीला । भेटला तिथं शाहाबुद्दिनाला । हाहुलीराय बोलला त्याला ! । "सारा सामंत ठार झाला । दिल्लीपति मदोन्मत्त झाला । माझा त्यानं अपमान हो केला । पृथ्वीराज शृंगारांत रमला । राज्याचं भान नाहीं त्याला । संधि आली दिल्ली जिंकण्याला । म्हणून आलों मी बोलवायला ! " ॥ अगणित फौज घेऊन । मोठ्या वेगानं । शाहाबुद्दिन दिल्लीवर चाल करून आला । फार दिवसांचं शल्य त्याला । हाहुलीराय सहाय झाला ! " ॥ चाल ॥ पर ही बातमी कळणार कशी पृथ्वीराजाला ? । शाहाबुद्दिन चाल करून आला । ही बातमी कळली समरसिंगाला । समरसिंग आला दिल्लीला । चार दिवस तळ देऊन बसला । पर कोणी नाहीं आला विचारपूस करण्याला ! । हें बघून शोक झाला त्याला ! । राजाला जागं करण्याला । त्यानं एक नामी उपाय योजला । एक पोपट त्यानं होता पाळला ! । शाहाबुद्दिन आल्याची चिठ्ठी त्यानं दिली आपल्या पोपटाला । चिठ्ठी घेऊन पोपट उडाला । तो आंतल्या चौकामधिं गेला । आणि तिथं चिठी टाकून निघून तो गेला ! ॥ राजानं वाचलं चिठ्ठीला । खाडदिशीं राजा जागा झाला ! । संयुक्तेचा निरोप त्यानं घेतला । अन् राजा वाड्यांतून चालला । समरसिंह भेटला मग त्याला । मोठमोठा सामंत आधींच होता ठार झाला । म्हणून राजाकडं नव्हता कुणी उरला । तरी उरलेल्या घेऊन फ़ौजेला । ते दोघे गेले लढाईला । कुरुक्षेत्रीं भिडले एकमेकांला । घनघोर केलं लढाईला । तंवा चामुंडराय बोलला, । "राजा ! हा एक बाण

राहिला । हा बाण रामबाण झाला । बोल ! कुणावर सोडूं ! । शाहाबुद्दिन आला सामोरा । हाहुलीराय बाजूला" । पर पृथ्वीराज बोलला, । "कर ठार आधीं फितुराला" । सट करून बाण जो गेला । तो हाहुलीरायाची मान छाटून गेला ! ।। पर शाहाबुद्दिन वेगानं आला । त्यानं एक बाण सोडला । त्यासरशीं चामुंडराय पडला ! । पृथ्वीराज लालेलाल झाला । त्यानं धनुष्याला एक बाण लावला । आणि दोरी खेचली तो कडाडाडा आवाज झाला ! ।। चाल ।। धनुष्याची दोरी हो तुटली । नशीबानं उलट ती खाल्ली ! ।। दिल्लीची गळसरी तुटली । नशीबानं उलट ती खाल्ली ! ।। चाल ।। त्यासरशीं प्रकार काय झाला । कुणी नव्हतं राहिलं बाजूला । म्हणून पृथ्वीराज एकटाच सांपडला ! । शत्रूंनीं घेरलं राजाला । करकच्च बांधलं राजाला । आणि दरदरा नेलं गझनीला ! ।। चाल ।। मग ठेवलं पृथ्वीराजाला । भुयाराच्या आंतल्या बाजूला ।। दोन मोठमोठे जंजीर । अडकवले त्याच्या मानेला ! ।। जिथं काळाकुट्ट अंधार । भर दिवसा सुद्धां राहिला ।। जिथं भीति वाटे भीतीला । तिथं ठेवलं पृथ्वीराजाला !।। दोन्ही डोळे फोडले राजाचे । रक्ताचा लोट चालला ! ।। ६ ।।

• •

## चौक ७ वा

झालं दुःख फार चंदाला । गेला भेटायला । पृथ्वीराजाला । बोलला मग शाहाबुद्दिनाला, । "खावंद ! चांद भाट आला । एकदां मित्राला भेटण्याला ।। आला चढता काळ आपणाला । शूर वीर झाला । आपला दरारा । काय वर्णावा आज सरकार । पशुपक्षीहि झाले मनिं गार । जनतेला तुम्ही एक आधार ! ।। पर एक गोष्ट सांगतों तुम्हांला । पृथ्वीराज शब्दवेधी झाला । त्याच्यासारखा दुसरा दुनियेंत कोणही न झाला ।। ही मौज पहावी या वेळा । शाहाबुद्दिन 'ठीक' बोलला । मग चांद भुयारांत

गेला। तिथं पाहिलं पृथ्वीराजाला। तो प्रकार दिसला काय त्याला। दीड मणाची बेडी पायाला। शरीराचा सांगाडाच उरला। दोन्ही डोळ्यांतनं मासांचा गोळा!। अशा पृथ्वीराजाला बघुन चंद गहिंवरला!॥ मिठी मारली त्यानं राजाला!। जरी नव्हते डोळे: राजाला। तरी वळखिलं त्यानं हो त्याला!। मग राजा बोलूं लागला। "कोण? चंदा!"। दोघांचा गळा दाटला!। "चंदा! काय होतं अन् कसं झालं रे। मीच कारण झालों रे याला। कामान्ध झालों त्या वेळा। अन् दुखवलं कैक लोकांला। कैमास मीच ठार केला। चामुंडरायाला मींच होता कैदेंत टाकला। त्याचीं फळं भोगणं रे मला! असो! आतां ऐक शब्दाला। घे तलवार अन् काप माझा गळा। तुझ्या हातुन मरण रे सख्या! येऊं दे मला॥ चल! सोडीव झटकन् मला"। मग चंद बोलूं लागला,। "राजा! जरा थांब! अरे मरायचं तरी आहेच! पण त्यापूर्वीं दाखीव तुझी कला। वेधाची एकदां थोरीला। तुझा शब्दवेध बघण्याला। शाहाबुदिन आतुर झाला"॥ मग पृथ्वीराज बोलला,। "वा! चंदा? वाहवा रे मित्र! ज्यानं असं छळलं रे मला। त्यालाच दाखीव म्हणतोस माझी कला!। दुःखावर डागण्या देण्याला। कां आलायस् सांग रे मला!। धिक्कार असो रे तुला। मींच मरतों आतां या वेळां"॥ असं म्हणून पृथ्वीराजानं दाबला गळा!। पण चंदानं त्याचा हात धरला। अन् त्याला बोलूं लागला,। "राजा! अविचार शोभेना तुला। वीराचं मरणपद तुला। येऊं दे आशा ही मला। एकदां करामत दाव शाहाला। मग तूं अन् मी मारुन घेऊं एकमेकांला। अशानं तुझं नांव दुमदुमेल तीन लोकांला"॥'बरं' पृथ्वीराज बोलला। याच्या पुढचा प्रकार सांगीन पुढच्या चौकाला॥ ७॥

● ●

३३

## चौक ८ वा

तो शब्दवेध बघण्याला । लोक हीं सारा । तय्यार झाला । राजवाड्याच्या आंत जमला । बायकापुरुषानं वाडा फुल्ला । गगनमणी आकाशांत चढला ॥ चाल ॥ गालिचे किती पसरले । किती जमखाने घातले । किनखापी खांब शोभले । सात तवे मोठमोठाले वरतीं टांगले ॥ ॥चाल॥ मग आणलं पृथ्वीराजाला।बेडीनं होता बांधलेला। पृथ्वीराज वाळून गेला । मांस मुळीं नव्हतं अंगाला । डोळे फुटले होते ! । नुसता हाडकांचा होता सांगाडा ! । असो ! । पुढं काय प्रकार झाला । असं ठरलं होतं त्या वेळा कीं सात तव्यांपैकीं कोणताही एक तवा काठीनं वाजवावा । ' भले शाबास ! ' असा शब्द शाहानं बोलावा । त्यासरशीं पृथ्वीराजानं, बाण मारून तो तंवा खालतीं पाडावा ॥ जंवा लोक ठाक ठीक बसला । तंवा शाहाबुद्दिन आला त्या स्थळा । अन् समोरच सज्जामधिं बसला ! । मधें उभं केलं पृथ्वीराजाला । जवळ चंद उभा राहिला । एक धनुष्य दिलं राजाला । त्यानं लावला बाण मग त्याला । आकर्ण ओढलं दोरीला । तो कडाडाडा आवाज झाला । धनुष्याचा तुकडा उडाला ! । मग पृथ्वीराजाचंच धनुष्य आणुन दिलं त्याला । त्यानं त्याला बाण लावला । अन् खेचलं जोरानं त्याला । इतक्यांत ' खण ' असा आवाज झाला । ' भले शाबास ' घोरी बोल्ला । त्यासरशी चंद बोल्ला । " बघतोयस् काय ? हाण ! शेवटचा मोका हा तुला । करामत दाव शाहाला " । पृथ्वीराजानं बाण सोडला । तो शाहाबुद्दिनच्या छातींतून गेला । शाहाबुद्दिन खालतीं लोळला ! चंद बोल्ला पृथ्वीराजाला, । " भले शाबास ! शाहा ठार झाला । आतां मरूं सुखानं या वेळां " ॥ असं म्हणून एकमेकांनीं वार केला । अन् पृथ्वीराज चंद दोघेहि पडले भूमिला ! **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ ८॥

रचना-( १९३९ )

रणरंग

# जयाजी शिंदे

यांचा

# पोवाडा

तेजस्वी शिंदे कुलमणी । धुरंधर रणीं । दानशूर म्हणुनि । कीर्ति ज्याची गेली सप्तलोकांत । केला पर कसा दैवानं घात । '**पांडुरंग**' सांगतो आतां कवनांत ॥ ध्रु० ॥

## चौक १ ला

अतिरथी महारथी वीर । शूर रणधीर । मोठे धनुर्धर । दिल्लीकडं चालले सारे सरदार । उसळला त्यांचा मोठा दळभार । हिंदुराज्याची इच्छा अनिवार ॥ राघोबादादा होळकर । अंताजी माणकेश्वर । शिंदे पवार । विठ्ठल शिवदेव, गोविंदपंत सरदार । पाऊण लाख ढाल आणि तरवार । झाली झरझरा नर्मदापार ॥ माळवे, बुंदीकोट, झोंदेवाडा । पाटण, खेचीवाडा । उदेपुर कडा । ग्वालेरी, झांशी, काल्पी, नरवर । यांच्याकडून खंडण्या घेऊन तलवार । आनंदानं झाली चमेली पार ॥ चाल ॥ पुढं जाटाचा मुलुख लागला । तंव्हा जाटानं विचार काय केला । कीं मराठ्यांचा जोर फार झाला । दोन हात करणं शक्य नाहीं मला । म्हणून समेट योग्य या वेळा । म्हणून **रूपराम कंटारी** वकिलाला । पाठवलं दादांच्याकडं समेट करण्याला ॥ रूपराम बोलला दादाला । "दादासाहेब ! आलों भेटीला । चाळीस लाख रुपये खंडणीला । आज मोजतों स्वीकारा तिला" । पर राघोबा दादा बोल्ला, "काय भीक लागली तुझ्या राजाला ? । एक कोट रुपये खंडणीला । दिले पाहिजेत, सांग असं त्याला । दख्खनचा सिंह आज आला । त्याचा मोठा इतमाम

झाला । काय रे ! समजत नाहीं तुझ्या राजाला ? । जा, असा निरोप सांग जा त्याला । कीं एका कोटींत एक रुपाया जरी कमी आला । तरी खपणार नाहीं तें मला । अन् मग यमलोकीं जायची तयारी करा ” ॥ रूपराम निरोप घेऊन जाटाकडं गेला । अन् सांगितलं बोलणं जाटाला । तंवा जाटाला राग फार आला ॥ अन् त्यानं जबाब लिहिला दादाला । “ घ्यायचं असेल तर घ्या चाळीस लाखाला । नाहीं तर बांधा ढाली पाठीला । आम्ही केशरी पोशाख आधींच आहे चढवलेला”॥ असा त्यानं निरोप धाडला । पांच गोळे, दारू पाठविली त्यानं त्या वेळा ॥ चाल ॥ राघोबा गेले चिडून । कुंभेरीला गेले वेगानं ॥ मोर्चेबंदी केली कडकून । गांवाला ठेवलं वेढून ॥ तोफांचा मारा सडकून । धडकती गोळे वेगानं ॥ हस्तनाळा, सुतरनाळा छान । जेजाला विषारी बाण ॥ यांनीं दिला रंग जमवून । लढाईचा चंग बांधून ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

होळकर चढविती हल्ला एका बाजूला । जयाजी शिंदे रणशूर दुसऱ्या बाजूला । जसे भीम आणि अर्जुन होते मदतीला । दिनरात चालला रणरंग वीर रणिं दंग । गुंग जाहला ॥ दीड महिना झाला तरि किल्ला येईना हाताला ॥ रेतीची जमीन सुरुंगाचा उपाय सारा थकला । तोफ खालीं धरली तर गेला रेतीमधें गोळा । जर वर धरली तर किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूला गोळा हो पडला ॥ आणि आपलाच लोक जायबंदी झाला ॥ चाल ॥ पण मोहरा इरेला पडला । रणरंग असा चालला । पण एके दिवशीं प्रकार काय घडला ॥ चाल ॥ मल्हाररावांचा मुलगा खंडेराव । नशीबाची धांव । काय सांगावं ? ! निशाणाच्या जवळ सहज आला । आयुष्याचा दोरा ताडन तुटला । जेजालाचा गोळा येऊन पडला । बघतां बघतांना ठार झाला ! ॥ प्रळयाग्नि जसा भडकावा ।

जळत जावा । आकांत व्हावा । किंवा जशी वीज पडे कडाडून । केळीचं झाड जाई करपून । मल्हारराव तसे गेले भंगून ॥ चाल ॥ एकुलत्या एक पुत्रास । ग्रासलं मृत्यूनं खास ॥ नाहीं पारावार शोकास । मुळीं चैन नाहीं जीवास ॥ अहोरात्र लागला ध्यास । शोकाग्नि जाळी हृदयास ! ॥ दशरथ राजाला खास । जसा झाला रामवनवास ॥ चाल ॥ हाय खाल्ली त्यानं त्या वेळा । कार्याचा विसर त्यांना पडला । एवढा मोठा लढवय्या खरा । पर शोकानं झांकोळून गेला । लढाईचें भान नाहीं त्याला । तंवा राघोबा आणि सरदार बोलले मग त्याला ॥ " मल्हार-राव ! आम्ही काय सांगावं आपणाला ? । मरणाचा तडाखा सर्वांला । मरणात्नं कोणी नाहीं चुकला । तुमचा दरारा साऱ्या जगाला । तुम्ही धीर द्यावा दुसऱ्याला । पण आज पुत्रप्रेमानं बेहोष झाला । सापानं केलं घायाळ कसं मुंगसाला ! ॥ काळोखानं खाल्लं सूर्याला । हरणानं हैराण केलं कसं सिंहाला ? ॥ आग लागली कशी पाण्याला ? । काय आलं मरण अमृताला ? । सुभेदार ! शूर वीर झाला । तुम्ही भीष्मासारखे आम्हांला । तुम्ही द्यावा धीर आम्हांला । शत्रूनं जोर फार केला " ॥ हे शब्द दादांचे भिडले त्यांच्या हृदयाला । मल्हारराव शांत जाहला । पण क्षणांत लालेलाल झाला । अन् घनघोर केलं प्रतिज्ञेला, । " कीं सुरजमल जाटाचं डोकं तोडीन अन् कुंभेरीची माती यमुनेंत खणून टाकीन तरच बापाच्या पोटीं जन्म घेतला । नाहीं तर करीन प्राणान्त " सिंह गर्जला ! ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

हीं बातमी कळली जाटाला । घाबरून गेला । बोलला आपणाला । ' दिवस भाग्याचे संपले खास । नाश काल दिसतो माझ्या डोळ्यास । कोणी येईना मदत करण्यास ॥ काय जावं शरण गनिमाला । किंवा

युद्धाला ।। बायका पोरांला । करुनिया ठार, जावं चालून । अन्न, दारु-गोळा गेला संपून । करावं काय ! गेली बुद्धी गुंगून ।। चाल ।। हणसया ( अनुसूया ) जाटाची राणी बोलली त्या वेळा ।। " एक मसलत सांगतें तुम्हांला । शिंद्याचा अन् तुमचा पूर्वापार फार स्नेह झाला । तरी जावं त्यांच्या भेटीला । अन् वश घ्यावं करून या वेळा । हा एकच उपाय दिसतो बाई मला " । हा सल्ला पटला जाटाला । अन् पाठवलं शिंद्याकडं **तेजीराम** वकिलाला । तेजीराम रात्री चालला । किल्ल्याच्या बाहेर पडला । अन् शिंद्यांच्या छावणीमधिं गेला । तेजीराम बोलला शिंद्याला । " जाटाचं सांगणं तुम्हाला । कीं होळकरांनीं केलं प्रतिज्ञेला । कीं कुंभेरीचा किल्ला खणीन आणि यमुनेंत टाकीन म्हणून—अशा वेळीं तुमच्या-वीण जावं शरण कोणाला ? ।। भावासारखं समजा हो मला । द्यावं अभयवचन भावाला ! तुम्ही विष्णुसारखे हो मला । यावं गजेंद्राच्या मोक्षाला । नाहींतर तुम्हींच ठार करा मला " । असा तेजीरामानं निरोप सांगितला । अन् जाटाची पगडी त्यानं घातली त्यांच्या डोक्याला ।। अन् शिंद्याच्या घेतलं पगडीला । पगडीभाई झाल्यावर पोटचं द्यावं पण पाठचं देऊं नये—असा शिष्टाचार जाहला । तेव्हा शिंदे बोलले आप-णाला ।। चाल ।। " कसोटीचा काळ हा आला । दोन्हीकडून मरणाचा घाला ।। जाटाला जवळ जर केला । तर स्वामिद्रोह पदराला ! ।। जर जवळ नाहीं केलं त्याला । तर मित्रद्रोह नशीबाला" ।। पण शेवटीं निश्चय केला । सोडूं नये शरण आलेल्याला ।। जयाजी शिंदे मग बोलले तेजीरामाला ।। जा सांगा जाऊन जाटाला । कीं भिऊं नका, करिन मदतीला " ।।चाल।। असो असा कांहीं काळ गेला । तितक्यांत प्रकार काय झाला । नागोरचा राजा **रामसिंग** शिंद्याकडं आला ।। अन् जयाजीला बोलूं लागला । " महाराज ! शरण तुम्हांला । माझा चुलत भाऊ बिजेसिंग माझं राज्य बळकावुन बसला । होळकर साहाय्य झालेत त्याला । मागाल तें देतों

तुम्हांला । पण चला माझ्या मदतीला " । जयाजीला आनंद झाला । कुंभेरीस्नं निघून जायला । हा प्रसंग आयताच चालून आला । जयाजी शिंदे राघोबाला गेले भेटायला । अन् बोलले दादासाहेबांला । "खावंद ! ऐका शब्दाला । तीन महिने झाले तरी कुंभेरी येइना हाताला ॥ आपले पदरीं फौज भारी–एक जागीं बसून या वेळा । मसलत बुडेल–हें ठीक नाहीं दिसत मला । जाटाच्या पारिपत्याला । तुम्हीं राहावं–मीं जातों मारवाडप्रान्ताला " असं म्हणून जयाजी शिंदे निघून हो गेला ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

दुसरे दिवशीं उठून पहाटेला । नगारा केला ॥ शिंद्यांची फौज चालली नागोराला ॥ तीस हजार होती गणतीला । नागोरला वेढा घातला । बिजेसिंग त्याच्या आंत कोंडला ॥ आठ महिने बिजेसिंगानं किल्ला लढवला । आठ महिने शिंद्याचा गोळा रोज धडकला । भडिमार यंत्रांचा रोज मारा चालला ॥ बिजेसिंग हैराण झाला । काय खावं चिंता फौजेला । किल्ल्यांतला दारुगोळा सरला । घाबरून गेला ॥ जीं ॥ त्यानं मल्हाररावांला लिहिलं पत्र त्यावेळा ॥ कीं "आपल्या मदतीची खात्री आम्हांला । म्हणून आम्हीं सामना सुरूं केला । आतां आमचा पार चोळागोळा झाला । अजून कसल्या करता विचाराला ? । या ! लागला फास जीवाला । आशेचा तंतु तुम्ही झाला । या, दया दाखवा दीनाला" होळकरानं पत्र वाचून । त्याला पत्र लिहिलं धाडून ॥ शिंदे आणि होळकर जाण । पेशव्यांचे सरदार दोन ॥ शिंद्याशीं उघड वैरानं । कसं यावं बोला आपण ॥ दुसऱ्यांना पत्र देऊन । तुम्हांला मदत करवीन ॥ जर नाहीं आले मदतीला कोण । तर युक्ति घ्यावी ऐकून ॥ **मोंगलाई मसलत** करून । हा कांटा काढा उपटून ॥ बिजेसिंग बोलला लोकाला ।

"सव्वा वर्ष झालं युद्धाला। तरी गनीम घेरा घालून वसला। असा येणार नाहीं वठणीला। याला दुसराच एक उपाय पाहिजे केला। कोण आहेत तय्यार सतीचं वाण घ्यायला?। खास मरण लिहिलं कपाळाला। पण मरणातनं कोण बरं सुटला?। पण असं मरावं कीं ज्यानं कीर्ति होईल त्रिलोकाला"। तीन वीर तंवा पुढं सरला। अन् बोलला–"काय हुकूम द्यावा आम्हांला"। बिजेसिंग त्यांना बोलला। "तुमच्या रक्ताची तहान कट्यारीला। द्या रक्त तुमचं आज मला। तुमचा बळी पाहिजे देवीला। "ठीक घ्यावं" वीर बोलला। मग बिजेसिंग कायसंच त्यांच्या कानांत बोलला। तवा भिकाऱ्याचा वेष त्यांनीं केला। फाटलेलीं वस्त्रं अंगाला। रात्रीच्या तिसऱ्या प्रहराला। किल्ल्याच्या बाहेर चालले वीर ते वेळा। अन् शिंद्यांच्या लष्करांत शिरले दुसऱ्या दिवसाला॥ ४॥

● ●

## चौक ५ वा

देवाच्या डेऱ्यापुढं शिंदे गेले स्नानाला। चार घटका होता दिन आला॥ घोड्यांची पागा ती जवळ एका बाजूला। किती घोडा होता बांधलेला॥ त्याच्या पुढं होता तोबऱ्यांतला दाणा सांडलेला॥ (तिथं) तीन भिकारी दिसला डोळ्याला। दाणा वेंचत होता बसलेला। इकडं शिंद्यानं केलं स्नानाला। अन् चौरंगावर उभा राहिला। अन् लागला अंग पुसायाला। खिजमदगार गेले भांडीं ठेवायला। अबदागिऱ्या छत्र धरून राहिला। शिंद्यांनीं घेतलं धोतर डोळे पुसायला॥ दोन्ही डोळे झांकले अन् लागले डोळे चोळायला। तों इतक्यांत प्रकार काय झाला। भिकाऱ्यांनीं सटनं हल्ला केला। अन् भोसकला बरगडींत सुरा!। एक

सुरा भिडला आंतड्याला । त्यानं आंतड्याचा चोळागोळा झाला । मांस लागलं बाहेर लोंबायला । रक्तानं लालेलाल झाला । तिसरा वार पाठीवर झाला । आली घेरी जयाजी शिंद्याला । अन् पडले धाडन् जमिनीला । इकडं तिघं भिकारी लागले पळायला । अबदागिऱ्यानं आरडाओरडा केला । अन् केले ठार एकाला । चोहोकडनं लोक धांवत आला । तों दुसरा भिकारी पडला नजरेला । ससेहोलपट होऊन दुसरा ठार झाला । पर तिसरा निसटून गेला पार नागोराला ॥ अन् भेटला बिजेसिंगाला । बिजेसिंग बहुत खूष झाला । अन् बोलला । " आतां गानिम म्हणजे काय पदार्थ ?। चढत्या घोड्यानिशीं कापून काढूं त्याला ! " । असं म्हणून किल्ल्याबाहेर आला । गानिमावर हल्ला करण्याला दौड चालला ॥ शिंद्याच्या फौजेजवळ आला ! । पर इकडं काय प्रकार झाला । छावणींत आकांत झाला । दत्ताजी धांवत आला । तों हृदय फाटलं त्या वेळा ॥ चाल ॥ धैर्याचा मेरु गडबडला । रणसिंह शोकानं भरला ॥ डबडबला पाण्यानं डोळा । पाहून पुढं भावाला ॥ जयाप्पा घायाळ झाला । रक्तानं होता भरलेला ! ॥ मातींत होता पडलेला । चिखलांत लोळागोळा झाला ॥ तेज कसलं नुरलं डोळ्याला । मृत्युचा फांस कंठाला ! ॥ चाल ॥ मिठी मारली घट्ट भावाला । अन् दत्ताजी रडूं लागला । तंवा जयाजी लागला बोलायला । " अरे ! वैरी आलाय दाराला । अन् असा रांडेसारखा रडतोस काय ?। जा, लोळव पहिल्यांदा त्याला । जा, उभा जाळ दुस्मन सारा । जा, लाव तलवार त्याच्या नरडीला । हें योग्य क्षात्रधर्माला । नाहींतर लागेल कलंक नांवाला । आतां ! कांहीं होत नाहीं मला " ॥ चाल ॥ जयाजीचे शब्द ऐकून । दत्ताजी गेला चालून ॥ फौजेला फौज भिडवून 'जय महादेव' गर्जून ॥ सुरू केला जंग खवळून । किती वैरी काढले कापून ॥ पळ काढला बिजेसिंगानं । किल्ल्यांत गेला परतून ॥ चाल ॥ दत्ताजी शिंदे परतला । शाहाजणें वाजवीत दौड भावाकडं आला ॥

जयाजीनं डोळा उघडला। अन् दत्ताजीला बोलला। "काय गोष्ट आहे बोला!"। दत्ताजी बोलला भावाला। "शत्रूंचा फन्ना उडवला। बिजेसिंग परतून गेला"। जयाजी बोलला मग त्याला!! "शाबास! राखलंस नांवाला। पण आज नाहीं उद्यां-कर ठार बिजेसिंगाला। शेवटचा शब्द हा तुला"। असं म्हणून जयाजी शिंद्यांनीं डोळा फिरवला॥ अन् गेले स्वर्गलोकांला। असं यावं वीराचं मरण आम्हां सर्वांला॥ ९॥

रचना-इ. स. १९३६

मराठी ... स्थळप्रत
अनुक्रम ... वि: काव्य
... नों. दि: 2019148

# वीरांगना शशिप्रभा देवी

## हिचा

## पोवाडा —— : २ :

किती कोमलांगी सुंदरी। जाईची कळी। तरी पण उरीं। जशी काय होती कठीण हिरकणी॥ बादशाहा गारेगार झाला। पाहून जिला। अशी कोण अबला। सांगतो तुम्हांला। झाली या जनीं॥ ध्रु०॥

• •

### चौक १ ला

दिल्लिपति बादशहा अकबर। मोठा चतुर। राजा हुशार। होती त्याची सत्ता भरतखंडात। तंवा त्यानं केला मोठा आकांत। कसा काय सांगतो ठेवा चित्तांत॥ तो होता मुसल्मान जरी। कधीं कधीं तरी। लावुनी शिरीं। गंधाचा टिळा॥ कधीं कधीं दरबारीं येत। आणि हिंदु प्रजा झुलवीत। परि त्याच्या मनींचा हेत होता वेगळा !॥ जसे दोन्ही डोळे झांकून। समाधि लावून। धरुनिया मौन। ध्यान करि बगळा नदीच्या तिरीं॥ तसा ढोंगी राजा अकबर। भुलवून हिंदु नारी नर। पसरुनी मोहाचं जाळं। ओढी कितीकांना त्याच्या अंतरीं॥ औरंगजेब दुस्मान खरा। कापी सरसरा। पण याच्याहुन बरा। होता त्याचा सारा उघडा कारभार। फिरे देशभर घेऊन तलवार। करि कितिकांना हातोहात ठार !॥ बाहेरचे रोग किति जरी। गांजती परोपरी। बरे ते तरी। रोग परि आंतला मोठा दारुण॥ कसा केव्हां घेईल प्राण

सांगेल सांगा हें कोण । आज या स्थळा ! ।। चाल ।। विषवृक्ष किती जरि फुल्ला । तरि कोण कवटाळिल त्याला ? ।। जरि रम्य अग्निचा गोळा । तरि कोण झेलील त्याला ? ।। गळफांस मऊ मऊ झाला । तरि बांधील कोण कंठाला ? ।। चाल ।। एक मोहपाश अकबराचा सांगतों तुम्हांला ।। ही गप्प नव्हे, इतिहास असे साक्षीला ।। यावरनं त्याचं हृदय कळेल तुम्हांला ।। चाल ।। उघडला मीनाबाजार । अकबरनं आग्रा किल्ल्यांत ।। बायकांना खुला बाजार । पुरुषांना मज्जाव त्यांत ।। हरएक चीज त्या जागीं । ठेवलेली होती हो आंत ।। बाजार कसा फुलवला । सांगीन पुढच्या चौकांत ।। १ ।।

• •

## चौक २ रा

बाजार कसा भरविला सांगतों तुम्हांस ।। चाल ।। माणिक, मोती, प्रवाळ, सुंदर । हिरा, नीळ, गोमेध हि पुष्कर । सूर्यकांत, लसण्याहि सुंदर । छत्रपती ही रत्न भरपूर ।। अलंकारही किती तऱ्हेचे । सोन्यामोत्यांचे रत्नांचे । पाहुनि ज्यांना मन हें नाचे ।। बाजुबंद, गोखरूं, हातफूल । बिंदी, दावण, तोडा, साखळ, । हिराकंठ, कंदोरा, सुंदर । वाळी पेंदाहार, कर्णफूल । कुबेर अलकापुरी सोडूनी । जणु वाटला तिकडे आला । अशी मयसभा सजवायला ।। वस्त्र किती जरतारी झळकती । शालू, शेले, पैठण्या, चमकती । किती पितांबर उघडूनि बघती । गिऱ्हाइकांची गर्दी चढती ।। चाल ।। अत्तरें किती वासांचीं ठेवलीं । उटणी ही अंगशोभेची मांडली । भांडींही नाना घाटांची लावली ।। चाल ।। बाजार असा पाहून । हरकलं मन । गेल्या मोहून चटकचांदण्या ! ।। चाल ।। हळुहळु गर्दी वाढली । बायकांची दिसादिस अती । सुकुमार तरण्या सुंदरी । रोज नव्या नव्या झळकती । छुमछुमे पायीं

झांजरी । रुणझुणती नुपूरं अती ॥ साळुंक्या मैना हो जशा । तशा गोड गोड बोलती ॥ मदनाची फौज पाहुनी । घायाळ झाले महामती ॥ चाल ॥ मज्जाव होता पुरुषाला । पर एक आंतल्या बाजूला खोलीमंदि वसला ॥ आणि तिथ्नं पाहतो सर्वांला । मग बोलावून एका वेश्येला । कामगिरी सांगतों तिला ॥ चाल ॥ तरुणींच्या जवळ जाऊन गोड बोलून । मोहाच्या जाळ्याच्या आंत त्यांना पकडून । त्यांना गोड गोड सांगून जाई घेऊन । कुंटीण खोलिच्या आंत । जणूं नरकांत नेई ओढून !! ॥ चाल ॥ मग येई तळघरांतून । एक पुरुष वरतीं खोलींत ॥ वेश्येला देऊन बक्षीस । तिथ्नं तिला पाठवून देत । मग दार करुनिया बंद । घेतो सुंदरीची इज्जत ! ॥ अशा त्यानं भोगल्या किती । दादांनो ! नाहीं परिमित ! ! ॥ चाल ॥ पण सांगावा जाच कोणाला ? । जर - राजा नीच असा झाला ! । गरतींच्या घेतो अब्रूला । किती स्त्रिया लागल्या झुरणीला । कितीकिनीं वीष खाऊन प्राण सोडला ॥ कितीकिनीं फास लावून प्राण सोडला ॥ मानुनी पतित आपणाला । कितीकिनीं धर्म सोडला । जसा उपाय जिला जिला सुचला । तसा तसा उपाय तिनं केला ! ॥ झाले पुरुष षंढ कुतरडे । ज्यांना पाहून आर्यभू रडे ! । नरकांतले जणू काय किडे । नामर्द दीन बापडे । फटकारा पाठीवर उडे ! । तरि क्रोध मुळीं ना चढे । शांतीचे जसे काय कडे ! ॥ चाल ॥ अशा वेळीं उपाय काय केला । स्त्रियांनीं त्या वेळा । सांगतों तुम्हांला । ठेवावा बोल सदा चित्तांत । ऐका दादांनो ! पुढचा वृत्तांत । सांगिन आतां पुढच्या चौकांत ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

पृथ्वीराज सरदार दरबारीं होता एक नरवर । तयाची नार बहुत सुंदर ॥ चाल ॥ अंगलोट भरदार देखणी । रती लाजली तिजला बघुनी ।

फिक्कट पडली शुक्रचांदणी। गगनीं लपला चंद्र लाजुनी। लांब सडकसे केस गुंफुनी। केली तयाची सुंदर वेणी। त्यांत फुलांची मोहक वेणी। दोन बाजूंना वसले दबुनी॥ भांग मधोमध छान शोभला। जणुं मदनाचा मार्ग वाटला। ओढुनि नेई मनहरिणाला। केशपाश गुंतविती त्याला। मनोभृंग पण तिथेंच रमला। आकंठ करी मधुपानाला। तिथंच वेडा रंगुनि गेला॥ नयनांचा बहु नोक मनोहर। गालावरची खळी नयनहर। मुखकमलाचा सुंदर परिमळ। करतो उद्दीपित कामानल। झणझण झणती चरणीं झांजर। कंकणरव ही श्रवणा मंजुळ॥ चाल॥ असो आतां ऐका गोष्टीला। तिच्याकडं कांहीं जणी गेल्या। अन् बोलल्या,– "शसप्रभादेवी। लाज वाटते गोष्ट सांगायला। पण काय करावं! उपाय नाहीं दुसरा। मीनाबाजार बाजार नांवाला। पण धिंडवडा अब्रूचा चालला!। एक पशू मोठा मातलेला। धुडगूस घाल्तोय आंतल्या बाजूला। कितिकींच्या झोंबला अंगाला। पण सांगावं कुणाला बाई बोला?। कितिकींच्या अब्रूवर घाला। दररोज नेमानं आला। याचा बंदोबस्त कांहीं होईल या आशेनं आलों सांगायला"। शशिदेवी बोलली त्या वेळा। "बायांनो! सोडा चिंतेला। मीच लावतें गोष्ट शेवटाला"। तंवा साऱ्या बोलल्या हो तिला,। "बाई, हें काय! आपण नका जाऊं त्या जागेला। कशा नक्षत्रासारख्या तुम्ही झाला। तारुण्याचा बहर अंगाला"। शशिदेवी बोलली त्या वेळा। "करूं नका माझ्या चिंतेला। देव येईल माझ्या मदतीला"। असं म्हणून चालली ती बाई मीनाबाजारला॥ तिनं कट्यार घेतली लपवून आंतल्या बाजूला। अन् झपाझपा चालली ती अबला। किल्ल्याच्या आंतल्या बाजूला। अन् बाजार लागली बघायला॥ चाल॥ सुंदरी गोड पाहून। बादशहा गेला हुरळून!॥ लगबगा आली कुंटीण। आणि बोलली मोठ्या प्रेमानं॥ "मी इथं दलाली करून। पोट भरतें धंदा करून॥ चाल॥ काय हवं बाई आपणांला। काय? जवाहीर?। इथं फसव्यांचा

बाजार हा झाला । बघतां बघतां फसवतील तुम्हांला । एक जवाहिऱ्या दावतें तुम्हांला । तिथं खात्रीचा माल मिळेल आपणाला । " असं म्हणून चालली कुंटीण घेऊन तिला ॥ चाल ॥ एका खोलीच्या आंत नेऊन बोल्ली वेश्या मग तिला ॥ " बैस, सखे सुंदरी जोहरी आणतें बोलावुन जरा ॥ रत्नं पाणीदार किती पसरलीं पाहात बैस ग जरा ॥ बोल बोलुनी निघुनी गेली, कुंटीण सोडून तिला ॥ चाल ॥ पुढं काय प्रकार झाला । एक जोहरी जिन्यावरनं आला ॥ शशीप्रभा त्याला पाहून बिचकली जरा ॥ अन् बाहेर पडायचा विचार तिनं केला । पण जाण्याचा रस्ता बंद झाला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

तिला पाहून । नरपशू बोलला सलगीनं ॥ चाल ॥ "बोल सुंदरी, मीच जौहरी काय हवें तुजला । दिल्लीपति दास तुझा बनला ॥ रूपसुंदरी ! तुला पाहुनी प्राणच गुदमरला । म्हण मला सुंदरि ग आपला ॥ स्त्रिया बहुत मज पट्टराणी परि करिन मी ग तुजला । धन दौलत देईन तुजला ॥ बहुत देखिल्या स्त्रिया मधुरपर तुजसम नच कोणी । खुपसुरत ऐक ग रमणी " ॥ चाल ॥ बादशाहाचें बोलणें ऐकून । उसळली नार नागीण ॥ उसळून बोल्ली गर्जून ॥ बोल ! नीचा ! तोंड आवरून ॥ मोहाचं जाळं बांधून । मला इथं आणलं फसवून ॥ चाल ॥ एवढ्यासाठीं कां हा बाजार भरवला । कितीजणींच्या भंगलंस अब्रूला । पापाचा घडा आज भरला " । अकबर बोलला मग तिला । " ए माषूक ! किती जरी राग आतां आला । तरि कोण येणार तुला सोडवायला ? ॥ " " देव येईल माझ्या मदतीला " । " बोलाव पाहूं तुझ्या देवाला " । असं म्हणून चालला लगट करायला । त्यानं तिचा डावा हात धरला । अन्

दुसरा हात लावणार होता छातीला । इतक्यांत वाघीण बोलली हो त्याला । “ बेशरम । कुतरड्या ! आतां भोग आपल्या कर्माला । हा बघ माझा देव आला ! ” असं म्हणून कट्यार तिनं मारली त्याच्या हाताला ।। तवा लागलं रक्त सांडायला । तिनं धक्का मारला एक त्याला । त्यासरशी पडला धरणीला । तंवा लावणार होती कट्यार त्यांच्या आंतड्याला । तंवा बादशहा भयभीत झाला । अन् बोलला । “ बाई ! गुन्हेगार मी, क्षमा कर मला । दुर्लौकिक होईल या वेळा । तूं माझ्या आईसारखी मला । आजपासून मीनाबाजार बंद केला । कुराणाची कसम खाऊन सांगतों मी तुला ।। असं गांजणार नाहीं कोणाला । जीवदान आज दे मला ” । मग बोलली क्षत्राणी त्याला । “ एक वेळ सोडीन तुला । पण पुन्हां जर असा बोंभाटा झाला । तर पाहा काटीन तुला । कशी कोणत्या वेशानं येईन । हें कळणार नाहीं कोणाला ” । बादशाहनं मीनाबाजार बंद हो केला ।। चाल ।। पुरुषांनो, ठेवा हृदयांत । हें धैर्य एका अबलेचें ।। लाजवलं पुरुष जातीला । आपणाला काय पण त्याचें ? ।। आम्हीं आपले कैक वर्षांचे । आधारस्तंभ शांतीचे ! ।। जसे थंड गोळे बर्फाचे । अवतार शंभू देवांचे! ।। भगिनींनो ! ठेवा चित्तांत । हें शौर्य एका अबलेचें ।। द्या भित्रेपण टाकून । सार्थक करा जन्माचें । व्हा शूर वीर गंभीर । वाढवा तेज राष्ट्राचें । ।। चाल ।। **पांडुरंग** गातो हें कवन । रसिक तुम्ही म्हणून । अर्पितो चरणा । कवनाचं लावलं तुम्ही वेड ! पुरविलं माझं तुम्हीं कोडं । घ्या बोल करूनि हे गोड । विनंती चरणा ।। जी ।। ।। ४ ।।

रचना-इ. स. १९३६

# पानपतचा रणसंग्राम !

## पोवाडा —————— : ४ :

किती पिचले माणीक मोती । पानपतावरती । त्यांची नाहीं गणती । कष्टली धरती । केला संहार ॥ दीडलाख फुटली बांगडी । घरोघर चालली रडारडी ।.जसें झालें युद्ध द्वापारीं । कौरवकुळीं । तसा कुरुक्षेत्रिं माजला कळिकाळ । पोवाडा पांडुरंग गाणार ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

निजामाची करुनि धुळदाण कीर्ती मिळवून । मराठ्यांच्या ढाला पटदूरला आल्या वेगानं । कीर्तीच्या झडती नौबती करती गुणगान । आनंद भरला त्रिभुवनीं । विजयश्री आले घेवुनी । गुढ्या तोरणें चढलीं घरोघरीं । वाद्यें परोपरी । झडती आवडीनं ॥ जी ॥ भरविला मोठा दरबार । जमले सरदार । ल्हान आणि थोर । जागजागीं बसले आपल्या जाऊन । जसं शोभलं रम्य तारांगण । मधें चंद्र **विश्वास** छान । तेजानं भरलं त्रिभुवन । गेले वैरी सारे थरारुन । हाय खाऊन ॥ स्वराज्याचा वृक्ष बहरला । पुष्पभार आला । वास दरवळला । छायेखालीं गायमाता बैसली । मुळीं तिच्या भीति ना उरीं । कीं मानेवर येईल सुरी । विश्वास भरला अंतरीं । **शिवाजीचा** हेतु साधला । वाटलं लोकांला । हायसं अंतरीं ॥ चाल ॥ नाचती कलावंतिणी । रंगून ॥ उडवती रंग दरबारीं । रंगून ॥ तनानाना गाती गाणारे । रंगून ॥ सलकडी मोत्यांच्या माळा । दिल्या सर्वांला । पागोटें शेला । झाले आनंदी शिपाई सरदार । कित्येकांना दिले रत्नांचे हार । जणु काय कुबेराचा दरबार ॥ दैत्यांचा मोड करून । मोठ्या हर्षानं । दंग होऊन । बसले जसे देव सिंधुच्या तिरीं ।

किंवा रावणाचा नाश करून । जमले कपिगण । सारे पटदुरीं ॥ चाल॥ जयनाद असा चालला । पर अघटित दैवाची लीला । जासूद एक त्या जागीं हळु हळु आला ॥ अन् पत्र दिलं नानासाहेबाला । लखोट्यांतनं पत्र काढून वाचूं लागला ॥ तो काळवणला त्याचा चेहरा । पाण्यानं डोळा डबडबला । सरदार सारा बोलला । " खावंद ! खबर काय बोला " । हुंदक्याचा आला उमाळा । तोंडावर दुःखाची कळा । पीळ पडला त्याच्या हृदयाला । नानासाहेब बोलूं लागला ! । " दत्ताजी शिंदे ठार झाला ! । दत्ताजी लढाई करतांना होता घायाळ झाला । आणि होता जमिनीवर पडला । तंवा कुतुबशहा त्याच्याजवळ गेला । अन् पायानं लाथाडलं त्याला ! । मग मानेत्नं त्याच्या नीचानं सुरा खुपसला ! ॥ आणि डोस्कं कापून घेऊन गेला । असा मृत्यु आला सिंहाला । कुतऱ्यानं अपमान केला । **होणार ते चुकेना दैवाला !** " ॥ चाल ॥ मुखकमलं वाळून गेलीं । तीं गेलीं । काळाची चक्रगति फिरली ! ॥ सुखसरिता सुकुनी गेली । ती गेली । दुःखांची झड सुरूं झाली ॥ मौजेची चालली दिवाळी । दिवाळींत आली ही होळी ! ॥१॥

● ●

## चौक २ रा

सूडाची भडकली ज्योत । जळत्या हृदयांत । ठिणग्या उधळीत । पेटवीत चालली शूर हृदयास । रात्रंदिन लागला सूडाचा ध्यास । 'सूड' 'सूड' चैन देईना चित्तास ॥ उदगीरला तलवारी भाले । भारी रंगले । रक्त फार प्याले । नव्हती पर भागली त्यांची हो तहान । तहान रक्ताची घाली थैमान । थैमान घालती झाले बेभान ! ॥ **सदाशिवराव** सेनापति वीर । मोठा झुंजार । लढवय्या थोर । **विश्वासराव** बाल पेशवे सुकुमार । सतरा वर्षांची उमर, नाहीं फार । चालले घेऊन मोठा दळभार !

|| चाल || षाण्णव कुळिचे क्षत्रिय जमले । दमाजी गायकवाड चालले । यशवंतराव पवारहि आले । सोनजी भापकर, हरि दामोदर, विठ्ठल शिवदेव, तुकोजी पवार, । आप्पाजी जाधवराव चालले । आनंदराव पवार, ठानगे । शिंदे राणोजी, आणि शिवनेरे । गोविंदपंत, संताजी आटोळे । समशेरबहाद्दर सामील झाले । इभ्रामखान गारदीहि चालले । असे कैक रणवीर उसळले । एक लाख रणशूर तळपले ॥ चाल ॥ असा सेनासागर उत्तरेला चालला ॥ जरीपटका पुढं आणि भगवा झेंडा शोभला ॥ विश्वासराव सुकुमार चन्द्र शोभला ॥ घोडदौड लाटा उसळती । तलवारी मासे तळपती । ढाला कासवासारख्या शोभती । तोफा मगरी जबडे उघडती । तीरकमटे साप भासती । गर्जना करती नौबती । रणवीर रत्नं झळकती । गोळे काळकूट वाटती । असो, असा वीर चालला । बऱ्हाणपुरला झरझरा गेला । तिथ्नं गेला सारा आग्र्याला । मग सरोजसिप्रानरवरावरनं चालला ॥ ग्वाल्हेर, ढवळपूर, मथुरा । सरासरा चालून गेला । साडेचार महिन्यांनीं पोहचले **भाऊ** दिल्लीला ॥ दिल्लीला मोर्चा लावला । अन् धडाक्यानं किल्ला सर केला । वर भगवा झेंडा फडकला । ऐटीनं डोलूं लागला । पहिल्यान्दाच सदाशिवराव गेले असे दिल्लीला ॥ जसं धनं मिळावं लोभ्याला । अन्नाचं ताट भुकेल्याला । थंडगार पाणी तहानेला । रामाची भेट भरताला । पाण्याचे थेंब चकोराला । दृष्टीचा लाभ अंधळ्याला । तसा हर्ष झाला भाऊला । पण पैशाची टंचाई त्याला । पातशाच्या तख्ताकडं गेला । चांदीचं छत सदरेला । तिकडं पाहून **भाऊ** बोलला । " चला, फोडा, छत चांदिचं पुरेल गरजेला " ॥ तंवा **सुरजमल जाट** बोलला । " भाऊसाहेब ? ऐका शब्दाला ! पातशाही तख्ताची जागा मर्यादेची आहे ! इतिहास पांच शतकांचा यांत राहिला । आम्ही पूर्वापार नोकर पातशाहीचे । आम्हां देखत तरी करूं नका असल्या गोष्टीला । आणि आज जर आपण असला

प्रकार केला । तर दुखवाल कैक लोकांला " । भाऊसाहेब बोल्ला मग त्याला । " इथं पांचशें वर्सांचा इतिहास राहिला म्हणूनच फोडतो आज याला " । असं म्हणून त्यानं छतावर घांव मारला ! ॥ पण घावानं कितीक हृदयांचा तुकडा काढला ! ॥ सोन्याचा हरण कधिं सांगा कुणी पाहिला ॥ पण श्रीराम मोहून गेला ! । **होणार ते चुकेना दैवाला** ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

नदीपार होता अबदाली फौज घेऊन । त्यानं ऐकली दिल्लीची दशा (वार्ता) गेला खवळून । पर यमुनानदी मधें चालली दुथडी भरून । मंत्रानं साप मारावा । किंवा पिंजऱ्यांत सिंह कोंडावा । अबदाली तसा तडफडला । झाला बेभान ! ॥ चाल ॥ दिल्लीचा किल्ला मजबूत । गेला मराठ्यांच्या हातांत ॥ राजधानी घेतली कबजांत । शत्रूवर केली हो मात ॥ मराठ्यांचे घोडे दिल्लींत । मिरवीत डौलानं जात ॥ फडफडे झेंडा गगनांत । आशेचा बाग फुलवीत ॥ चाल ॥ दिल्लीचा बंदोबस्त केला । दुराणीशीं सामना देण्याला । त्यांनीं होता सरंजाम केला । पण अबदाली नदीपार राहिला । तंवा भाऊसाहेब बोलले सर्वांला । " सध्या जावं कुंजपुऱ्याला । तिथं कुतुबशाहा तळ देऊन बसला । महंमदखान कत्तलबाज आहे त्याच्या मदतीला ॥ पंधरा हजार फौज दिमतीला । आधीं त्यांचा करूं या चोळागोळा । आतां दिल्लीचा लोभ कशाला ? " । तंवा सुरजमल जाट बोलला । " भाऊसाहेब ! बेत ठीक झाला । पण ऐकावं माझ्या बोलाला । पुन्हां तख्तावर चढवा छताला । दिल्लीची वजिरी द्यावी गाजुद्दीनाला ॥ अशानं कांहीं मनं मिळतील आपणांला ॥ आणि जरी गेला कुंजपुऱ्याला । तरी सोडूं नका दिल्लीचा किल्ला । कांहीं फौज

ठेवा दिल्लीला । पुरवीन रसद तुम्हांला " । भाऊनं जुमानलं नाहीं त्याला । आणि दिल्लीचा तावा सोडून चालला त्या वेळा ! ॥ **होणार तें चुकेना दैवाला** । असो, त्यांनीं गांठलं कुंजपुऱ्याला । तो कुतुबशाहा आला लढाईला ॥ चाल ॥ खणाखणी झाली घनघोर । बाणांचा केला बहुमार ! ॥ तोफांचे गोळे भरपूर । कितिकांना केलं रणीं ठार ! ॥ धडा धडा धडकती वीर । गर्जना करती ' हर, हर ' ॥ कचाकचा कांपती शीर । खळखळली रक्ताची धार ॥ चाल ॥ घनघोर संग्राम झाला । मराठ्यांनीं एकच धौशा केला । चोहोंकडून जोराचा हल्ला । लांडगेतोड झाली त्या वेळा । यवनांची केली धुळदाण धुव्वा उडवला ! ॥ दमाजीनं धरलं कुतुबशाला । ( यानंच मारलं होतं दत्ताजी शिंद्याला ) । अन् भाऊकडं धाडलं हत्तीवरनं त्यानं हो त्याला ॥ पण भाऊनं पाहिलं जंवा त्याला । तंवा रागानं भाऊ भडकला । रोमांच अंगावर चढला । अन् भाऊ बोलला, " एवढ्या प्रतिष्ठेनं कशाला पाठवलं या नीचाला ? । हत्तीवरनं द्या लोटून त्याला " । कुतुबशाहानं ऐकलं शब्दाला । हत्तीवरनं उडी टाकून आला । पुढं काय प्रकार झाला । तो सांगीन पुढच्या चौकाला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

उडी टाकली हत्तीच्यावरनं । कुतुबशाहानं । घातलं बांधून । साखळदंडानीं तेव्हां त्याला । भाऊपुढं आणून हजर केला । भाऊनं दांत ओठ चावला ! ॥ चाल ॥ भाऊसाहेब बोलले मग त्याला । " बोल ! काय बोलायचं आहे का तुला ? " । तंवा कुतुबशहानं विचार केला । " आतां जिवें मारणार भाऊ खास मला । मग लाचारपणा कशाला ? " । मग बोलला भाऊसाहेबाला । " तुमच्या मनांत काय आहे बोला । जर असेल

मनांत, तर तुमचा आणि अबदालीचा करून देतों सल्ला ।। नाहींतर घ्या पन्नास लाख रुपये आणि आज मुक्त करा मला । तेंही नको असेल तुम्हांला । आणि असेल हिंमत तर आजपासून पंधरा दिवसांत पुन्हां येतों लढाईला । तेव्हां मरायची तयारी तुम्ही करा " ।। चाल ।। हे त्याचे शब्द ऐकून । भाऊसाहेब गेले खवळून ।। दांत ओठ चावले जोरानं । डोळे इंगळासारखे करून ।। रागानं झाले बेभान । आणि बोलले त्याला गर्जून ।। " नीच्या, कुतरड्या ! दत्ताजीला लाथाडणारा तूंच ना ? अन् तूंच ना त्याचा शिरच्छेद केलास ? आतां तसंच मारलं पाहिजे तुला " । तंवा कुतुबशाहा बोलला । " होय, होय, मीच दत्ताजीला कचाकचा तुडवला । त्याच्या डोळ्यांत फेकलं मातीला । तें मुंडकं लावलं भाल्याच्या टोकाला । आणि शाहाजणे वाजवीत हाच कुतुबशहा गेला ।। तुमची सुद्धां हीच गत करायला । मागं पुढं पाहणार नाहीं, बोला " ।। भाऊसाहेब बेफाम झाला । अन् बोलला,– " फरफटत न्यारे ढालेखालीं याला । आणि सट्कन् उडवा मुंडक्याला " । ढालेखालीं नेलं मग त्याला । पाणी प्यायचं होतं एकदां त्याला । पण दया येणार कोणाला ? ।। चाल ।। तलवार मानेवर आली । देहाचीं खांडोळीं पडलीं ।। जी ।। मूठमाती कोणी नाहीं दिधली । गिधाडांची गम्मत झाली ।। चाल ।। असो ! ऐका पुढच्या गोष्टीला ।। चाल ।। कुंजपुरा हाताला आला । आनंद झाला । होळकर आणि शिंदे बोलले भाऊला । श्रीकृष्ण सहाय तुम्हांला । म्हणून विजय आला हाताला । आतां जावं परत दिल्लीला । वाटतं आम्हांला " ! ।। पण भाऊसाहेब होते विजयाच्या मोठ्या धुंदींत । काना डोळा केला त्यांनीं ऐकली नाहीं मसलत । तिथं खणत्या लावून राहिले कुंजपुऱ्यांत ! ।। **होणार तें चुकेना दैवाला** । पुढचा सारा प्रकार सांगीन पुढच्या चौकाला ।। ४ ।।

• •

## चौक ५ वा

कुंजपुरा घेतला भाऊनं । एका धडक्यानं । तोफा डागून । कुतुबशाहा सैमदखान झाले ठार । गनिमानं कांपले सात हज्जार । बातमी ही गेली यमुनेच्या पार ! ॥ अबदाली रोहिला नजीबखान । बातमी ऐकून । गेले हादरुन । झाले पर दोघे रागानं लाल । मनगटं चावलीं झाले बेताल । जीवावर झाले दोघे उदार ॥ चाल ॥ रातोरात करुनी मसलत केला नगारा ॥ साठ कोस भूमि रात्रींत चाटून गेला ॥ गेला पानपत कर्णोलाला । ( तिथं ) होता गचक्या उतार यमुनेला । तिथ्नं यमुना नदी उतरायचा बेत त्यांनीं केला ॥ हस्तनाला पुढं चालला । मागोमाग होता सुतरनाला । बाणांच्या कैच्या बाजूला । मागं फौजेचा लोंढा चालला । तोफखाना नदीपार नेला । अबदाली ओलांडून नदी एकाएकीं आला ।। चाल ॥ विपरीत बातमी ऐकून । भाऊसाहेब गेले हादरून !॥ यमुनेला पूर पाहून । निश्चिंत होते सारेजण॥ अकस्मात आलं पण विघ्न । दिला मार्ग त्याला यमुनेनं ॥ चाल ॥ तंवा भाऊसाहेब बोलले सर्वांला । " इथं राहून घात जीवाला । चला जावं जल्दी दिल्लीला " ॥ तोच सल्ला मागं होता दिला । पण तंवा मानलं नाहीं त्याला । **होणार तें चुकेना दैवाला** । कुंजपुरा सोडून सारे चालले दिल्लीला ॥ पण आतां पोचणार कसे बोला ? । अबदाली रस्ता रोखून मधोमध्य बसला ॥ इकडं दिल्लीही नाहीं-अन् तिकडं कुंजपुरा सुटला । पानपतीं तळ त्यांनीं दिला । खंदक खणला भोंवताला । तोफखाना चारी बाजुला । मराठ्यांचा आधार तुटला । अबदाली छावणी टाकून समोरच बसला ॥ चोहोकडनं वेढलं मराठ्यांला । तंवा हळुहळु दाणा गोटा सरला । खजिन्यांतला पैसा पार सरला । उपासमार झाली सैन्याला । असा जेव्हां प्राणावर प्रसंग बेतला । तंवा विश्वासरावानं पत्र लिहिलं बापाला ( नानासाहेबाला ) ॥ " कीं गिलच्यांचा पेच भारी

पडला । भाऊसाहेब अभिमानी पुरुष–गारद होतील पण लिहिणार नाहींत तुम्हांला । अशा आणीबाणीच्या वेळेला । जर पन्नास हजार फौज मदतीला । अन् एक कोट रुपये खर्चीला । पाठवाल तरच दर्शन होईल आमचं तुम्हांला । नाहींतर हेंच शेवटचं पत्र । भाऊ मोहरा इरेला पडला " । विश्वासरावानं लिहिलं पत्र वडिलाला ॥ जनकोजी शिंद्यांचा सल्ला । ही गोष्ट कळली भाऊला । तंवा रागानं बेभान झाला । विश्वास आणि जनकोजीला । एकांती भाऊ बोलला । " **विश्वास** ! पत्र धाडलं कशाला ? । जर जगायचं असेल तुम्हांला । तर पोहोचवतों तुम्हां दोघांला " । तंवा विश्वासराव बोलला । " काका ! अशा आणीबाणीच्या वेळेला । लिहूं नये आपल्या माणसाला । तर काय लिहावं दुराणीला । बाकी जर नसेल आवडत तुम्हांला । तर आजपासून कांहीं लिहिणार नाहीं कुणाला " । **होणार तें चुकेना दैवाला** ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

एके दिवशीं गोविंदपंताला । भाऊ बोलला । " बाहेर तुम्हीं चला । अन्नावीण झाले कासावीस प्राण । अर्धपोटीं सैन्य झालं हैराण । पैशाचा पडला भारी हो ताण " ॥ गोविंदपंत ( बुंदेले ) बुंदेलखंडाला । खजीना आणण्याला । लगबगीनं गेला । वीस लाख रुपये घेऊन फिरला । अबदालीनं मधें रोखलं त्याला । येण्याचा रस्ता बंद केला ! ॥ दुराणीची रसद तोडण्याला । गोविंदपंत गेला । यमुनेपार झाला । अंतर्वेदीत जाऊन राहिला । राहिला पर गाफील कामाला । चुकीनं कार्यघात झाला ॥ चाल ॥ पंताचा कावा दुराणीला सहज हो कळला ॥ पंधरा हजार फौज घेऊन नजीबखान रोहिला तिकडं चालला ॥ इकडं मराठ्यांचा तळ यमुनेच्या कांठीं होता पडला ॥ रात्रीचा काळ होता झाला ।

आकाशीं चंद्र झळकला। चांदण्यांनीं खेळ मांडला। वारा मंद मंद चालला। नजीबखान तिकडं चालला। मराठ्यांच्या फौजेजवळ आला। तंवा त्यानं प्रकार काय केला। होळकरी फौजेचे झेंडे दिले फौजेला। अन् नजीबखान चालून आला। कोणी येतंय पाहून मराठा घोड्यावर चढला॥ त्यानं दिला इशारा फौजेला। कीं, दुस्मान अंगावर आला। तंवा गोविंदपंत बोलला। "छे! कसचा येतो दुस्मन! ते पहा होळकरी झेंडे! नारोशंकर आलाय मदतीला"। पण लवकरच भ्रम दूर झाला। यवनांचा घोडा चवताळून आला। तंवा सारा भ्रम दूर झाला। मराठे लागले पळायाला। पण चोहोकडनं घेरलं हो त्याला। आणि कापलीं डोकीं अगणीत, कहर गुदरला!॥ एक गनिम (मराठा) नाहीं जिवंत सोडला। गोविंदपंत घोड्यावरनं पडला। रोहिल्यानं गांठलं तिथं त्याला। लाथेनं मारलं पंताला। अन् त्यांचं डोस्कं कापून घेऊन गेला॥ नजीबखान रोहिला आणि गोविंदपंत यांचा पूर्वी फार स्नेह झाला। त्याचा बदला नजीबखानानं मित्राला दिला!॥ असो! रोहिल्यानं शीर दिलं अबदालीला। त्यानं तें नजर केलं सदाशिवरावाला। आणि बरोबर निरोप धाडला। "तुम्हांसाठीं जागा पाहायला। पंतांना पाठवलंय स्वर्गाला। अन् तुम्हांला घेऊन जायला। पंत फार आतुर झाला। त्यानं आपलं शीर पाठवलंय तुमच्या भेटीला" ॥चाल॥ बुंदेल्याचं शीर पाहून। भाऊसाहेब झाले बहु खिन्न॥ डबडबले डोळे पाण्यानं। भाऊसाहेब भिजले घामानं॥ **होणार चुकवील कोण?**। दुर्दैव आलं चालून॥ ६॥

●●

## चौक ७ वा

आभाळ फाटलं चोहीकडे। दुःखाचे कडे। डोळ्यापुढं खडे। भरला निराशेचा गर्द अंधार। अपेशानं पाठ पुरविली पार। तृणासम झाले सारे

सरदार ॥ ज्यांनीं चारली वैऱ्याला धूळ । लावलं ज्यांनीं खूळ । भीतिचं मूळ । त्यांचें आज तेज गेलें विलयास! अपेशाचा वारा आला नशिबास। निराशेनं मारलं साऱ्या लोकांस ॥ चाल ॥ तंवा बळवंतराव मेहेंदळे चालले समराला ।। जातांना बोलले बायकोला । " वये ! आज युद्धाचा मानस आम्हीं केला । यश आलं तर येईन भेटिला । नाहींतर हाच योग शेवटचा झाला " । लक्ष्मीबाई बोलली भ्रताराला । " ठीक आहे ! बेत उत्तम झाला । शंभर वर्सांनं केव्हां तरी एकदां मरायचंच । त्यांत असा जर योग आला । तर फार उत्तम ! पण कर जोडून सांगतें तुम्हांला । तुम्हासंगं येऊं द्या मला " । तंवा बळवंतराव बोलला । " नेलं असतं तुम्हांला । पण या लाडक्या पोराची काय वाट ? । आप्पाराव बाळ अजून झाला " । ती साध्वी बोललीं मग त्याला । " जें दैवांत असेल तें होईल ! कोण कुणाच्या जन्माला पुरला ? " ॥ चाल ॥ साध्वीला संगे घेऊन । बळवंतराव गेले चालून ॥ सारी फौज सिद्ध करून । खंदक चालले सोडून ॥ मग गिलचे भिडले येऊन । खणाखणी झाली कडक्यानं ॥ चाल ॥ अग्नीचा वर्षाव झाला । गगनांत भरला धूरोळा । गिलच्यानं मार फार दिला । सोसवेना मराठी फौजेला । अन् गोटाकडे पळ काढला । पाठलाग गिलच्यांनीं केला । अन् झाडून सारा कापून काढला ! । **बळवंतराव** बोलला आपणाला । " कसं दाखवावं तोंड भाऊला ? । मरून जावं आज या वेळा " । असं म्हणून तोंड फिरवून हल्ला चढविला । त्यांनीं मागं रेटलं गिलच्याला । पण इतक्यांत प्रकार काय झाला । एक गोळी भिडली काळीजाला । अन् घोड्यावरच प्राण निघून गेला ॥ चाल ॥ कोसळला खालीं भूवरीं । तो वीर ॥ दुराणी आला त्या स्थळीं ॥ तो वीर ॥ दिला पाय वीराच्या उरीं । तो काळ ॥ नरड्याची घाटी कांपली । तो काळ ॥ चाल ॥ ही वार्ता कळली डेऱ्यांत **लक्ष्मीबाईला** ॥ काळजाचा चक्काचुर झाला ॥ कसं कुणी आवरावं तिला । राहवेना पाठीमागं तिला । भाऊच्या स्वाधीन केलं तिनं मुलग्याला ॥

तंवा बोलली माय बाळाला । "बाळ! आतां सोडून जातें मी तुला" कलिजा बोलला आईला। "आई! कुठं जातीस सोडून ग मला!। बाबा गेले सोडून आम्हांला । आतां तुमचा एक आधार जीवाला । तोही जर तुम्ही तोडला तर आम्हीं कुठं जावं?। अन्नपाणी मागावं कोणाला?। कुरवाळिल कोण ग मला?। रुसावं कोणावर बोला?"। आई बोलली फिरुन लेकराला! नको रे बाळ! मायाजाळांत गुंतवूं मला। सोड बाळा! उशीर फार झाला। ईश्वर पाठीराखा तुला"। असं म्हणून काळजाचा तुकडा दूर तिनं केला॥ घळघळा पाणी डोळ्याला!। सती जायचा बेत तिनं केला। बळवंतरावाचा मुडदा आणवला। सती गेली साध्वी, धन्य धन्य जन्म जाहला!॥ **होणार तें चुकेना दैवाला** ॥ ७ ॥

• •

## चौक ८ वा

दिनराज अस्ताला गेला रक्त होऊन॥ मग चंद्र आला गगनांत अर्धा होऊन। गिळच्यांच्या भीतिनं जणूं गेला हारपून। चांदण्या बघती पडद्यातनं मंद होऊन ॥ चाल ॥ भेसूर शांतता झाली। कोल्ह्यांनीं कोल्हेकुई केली॥ रात्र ही घाबरून गेली। काळवस्त्र पांघरून बसली॥ डोळ्याला डोळा लागेना। झोंप येईना। होती यातना। भाऊच्या चिंता जाळि हृदयास। मुंडकीं दोन दिसतीं त्याच्या डोळ्यास। मरणाची छाया पडली हो खास॥ आरडती कोल्हीं भेसूर। त्या जागीं। किती कण्हति घायाळ वीर। ते जागीं॥ चाल॥ घालवली रात्र कशितरी॥ मृत्युच्या घरीं। कोपला हरी। पुन्हां दिन आला। आकाशीं पुन्हां तेजानं सूर्य तळपला॥ भेटले वीर भाऊला। बोलले मग त्याला। "एकावं बोला। उपासमार पडली। अन्नपाण्यावीण प्राणाची छबी

५/८/७८ पोहोच २०/१/८८

मावळली ॥ चाल ॥ मग दोन हात करुनिया टाकुं देहाला " ? ॥ चाल ॥ वीरांचं बोलणं ऐकून । बेत केला भाऊसाहेबानं ॥ चाल ॥ लगेच युद्धाचा नगारा केला । शूर वीर तय्यार झाला । तोफखाना गर्जू लागला । स्वतः **भाऊसाहेब** हत्तीवर बसला । **विश्वासराव** अंबारींत चढला । वीर गेला आपापल्या जागेला । अबदाली फौज घेऊन चालून आला ॥ दोन्ही सैन्य भिडलीं एकमेकांला । गगनांत भरला धुरोळा । दुराणीनं जोर फार केला । इतक्यांत प्रकार काय झाला । आकाशातनं तारा बघा तुटला । एकाएकीं गोळी लागून **विश्वासराव** पडला ॥ बाणांनीं आधींच होता जेर झाला । तों गोळी भिडली छातीला । अंबारीतनं खालीं कोसळला ! । पायाखालीं तुडवलं बाळाला । तंवा हलकल्लोळ झाला ! अभिमन्यु दुसरा वाटला । कवटीचा चक्काचूर झाला । दोन्ही डोळे फुटले त्या वेळा । किती माती लागली जिभेला । अंगाचा झाला चोळागोळा ! । विश्वास बाळ संपला ! ॥ विश्वास विश्वाचा झाला । विश्वास त्याचा भाऊला । पण विश्वास सोडून गेला ॥ ८ ॥

● ●

## चौक ९ वा

**विश्वास** लाडका बाळ । झाला रणीं ठार । बाळ सुकुमार । बातमी ही गेली हृदय भंगून । ( पण ) मोठ्या कष्टानं शोक आवरून । भाऊसाहेब आणि जनकोजी । वीर तुकोजी । गिलच्यावर गेले थेट चालून ॥ ' हाणा, कापा, बघतां काय ? मारा ' शब्द हे भाऊ बोलती खवळून । पण आली तोंडाला लाळ । आवाज ओढला हो खोल । पण सपासपा कांपती शत्रूला । धौशा घेतला । चालले धडकून ॥ चाल ॥ पण गिलच्यांनीं मारा बहु केला । किती वीर पडुनिया गेला ॥ शें

पांचशें राहिले मदतीला । जनकोजी शिंदे ठार झाला । तंवा भाऊसाहेब गर्दीमध्यें घुसला । गिलच्यांनीं घेरलं भाऊला । पण भाऊचा पट्टा चालला । उडवलं कितीक मुंडक्याला । पण भाऊसाहेब भाऊगर्दीत ठार जाहला । खग्रास ग्रहण सूर्याला ! **होणार तें चुकेना दैवाला** ॥ घनघोर असा संग्राम कुणी पाहिला ? ॥ कुरुक्षेत्रीं प्रकार हा झाला । इथं एकट्या पांडवांनींच विजय होता मिळवला । पृथ्वीराज चव्हाण केवढा मोठा लढणारा ! । पण इथंच अपेश आलं त्याला । भाऊसाहेब इथंच पडला । दीड लाख वीरांनीं इथं प्राण बळि दिला । मराठ्यांच्या चढतीला धक्का धाडकन् बसला । पांडुरंग शाहीर गातो त्यांच्या कवनाला ॥ ९ ॥

# हुतात्मे गुरुगोविंदसिंह व वीर वैरागी यांचा

# पोवाडा —————— : ५ :

न्यायनीतिधर्माचा ऱ्हास । करी जननाश । अशा समयास । ज्यानीं ज्यानीं दिलं दिव्य बलिदान । त्या त्या वीरांचा करण्या सन्मान । शाहीर **पांडुरंग** करि गान ॥ धु० ॥

• •

## चौक १ ला

सरहिंदच्या नबाबानं घेरलं गांव चमकोर । गुरुगोविंदसिंह होते आंत वेदान्ती वीर । शें दोनशें शीख लढवय्ये लढती अनिवार । किती हिंदु होते गांवांत । पर शेळ्यामेंढ्यांची जात । रक्ताचे चालले पाट । धुरळा घनदाट । भरलं अम्बर ॥ लढतांना झाली सायंकाळ । भूमि हि लाल । झाली बंबाळ । सूर्य ही गेला बुडुन रक्तांत । अंगाचं रक्त धुवून काढण्यांत । झाला निमग्न सप्तसागरांत ॥ कडाक्याची थंडी मग पडली । रात्र भडकली । करुण किंकाळी । गेली हृदयाचा चूर उडवून । किती वीर कण्हती ऊर बडवून । काळोख आला प्रेत तुडवून ॥ चाल ॥ पांच पन्नास शीख मरणाच्या शय्येवर पडला ॥ शें दोनशें शीख शेकोटी पेटवून बसला ॥ पण निराशेनं आली काळोखी त्यांच्या डोळ्यांला ॥ लढाईचा त्यांचा दम गेला । अशा वेळीं प्रकार काय झाला । बारा वाजतां रात्रीं त्या वेळा । वीरांनीं चमत्कार पाहिला । **गुरु तेजबहादूर** दिसले डोळ्याला ॥ डोळा इंगळासारखा लाल झाला । रक्ताचा थेंब टवकला । धड नव्हतं खालच्या बाजूला । तोंडाचा जबडा

उघडला । तें मुंडकं बोलूं लागलं शीख वीराला ॥ " भले बहाद्दर । फोडा नरड्याला । नका दाखवूं पाठ कोणाला । लावूं नका डाग नांवाला । पायाखालीं तुडवा भीतिला । करा मुक्त जन्मभूमिला ॥ चाल ॥ किती जरी जपलं प्रेमानं । चुकवील मृत्युला कोण ? ॥ आला जो जो जन्म घेऊन । मृत्युही त्याच्या मागून ॥ मरणाचं नांव ऐकून । जाति भित्रे थंड होऊन ! ॥ मरणाचं नांव ऐकून । वीराला चढतं स्फुरण ॥ चाल ॥ म्हणून सांगतों आज तुम्हांला । सोडूं नका धीर या वेळा । माळ घालील सिद्धी तुम्हांला" ॥ असं बोलुन मुंडक्याचा भाग नाहींसा झाला !॥ स्फुरुं लागला दंड वीरांचा उतावीळ झाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

जरी मारली बुडी पाण्यांत । सप्तसागरांत । तरि न रुधिरान्त । तसाच रक्तानं आला रंगून । सूर्यानं केला यत्न निवटून । तरी पण रक्त जाईना धुवून ॥ रणशिंगं वाजूं लागलीं । भेरी दणाणली । सेना खडबडली । चालली लढाईला शस्त्र परजून । उभे राहिले वीर दंड ठोकून । भित्र्यांची गेली छाती दडपून ! ॥ यवनांची फौज पर भारी । होती जमलेली । झुंझाया आली । गणना यौवनांची वीस हजार । इकडं शें-पांचशें वीर लढणार । ऐका कसा झाला पुढचा प्रकार ॥ ॥ चाल ॥ जोराचा हल्ला चढविला यवनीं फौजेनं ॥ गांवांतले हिंदु गेले नबाबाला शरण ॥ बोलले काय ऐका ते भित्रे दीन होऊन ॥ " नका मारुं आम्हांला आम्ही लढवय्ये न न ॥ गुरुगोविंदसिंह आणि शीख चारशें जण ॥ ते लढले तुम्हांशीं आम्हीं लाचार दीन ॥ करा दया डोस्क्यानं झाडतों तुमचें चरण" ॥ पुढं असा प्रकार झाला । कीं नबाबाच्या पायावर हिंदु लागले लोळायाला ॥ धिक्कार असल्या

जगण्याला । शिणविलं व्यर्थ आईला । लाज कसली नाहीं जीवाला । कुत्र्याचा जन्मही बरा । राग कसला ठाव नाहीं त्याला । मान तर केव्हांच सोडून गेला । देश याचा नांवाचाच राहिला । परक्यांची लगाम तोंडाला । पाठीवरती परका स्वार झाला । आणि हिंदुघोडा दौड चालला । काय जगणं म्हणावं याला ? । असो ! जेव्हा हिंदु लागले गडबडा लोळायला । तेव्हा नवाबनं दिल्या लाथा सर्वांला । मग जसं चिरावं चरचरा बकऱ्यांला । तस्सा सारा लोक चिरला । जगण्याच्या आशेनं गेला । पण नरकवास लाभला नशिबाला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

जगलेलीं मढीं हिंदूंची मेलीं पाहून । गुरु गोविंदसिंह नरवीर गेला खवळून । शीखांचं धैर्य खचलेलं पार पाहून । त्यांनीं उपाय काय मग केला आतां सांगीन ॥ चार मुलगे गोविंदसिंहाला होते सुकुमार । मोठा होता सोळा वर्षांचा बाळ कुमार । ते बच्चे सिंहाचे होते शूर रणधीर । कडकडा चावती दांत । रक्त अंगांत । उसळे अनिवार ॥ मोठा मुलगा बोलला बापाला । " लोक सारा भ्याला । जातों लढाईला । देतों यवनांना पार उधळून । आशीर्वाद द्यावा हात फिरवून । नाहींतर जातो देह टाकून" ॥ जसा तारा तुटलेला सुटतो मोठ्या वेगानं । किंवा झोत पाण्याचा उसळे पर्वतावरनं । स्वातंत्र्यदेवीचा प्यार चालला वेगानं । तें सोळा वर्सांचं पोर । घेऊन समशेर । धावलं खवळून ॥ चाल ॥ पोराचं शौर्य पाहून । शीख चालले त्याच्या मागून ॥ सिंहांचा सिंह पाहून । कोल्हीं कुत्री गेलीं घाबरून ॥ सरसरा झडपा घालून । कितीकांची फोडली गर्दन ॥ मारावें जसे ढेकूण । तसे मारले कितिक डंवचून ॥ चाल ॥ सहा तास असा बाळानं कहर मांडला ॥ किती जखमा झाल्या

पर त्याची क्षिती कोणाला ? ॥ लढलढून त्याच्या अंगाचा खुळखुळा झाला ॥ जिकडं पाहावं तिकडं मुडद्यांचा खच हो पडला ॥ इतक्यांत एक वार झाला उजव्या हाताला ॥ हात तुटून धरणीवर पडला । मग मूर्छा आली बाळाला । अन् धाडनं भूमिवर पडला । जयद्रथ जसा लाथ मारी अभिमन्युला ॥ वजिरखान तसा कचकचा तुडवी बाळाला ॥ शरीराचा चेंदामेंदा झाला । मासाच्या चिखलांत बालवीर तो बुडला ॥ हाहाकार सगळीकडं झाला । पण रक्ताचं पाणी घालून धर्म वाढविला ॥ मासाचं खत घालून धर्म वाढविला ॥ प्राणांचं मोल देऊन धर्म फडकविला ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

बाळ बुडला मासारक्तांत ठार होऊन । गुरुगोविंदसिंहांना कळली वार्ता दारुण । आनंदीआनंद झाला तोषलं मन । सुखदुःख सारखं ज्यास । अशा पुरुषास । चाळवील कोण ? ॥ बोलवलं त्यांनीं मग आपल्या दुसऱ्या बाळाला । बाळ बारा वर्षांचा होता मोगरा फुलला । अंगाची कांति कोमल मोत्याचा डोळा । गाल गोरेपान पाहून । वरती येऊन । गुलाबहि बसला ॥ चाल ॥ गुरुगोविंदसिंह मग बोलले कवळ्या जीवाला ॥ "बाळ ! भाऊ तुझा लढतांना मरून रे गेला ॥ कचकचा दुष्टांनीं पायीं ठेचला त्याला । स्वातंत्र्यदेविनं परी झेललं त्याला ॥ आतां तुझ्या रक्ताची तहान लागली तिला ॥ जा तुझा भाऊ स्वर्गाला एकला गेला ॥ जा बाळ त्याच्या सोबतीला । तूं लाडकं बाळ जीवाचं वखत पण आला" ॥ चाल ॥ गुरुगोविंदसिंहाचे बोल । ऐकून बोललं बाळ । "द्या आशीर्वाद प्रेमळ । हा तुमचा लाडका बाळ ॥ आई माझी नाहीं जवळ । तिला सांगा गेला ग बाळ ॥ नको रडूं आई तुंबळ । पोराचं झालं

मंगल " ॥ चाल ॥ बाळ झट्‌नं तयार झाला । आगीशीं खेळ खेळायला । तलवार उजव्या हाताला । ढाल होती डाव्या हाताला । तंवा बाळ बोलला बापाला । " बाबा ! चालला प्रेमाचा गोळा । पण तहानेनं घसा माझा सुकला । पाणी पिऊन जातो." बाळ बोलला । गुरुगोविंदसिंह मग बोलले वीर बाळाला ॥ "बाळा ! तुझा भाऊ मरून पडलाय त्या जागेला । तिथं रक्ताचा लोट चालला । जा अन् रक्ताचे घोट घेऊन ओला कर गळा " । " ठीक, बाबा !" बाळ बोलला । अन् गेला झुंज करण्याला ॥ चाल ॥ अग्नीचा जाळ चहूकडं मधोमध फूल ॥ चिखलांत बुडुन जसा जावा हंस सुंदर ॥ मधें हरिण मोठमोठे वाघ जसे चौफेर ॥ तसा दिसला बाळ कोमल । गिधाडांनीं घातली झडप वेगें त्यावर ॥ डोळ्यांतनं घुसले खंजीर । मानेतनं शिरली तलवार । मान तुटली, धड कोसळलं पडला भूवर ॥ ४ ॥

• •

## चौक ५ वा

काळजाचे तुकडे असे दोन । पडले गळून । भडकलं मन ॥ गुरु-गोविंदसिंह छातीचा कोट करून । उडी घालती झुंज करण्याला खड्ग घेऊन । दहा पांच वीर बरोबर । चमके समशेर । लाल होऊन ॥ घनघोर चाललं कंदन । नाद गेला गगन भेदून । जशी कणसं कापा-वींत तशा तुटती गर्दन । पर वर्मी लागला वार । गुरुगोविंद झाले घायाळ । आली घेरी त्यांना पाहून । शिखांनीं बाजूला नेलं दूर उचलून ॥ जी ॥ ॥चाल॥ **माधवदास वैरागी** एक शिष्य जीवाचा । एकनिष्ठ कल्याण जसा रामदासांचा ॥ अर्जुन जसा एक प्यारा गुरु द्रोणाचा ॥ हनुमान जसा भगवान् रामचन्द्राचा ॥ चाल ॥ वैरागी गेला जवळ । अंतकाळ आला पाहून ॥ चाल ॥ गुरुगोविंदसिंहानीं जरा डोळा उघडला ॥ माधवदास वैरागी

होता जवळ राहिला ॥ गुरु बोलले माधवदासाला । " आतां आमचा अंतकाळ आला । आतां कोण समरयज्ञांत उडी घेणारा ?॥ हें कार्य देवाधर्माचं कोण करणारा ? " ॥ तंव्हा माधवदास बोलला । " हा बंदा दास, आपला हो झाला । हा करील धर्मयुद्धाला । वजीरखानाला जिवन्त जाळलं तरच नांवाचा बंदा झाला " ॥ चाल ॥ शिष्याचे बोल ऐकून । गुरु बोलले तुष्ट होऊन ॥ " **बंदा बहाद्दर** नांवानं । तुझं नांव आजपासून " ॥ हातीं बांधलं लोहबंधन । चढविलं युद्धकंकण ॥ मग बंद केले नयन ॥ प्राण गेले देह सोडून ॥ दोन मुलगे बळी देऊन । गुरु गेले त्यांच्या मागून ॥ त्यागाचा धडा देऊन । मरणाचं शास्त्र सांगून (शिकवून) ॥ ५ ॥

• •

## चौक ६ वा

गुरुगोविंदसिंहाचे बच्चे आणखि दोन राहिले होते अजून । मातासुंदरी माता त्यांची करित त्यांचं रक्षण ॥ मुलगे घेऊन वेष पालटून रानोमाळीं हिंडून । वीरमाता ती कसेबसें हो लोटित होती दिन ॥ अन्नपाण्याविण कंठीं लागले प्राण आले दाटून । ब्रीद तरी सोडती न मोठें व्रत त्यांचें दारुण ॥ पंखाखालीं लपवून पिल्लं जशी राहि पक्षीण । पांघरुण मायेचं घालून तशी राही रंगून ॥ एके दिवशीं काय प्रकार झाला आतां तुम्हां सांगीन । फितूर झाला अधमाधम एक गंगाराम ब्राह्मण ॥ बातमी दिली त्यानं नबाबाला, तो काळ आला धांवून । बद्ध केले यवनानं सिंहाचे बच्चे आणि सिंहीण ॥ चाल ॥ असो, ऐका प्रकार काय झाला । तो नबाब बोलला दोघाला । कीं " पोरांनो, ! तुमचे दोघं भाऊ चिरले मी चराचरा । आतां तुम्ही लागला हाताला । तुम्ही तरी अगदींच लहान झाला । दहा वर्षंसुद्धां पुरीं झालीं नाहींत तुमच्या जिवाला ।

म्हणून विचारतों आज तुम्हांला जर सोडलं आज तुम्हांला । तर कराल काय तुम्हीं बोला " । भाऊ भाऊ बोलले त्या वेळा । " जर सोडशील आज आम्हांला तर लोकांना घेऊन येऊं लढाईला । अन् मरुं किंवा मारुं रे तुला " । असे कडवे बोल ऐकून नबाब चरफडला ! ॥ आणि बोलला आपल्या लोकांला । " चला, गाडा, भिंतींत दोघांला ॥ चाल ॥ दगडांची रचविली भिंत । उभं केलं भावांना त्यांत ॥ जसजशी चढली ती भिंत । फोफावलं तेज जोरांत ॥ फोफावला धर्म जोरांत ॥ दगडांचे थरांथर थर । गळ्याइतके आले वरवर ॥ चाल ॥ कसायांचा कसाई बोलला । " बोला अजून सोडतों तुम्हांला । जर धर्म तुम्हीं बदलला "। पण भाऊ भाऊ बोलले ह्या वेळां । " आमचे बाबा अन् भाऊ गेले स्वर्गाला । तिथंच जाणं योग्य आम्हांला ॥ मरणाची भीति कोणाला ? । ती भीति तुझ्यासारख्याला । ती नाहीं आमच्या जीवाला " ॥ चाल ॥ भिंतीचा एक थर चढला । एक बाळ दिसेना झाला ॥ दगडांचा दुसरा थर चढला । बाळ दुसरा नाहींसा झाला ॥ तें निंद्य कर्म पाहून ॥ मृत्युहि ढळढळा रडला ॥ चाल ॥ ते दिवशीं सूर्य लवकर अस्ताला गेला ॥ ते रात्रीं चंद्र नाहीं उगला । चांदण्यांचा देह थरथरला । जा पहा अजून त्या जागेला । दरवर्षी झाडं आणि वेली रडती ढळढळा ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

दोन पोरं होतीं जिच्या आंत । जणुं हृदयांत । अशी ती भिंत गेली घरोघर । खडबडून केले तिनं जागे शीख सरदार । स्वागत तिचं करण्याला ढाल तलवार । म्यानांतून पडले बाहेर । भाले खंजीर बारा हजार ॥ जी ॥ वैरागी बंदा बहाद्दर । जणूं काय आग । चालला उधळीत । सैन्य घेऊन । असा जाई हां हां म्हणतांना यवन कापून । कीं जसा सोसाट्याचा पवन । कडकडा झाडं मोडून । समुद्राच्या

लाटांचे कान धरूनिया देई त्यांना उसळून ॥ जी ॥ आज इथं तर उद्यां तिथं अशा झडपेनं करित बेचैन यवनांना फार ! भूतखेत अनुकुल त्याला बोललं घरदार । बसविला त्यानं असा धाक । कीं झाले किती खाक । नांव ऐकून ॥ सरहिंद गांवावर आला । चढाई करण्याला । चढविला हल्ला । होती त्याची सेना सात हजार । मांजर झडपी उंदिर । विंचवाला उतारा पाल । वैरागी आला ऐकून । वायकांचा वेप घेऊन । कितिक जण दडले खाऊन हार ॥ जी ॥ घनघोर झाली लढाई । झाली हातघाई । करती चढाई । शीख वीरांनीं मांडला संहार । जशा मध-माश्या झोंबुनी फार । कडकडून चावा घेती अनिवार ॥ मुंग्यांचे थवे जसे करती भुजंगम ठार । तसं यवनांना केलं बेजार ॥ चाल ॥ धूम ठोकली यवनी फौजेनं । वैरागी पुढं पाहून ॥ तलवारी गेल्या भंगून । खंजीर पडले गळून ॥ चाल ॥ तोफांचे गोळे गर्जना करती गडगडा । यवनांच्या डोक्यांवर झाला बाणांचा सडा । कोसळती धडं धडधडा । रणभेदी वाजती कडकडा । वीर सारा रणावर खडा । वैरागी जसा काय कडा । वैरागी मांत्रीक ( अवलिया ) बडा ॥ चाल ॥ वजीरखान पुढं पाहून । वैरागी धांवला वेगानं ॥ जसा सिंह झडपी हरीण । तशी काळ-झडप घालून ॥ वजीरखान आणला बांधून । दोरांनीं घट्ट आवळून ॥ चाल ॥ मग त्याला बांधलं खांबाला । अन् खांब पेटवून दिला । ज्यानं इथंच चिणलं होतं दोन बालकाला । तिथंच त्याला असा बदला मिळाला ॥ ७ ॥

• •

## चौक ८ वा

तो बंदा बहादर आला आला ऐकून । उभ्या उभ्या जीव कितिकांचे गेले करपून । कितिकांची वाचा थंड झाली गेले बावरून । आली

घेरी कितिक यवनांना । किती एक धूम ठोकती दाढी धरून ॥ स्वप्नांत वीर वैरागी आला पाहून । किति करती शंख झोपेंतनं जोराजोरानं । धावायला कितिक लागती नग्न होऊन । ओरडती रडक्या सूरानं । किती धडक्या देती भिंतीला । अर्धा जीव गेला । ऊर बडवून ॥चाल॥ असा धाक त्यानं बसविला जागोजागेला ॥ त्यानं झटके दिले दिल्लीच्या सिंहासनाला ॥ तंवा फरुक्शियर होता गादीला । पर फितुरीनं लचका तोडला । अस्तनींत पडला निखारा । कापसाच्या राशीखालीं जणुं अग्नि धुमसला ॥ जसा साप पथारीखालीं लपुनिया बसला । अन्नांत जणुं जहराचा अंश (कण) कालवला ॥ किती संसार फितुरीनं पेटवून दिला ॥ बाराशें वर्षं आज झालीं फितुरीच्या रोगानं सारा देश गांजला ॥ असो ! पुढं काय प्रकार झाला ॥ चाल ॥ गुरुदासपूर नगर । तिथं होता वैरागी वीर ॥ तिथं होते कैक सरदार । पर झाले होते फितुर ॥ दैवाची गती अशी क्रूर । कालवलं जहर भेसूर ॥ चाल ॥ अबदूल समदखानाला । सामना देण्याला । शाहानं पाठवला । फौज घेऊन तीस हजार । घेरलं त्यानं नगर, तोडला आधार । वैरागीला कोंडलं किल्ल्यामधिं पार ॥ चाल ॥ वैरागी तोंड देण्याला तय्यार झाला ॥ रणभेरी वाजूं लागल्या इषारा दिला ॥ शत्रुला जाऊन भिडण्याला हुकुम त्यानं दिला ॥ पण तलवार, भाला खंजीर खडा नाहीं झाला ॥ धनुष्याच्या दोरीवर बाण चढेना त्या वेळा ॥ फितुरांचा बुजबुजाट झाला । फितुरीनं फोडला दरवाजा । कडकडा आवाज झाला । यवनांचा लोंढा आंत घुसला । लोक सारा कापूनच काढला । वैरागी चवताळून आला । पण होता अन्नपाण्याविण व्याकूळ झाला । खोल किती गेला होता डोळा । हाडं नुसतीं होतीं अंगाला । पण किती जरी सिंह रोडला । तरी सिंह तो सिंहच झाला । गर्जना केली आणि वीर चालून गेला ॥ चाल ॥ पण वैरागी एकला वीर ॥ जसा काय तीर । चालला रणधीर । शत्रुच्या वरती ॥ करकरा ओठ चावून । तलवार हातीं खेचून । जय महादेव

४

गर्जून चालला पुढती ॥ शस्त्रास्त्र मेघ गरजले । रक्ताचें पाणी सांडलें ॥ खळखळा चालला पाट । रक्ताचा दाट । सुरू छाटाछाट । लालेलाल लाट उसळली वरती । जय महादेव गर्जून चालला पुढतीं ॥ चाल ॥ घनघोर केलं कंदन । भूवरीं ॥ जयनाद गेला भेदून । अंबरीं ॥ दुर्दैव आलं सामोरं । सत्वरीं ॥ चाल ॥ अगणीत भाले रोखून । चारी बाजूनं । धावले यवन । केला मग हल्ला । वैरागी मूर्छा येऊन भूमिवर पडला ! ॥ चाल ॥ पकडलं त्याला दुष्टांनीं । संगरीं ॥ दिल्लीला नेलं ओढून । त्यावरी ॥ दिल्लीला प्रकार काय झाला । कसा काळ आला । तुम्हां सांगीन । हा चौक बंद करून पुढचा उघडून ॥ ८ ॥

● ●

## चौक ९ वा

दिल्लीच्या एका चौकांत । पिंजऱ्यांत आणला ठेवून ॥ कुतरडी चारी बाजूला । उभीं राहिलीं तोंड विचकून ॥ पांचसहाशें शीख वीरांना । उभं केलं एका रांगेनं ॥ झाली आज्ञा, धांवली तलवार । कटा-कटा काटली गर्दन ॥ खळखळा नदी रक्ताची । वाहूं लागली मोठ्या वेगानं ॥ पिंजऱ्यांतल्या शूरवीराला । दहा दिवस ठेवले जखडून ॥ पिंजऱ्याच्याजवळ जाऊन । डवचावं कुणिही भाल्यानं ॥ लाल सळ्या हातीं घेऊन । भाजावं कुणिही भ्याडानं ॥ पाडावीं भोकं देहाला । कोणीहि बाण फेकून ॥चाल॥ असा रोजचा प्रकार हा झाला ॥ आज तोडलं एका हाताला । उद्यां काटलं दुसऱ्या हाताला । परवां कापलं एका पायाला । तेरवा तोडलं दुसऱ्या पायाला । मग काढला मासाचा गोळा । मासाचे लचके किती तोडले ठाव कोणाला ? ॥ जेव्हां दहावा दिवस उगवला । पिंजऱ्यांतनं काढलं बाहेर त्याला । पुढं काय प्रकार झाला । दोन वर्षांचं एक पोर होतं वैरागीला । त्या पोराला आणलं त्या जागेला । अन् वैरागीच्या पुढं ठेवलं त्याला । एक खाटिक समशेर घेऊन आला । त्यानं

पोराची तंगडी धरून त्याला उडवलं आकाशाला । अन् मधोमध चिरलं बाळाला । शिंतोडे चारी बाजूला । रक्ताचा थेंब वैरागीच्या ओंठावर पडला ॥ पण वैरागी शांत राहिला । अन् मान खालीं टाकून बसला । इतक्यांत एक झटका मानेवर बसला । झाले दोन तुकडे देहाचे अंत जाहला ॥ मुंडक्यानं त्यानं पूजिलं हिंदभूमीला । जीवाचा दिवा मालवला । पण उजळवलं साऱ्या विश्वाला ( दुनियेला ) । धन्य धन्य गोविंदसिंह–धन्य वैरागी झाला ॥ चाल ॥ टाकिलं प्रेत दैत्यांनीं । दुर्गन्धि उकिरड्यावरती ॥ दुर्गन्धि घाण सडलेली । हाडकांची रास त्यावरतीं ॥ आश्चर्य काय पण झालें । सांगीन तुम्हांला पुढतीं ॥ चाल ॥ हाडकांचीं पुष्पें झालीं । दुर्गन्धी लोपुनि गेली । नव बाग प्रफुल्लित झाली ॥ चाल ॥ वीरांनीं किमया केली । मन्मुखांतुनी ती वदली ॥ चाल ॥ घनदाट भरला अंधार । पडला विसर । कार्याचा पार । परकी मायेनं गेले मोहून । हिंदजन झाले मूढ पाहून । ज्यानं अभिमान आणला परतून । **सावरकर** वीर विख्यात । त्यास हें कवन । अर्पितों आज नम्र होऊन ॥ ९ ॥

रचना–इ. स. १९३८.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ........ दि: ........
........ नों: दि: ........
म. ग्रं. सं. ठाणे
१६९७८
वा. क्र.

# देवी अहिल्याबाई

## हिचा

# पोवाडा ——————————— : ६ :

देवि अहिल्ये, धन्य धन्य तूं करिन तुझा जयजयकार । धर्मशील तूं राजकारणी दीन जनांचा आधार ॥ धृ० ॥

● ●

### चौक १ ला

महाराष्ट्रांत नगर जिल्ह्यांत, शेवगांव तालुक्यांत, पाथर्डी गांव असे छान । आनंदराव शिंदा मोठा निपुण । होता गांवांत मोठा मान ॥ जी ॥ चाल ॥ त्याला मुलगी एक अहिल्या नांव हो तिला ॥ जी ॥ कोल्हापूरच्या अंबेनं दिली कन्या ही त्याला ॥ चोंढी गांवीं आली जन्माला । श्रीखंडोबा दैवत होतं आनंदरावाला ॥ खंडोबाची तळी आरती आदितवाराला । आणि पौर्णिमेच्या दिवसाला । ही मुलगी अहिल्या त्याच खेळती खेळाला ॥ जी ॥ जवळ एका मारुतीच्या देवळाला । पळशीकर तात्या पंतोजी चालवित शाळा ॥ अहिल्येला लिहावाचायला । तात्यांनीं शिकविलं त्या वेळा ॥ मोठी गुणी चतुर सद्गुणी झाला बोलबाला ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

एकदां काय प्रकार झाला । श्रीमंत राघोबा अन् मल्हारराव होळकर । यांनीं छावणी टाकली पाथर्डीला । मारुतीच्या देवळांत त्यांचा मुक्काम

राहिला ॥ तात्या गेले त्यांच्या भेटीला । बरोबर होती मुलगी अहल्या । तात्यांनीं नमस्कार केला दादासाहेबाला ॥ तंवा अहल्या बोलली, "तात्या, तुम्ही नमस्कार केला तो कोणाला? कोण बुवा आलाय? तें सांगा ना सारं तुम्हीं मला" । तंवा तात्या बोलले तिला । "बाळ, हे पेशवे छत्रपतींचे; यांचा दरारा साऱ्या मुलखाला । तंवा बाळ बोलली दादाला । "तुम्हीं प्रधान छत्रपतींचे । तर कुठपर्यंत तुम्ही गाजविलं त्यांच्या नांवाला? । प्रधान आणि सेनापति हे दोन हात शाहुराजाला ।" दादांना वाटलं कौतुक फार त्या वेळां ॥ अन् बोलले मल्हाररावाला । "सुभेदार, तुमच्या खंडूला । हीच बायको करा या वेळां ॥ हाच जोडा चांगला शोभला" । "ठीक आपली आज्ञा" सुभेदार बोलले त्या वेळां ॥ अन् अहल्या झाली सून मल्हाररावाला ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

कुंभेरीचा वेढा गाजला । सुरजमल जाटाशीं मोठा संग्राम झाला ॥ खंडेराव निशाणाजवळ होता राहिला ॥ पण दैवाचा घाला हो आला । एक आला तोफेचा गोळा । तो लागला खंडेरावाला । खंडेराव कोसळून पडला । प्राण गेले सोडून देहाला ॥ चाल ॥ मरणाचा अचानक घाला । मुलावर आला । असं पाहून ॥ जी ॥ मल्हारराव रणधीर पराक्रमी वीर गेला करपून ॥ जी ॥ चाल ॥ तंवा सुभेदार करिती प्रतिज्ञेला । कुंभेरीची माती यमुनेंत खणून टाकीन । आणि सुरजमल ठार करीन । तरच नांवचा मल्हारराव झाला । इकडं काय प्रकार झाला । अहिल्येनं सती जाण्याचा संकल्प केला ॥ जी ॥ तंवा मल्हारराव बोलला तिला । "सूनबाई! म्हाताऱ्याची दया येऊं दे तुला । अग! असं वाटतंय मला—कीं सून माझी गेली पण माझा खंडू तुझ्यारूपानं मागं राहिला ॥ म्हणून जाऊं नको सती या वेळां । आहिल्येनें विचार

केला। अन् सती जाण्याचा बेत रद्द केला ॥ चाल ॥ वैराग्य करून धारण। संग सोडून। घालवित काळ ॥ अहो जी ॥ ईशसेवा भजन-पूजन। देवाचं स्मरण। करी जपमाळ ॥ अहो जी ॥ आदर्श अहल्या सती। सदा सन्मती। जाहली धन्य ॥ अहो जी० ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

राज्याचा कारभार अहिल्येवर टाकून। मल्हाररावाला झालं मोठं समाधान। कारभार चालवी सती मोठ्या न्यायानं। झाली प्रजा संतुष्ट मनीं। राजकारणी। बाई ही धन्य ॥ जी ॥ तंवा एकदां प्रकार काय झाला। पुण्याहून हुकूम गेला। कीं सुभेदार तुम्ही जावं सिरंद-बक्सराच्या मोहिमेला ॥ तंवा मल्हारराव बोलले अहिल्येला। "सूनबाई मी जातों, आतां मोहिमेला। राज्याचा बंदोबस्त दिला। तुझ्या ग हाताला ॥ जी ॥ तंवा अहिल्या बोलली सुभेदाराला। "मामाजी! तुमचा वृद्ध काळ झाला। कां एकटे जातां तुम्हीं बोला?। मला बरोबर घेऊन चला ॥ तंवा मल्हारजी बोलले तिला। "सूनबाई! तुझं कौतुक वाटतंय मला। पण लढाईंत बायकांचं काय काम ग बोला? ॥ अन् जिथं मी जाणार तो परक्यांचा मुलुख आहे झाला। तर तूं घरींच रहा। अन् सांभाळ आपल्या दौलतीला"। अहिल्येनं जबाब दिला त्याला। "मामाजी, तें खरंच! पण मी हिंदु स्त्री भिणार नाहीं मरणाला। अन् त्यांत आपली सून। लढाईची भीति ना मला। हिंदु स्त्रियांनीं मागं लौकिक केला। तो काय मी सांगावा आपणाला? ॥ चाल ॥ त्या सत्यभामेनं नरकासुर कापिला ॥ सीतेनं रावणाचा पुरता धुव्वा उडविला ॥ जिजाईनं शिवाजी घडविला। देवीनं महिषासुर पायाखालीं तुडविला। पद्मिनी सती जोहार करी त्या वेळा ॥ कैकेयीनं रथाचा कणा सांवरून धरला ॥ द्रौपदीनं दुष्ट कीचक पार लोळवला ॥ तंवा, मामाजी! अशी

भीति मुळीं नच धरा "॥ सुभेदार नेती सुनेला। अशी देवी अहिल्या रत्न शोभे पृथ्वीला ॥ जी ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

दुःखांत घालाया भर। यम तय्यार। मालोजी नेला यमानं॥ एकुलता एक कुमार। आईचा प्यार। सोडुनी गेला। अहो जी जी॥ दुःखाचा कडा कोसळे। हृदय तळमळे। शोकाचा भार। अहो जी॥ पर धीर धीर मातेनं। दुःख गिळून। कंठला काळ। अहो जी॥ तंवा तात्याबा चंद्रचूड होते मुख्य प्रधान। त्यांच्या मनीं एक मोठें पाप आलें दारुण ॥ जी ॥ चाल ॥ त्यानं लिहिलं राघोबादादाला। "वारस नाहीं होळकरशाहीला। म्हणून येऊन खालसा करा दौलतीला। ही नामी संधि तुम्हांला"। राघोबा दादा पुण्याहुन चालून आला॥ तीर्थयात्रेचा बहाणा केला। हें नव्हतं ठाऊक माधवरावाला। राघोबा माळव्याला आला। तंवा अहिल्येनं लिहिलं माधवरावाला। "दादासाहेब आलेत माळव्याला। दौलत खालसा करण्याचा विचार त्यांनीं केला॥ दत्तकाचा अधिकार मला। दौलत द्यावी तुकोजीला। सुभेदार मरतांना हेंच बोलले हो मला॥ तर न्याय द्यावा तुम्ही मला"। इकडं अहिल्येनं लिहिलं दादासाहेबाला। "दादासाहेब! दौलत खालसा करायला। तुम्ही आलांत असं कळलं मला। पण मी सून सुभेदारांची। जाऊं नका माझ्या वाटेला। बायकांशीं लढावं लागेल तुम्हांला। पांचशें बायका तयार लढाईला। त्यांना ठेवलंय मी आघाडीला। बोलून चालून मी बाई माणूस। जर माझा पराभव झाला। तर लोक हसणार नाहींत मला। तुम्ही मोठे लढवय्ये झाला। खडे चारलेत तुम्ही अबदालीला। अटकेपार झेंडा रोंवला। अन् गंगाथडीचा घोडा सिंधूचं पाणी प्याला ▶

असे तुम्ही बहाद्दर झाला। जर कां अपयश आलं तुम्हांला। तर कलंक लागेल नांवाला। याचा आधीं विचार करा। अन् मग यावं फौज घेऊन लढाई करण्याला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

मोठमोठ्या जहागिरदारांना पत्र लिहिलीं त्या साध्वीनं। होळकर दौलत बुडती पहा या मदत कराया धांवून ॥ पाटिलबाबा शिंदे लिहिती तंवाच दादासाहेबाला। होळकराशीं जर लढाई आपली तलवार बाईच्या बाजूला ॥ जी ॥ असे सारे सरदार झाले बाईच्या बाजूला ॥ तिकडे पुण्याहून हुकूम आला राघोबाला। कीं "दौलतीचा कारभार बघायला। बाई मुखत्यार – त्यांत कर्तव्य नाहीं तुम्हांला। जर अविचार कांहीं कराल तर त्याचा जाब द्यावा लागेल तुम्हांला"। तंवा दादांचा नक्षा उतरला। कांहीं तरी बहाणा करायला। राघोबानं लिहिलं बाईला। "तुमचा मुलगा गेला म्हणून मातंगपोशीस आलों– असं असतां येण्याचा विपर्यास कां केला?"। तंवा तुकोजीनं जबाब दिला। "कीं तर मग ही फौज कशाला?। आपण एकटेंच पालखींत बसून यावें भेटीला। आमची फौज, घरदार, दौलत,–सारं आपलंच आहे–आपण इकडे खुशाल यावें–आनंद होईल आम्हांला" ॥ दादांनीं तसाच देखावा केला। अन् गेले पुढं इंदूराला। एक महिना मुक्काम केला। तंवा १० जून १७६७ ला। सरदारीचीं वस्त्रं दिलीं तुकोजीला। अन् दादासाहेब गेले तसे आले परत माघारा ॥ जी ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

अहिल्याबाईनं राज्यकारभार मोठ्या चतुराईनं केला। तुकोजी होळकर करी मोहिमा, लोक सुखी केला सारा ॥ जी ॥ भजनपूजनीं

काळ घालवित नित्य नेम व्रतनियमांत । आला गेला अतिथीपूजा खर्चे करी धन धर्मांत ॥ जी ॥ आईसारखी प्रजाजनाला न्याय देतसे सर्वाला । देवी अहिल्या म्हणुन बोलती लोक अशा या राणीला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ दिनचर्या राणीची आतां सांगतों तुम्हांला ॥ चाल ॥ अडीच घटका पहाटे उठून । करुनिया नर्मदा स्नान ॥ जी ॥ मग करी पुराण श्रवण । मग करी नेमानं दान ॥ जी ॥ मग करी साधें भोजन । त्यापुढें ईश्वरस्तवन ॥ जी ॥ विश्रांति जरा घेऊन । दरबारांत बसे जाऊन ॥जी॥ दिवसा दोन प्रहरापासून । सूर्यास्त होईतों काम ॥ जी ॥ मग तीन तास देवपूजन । रात्रीला सरकारी काम ॥ रात्रीं अकराला शयन । अशी दिनचर्या घालविल कोण ? ॥ जी ॥ चाल ॥ किति घाट बांधले स्नानसंध्या करण्याला ॥ किती अन्नछत्रं घातलीं अन्न देण्याला ॥ देवतांचीं मंदिरें बांधलीं सेवा करण्याला ॥ जी ॥ सदा दानधर्म करण्याला । हात नेहेमीं तयार झाला । असं एकही तीर्थक्षेत्र नसेल- कीं जिथं अहिल्येनं दानधर्म नाहीं केला ॥ जी ॥ असा काळ घालवून गेली परलोकाला ॥ श्रावण वद्य चतुर्दशीला । ( ता. १३ ऑगस्ट १७९५ ला ) अहिल्येचा अंत झाला । धन्य धन्य देविनं धन्य लोक हा केला ॥ जी ॥ **पांडुरंग** शाहीर गातो तिच्या कवनाला ॥ जी ॥७॥

रचना–ता. २१।८।४८.

# रणशूर स्वामिनिष्ठ जिवबादादा बक्षी

## यांचा

# पोवाडा —————— : ७ :

### प्रास्ताविक

जिवबादादा रत्न अमोलिक दिपवुनि गेले सकळाला। योद्धा अनुपम, मुत्सद्दीपण, गाजविले चौबाजूला ॥ जी ॥ महादजी शिंदा ढवय्या धाक जयाचा सर्वांला। जिवबादादा बक्षी खरोखर सेनापति शोभे त्याला ॥ चरित्र ऐका या वीराचें आतां सांगतों तुम्हांला। काव्यदेवते, ये झणिं आतां घेउनि वाग्भांडाराला ॥ ठेव तुझा कर मस्तकिं माझ्या, गाईन मग मी कवनाला। रचना करुनी तुझ्या कृपेनें तुष्ट करिन जनहृदयाला ॥ भक्त तुझा हा **पांडुरंग** कवि करूनि तुझ्या ग स्मरणाला। चरित्र गाईन या शूराचें रंजवील या लोकांला ॥

● ●

### चौक १ ला

गोवें प्रांतीं महाल पेडणें त्यांत गांव केरी छान। जन्मभूमि जिवबादादांची निसर्गशोभा संपूर्ण ! ॥ चाल ॥ तिथं १७४० सालाला। जिवबाचा जन्म जाहला। दिसामासा वाढूं लागला। मर्दानी खेळामधिं बाळ रंगुनी गेला ॥ पोहण्याचा व्यायाम रोज त्याला। पाण्यांतनं होड्या वल्हवणं वळण देहाला ॥ जोर, कुस्ती, दंड, बैठका रोजचा नेम झाला ॥ बंदुकीचा नेम रपेट घोड्याची त्याच्या जोडीला ॥ असा

देह भरदार केला । धाक त्याच्या साऱ्या लोकांला । एकदां काय प्रकार झाला । फिरंग्यांची सत्ता गोऱ्याला । त्यांनीं मोठा छळ मांडला । लोक सारा हवालदील झाला । गोरे सोजीर छळती लोकांला। तरी कोणी हूं कां चूं करीना त्या वेळा ॥ असा दरारा त्यांचा सर्वांला ॥ चाल ॥ दारू पिऊन गोरे सोजीर । बागाइत नासती फार ॥ तरी कोणी करीना प्रतिकार । मुकाट्यानं सोसती मार ॥ एकदां तीन फिरंगी सोजीर । केरी गांवीं आले सत्वर । तेरेखोलच्या खाडींतून नाव आणली किनाऱ्याला । आणि नाव ठेवून बाजूला । एका बागेंत शिरले त्या वेळा । अन् लागले नारळा पाडायला । **जिवबा** मुलगा जवळच होता राहिला । त्यानं तो प्रकार पाहिला । अन् नांव रेतींत ठेवून दूर उभा राहिला । फिरंग्यांनीं जंवा हा प्रकार पाहिला । तंवा ते धांवले जिवबाला मारायला । दोघांनीं पकडलं जिवबाला । अन् बुटाची लाथ मारणार । तों जिवबानं फिरंग्याचे हात असे पिळले कीं ते फिरंगी लागले बोंबा मारायला । अन् जिवबानं उचललं तिसऱ्याला अन् दिलं भिरकावून समुद्रांत त्याला । बाळपणीं असा पराक्रम जिवबानं केला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

एके दिवशीं चमत्कार झाला। कोणी एक पुरुष गेला होता स्वानाला। तो जिवबाला बोलूं लागला। " काय निजलास ? ऊठ या वेळा। अन् जा हिंदुस्थानांत तिथं मोठं वैभव मिळेल रे तुला " । दोन तीनदां असाच प्रकार झाला। तंवा जिवबा देशावर आला। कोल्हापूरला जिवबा आला। तिथं आठ दहा महिने काढले त्या गांवाला। तिथनं जिवबादादा गेले पुण्याला। बर्च्यांच्या पथकांत जिवबा दाखल झाला॥ पुढं पेशव्यांच्या आला नजरेला। तंवा त्यांनीं चाकनिशी दिली जिवबा-

दादाला ॥ काम चोख पाहून लोभ त्याच्यावर जडला ॥ मग बऱ्यांच्या पथकावर सरदार नेमलं जिवबाला ॥ म्हैसूरच्या हैदरावर एकदां लढा सुरू झाला ॥ तंवा गोपाळराव पटवर्धन चालले सामना देण्याला ॥ जिवबादादा होते मदतीला । हैदरखान आला लढाईला । पण मराठ्यांनीं जोर फार केला । अन् हैदरचा पराभव झाला । जिवबादादा सुभेदार नेमले त्याच प्रांताला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

पानिपतची झाली दंगल । त्यांत वीर झाले किती ठार ॥ संग्राम झाला घनघोर । मराठ्यांना दैव प्रतिकूल ! ॥ चाल ॥ फार थोडे वांचले त्या वेळा ॥ मल्हारराव होळकर । आणि वीर नारो शंकर ॥ बाळोबा तात्या पागनीस वांचले त्या वेळा ॥ नाना फडणीस आणि पुरंदरे वांचले त्या वेळां ॥ जिवबादादा एका घोड्यानिशीं वांचले त्या स्थळा ॥ शिंद्यांचा सारा वीर रणक्षेत्रीं पहुडला ! ॥ शिंद्यांच्या जहागिरीला वारस कोण मग झाला ? । तंवा राघोबानं विचार केला । कीं " शिंद्यांची जहागीर द्यावी नारो शंकराला ॥ तंवा महादजी शिंदे गेले पुण्याला । अन् बोलले राघोबाला । " कीं शिंद्यांची जहागीर द्यावी मला । कारण मीच वारस आहे त्या गादीला ॥ तंवा एक राघो राम पागे आणि दुसरे जिवबादादा बक्षी यांनीं सांगितलं पेशव्याला । कीं शिंद्यांनीं रक्ताचा सडा घातला । हेंच कां चीज त्याचं बोला । तर जहागीर द्यावी महादजीला । आम्ही जिम्मेदार व्यवस्थेला । नाहींतर तुमचा मनसुब योग्य दिसेना आम्हांला " ॥ पेशव्यानं दिली जहागीर महादजीला । त्याला जिवबादादाच कारण झाला । पुढं जिवबादादा राहिले शिंद्यांच्या नोकरीला । तंवा त्यांना **बक्षी** असा किताब दिला । जिवबांनीं

सैन्याचा चांगला बंदोबस्त केला ! ॥ शिपायांचं प्रेम त्यांनीं खेचलं आपल्या बाजूला ॥ जरी **द बॉयन्** होता नोकरीला । तरी जिवबांचा दरारा सर्वांला । शिंद्यांच्या फौजेचा धाक नवहि खंडाला ! ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

इकडं अहिल्याबाई होळकर होत्या इंदूर गांवाला । त्यांनीं जरा विचार केला अन् तुकोजीला आपला वारस केला । पण राघोबा संमति देईना त्याला । तंवा शिंद्यांची मदत होळकराला । जिवबादादा फौज घेऊन इंदूरला गेला ! ॥ राघोबाचा पाहून असला चाळा । माधवरावानं दूर सारलं काकाला । अन् स्वतःच कारभार करूं लागला । तंवा त्यानं तुकोजीराव वारस कबूल केला । त्याला कारण जिवबादादाच झाला । पुढं सैन्य घेऊन जिवबा उदेपुरीं गेला । तिथं मदत दिली **रतनसिंहाला** । अशा कैक लढायांत जिवबा धांवून गेला ॥ अन् शिंद्यांचा दरारा वाढविला । जिवबांनीं राष्ट्राच्यासाठीं देह झिजविला ! ॥ ४ ॥

• •

## चौक ५ वा

१७७८ सालाला । इंग्रजांशीं सामना देण्याचा प्रसंग आला । **गॉडर्डसाहेब** फौज घेऊन दक्षिणेंत आला ॥ कर्नल **इगर्टन** आणि **कॅप्टन स्टुअर्ट** हे होते प्रमुख सरदार झुंज देण्याला ॥ दोन्ही फौजा भिडल्या एकमेकांला । पण इंग्रजांचा जोर फार झाला । रघुनाथराव होता इंग्रजांच्या बाजूला ॥ तंवा नानानं लिहिलं शिंद्याला । "फौज घेऊन आतां झडपेनं यावं या वेळा" । तंवा शिंद्यांची फौज आली मदतीला । अन् जिवबादादा सेनापति झाला । तंवा **तळेगांवला**

सामना झाला । तोफखाना पुढें पसरला । मागं पायदळ अन् त्याच्या-मागें स्वार । असा व्यूह जिवबादादांनीं तयार केला ॥ तोफा लागल्या गोळे झाडायला । बंदुकींचा मारा सुरूं झाला । तो धुरळा भिडला गगनाला । इतक्यांत लढाईची तयारी पाहायला । इस्टुर फाकडा झाडा-वर चढला । अन् लागला दुर्बिणीनं बघायला । तों गोलंदाजानं एक गोळा झाडला । त्यांत **इस्टुर फाकडा** ठार झाला ( ४-१-१७७९ ) ।

जिवबादादांनीं पराक्रम केला । इंग्रजांनीं तह केला । अन् राघोबाला केलं स्वाधीन त्यांनीं त्या वेळा ॥ मग शिंदे गेले उज्जयिनीला । तिकडं पुन्हां इंग्रजांशीं सामना झाला । तेव्हांही जिवबादादांनीं शत्रुला चांगला मार दिला ॥ चाल ॥ रांगड्यांचीं राज्यं हिरावून । जिवबादादांनं । मोठ्या हिमतीनं । जोडलीं तीं शिंदे जहागिरीला । रांगड्यांनीं त्यांचा द्वेष केला । शिंद्यांचं मन बिघडवलं त्यांनीं त्या वेळा । तंवा शिंद्यांना जिवबा नकोसा झाला । पण पुन्हां सलोखा झाला । तंव दिल्लीचीं बंडें मोडायला । जिवबादादा फौज घेऊन गेला । मग टिपूचा समाचार घ्यायला । जिवबादादा दक्षिणेंत गेला । अन् बदामीचा किल्ला मराठ्यांनीं काबीज केला ! ॥ पुन्हां जिवबादादा गेले उत्तरेला । अन् **गुलाम-कादरचा** कांटा दूर केला । अन् बादशाहा शहा अलमला-मदत देऊन खूष केला त्याला ! ॥ ९ ॥

● ●

## चौक ६ वा

निजामानं पेशव्यांचा होता अपमान केला । तंवा निजामावर चढाई करण्याला । जिवबादादा तयार झाला । लहानमोठे सारे सरदार चालले लढाईला । जिवबांनीं सैन्य किति घेतलं सांगतों तुम्हांला ॥ ३०००० स्वार चालला । १२००० पायदळ मदतीला । ९८ तोफा माऱ्याला ।

१०००० पेंढारी लुटीला। दुसऱ्यांनीं सैन्यं केलीं सज्ज त्याच वेळेला॥ एकूण आंकडा सांगतों तुम्हांला। ८९००० स्वार, ३८००० पायदळ, १९२ तोफा अन् १०००० पेंढारी असा दळभार सज्ज केला। खर्ड्याजवळ मुकाबला केला। त्यांत जिववांनीं हैराण केलं दुस्मान निजामाला। तंवा निजाम शरण आला। पेशव्यांनीं जिवबादादांचा गौरव केला॥ कांहीं काळ गेल्यावर ऐका प्रकार काय झाला। जिवबांना विषमज्वर झाला। तापानं जोर फार केला। तंवा सारा हवालदिल झाला। नाना तऱ्हेचा उपाय केला॥ पण उतार पडेना जिवबाला। हळूहळू थकवा फार आला। तोंडातनं **राम** असा आवाज निघाला। देहातनं प्राण चालला। सहा जानेवारी १७९६ सालाला। **जांब** गांवीं हिरा हरपला। सारा देश दुःखभारानं हळहळून गेला॥ जी॥ **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला॥ ६॥

रचना–१९४९.

# राणा प्रताप

# यांचा

# पोवाडा —————— : ८ :

संकटांचे कडे खडे तरी हिम्मत ज्याची सदा लढे। प्रतापसिंहा! नांव ऐकुनी पत्थरही होतील खडे ॥ जी ॥ राजपुतांची कीर्ती मोठी, पिउनी होउनि धुंद लढे। दऱ्याखोऱ्यांतुन पर्वत अजुनी गाति यशाचे पोवाडे ॥ ध्रु. ॥

• •

## चौक १ ला

अकबराची सत्ता दृढ झाली चारी बाजूला ॥ राजपूत मोठमोठे राजे शरण गेले त्याला ॥ मारवाड, बिकानेर, अंबर बुंदिचे राजे झाले वश त्याला॥ भाऊ प्रतापसिंहाचा शक्तसिंहही गेला सोडून भावाला ॥ जी ॥ अन् अकबराचा मानकरी झाला ॥ पण प्रतापसिंह कधिं मान लववेना त्याला ॥ जी ॥ रानावनांत, डोंगर कपाऱ्यांत जाऊन राहिला ॥ पण तो सिंह शरण नाहीं गेला। अन् तिथनं सतावतो अकबराला। तंवा वश करायला त्याला। अकबरानं लालूच दाखविली पण उपयोग कांहीं नाहीं झाला। तंवा त्याचा मोड करण्याला। बादशहा तय्यार झाला। अंबरचा राजा मानसिंह स्वाभिमान विसरून गेला। त्यानं बहीण दिली अकबराला। रजपूत-कुलाला कलंक त्यानं लावला ॥ जी ॥ एकदां काय प्रकार झाला। मानसिंग चालला होता दिल्लीला। तंवा वाटेंत

प्रतापसिंहाला। त्यानं असा निरोप धाडला। कीं "भेटायची इच्छा तुम्हांला"। तंव्हा **प्रताप** होता **कमळ भेरला**। तिथून मानसिंगाला आणायला। उदयसागरपर्यंत सामोरा गेला। तिथं बैठक तयार केली भेटीला। अन् मेजवानीचा थाट मोठा केला। अन् बोलवलं मानसिंगाला। तिथं आल्यावर मानसिंग पाहतो तों राणा **प्रताप** दिसेना कुठं त्याला। **अमरसिंह** प्रतापाचा मुलगा होता दिमतीला। मानसिंग त्याला बोलला। "राणाजी आहेत कुठं बाळा"। तंव्हा अमरसिंह बोलूं लागला। "राणाजींचं डोकं दुखतंय म्हणून पाठवलंय त्यांनीं हो मला"। तंव्हा मानसिंग बोलला। "न यायचं कारण समजलं मला। जा! सांग जा, (तुझ्या बापाला) राणाजीला। तुम्हीं आलात तरच खाणंपिणं या जागेला"। तंव्हा राणाजी संतापून आला। अन् बोलला मानसिंगाला। "मानसिंग, थोर तुम्ही झाला। पण कलंक लावलात रजपूत कुळाला। आपल्या पोरीबाळी दिल्यात म्लेंच्छाला। अन् कुळशील-भ्रष्ट तुम्ही झाला। अशा तुमच्याबरोबर जेवण तर सोडाच। पण तुमचं नुसतं तोंडदेखील बघायला। हा राणा–सिसोदिया-तय्यार नाहीं या वेळा"॥ चाल ॥ हे असे बोल ऐकून! मानसिंग भडके रागानं ॥ जी ॥ खाणंपिणं तसंच टाकून। मानसिंग उठला रागानं ॥ जी ॥ जातां जातां बोलला त्या वेळा। "अरे जा रे कुतऱ्या! तुझा सूड घेईन तरच नांवचा **मानसिंग** झाला"। असं बोलून **मानसिंग** पार निघुनिया गेला ॥ जी ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

राणाजीनं मानसिंहाचा केला अपमान। अकबर त्याचा मेहुणा झाला बेभान। अगणीत फौज वेगानं तयार करून। प्रतापाचा नाश करण्याला। अरवली पहाडांत आला। अकबरचा मुलगा सेलीम मोठ्या

झडपेनं ।। चाल ।। अरवली पहाडांत प्रतापसिंह तयार । जागजागीं ठेविले प्राण देणारे वीर ।। घोड्यांच्या टापांचे नाद भरले चौफेर ।। जी ।। (चाल) ।। घनघोर संग्राम झाला । रणयज्ञ असा कधिं कुणी नाहीं पाहिला ! ।। जी ।। चाल ।। चेतक-घोड्यावरती बसुनी **प्रताप** फिरतो चोहीकडे । बाण लावुनी सोडत केव्हां न कळे शत्रू खालीं पडे ।। रणचंडीला नरशीर्षांचे नारळ वाहती वीर बडे । सूर्यासम तो प्रताप दिसला ठार जाहले शत्रु किडे ! ।। जी ।। (चाल) ।। लढाईचा मध्यकाळ आला । तंवा राणा फिरतो गरगरा । मानसिंग कुठाय बघण्याला । राणा गरुडासारखा चालला । पण त्याला सेलीम दिसला । तो होता अंबारींत बसला । प्रतापानं टांच मारली आपल्या घोड्याला । तो चेतक हत्तीवर थेट चालुन गेला ।। जी ।। दोन पाय लावले सोंडेला । अन् सामोरा उभा राहिला । प्रतापानं भाला फेंकला । तो हौद्याला धाडूनं लागला । पण त्यानं माहूत ठार केला । अन् सेलीम थोडक्यांत वांचला । पण हत्ती बेफाम झाला । अन् लागला उधळून पळायला । राणा प्रताप गेला पाठलागाला । तंवा शत्रूंनीं घेरलं प्रतापाला । आतां शत्रु मारणार त्याला । इतक्यांत **झालापति मन्ना** धांवुन आला ।। त्यानं राणाजीचा पोषाख केला । अन् राणाजीला आपला पोषाख दिला । तंवा राणाजी वायुवेगानं निघुनिया गेला ! ।। **झालापति मन्ना** लढतांना मरुनिया पडला ।। असा मित्र कधीं कुठं कुणी पाहिला बोला ।। २ ।।

• •

## चौक ३ रा

तंवा राणाजीच्या पाठलागाला । एक **मुलतानी** अन् दुसरा **खुरासानी** शिपाई मागं लागला । इतक्यांत **शक्तसिंग** भाऊ धांवून

आला। शक्तसिंग प्रतापाचा भाऊ – पण भांडून होता निघून गेला ! शत्रूला मदत करायला। पण ऐनवेळीं तोच आला मदतीला। त्यांनीं मारलं त्या दोन्ही शिपायाला। अन् प्रतापाचा जीव बचावला। असं बंधुप्रेम पाहून – हळदीघाट धन्य धन्य झाला ॥ जी ॥ राणा प्रताप पंचवीस वर्ष झुंजत राहिला। पण शत्रु बळावत गेला। डोंगरातनं दऱ्याखोऱ्यातनं राणा राहिला। पण स्वाभिमान नाहिं सोडला। कंद मुळं फळं खाऊन काळ कंठला। पण मान नाहीं लवविली त्यानं यवनाला ॥ जी ॥ असा राणा मानी मानाचा कुणि न पाहिला ॥ जी ॥ **पांडुरंग** राणाजीला करतो मानाचा मुजरा ! ॥ ३ ॥

रचना–१२ जुलै १९९१, मुंबई.

तात्या टोपे

यांचा

# पोवाडा ——————— : १ :

तात्या टोपे चाल करोनी हल्ला करण्याला आला । ऐकुनि झाला शत्रु घाबरा वंदन करितों मी त्याला ( तात्याला ) ॥ ध्रु० ॥

● ●

## चौक १ ला

नाशीक जिल्ह्यांतिल गांव । येवलें गांवाचं नांव ॥ जी ॥ **पांडुरंगपंत** राहती येवलें गांवाला ॥ त्याचा मुलगा रघुनाथ झाला वंद्य सकलाला । १८१४ सालाला । रघुनाथ आला जन्माला । रघुनाथ दिसामासांनीं मोठा जाहला ॥ १८१८ सालाला । पेशवाई गेली अस्ताला । आठ लाख रुपये पेन्शन बाजीरावाला । तंवा बाजीराव गेले ब्रिठुरला । पांडुरंग-पंतही गेले त्याच गांवाला । रघुनाथ तात्याही गेले संगें त्या वेळा ॥ असा कांहीं काळ मग गेला । रघुनाथ मोठा जाहला । तंवा बाजीराव प्रसन्न झाला । अन् त्यानं एक टोपी दिली रघुनाथाला ॥ टोपीचा दिमाख मोठा झाला । रघुनाथाच्या घातली डोक्याला । तेव्हांपासून रघुनाथ **तात्या टोपे** जाहला ॥ जी ॥ चाल ॥ **नानासाहेब बाळासाहेब** दोन । भाऊ जसे भीम अर्जुन ॥ **रावसाहेब** पुतण्या नानाचा । अभिमन्यु जसा शौर्यानं ॥ तात्या टोपे चुणचुणीत छान । **मनुबाई** छबेली गुणवान ॥ जी ॥ चाल ॥ पेशव्यांच्या वाड्यामधिं मुलं खेळाति खेळाला ॥

भाल्याची फेंक, तलवार, पट्टा बंदूक, घोड्याची दौड हे खेळ खेळतीं त्या वेळा ।। या खेळांत झाला तरबेज मुलांचा मेळा ।। १ ।।

● ●

## चौक २ रा

हिंदुस्थानावर राज्य करण्याची हांव सुटली कंपनीला । संस्थानांचा वळी घेतला लागोपाठ तिनं त्या वेळां ।। राज्य सातारा तंजावरही नागपूर झांशी यादीला । पंजाब, सिक्कीम, ब्रह्मदेशाचा अर्धा तुकडा तो गिळला ।। जी ।। दिल्ली अयोध्या याच यादीला असा कहर हा जुलुमाचा । डलहौसी भस्मासुर उठला ग्रास कराया सर्वांचा ।। जी ।। चाल ।। बाजीराव गेला मरून । बंद झालं त्याचं पेन्शन ! ।। नानासाहेब पेशवे वारस होते वतनाला ।। त्यांनीं विचारलं कंपनीला । कीं "मी वारस आहे पेन्शनाला । मग तनखा बंद कां केला सांगा आम्हांला" । पण साहेबानं जबाब तंवा दिला । "तुम्हीं औरस नाहीं वतनाला । शिवाय बाजीरावानं पैसा असेल ठेवला । तो पुरेल तुमच्या जन्माला" ।। अशा कैक जुलमानी गांजलं साऱ्या लोकांला ।। जी ।। २ ।।

● ●

## चौक ३ रा

गुलामगिरिच्या बेड्या पडल्या हिंदभूमिच्या पायांत । तडतड तोडुनि मुक्त कराया कैक तरुण ते तळमळत ।। जी ।। सैन्यांत बंडाळी झाली । ती फौज बिथरली सारी ।। २९ मार्च १८५७ ला । नवीं काडतुसं दिलीं शिपायाला । गाईं डुकरांचीं चरबी लावली त्याला ।। बराकपुरचे पलटणवाले शिवेनांत तसल्या काडतुसाला । तंवा शिपायांना शिक्षा करण्याला । कंपनीनं पलटणच रद्द केली त्या वेळा ।। तंवा मंगलपांडे शिपाई भडकला । अन् त्यानं उघड उघड केला साहेबावर हल्ला ।। गोरे अधिकारी धांवले त्याला पकडायला । त्यांनीं पकडलं शूर वीराला ।

अन् ६ एप्रिल १८५७ च्या दिवसाला। फांसावरती त्यांनीं चढविलं मंगलपांडेला ॥ क्रान्तीचा वणवा जागजागीं धुमसूं लागला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

३१ मे १८५७ दिवस ठरविला बंडाचा। चहुबाजूंनीं उठाव करावा बेत असा हा सर्वांचा ॥ मिरत गांवाचे शूर शिपाई अधीर झाले बंडाला। १० मे रोजींच उठाव केला त्यांनीं बंडाचा मिरतेला ॥ मिरतेहून मग शिपाई सारे तडक चालले दिल्लीला। दिल्ली जिंकुन बादशहाला पुन्हां बसाविलं तख्ताला ॥ चाल ॥ लखनौनं पेट घेतला। जगदीशपूर यादिला। **कुंवरसिंह** ८० वर्षांचे होते आघाडीला। अमरसिंह भाऊही होता त्यांच्या मदतीला ॥ अयोध्येनं शत्रुरक्ताचा पाट वाहविला ॥ जी ॥ तंवा कानपुरला प्रकार काय झाला। कंपनीचा खाजिना होता कानपुरला। तंवा त्याचं रक्षण करण्याला। **व्हीलरनं** बोलवलं नानाला। "नानासाहेब, कंपनीचे मित्र तुम्हीं झाला। आतां खजिन्याचं रक्षण करण्याला। तुम्हीं यावं धांवुन बक्षीस देऊं तुम्हांला ॥ नानानं संधीचा फायदा पुरा घेतला ॥ तीनशें लोक घेतले मदतीला। दोन तोफा मारा करण्याला। **तात्या टोपे** चालले त्या वेळा ॥ २२ मे ला गेले कानपुरला। इंग्रजांच्या छावणींतच तळ त्यांनीं तंवा दिला ! ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

चार जूनचा सूर्य उगवला तसाच गेला अस्ताला। मध्यरात्रीला भडका उठला बंडाचा झेंडा चढला ॥ नाना पेशवे, तात्या टोपे, टीकासिंग सुभेदार। चतुर योजना त्यांची पाहुन बावरले **सर व्हीलर** ॥ चाल ॥ कानपुरच्या एका कोटांत इंग्रजहि जमले ॥ शिपायांनीं

जोरानें कैक हल्ले चढविले ॥ २३ जूनचा दिवस उगवला । असा समज होता झालेला । त्या दिवशीं वर्षे शंभर साहेबी राज्याला ॥ अन् कंपनीचं राज्य बुडणार त्याच दिवसाला ॥ म्हणून निकराचा हल्ला सुरू झाला । सर व्हीलर शरण मग आला । तारीख २५ जूनच्या दिवसाला । कंपनीचं राज्य जणुं वाटलं गेलं अस्ताला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

१८५७ ला । जुलैच्या पहिल्या तारखेला । अभिषेक नानासाहेबांला । झाला ब्रह्मावर्त नगराला । पण इंग्रज चढाई करण्याला धांवून आला ! ॥ सेनापते **रेनॉड, हॅवेलॉक** आले लढण्याला । तंवा नशिबाचा फांसा उलटला । १७ जुलैच्या हो दिवसाला । कानपुर जिंकलं इंग्रजानं फांसा उलटला ॥ सेनापतिपद नानानं दिलं तात्याला ॥ काल्पीवरती हल्ला चढविला । अन् विजयाचा झेंडा उभा केला । राजधानी केली काल्पीला । रावसाहेब पेशवे मग गेले काल्पी गांवाला ॥ तंवा शत्रूला हैराण करण्याला । तात्या चालले मुलुखगिरिला । कानपुरावर हल्ला चढविला। **विंड्यामचा** पुरा मोड केला । सैन्याचा धुव्वा उडविला । विल्सन, मेक्रिया, मर्फी, स्टर्लिंग, बिविन्स्–हे सारे मोठे लढवय्ये पडले भूमिला ॥ जी ॥ डिसेंबरच्या ६ व्या तारखेला । लखनौस्नं सेनापति **कॉलिन्स्** धांवून आला ॥ पुन्हां मोठा संग्राम झाला । इंग्रजानं विजय मिळविला । पुन्हां सारे देशभक्त गोळा झाले काल्पीला ॥ जी ॥ पुन्हां इंग्रज चालून आला । काल्पीला पराभव झाला । गेले ग्वालेरला । ग्वालेरला मुकाबला झाला । १८ जून १८५८ ला । झांशीच्या राणीनं प्राण दिले देशाला । धारातीर्थी देह ठेविला । बंडवाले पडले भूमिला । पण तात्याचा धीर नाहीं खचला ॥ त्याचा पुढचा बेत सांगीन पुढच्या चौकाला ॥ जी ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

वाऱ्यासारखा तात्या टोपे गरगर फिरला चौंहीकडे ॥ फुंक मारुनी जादुगार हा सैनिक करतो रणीं खडे ॥ आज इथें तर उद्यां तिथें हा करितो शार्दुल संचार। इंग्रज सेनापति चपापत पाहुनिया हा रणवीर ॥ मानसिंगाचा आश्रय घ्याया वीर निघुनिया हा गेला। मानसिंग पण फितुर होऊन पकडून देतों वीराला ! ॥ १८५९ सालीं एप्रिल ७ व्या दिवसाला ॥ तात्या टोपे हातीं लागला, इंग्रज आनंदून गेला ॥ चाल ॥ मग नेले त्याला शिप्रीला। **जनरल मीड** न्याय देण्याला। तात्याची जबानी झाली त्याच जागेला ॥ तो खंदा वीर बोलला ॥ "पेशव्यांचा नोकर हा झाला। त्यांच्या आज्ञा मान्य हो मला। म्हणून मी केलं युद्धाला। हा तात्या मारेकरी खुनी कधीं नाहीं झाला ॥ लढाईंत समोरासमोर मार घेतला अन् मार दिला। यांत अपराध कोणता मी केला ?। जर मी अपराध केलाच असेल तर तोफेच्या तोंडीं द्या मला। तेंच मरण योग्य वीराला"। १८ एप्रिलच्या हो दिवसाला। १८५९ ला। दुपारीं ४ च्या ठोक्याला। तात्याला फांसावर दिलं-धन्य जाहला ! ॥ **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ जी ॥ ७ ॥

रचना-२-७-५३, मुंबई.

श्रीशिवजन्म

# पोवाडा ——— :१०:

## नमन

आधीं नमीन शिवनंदन। करि जो विघ्नांचं भंजन ॥ जी ॥ मग नमीन मी शारदा। करि जी कवनाचं स्पंदन ॥ जी ॥ वंदिन श्रीशंकर-पार्वती जगताचें कारण ॥ जी ॥ सांगिन शिवजन्माची कथा। ऐकावी आतां लक्ष देऊन ॥ जी ॥

• •

## चौक १ ला

बाबाजी राजे भोसले। वेरूळगांवीं त्यांचं वतन ॥ मालोजी विठोजी मुलगे जसे काय होते भीमार्जुन ॥ वेरूळचे पाटील म्हणुनी ओळखती सज्जन ॥ चाल ॥ शेती करुनी धान्य पिकवुनी करती गुजराण ! ॥ भावाभावांचं नशीब मोठं ऐका लक्ष देऊन ॥ जी ॥ एके दिवशीं प्रकार काय झाला। शेतातनं विठोजीला यायला वेळ लागला ॥ काळजी लागली बंधुराजाला। भावाचा शोध करण्याला मालोजी गेला ॥ जंगलांतून जाऊं लागला। किर्र् झाडी चारी बाजूला। रात्रीनं काळोख केला। आणि लागली भीति घालायला। वटवागळं फिरूं लागलीं आकाशांत जरा ॥ भुरभुरती पाकोळ्या कैक चारी बाजूला ॥ घुबडांचा घूत्कार चालला चारी दिशेला ॥ पक्षी गेले होते घरट्याला। वाघ चित्ते लांडगे कुठं कुठं जीव घेण्याला ॥ अशा वेळीं प्रकार काय झाला। मालोजी होता पुढंच चालला। पण झाडाची फांदी आड आली, झाला अडथळा ॥

मालोजी जरासा दचकला। अन् इकडं तिकडं लागला बघायला ॥ तों चमत्कार काय झाला। **भवानीनं** दिलं दर्शन मालोजीरावाला। जगदंबा बोलली काय त्याला! "मी तुझी कुलस्वामिनी। अन्य ना कुणी। इथं या रानीं। तूं धन्य तुझं कुळ धन्य ऐक ही वाणी ॥ जी ॥ या तुझ्या शिसोदेकुळीं। अवतरेल वळी। ऐक सत्वरीं। देव तो थोर। ज्यानं शिरीं गंगामातेला आणि चंद्राला दिला आधार" ॥ यवनांचं बंड मोडील मोठा झुंजार। माझा विळखा त्याच्या कमरेला सदा राहील ॥ जी ॥ चकचकतं रूप तें माझं रक्तानं लाल ॥ दीनदुबळ्यांचा आधार। साधुसंत धर्माचं राज्य पुन्हां स्थापील ॥ सत्तावीस पिढ्या मग राज्यभोग घेतील ॥ चाल ॥ तें पहा वारुळ तूं जरा। तें खोद द्रव्याचा ठेवा दिसेल रे तुला। तो घ्यावा तुमच्या कार्याला। तें द्रव्य घेऊन तूं जावं श्रीगोंदेला। तिथं शेषाजी नाइक माणूस थोर। त्याच्याजवळ द्रव्य ठेवून द्यावं सत्वर ॥ अन् लागेल तसं घेऊन त्याचा योग्य करा वापर ॥" असं बोलून दिसेनाशी झाली मूर्ति ती थोर ॥ चाल ॥ जगदंबेची आज्ञा ऐकून। खोदियलें तें वारुळ येऊन। अमाप धन तें हातीं लागलें। शेषाजीकडे ठेवुन दिधलें ॥ चाल ॥ केला दानधर्म अगणीत। नांव दानशूर प्रख्यात ॥ वेरुळला घृष्णेश्वर। देवळाचा जीर्णोद्धार ॥ पाण्याचा तलाव बांधिला। श्रीशिखर महादेव क्षेत्राला। असा त्यांच्या नांवाचा झाला मोठा बोलबाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

मर्दुमकीची हौस भयंकर होती भावाभावाला। जाधवरावाकडे चालले नोकरी लष्करी करण्याला ॥ लखूजी जाधव सिंधखेडचे होते पराक्रमी सरदार। त्यांच्या पदरीं बारगीर म्हणून दोघे राहिले ते वीर ॥ यादवकुळिंचे देवगिरिचे राजारामदेव रणशूर। शंकरदेव, गोविंददेव

ठाकुर, भूखणदेवहि नरवीर ॥ अचलकर्णजी निजामशाहाचा होता मोठा मनसबदार । त्याचा मुलगा विठ्ठलदेव, त्याचा पुत्र लक्ष्मणदेव ॥ लक्ष्मणदेव तोच लखूजी जाधव नामें महशूर ॥ सात मुलगे होते त्याला मुलगी जिजाई सुंदर ॥ देवगिरीच्या यादवकुळिचा वंश बोलतो हा सारा । आतां पुढें सांगीन मालोजी पुढं कुठं आणि कां गेला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

मालोजीला वाव मिळेना कर्तबगारी करण्याला । म्हणुनी गेले भाऊ भाऊ ते नोकरिसाठीं फलटणला ॥ परमारवंश फलटणला करि राज्याला ॥ वनंगपाळ निंबाळकर भूपाळ । पराक्रमी मोठा काळाचा काळ । प्रजेचा होता करित सांभाळ ॥ जी ॥ चाल ॥ लोक बोलती काय त्या वेळीं सांगतों तुम्हाला । एक वनंगपाळ बारा वजिरांचा काळ झाला ॥ मालोजी विठोजी करिती त्याच्या नोकरीला ॥ एकदां काय प्रकार झाला वनंगपाळ कोल्हापुरावर चढवितो हल्ला ॥ १२०००, घोडेस्वार घेतले चढाई करण्याला ॥ जातां जातां रंकाळा तलाव त्यांना लागला ॥ तिथं टाकली छावणी त्या वेळां । आणि तलावांत गेले स्नान करायला । वनंगपाळ, मालोजी विठोजी–हे सारे करिती स्नानाला ॥ शत्रु होता जवळ आलेला । त्यानं संधि साधून केला अचानक हल्ला ॥ वनंगपाळाच्या छावणींत झाला मोठा गलबला ॥ बेसावध होते सारे जण हाहाकार झाला ॥ तंवा मालोजी विठोजींनीं स्नान ठेवलं बाजूला । अन् भाऊ भाऊ घोड्यावर चढला । शत्रूवर हल्ला चढविला । हल्ला इतक्या जोराचा केला कीं विजापुरच्या फौजेचा पार धुव्वा उडवला ॥ तोबा तोबा म्हणत पळत सुटले चारी दिशेला ॥ लढाईचा इतका माज चढला होता दोघाला । कीं आतां आवरावं कसं त्यांना । हीच चिंता लागली जीवाला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

पराक्रमाचा सुगंध भरला साऱ्या दुनियेंत । निजामशाहा मूर्तुजानं त्यांना आणलं दरबारांत ॥ मानसन्मान करून मोठा शाहा बोलला दोघाला । "फलटण सोडून यावं इकडं करिन शिलेदार तुम्हांला ॥" वजीरपदावर लखुजी जाधव शोभत होते त्या वेळा । निजामशाहींत आले दोघेजण खेळ दैवाचा बघण्याला ॥ मालकर्णजी त्यांचे आजोबा होते पूर्वी नोकरीला । त्यांची जहागीर दिली शाहानं परत त्यांच्या नातवाला ॥ चाल ॥ १५०० स्वारांची शिलेदारी दोघाला ॥ जुन्नर परगणा दिला त्यांच्या खर्चाला ॥ शिवनेरी किल्लाही दिला बंदोबस्ताला ॥ ही बातमी ऐकून वनंगपाळ खूष झाला ॥ अन् त्यानं दीपाबाई बहीण दिली मालोजीला । लग्नाचा थाट फार झाला । मालोजीला राजे हा किताब शाहानं दिला ॥ परमारशिसोदे वंशांचा संगम झाला ॥ जी ॥ ४ ॥

• •

## चौक ५ वा

मालोजीचं दैव उघडलं कमान चढती दौलतिला । एकच हुरहुर जाळी मनाला आतां सांगतों तुम्हांला ॥ चाल ॥ चाळिशी उलटली तरी नाहीं संतान ॥ हें होतं त्यांच्या चिंतेचं मोठं कारण ॥ जी ॥ किती उपास तापास केले । दानधर्म अगणित झाले ॥ रुद्राभिषेक किती झाले । किति सूर्यमंत्र ते जपले ॥ चाल ॥ श्रीहरी प्रसन्न झाला । अन् ४४ व्या वर्षाला । मालोजीला मुलगा एक झाला । शके पंधराशें सोळाला । नांव ठेवलें **शहाजी** मोठा आनंद झाला ॥ तीन वर्षांनीं दुसरा पुत्र झाला । **शरीफजी** नांव हो त्याला । भोसलेकुळाला उजळा त्यांनीं दिला ॥ जी ॥ आनंदाचं स्मरण ठेवण्याला । **शिखर शिंगणापुरला** एक मोठा तलाव बांधला । जाधवराव होते वजीर निजामशाहीला ॥

मालोजीचा ओढा फार लागला त्यांच्या जीवाला ॥ दोन घराण्यांचा घरोबा वाढला ॥ चाल ॥ शके १५२१ सालीं मोंगल सरदार युद्धाला। निजामशाहीवर चाल करुनिया मोठ्या झडपेनं तो आला ॥ चाल ॥ निजामशाही बुडवण्याचा घाट त्यानं घातला ॥ निजामी फौज चालली लढाईला। बीडजवळ भिडलीं तीं सैन्यें एकमेकाला ॥ मालोजीनं पराक्रम केला। अन् मोंगलांचा फडशा उडवला। शेरख्वाजा मोंगल सरदार पळुनिया गेला। आनंदीआनंद झाला। रंगपंचमीचा सण मग आला। तो कसा साजरा झाला। तें सारं आतां सांगीन पुढच्या चौकाला ॥५॥

● ●

## चौक ६ वा

झाली हुताशनी गिरिजापतिनं उघडुनि तिसऱ्या डोळ्याला। कामदेवाला पार जाळलं हुताशनीच्या दिवसाला ॥ फुटली पल्लवी फुटले अंकुर वृक्षाला आणि वेलीला। जाइजुईला बहार आला गुलाब मोगरा दरवळला ॥ निळा चांदवा आकाशाला किती चांदण्या लुकलुकती। पहा सोन्याचा रंग उधळला अंतराळांतून भूवरती ॥ चाल ॥ रंगपंचमी नाचत आली। गुलाल रंगीं रंगुनि गेली। किती उडविला रंग केशरी। आनंदाची लूट चालली ॥ चाल ॥ त्या दिवशीं जाधवरावांनीं मोठा बेत केला ॥ मोठी मोठी मंडळी आली त्यांच्या वाड्याला ॥ मालोजीराजेहि आले घेऊन शहाजीला ॥ शहाजी पांच वर्षांचा प्यारा सर्वांला ॥ शहाजी जाधवरावांकडं धांवतच गेला ॥ अन् थेट जाऊन मांडीवर बसला। लखुजींची मुलगी जीजाबाई आली त्या स्थळा ॥ तीहि धांवली बापाकडं तिचा मोठा हो लळा ॥ शाहाजी एका मांडीला। जिजा शोभे दुसऱ्या मांडीला। लोक बघती टकमका आनंदाचा सोहळा ॥ कुजबुजती एकमेकाला। हा योग जर जमून आला। तर ब्रह्मदेव धन्य जाहला। सोन्याच्या कोंदणांत शोभे चमकता हिरा ॥ पण येणार कसा हा योग ठाव कोणाला? ॥ इतक्यांत प्रकार काय झाला। जाधवराव

बोलले त्या वेळां । ‘हा शाहाजी आणि ही जिजा—किती जोडा छान शोभला । मुली, नवरा हवा कां हा तुला ?।’ मनामध्यें लाजली जरा। थोड्या थोड्या चोरट्या नजरेनं पाहिलं तिनं त्याला ॥ तंवा मालोजी चटकन् बोलला । “ऐका हो ऐका—यांनीं शाहाजी जांवई केला । अन् जिजा सून आम्हांला” । टाळ्यांचा कडकडाट झाला ॥ चाल ॥ पण जिजाईची आई रागानं । पाहूं लागली डोळे फिरवून ॥ तिनं मोडतां घालण्याची खूण । लखूजींना केली डोळ्यानं ॥ चाल ॥ मग लखुजी लागले बोलायला । “मित्रांनो, मी सहज बोललों हें जरा । तसा माझा मानस नाहीं झाला । विवाहसंबंधाच्या विषयाला । घराण्याचा सारखेपणा मूळ कारण हो झाला ॥ तसा इथं दिसत ना मला” । मालोजी रागारागानं निघुनिया गेला ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

जाधवरावांनीं मनुष्य पाठवून जेवायला बोलावलं मालोजीला । “व्याही होऊं तेव्हांच येऊं” मालोजिनं चट् जबाब दिला ॥ धन नाहीं म्हणून अपमान । हें शल्य करित हैराण ॥ लखूजींची नोकरी सोडून । वेरुळला गेले निघून ॥ चाल ॥ भवानीला भार घालायला । तुळजापुरला मालोजी गेला ॥ भवानीनं तुष्ट होऊन दिला वर त्याला ॥ “भाग्याचा काळ लवकर येईल रे तुला ॥ संकल्प मनाचा होईल तुझा रे पुरा” ॥ मालोजी फिरला माघारा । अशांत पांच वर्सं गेलीं झरझरा । पण मालोजिच्या जखम हृदयाला । अपमानाचा कसा घ्यावा बदला । हा विचार सारखा चालला । एक उपाय सुचला मग त्याला । एक दिवस मालोजी जाधवरावाकडं गेला ॥ अन् त्यांना बोलूं लागला । “राजे, तुम्हीं माझा अपमान केला । तुम्हीं दिलेला शब्द मोडला ! । मी असेन गरीब पण यावं द्वंद्वयुद्धाला । अन् ठरवूं या कोण मोठा झाला ॥ पैशाची बरोबरी नको मला । शौर्याची बरोबरी करूं चला । रंडकी सुद्धां पैसा

मिळविते–त्यांत कसला पुरुषार्थ खरा ? ॥ धूड हत्तीचं चाललं म्हणून काय ? खरा सिंह तो सिंह खरा ॥ साप किति जरी जहरी झाला तरि गरुड खरा तो गरुड खरा ॥ चला द्वंद्व युद्धानं ठरवूं कोण शक्तिनं अधिक खरा '' ॥ हें कळलं निजामशहाला । त्यानं बोलवलं मालोजीला । अन् झगड्याचं कारण काय तें विचारलं त्याला । मालोजीनं सांगितलं सारं त्याला । मालोजीची गरज निजामाला । त्यानं बोलावून घेतलं लखूजीला । अन् निजामशहा बोलला । " हा काय प्रकार चालला ? " । जाधवराव बोलले त्या वेळा, ॥ " खावंद, माफ करा मला । हा जिजा द्या म्हणतो शहाजीला । पण—काय ? जिजा देऊं शहाजीला ? । आमचा तोलाचा मालोजी नाहीं झाला । मालोजी होता आमचा बारगीर । मग शादी कशी होईल बोला ? " । निजामशहा बोलूं लागला, । " एवढीच अडचण आहे ना ? ती दूर करतों या वेळा । आजच मालोजीला ५००० घोडेस्वारांचा मनसबदार मी केला । पुणें–सुपे परगणे-दिले खर्चाला । चाकण शिवनेरी किल्ले दिमतीला । अन राजे हा किताब दिला । आतां कमीपणा काय तो बोला । मालोजीचा बाजूचा मी व्याही–द्यावी जिजा आमच्या शहाजीला " । जाधवराव खजील झाला । अन् सोयरिकी जमली त्या वेळा । निजाम खास हजर होता लग्नाला । शके १५२७ ला । ज्येष्ठ शुद्ध दशमीला । जिजाइनं थाटामाटानं वरलं शाहाजीला ॥ ७ ॥

● ●

## चौक ८ वा

धारातीर्थी पडले मालोजी आपल्या सत्तर वर्षाला । इसवी सनाच्या सोळाशें एकोणीस सालाला गेले स्वर्गाला ॥ मलिकंबरचा मृत्यु जाहला १६२६ सालाला । शहाजी राजे वजीरपदावर आले होते त्या काळाला ॥ मोंगल शहानं फौज धाडली दक्षिण काबिज करण्याला । निजामशाही खालसा कराया लखूजी जाधव मदतीला ॥ शहाजीनं विचार तंवा

केला। कीं माहुलीचा किल्ला मजबूत झाला। तिथं जावं आतां या वेळा। निजामशाहाला घेऊन चालला। बेगमसाहेबासंगें त्या वेळा। माहुलीच्या किल्यामधिं गेले राजे त्या वेळा॥ मोंगलांनीं वेढलं किल्याला। सहा महिने वेढा चालला। लखूजी सामील मोंगलाला। तो होता बाहेरच्या बाजूला। शाहाजी आंतल्या बाजूला॥ सासरे जांवई झाले दुश्मन एकमेकाला।. सहा महिने झाले तरी किल्ला येईना हाताला। तंवा फितुरीचा प्रयोग केला। बेगमसाहेबा फुटली त्या वेळा। तंवा शहाजीनं विचार केला। ज्याच्यासाठीं जीव धोक्यांत घातला। तोच धनी फितुर शत्रुला। आतां कुणासाठीं लढायचं बोला॥ असं म्हणून शहाजी किल्याबाहेर चालला॥ जिजाबाई होती बरोबर संगें त्या वेळां॥ घोडे धांवती पुढें मागें त्यांच्या शत्रु लागला॥ आठ महिन्यांची गरोदर जिजा। घोड्यावरनं चालली त्या वेळा। लेकीला अन् जांवयाला पकडायला। लखुजी मागं चालला पाठलागाला। शिवनेरी किल्ला जवळ आला। तेव्हां शहाजीनं विचार केला। आतां इथं किल्यांत ठेवावं जिजाईला। अन् आपण जावं विजापुरला। आतां घोडदौड झेंपणार नाहीं जिजेला। असा बेत करून किल्यांत ठेवलं तिला। अन् शहाजी विजापुराकडं निघुनिया गेला॥ पाठोपाठ लखूजी आला। शिवनेरी किल्यामधें गेला। तिथं लेक दिसली डोळ्याला तिथं पुढं काय प्रकार झाला। शाहीर आतां सांगील पुढच्या चौकाला॥ ८॥

● ●

## चौक ९ वा

जाधवराव बोलले जिजाईला। "पोंचवतों चल मुली तुला। मी आतां तुझ्या माहेराला। सिंदखेडला चल जाऊं या। आईजवळ पोंचवतों तुला"॥ पितयाचे बोल ऐकून। जिजा बोलली धीट होऊन॥ "कुऱ्हाड मारता माझ्या डोक्यावर। बाबा म्हणावं काय तुम्हांला?। लाखों जन्माची

पुण्याई तुमची असला पति हा लेकीला ॥ किती अभागी मुलगी तुमची पती लाभला जरि छान । तरि पिताच त्याचा वैरी झाला, दैवयोग हा दारुण ॥ बापच देवा ! वैरी झाला तर आधार कुणाचा मुलीला । आईबापांनीं छळ मांडला फिर्याद सांगावी कुणाला ? । आठ मास मज झाले आता । घोडयावरूनी जाता जाता । जीव उडाला । म्हणुनि ठेवुनी येथें मजला । राजे गेले या वेळा ॥ चिंता लागली या जीवाला हुरहुर माझ्या हृदयाला ॥ चाल ॥ असा त्यांनीं काय अपराध केला । कीं ज्यानं पेटवलं तुम्हांला ? । मुलीचं कुंकू पुसायला । बेदिक्कत तुम्ही तयार झाला बोल लावला मी नशिबाला ॥ जी ॥ चाल ॥ मी येणार नाहीं माहेरा । काय माझं व्हायचं तें होऊं द्या इथंच या वेळा ॥ घ्या तलवार अन् उडवा माझा गळा " ॥ कठोर निश्चय बघुन मुलीचा ठेवून तेथेंच जिजेला । लखुजी जाधव पुढं चालला शहाजीला पकडायाला ॥ ९ ॥

● ●

## चौक १० वा

फाल्गुन महिना सुरू जाहला हुताशनीचा सण झाला । मदन जाळून धुळवड खेळून महादेव जणु अवतरला ॥ जी ॥ झाडं टवटवित दिसूं लागलीं । गोड फुलांनीं फुलल्या वेली । निरभ्र आकाशांत चांदण्या खेळूं लागल्या डौलानं । चंद्र मधोमध कृष्णासारखा शोभूं लागला तेजानं ॥ चाल ॥ शुक्रवारचा दिवस उगवला । फाल्गुन वद्य तृतीयेला । शके १५५१ ला ॥ चाल ॥ मंद सुगंधित सुटला वारा । अंधारास न कोठें थारा । शांत नभस्तल । शांत धरातलं । आनंदानं भरलं त्रिभुवन । सत्पुरुषांचं करण्या रक्षण । दुष्टांना करण्याला दंडन । धर्माची स्थापना कराया श्रीहरि धरि अवतरला ॥ नांव शिवाजी रम्य ठेवलं, वंद्य जाहला जगताला ॥ शिवरायाच्या दिव्य यशानं वेड लावलं जीवाला । दिव्य यशाचे गुण गाण्याला **पांडुरंग** शाहिर आला ॥ १० ॥

रचना-२७-४-६०.

# मालव-केसरी यशवंतराव होळकर

## यांचा

# पोवाडा ——————— : ११ :

निराशेचा वणवा पेटला। चारी बाजुला। तरि न डगमगला। केला ज्यानं दुष्मनांचा संहार। मुकुंदरा खिंड गाजविली फार। कीर्तिनं ज्याला घातला हार। **यशवंतराव** रणवीर। पराक्रमी धीर। **पांडुरंग** शीर। त्याला नमणार॥ ध्रु०॥

• •

### प्रास्ताविक

डोळे जसे काय मोती टप्पुरे होते पाणिदार। वरती कमान भिवयांची शोभली काळी काळी भोर॥ दृष्ट कुणाची कशी लागली एक डोळा चूर। बंदुकीच्या दारूनं उडविला मर्द खरा वीर॥ अंग पिळलेलं छाती जशी काय भिंत भव्य थोर। अभयदान देण्यास सज्ज ती झाली तलवार॥ कंगणीदार पागोटं वीराच्या शोभे शिरावर। शिरपेंच मोत्यांचा वर। जडविलीं रत्नं सुंदर। वरती मोत्यांचा तुरा घोळतो राजमस्तकावर॥ जी॥ चाल॥ **लंका** घोडी शोभे सुंदर **यशवंत** झाला वर स्वार। भाला बर्ची ढाल तलवार। शत्रूंचे फोडी जिव्हार॥ चाल॥ घोड्यांच्या टापा ऐकून। झाले अर्धेमुर्धे रणधीर॥ चाल॥ कनवाळू उदार दिलदार। प्रेमाची घाली पाखर॥ गांजलेले लोक पाहून। रायाला येत गहिंवर॥

• •

## चौक १ ला

**मल्हार गर्दी** झाली पुण्याला । मल्हारराव जीवें मारला ! **विठोजीला** हत्तीच्या पायाखालीं चिरडिला ॥ तंवा यशवंतराव निसटला । हळु हळु कान्हदेशीं आला । तिथं **चिमणाभाऊ** भेटला वीराला । त्यानं रुपये तीनशें आणि **लंका घोडी** दिली त्याला । पुढें यशवंतराव आले धारेला। **आनंदराव पवार** राज्य करत होते धारेला ॥ **रंगराव औढीकर** चाल करून आला । आनंदराव हटूं लागला । इतक्यांत यशवंतराव पुढं झाला । अन् बोलला आनंदरावाला । " नका सोडूं धीर या वेळा । हा यशवंत तुमच्या बाजूला । मग अपयश येईल कसं बोला " । असं म्हणून चवताळुन औढीकरावर गेला । अन् त्याचा फडशा उडविला ! आनंदी आनंद झाला । मग यशवंत माळव्यांत आला । खंडेराव ( मल्हाररावाचा मुलगा ) वारस राज्याला । यशवंतराव त्याच्या नांवानं करतो राज्याला। एक वर्षांत प्रकार काय झाला । यशवंतराव सेनापति झाला । पुढं **वडगोंदें** येथें वीर गेला । तिथं निशाण मारतांना फुटला दारूचा गोळा॥ अन् दारूनं फोडला एक डोळा । इकडं पुण्याला प्रकार काय झाला । दुर्बुद्धि सुचली पेशव्याला । अन् त्यानं होळकरचा मुलुख जप्त केला । यशवंतानं लिहिलं पेशव्याला । " कीं हा मोठा अन्याय तुम्हीं केला । खंडेराव वारस गादीला । खंडेराव ल्हान पोर झाला । म्हणून त्याच्या नांवानं मी चालवतों राज्याला । तरी जरा सुविचार करा । आपापल्यांतच कटाकटी करून नाश सर्वांला " । पण पेशव्यानं ऐकलं नाहीं तंवा- यशवंतराव पुण्यावर चाल करुन हो गेला ॥ चाल ॥ होळकरी फौजा पाहून । बाजीराव गेला घाबरुन ॥ गेला पळुन पुणं सोडून । **वसईला** गेला धांवून ॥ तिथं इंग्रजाला गेला शरण । राज्य दिलं त्याला लिहून ॥ बाजीचा पक्ष घेऊन । इंग्रज आला चाल करून ॥ चाल ॥ इंग्रज बोलला यशवंतरावाला । " तुम्हीं निमकहराम झाला । धन्यावर शस्त्र

टाकायला । कसे तुम्ही तयार झाला ? । तरी जावं परत माळव्याला । राज्य देऊं परत तुम्हांला " ॥ इंग्रजी कावा हा झाला । बाजीराव आला पुण्याला । पर सत्ता विकली कंपनीला । कळसुत्री बाहुलं तो झाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

दौलतराव शिंद्यांच्या फौजा पार उधळून । कंपनीच्या रस्त्यांतिल कांटा काढला उपटून । वेलस्ली गेला स्वप्नांत पार रंगून ! कीं हिंदुस्थान लाल रंगाचा करीन वेगानं ॥ जी ॥ हिंदुस्थानी राजे लोकांना साऱ्या जिंकून । इंग्रजांचं राज्य मी आतां करिन वेगानं । खड्यासारखे सारे लढवय्ये देइन फेकून ! हिंदुस्थान नांव खरडून । इंग्रजांचं नांव देशाला खास देईन ॥ जी ॥ सारे राजे आले शरण । पण यशवंराव दारुण ॥ त्याला आतां जिंकल्यावीण । मुळीं नाहीं जिवाला चैन ॥ कुरापत कांहीं काढून । त्याला द्यावं धुळीस मिळवून । असा बेत दुष्ट करून । यशवंताला लिहिलं वेलस्लीनं ॥ कीं "तुम्ही चिथवता राजेलोकांला । इंग्रजांना हाकलुन देण्याचा कट तुम्हीं केला । तुम्ही पाठवितां पत्रं राजाला । कीं 'चला, पिटाळुया टोपीवाल्याला । सात हजार मैलांवरनं आला । अन् त्यानं घेतलं आमच्या मुलुखाला । हिंदुधर्म चालला ऱ्हासाला । हिंदुराज्य चाललं ऱ्हासाला । जो जो राजा आमचा दोस्त आहे झाला । तुम्ही धमकावता त्या त्या सर्वाला । कंपनीचे दुस्मन तुम्ही झाला ! असा पुरावा आमच्या हाताला । तुमचं राज्य परत देण्याचा विचार होता केला । पण तुम्ही बंडखोर झाला । म्हणून राज्य मिळणार नाहीं तुम्हांला । तर मुलखाचा ताबा द्यावा पेशव्याला । नाहींतर धाडतों आम्हीं फौजा तुमच्या मुलखाला " ॥ चाल ॥ इंग्रजांचा खलिता वाचून । यशवंत गेला भडकून ॥ चाल ॥ त्यानं दिला जबाब वेलेस्लीला । कीं "आपला खलिता पोंचला । सुखासुखीं मुलुख द्यायला । हा यशवंत

वेडा नाहीं झाला। धाडा फौज झुंज करायला। पण ठेवा लक्षांत या बोला। या यशवंताशीं गाठ तुम्हांला। जर जाल माझ्या वाटेला। तर बेचैन करीन तुम्हांला॥ दीड लाख घोड्यांची धाड जंवा येइल तुमच्या मुलखाला। तंव हाय खाऊन मराल–हे बोल सांगतों तुम्हांला। होळकर कधीं भीत नाहींत मरणाला। शिंदे झालेत वश आम्हांला। भरतपूरकर–जयपूरकर–सारे राजे आमच्या बाजूला। समुद्राच्या लाटांवर लाटा जशा धडधडा आदळती खडकाला। तशा माझ्या सैन्याच्या लाटा गिळतिल तुम्हांला। तुमचा मुलुख मिळविन धुळीला। लाखों लोक बळी पडतील माझ्या तलवारीला। याचा आधीं विचार करा। मग धाडा आपल्या फौजेला। मीच येतों आधीं सामना द्यायला"। असा त्यानं खलिता धाडला। अन् सैन्याचा बंदोबस्त केला। यशवंताला संशय आला। कीं फौजेंतले गोरे अधिकारी फितुर साहेबाला। तंवा **व्हिकर्स--टाड** व **रायन**–या तीघाला। पकडून आणलं सदरेला। अन् त्यांचा शिरच्छेद केला! तीं मुंडकीं टोचलीं भाल्याला! अन् फौजेत्नं फिरविलीं गरगरा। दहशत बसली सर्वांला! पुढं काय प्रकार झाला। तो सांगीन तिसऱ्या चौकाला॥२॥

● ●

## चौक ३ रा

होळकरचा खलिता पाहून। फौज घेऊन। मोठ्या वेगानं। लेक-साहेब चाल करून आला। आग्र्याला तळ त्याचा पडला। यशवंतराव चिडून गेला!॥ चाल॥ फौजेचे सेनापति दोन। आले उत्तरेकडनं। **डॉन साहेब** आणि **मॉन्सन**॥ जी॥ आला **मॉन्सन** एका बाजूनं। **डॉनसाहेब** दुसऱ्या बाजूनं॥ जी॥ **वेलस्ली** दक्षिण बाजूनं। **मरे** आला पश्चिमेकडनं॥ जी॥ **शिंद्यांच्या फौजा पूर्वेनं**। असा रचाल व्यूह साहेबानं॥ जी॥ चार सिंह चारी बाजूनं। गरजत आले चालून

॥ जी ॥ ॥ चाल ॥ सिंहाचा सिंह यशवंत । सदा यशवंत । शत्रूंचा अंत । करण्याला वीर आला तय्यार । दीड लाख घोडा केला तय्यार । तोफखाना सात हज्जार तय्यार । एकोणीस हजार पायदळ झालं तय्यार । एकशें नव्वद तोफा केल्या तय्यार ॥ जी ॥ यशवंतरावानं पत्रं तंवा धाडलीं हिंदुराजांला ॥ "कंपनीनं अन्याय केला । देशी राज्यं खालसा करण्याचा सपाटा चालवला ॥ आपआपसांत लावलं झुंजायला । अन् हिरावुन खाल्लं दोघांला । शिंद्यांशीं वेगळा तह केला । पेशव्यांशीं वेगळा तह केला । आतां आलाय् खायला आम्हांला । जर आमचा आज मोड झाला । तर हिंदुराज्य जाइल विलयाला । हिंदुधर्म जाइल विलयाला । म्हणून यावं आमच्या मदतीला ॥ चाल ॥ टोपीवाला आलाय चालून । आम्हावरती चंग बांधून ॥ चाल ॥ यवनांचा जाच बंद झाला । आतां आलाय ताम्र छळण्याला । याचा वेळींच जर बंदोबस्त नाहीं केला । तर डोइजड होइल सर्वांला । म्हणून ऐका माझ्या शब्दाला । आम्हीं आहे संग्राम मांडला । माझा घोडा चालल्लाय आघाडीला । काळ आणीबाणीचा हा आला" । अशीं पत्रं धाडलीं सर्वांला । अन् यशवंतराव चालले आघाडीला । **अमीरखानाला** धाडलं बुंदेलखंडाला । आडवायला टोपीवाल्याला । इकडं यशवंतराव घेऊन फौजेला । जयपूरच्या रोखानं गेला । अन् जाळपोळ केली, लुटालूट साऱ्या मुलुखाला । जयपुरचा राजा इंग्रजांचा दोस्त झाला । तंवा त्या दोस्ताला मदत करायला **लॉर्ड लेकनं** पाठवलं मॉन्सनाला । तोफखाना दिला मदतीला । चाळीस हज्जार फौज मदतीला । मॉन्सननं विचार केला । कीं **जसवंतराव** कोणच्या झाडाचा पाला ? । दोन दिवसांत पकडिन मी त्याला । नाहींतर करिन ठार त्याला । पुढं कसा काय रंग लढाईला । तो सांगीन चौथ्या चौकाला ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

**मॉन्सनसाहेब** चालून आला। यशवंतरावनं विचार मनिं केला। घ्यावं पाठीवरती साहेबाला। अन् न्यावं आपल्या मुलखाला। डोंगराळ मुलखांत घेउन जावं त्याला। मग घ्यावं समाचाराला। असं म्हणून यशवंतराव फिरला माघारा। अन् इंदूरच्या रोखानं चालला। इकडं मही नदी उतरून **मरे** होता आला। त्याला वाटलं यशवंतराव आपणावर आला। तंवा मरे साहेब अर्धामुर्धा मेला। अन् मही नदी ओलांडून मागच्या मागं पार झाला॥ बापूजी शिंद्यांनीं लिहिलं मॉन्सनला। "साहेब! यशवंतराव घाबरून गेला। त्यानं तुमचा दिमाख पाहिला। अन् लागलाय सारखा धांवायला। दिनरात्र चैन नाहीं त्याला। भीतिनं गांगरून गेला! झोंप नाहीं येत रात्रीला। पळता भुई थोडी झाली त्याला। बेदिली झाली फौजेला। जर आतां कराल जोराचा हल्ला। तर होळकरी फौज येईल तुमच्या बाजूला"। मॉन्सननं विचार केला। कीं पाठलाग करावा या वेळा। अन् होळकरला चिरडावा पुरा। अन् यश घ्यावं आपल्या वाट्याला। असा बेत करून तो चालला पाठलागाला॥ तंवा **लॉर्ड लेक** बोलला त्याला। "अरे पावसाळा अगदीं जवळ आहे आला। तर जाऊं नको पाठलागाला" तंवा मॉन्सन त्याला बोलला। "त्याची चिंता नको तुम्हांला। होळकर कोणच्या झाडाचा पाला? । टाच मारीन आतां घोड्याला। अन् पकडून आणीन त्याला। असं म्हणून चालला पाठलागाला। पुढं यशवंत, मागं मॉन्सन धावूं लागला॥ असो। आतां ऐका गोष्टीला। पाठोपाठ मॉन्सन आला। मॉन्सन कोट्याला आला। तिथनं मुकुंदऱ्याच्या खिंडींत आला। तिथनं सोनारा गांवीं तो आला। तिथं हिंगलजगडचा किल्ला त्यानं सर केला। मग पिंपळघाट उतरून आला। होळकर सारखा पुढं नेतोय त्याला। चंबळा नदी ओलांडून आला। दोनशें पंचवीस मैलांचा पाठलाग

मॉन्सननं केला ॥ अन् गुरीगांवीं तळ त्यानं दिला। इतक्यांत मान्सून (पावसाळा) सुरू झाला। मान्सूनला पाहून मॉन्सन घाबरून गेला ॥ पुढं काय प्रकार झाला। होळकरनीं डाव काय केला । तें आतां सांगीन मी दादा! पांचव्या चौकाला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

मॉन्सनसाहेब आला गुरीला। पाठलागाला। आनंदुन गेला। वाटलं त्याला यशवंतराव झाला गार। गोळ्या झाडून करिन ठार। मॉन्सनला झाला गर्वभार फार ॥ जी ॥ पण कळलं नाहीं वेड्याला। यशवंतानं कावा काय केला। मॉन्सनला आणलं खेंचत आपल्या मुलखाला। जसं सिंहानं आणावं सावज आपल्या गुहेला। तसा मॉन्सन जाळ्यांत सांपडला पुरा। मग यशवंतराव उलटला। अन् जसा नाग साप उलटावा, तसा केला मॉन्सनवर हल्ला (८ जुलै १८०४)॥ साहेबाचा चेहरा गोरामोरा झाला। साहेबाला धक्का बसला। अन् लागला मागं पळायाला। पुढं मॉन्सन मागं यशवंत सिंह चालला ॥ ऐंशी हज्जार टापांचा थयथयाट सुरु केला ॥ वीस हज्जार तळपला भाला ॥ भगवा झेंडा चालला आघाडीला। गुरी गांवावर छापा घातला। मॉन्सन घाबरून गेला। टोपीवाला कैक ठार झाला। तंवा **ल्यूकनसाहेब** आला लढाईला। तंवा यशवंत बोलला त्याला। यावं आतां शेकहॅन्डाला। तंव ल्यूकन बोलला। "शेकहॅन्ड करायची ऑर्डर नाहीं मला। तुम्ही नेटिव राजे-पळपुटे-घाबरट-लोक-कुणी म्हटलं टोपीवाला आला। तर दहा कोस पोबारा केला। तुझ्यासारख्या लुटारुशीं शेकहॅन्ड कोण करणार बोला? ॥ चल कर दोन हाताला"। तंवा दोघं लागले झुंजायला। तोफांचा धडधडाट झाला। तलवारी लागल्या चमकायला। घोडेस्वार घालती झडपेला। धूळ भिडली जाऊन गगनाला। हेल्मेटं पडलीं

घळघळा। मॉन्सनसाहेबाचा धीर खचला । अन् लागला सारखा पळायला। इतक्यांत ल्यूकनसाहेबाला वार लागला। ल्यूकनसाहेब घायाळ झाला। अन् त्यांत बिचारा मरुन गेला (८ जुलै १८०४)। विजयानं हार चढविला हो यशवंताला ।। ९ ।।

● ●

## चौक ६ वा

मॉन्सनसाहेब तिथ्नं पुढं चालला फौज घेऊन । सोनारा ( गांव )–पुढं मुकुंदरा खिंड गाठून । नऊ जुलै अठराशें चारला बसला अडवून । त्याला वाटलं आतां होळकर । पाठोपाठ नाहीं येणार। खिंडीची जागा अवघड फार पाहून ।। जी ।। पर लगेच दुसऱ्या दिवसाला ( १० जुलै १८०४ )। होळकर आला। अचानक हल्ला। केला त्यानं झाले टोपीवाले गार । यशवंतानं लिहिलं मॉन्सनला । “ खालीं ठेवा शस्त्रं या वेळा । अन् यावं शरण आम्हांला । नाहींतर ठिकऱ्या उडवील माझी तलवार ।। जी ।। मॉन्सननं जबाब नाहीं दिला। लाज वाटली जबाब द्यायला। थोडी फौज ठेवली खिंडीला। अन् तिथ्नं चालला कोट्याला । कोट्याच्या राजाला मॉन्सन बोलला। “ अन्नपाणी नाहीं फौजेला। दोन दिवसांचा उपास झाला। तुम्ही आमचे दोस्त झाला । म्हणून द्यावं खायला प्यायला। अन् जरा आसरा राहण्याला। होळकर लागला आमच्या पाठीला ” तंवा कोट्यांचा राजा बोलला। “ I am very sorry सांगायला। अन्नपाणी मिळणार नाहीं तुला। होळकर आमचा जातभाई झाला। अन् जर आसरा देईन तुला। तर यशवंतराव मिळवील मला धुळीला । तंवा Good bye साहेब तुम्हांला। तुम्ही पुढचा रस्ता धरा ”।। चाल ।। मॉन्सन झाला बेजार। पाठोपाठ आला होळकर ।। ध्यानीं मनीं स्वप्नीं होळकर। झाला मॉन्सनसाहेब गार ।। तिथ्नं चालला **गनियास** गांवाला। तिथं चंबळेनं

अडवलं त्याला । तंवा मॉन्सनला वाटलं त्या वेळा । आतां इथंच करावं युद्धाला । म्हणून त्यानं चंबळेच्या कांठाला । लढाईचा बंदोबस्त केला । तिथं काय प्रकार झाला । तों आतां दादांनो ! सांगीन सातव्या चौकाला ॥ ६ ॥

• •

## चौक ७ वा

यशवंत पाठोपाठ आला पाठलागाला । **गनियास** गांवीं मॉन्सन होता बसलेला ॥ भडिमार तोफांचा मारा त्यानं सुरू केला । घोडेस्वार लागले कचरायला । लोक लागले पटपटा मरायला कैक त्या वेळा ॥ जी ॥ इंद्रानं प्रकार असा पाहिला । तंवा यशवंताला मदत करायला । आकाशांतनं तोफा त्यानं रोखल्या जागोजागेला ॥ चाल ॥ आभाळांतनं तोफा रोखून । गोळे झाडले धडाडा इंद्रानं ॥ जी ॥ विजेचे तुकडे करून । तलवारी केल्या इंद्रानं ॥ जी ॥ पाण्याच्या धारांचे बाण । शत्रूला करती हैराण ॥ जी ॥ दारूगोळा भिजवुन दिला ! । तंवा मॉन्सन अर्धामुर्धा झाला । अन् लागला मागं पळायला । तों चंबळेनं आडवलं त्याला । चंबळा बोलती मॉन्सनला । “ नाहीं देणार रस्ता मी रे तुला । मी यशवंताच्या बाजूला । यशवंत बाळ माझा झाला । तुम्ही आलायत त्याला मारायला । त्यानं काय तुमचा अपराध केला ? । सात हजार मैलांवरनं आला । इथं माझीं मुलं बाळं मारायला । जा, सांगा **थेम्सबाईला** । कीं **चंबळेनं** रस्ता नाहीं दिला । पण जाणार कसे तुम्ही बोला ? । एक रस्तां दाखवते तुम्हांला । यशवंत चौफेर लागलाय फिरायला । आतां माझ्याबरोबर तुम्ही चला । समुद्रापर्यंत नेतें तुम्हांला । तिथनं जगलात वाचलात तर जा परत तुमच्या देशाला । अन् सांगा थेम्सबाईला कीं चंबळेनं रस्ता नाहीं दिला ” । तंवा मॉन्सन बोलला चंबळेला । “ चंबळे ! पुरे कर वटवट या वेळा । हा

मॉन्सन भिणार नाहीं तुला। पायांखालीं तुडवून जाइन तुला " । असं म्हणून बोलला फौजेला । " चला तुडवा पायाखालीं हिला । अन् दुसऱ्या तीराला चला " असं म्हणून लागला चंबळा ओलांडायला । तों चंबळेला महापूर आला । अन् त्यांत मॉन्सन लागला गटंगळ्या खायला । टोपीवाले लागले बुडायला । नाकातोंडांतनं पाणी शिरलं त्या वेळा । अन् चालले नदीबरोबर समुद्राला । किती तोफा गेल्या तळाला । किती घोडा वाहून गेला । दारूगोळा पाण्यांतनं चालला । कसाबसा मॉन्सन गेला दुसऱ्या तीराला । इतक्यांत यशवंत आला पाठलागाला । चंबळेनं रस्ता दिला त्याला । इकडं मॉन्सन पुन्हा लागला धावायला । पण रस्त्यानं चिखल फार झाला । तोफा रुतल्या जागोजागेला । तोफा टाकून मॉन्सन तसाच चालला । पाठीमागं होळकर लागला । मॉन्सन टोंकरामपुऱ्याला गेला । पुढं बनास नदीनं आडवलं त्याला । तिथं यशवंतानं केला जोराचा हल्ला । अन् मॉन्सनचा धुव्वा उडविला । तिथनं मॉन्सन **हिंडौनला** गेला । तिथनं गेला **बियाना खिंडीला** ( २८ ऑगस्ट १८०४ ) । तिथनं आग्ऱ्याला जाऊन पोंचला । आयुष्याची दोरी भली म्हणून मॉन्सनसाहेब वांचला ॥ जी ॥ याच्या पुढचं सारं सांगीन आठव्या चौकाला ॥ ७ ॥

● ●

## चौक ८ वा

मॉन्सनला दूर पिटाळून । मोठ्या वेगानं । चाल करून । यशवंतराव मथुरेला गेला । घोडेस्वार बरोबर नेला । पायदळ तोफखाना भरतपुरला ॥ मथुरेचा ताबा घेऊन । वायुवेगानं । टाच मारून । गेला दिल्लीला ॥ आग्ऱ्याला प्रकार काय झाला । मॉन्सनचा फजितवाडा झाला । तंवा **लॉर्ड लेक** चवताळुन गेला । भरतपुरचा राजा सामील होळकरला । होळकरी पायदळ आणि तोफखाना होता भरतपुरला । म्हणून साहेब

चालला भरतपुरचा किल्ला घेण्याला। किल्ल्याबाहेर तळ पडला। तिथनं तोफा डागल्या किल्ल्याच्या बुरुजाला। आतनं जाट आणि मराठ्यांनीं तोफांचा मारा फार केला॥ किल्ल्याचा खंदक फार मोठा झाला। नव्वद हात होता रुंदीला। अन् चाळीस हात खोल तो झाला। पाण्यानं होता खंदक भरलेला। इंग्रजांनीं निकराचा हल्ला केला। तंवा एक खिंडार पडलं कोटाला। इंग्रज लागले खिंडारा चढायला। पण जितके वर आले तितक्या सगळ्यांला। मराठ्यांनीं कापून काढलं त्या वेळा। तीन वेळा कोट भंगला। पण तीन्ही वेळा भरुन काढला। भरतपुरचा किल्ला अभंग राहिला!। पुढं भेदनीतीचा उपाय केला। भरतपुरचा राजा फुटला। अन् त्यानं आंग्लाशीं तह केला। पण यशवंत गेला अमृत-सरला। तिथं भेटला **रणजितसिंगाला** (१०-१२-१८०५),। यशवंत बोलला काय त्याला। "तुम्ही जर सामील व्हाल आम्हांला। तर ताम्राची चटणी करूं या वेळा"। पण रणजितसिंग बोलला त्याला। "यशवंतराव! तुम्हीं म्हणतां तें खरं–पण अजून वख्त योग्य नाहीं त्याला। ताम्राशीं सध्यां करा सल्ला। पुढं पाहूं त्या विचाराला। असं म्हणून त्यानं पाठवला वकील–भागसिंग–इंग्रजी तळाला॥ यशवंत जड झाला होता सर्वांला। म्हणून कंपनीनं तह केला **व्यासघाटाला** (६–१–१८०६)। त्यांत राज्य मिळालं यशवंताला। आनंदीआनंद झाला। मग यशवंतराव आले माघारा। पण शांति मिळेना मनाला। ताम्राला काढून कसा बावा। तो ध्यास लागला जीवाला। तोफांचा कारखाना सुरू केला। दोनशें तोफा ओतवल्या। आणि दोनशें तयार करण्याचा विचार केला। अन् त्यांत यशवंत वेडा झाला॥ चाल॥ मातृभूमिच्या स्वातंत्र्याचं वेड लागलं वीराला। अन्नपाणीही विसरून गेला तोफा एक दिसती त्याला॥ वेडाचा अतिरेक जाहला केला मृत्युनं मग हल्ला। भानुपुरीं यशवंत भानु हा हाय! अस्ताला हो गेला!!॥ **लंका** घोडीचं प्रेम अलौकिक सोडीना यशवंताला। खाणं पिणं तिनं

सारं सोडलं अश्रु लोटले नयनाला। यशवंताचा जीव चालला सोडुनिया या लोकाला। लंका घोडीचा जीव चालला-गेली घोडी परलोकाला ॥ भानुपुरीं जर जाल तुम्हीं तर दृश्य दिसेल त्या जागेला। **यशवंताच्या** समाधिपायीं दिसेल **लंका** तुम्हांला ॥ **पांडुरंगाची** घडण साधी लावील चटका जीवाला। यशवंतराव की जय जय बोला यशवंतराव की जय बोला ॥ जी ॥ ८ ॥

रचना-१-१०-१९४३.

# नाना फडणीस

# यांचा

# पोवाडा —————— : १२ :

## प्रास्ताविक

शिरपेंच मस्तकावर । पाणिदार मोत्यांचा हार ।। जी ।। बाळ्याच्या जोड्या तेजाळ । खुलवीत भव्यता फार ।। जी ।। पागोटं शेला सुंदर । अंगरखा शुभ्र भरदार ।। जी ।। तें रुंद भव्य कपाळ । गंध आडवं शोभे त्यावर ।। डोळ्यांची चमक अनिवार । करि इंग्रजाला बेजार ।। चाल ।। रेखीव नाक थरकांप देई शत्रूला ।। ती खूण करारी बाण्याची ठाव सर्वाला ।। त्या मिशा सांगती कारस्थानाची कला ।। शत्रुला गिळाया कंठ जणू उचलला ।। उंच भव्य देह जाहला ।। पाहून अशा मूर्तिला। आनंद झाला चित्ताला । बुद्धिची करुनि तलवार देश रक्षिला । **बाळाजी जनार्दन भानु** चमकला हिरा ।। **पांडुरंग** शाहीर गातों त्याच्या कवनाला ।। १ ।।

—२—

भानु कुळामधिं जन्म घेऊनी भानूसम तळंप नाना । नाना आले पाहुनि इंग्रज मनीं चरकती ते नाना ।। टोपीवाले मनांत म्हणती असेल जेथें हा नाना । नाना युक्त्या योजुनि करितो निष्फळ आमुच्या युक्त्यांना ।। नांव ऐकुनी ज्या नानाचे निजाम हैदर वीरांना । धडकी भरली, धुंद उतरली, चिंताज्वर तो कितिकांना ।। शत्रूंचा बुजबुजाट

झाला, मत्सर चारी बाजूला। भले बहाद्दर नाना! तुम्ही तरिहि न कोठें डगमगला ॥ चरित्र आतां या नानाचें सांगिन ऐका या वेळा। काव्यदेवते! ये झणिं आतां, आशीर्वचनें देण्याला ॥ २ ॥

• •

## चौक १ ला

धन्य, धन्य, गांव **वेळास**। **भानुवंश** भूषवी ज्यास ॥ चाल ॥ शके १६६३ च्या माघ वद्य चौथीला। शुक्रवारच्या हो दिवसाला। बाळ नाना आले जन्माला। फडणीशी सुरेख करण्याला। कसें आतां सांगतों तुम्हांला। ऐकुनि घ्यावें प्रसंग मोठा स्फूर्तिदायी जाहला ॥ जी ॥ जंजिऱ्याच्या शिद्दीनं छळलं कैक लोकाला ॥ बाळाजी विश्वनाथांच्या वडिल भावाला ॥ पोत्यांत घालुन बुडवलं धाक सर्वाला ॥ बाळाजिनं विचार मनिं केला। आतां जावं सोडून मुलुखाला। घाटावरती नशीब काढायला। श्रीवर्धन सोडुन चालला। वेळास गांवाला आला। तिथं भानूचा घरोबा झाला। म्हणुन मुक्काम त्यांच्या घरीं केला। **हरिभाऊ, रामाजी** आणि बाळाजी–तिघं भाऊ भानूंच्या घरा। बाळाजी विश्वनाथ बोलले तिघां भावांला ॥ "आम्ही चाललों देशावर दैवयोग बघण्याला। जर यायचं असेल तुम्हांला। तर विचार करा तुम्ही जरा"। तिघं भाऊ झाले तय्यार त्याच वेळेला ॥ जी ॥ भट–भानू आले साताऱ्याला। सेवा दिली शाहुराजाला। शाहुराजा प्रसन्न झाला। पेशवाई दिली बाळाजीला। इ. स. सतराशें तेराला। बाळाजी भानूला फडणीस केला। बाळाजी–बाळाजी चालले उत्तरेच्या मोहिमेला। सय्यद हुसेनशीं होता तह केला। मऱ्हाटे गेले दिल्लीला। बादशाहाला (रोशन अख्तर) बादशाहा केला। अन् चौथाई–सरदेशमुखीच्या सनदा दिल्या मराठ्यांला॥ हें रुचलं नाहीं अमीरउमरावाला। त्यानं बाळाजी पेशव्याला ठार करायला। एक मोठा कट केला ॥ चाल ॥ दिल्लीच्या एका

रस्त्यांत । मारेकरी बसले जोरांत ।। जंव्हा हातीं सनदा घेऊन । जाईल पेशवा परतून ।। तंवा त्याला ठार मारून । घेउया सनदा हिसकून ।। असा दुष्ट बेत त्यांनीं केला । तो कळला बाळाजी भानुला । बाळाजी बोलला बाळाजीला । " बाळभाऊ ! असा प्रकार आलाय कानाला । तर एक विनंति करतों तुम्हांला । पेशव्यांचा पोशाख द्या मला । मंदील माझ्या डोक्याला । अन् तुम्ही हा माझा पेशाख करा । अन् आपल्या गोटाकडं सनदा घेऊन चला । " तसा बदल पोशाखांत केला । बाळाजी पेशवा तंवा आपल्या गोटाकडं गेला । पण इकडं प्रकार काय झाला । बाळाजी भानु त्या रस्त्यामध्नं चालला ।। तों मारेकरी अंगावर धांवले चारी बाजूला । तलवारीचा घाव पडला । तों बाळाजी भानुचा प्राण निघुनिया गेला ! ।। मित्रासाठीं मित्रानं प्राण असा अर्पिला ! ।। जी ।। बाळाजी पेशवा प्रसन्न झाला । अन् फडणीशी दिली बाळाजीच्या मुलाला । जनार्दनपंताला । अन् फडणीशी दिली कायमची भानुवंशाला । जनार्दनपंताला मुलगा झाला । तोच हा **नाना** फडणीस म्हणून गाजला दिगंताला ! ।। १ ।।

● ●

## चौक २ रा

दिसामासांनीं वाढत गेला हट्टी बाळ हेकेखोर । विद्याभ्यासहि हळु हळु झाला तळपु लागला हा चतुर ।। ।। चाल ।। सतराशें एकसष्ट सालाला । पानपतचा मुकाबला झाला । तंवा नाना पानपतला गेला । पण पानपतला मोठा आकांत झाला । लहान मोठा कितिक ठार झाला । तंवा सदाशिवभाऊच्या बाजूला । नाना शेवटपर्यंत होता राहिला । पण भाऊचा अंत जंवा झाला । तंवा साऱ्यांचा धीर सुटला । अन् जो तो लागला वाट फुटेल तिकडं धावायाला । त्यांत नाना बचावला । पण हाल हाल झाले जीवाला । वीस वीस कोसांची मजल दिवसाला । कसाबसा बऱ्हाणपुरला आला । तिथं नानासाहेब पेशवा भेटला त्याला ।

पानपतच्या सांगून खबरेला। नानाचा जीव कासावीसला। अन् बोल्ला नानासाहेबांला। "श्रीमंत! आतां रजा द्यावी मला। मी जातों काशीयात्रेला। आतां ही यातायात नको मला। देहाचें करावें सार्थक वाटतंय मला"॥ असं बोलून नाना फडणीस गेले काशीला॥ इकडं पेशवे आले पुण्याला। पण जीव त्यांचा होरपळून गेला। पानपतचा धक्का जीवाला। देह लागला दिसंदीस खंगायला। तंवा निरोप धाडला नाना फडणीसाला। कीं "नाना! भेटायची इच्छा एकदा तुला। जर या नानाची काळजी असेल तुला। तर मी मरायच्या पूर्वी ये एकदां भेटीला"॥ ॥ चाल॥ पेशव्याचें पत्र वाचून॥ नाना फडणीस गेले करपून॥ वैराग्य दिलं सोडून। घोड्यावरती स्वार होऊन॥ येऊं लागले मोठ्या वेगानं। भेटीचा छंद घेऊन॥ पारनेरला आले धांवून। तिथं कळली वार्ता दारुण॥ शोकानं गेले भाजून। नानासाहेब गेले सोडून!॥ प्राण गेला पुणं सोडून। पुण्याई गेली संपून ॥ चाल॥ काळोख चारी बाजूला। शोकाच्या समुद्रांत देश बुडून हो गेला॥ जी॥ तंवा देशाला धीर कुणि दिला?। एक नाना धांवून आला। राष्ट्राला हात देणारा। वांचवलं राज्य मर्दानं धन्य जाहला॥ २॥

● ●

## चौक ३ रा

**बाळ माधव** पेशवा झाला। त्याचा फडणीस **नाना** शोभला (**सप्टेंबर** १७६१)। माधवराव तेजस्वी झाला। निजामाशीं युद्ध त्यानीं केलं **राक्षसभुवनाला**। अन् शत्रूचा पुरा मोड केला। माधवराव पेशवा थोर झाला। शूर, उदार, न्यायी–असा त्याचा डंका गाजला!॥ **रामशास्त्री प्रभुणे** न्यायाला। रामराज्य साऱ्या लोकांला। पण दैवानं घातला घाला। माधवरावाला क्षय लागला। अन् १७७२ सालाला। अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्साला। काळानं नेलं झडपून माधवरावाला!॥ तंवा

नारायणराव पेशवा झाला । पण राघोबाकाकाच्या अंगांत कलि शिरला । अन् त्यानं पुतण्याचा खून करविला । सुमेरसिंह गारदी झाला ! । तंवा नाना भडकून गेला । नारायणाच्या प्रेत-संस्काराला । ओंकारेश्वरीं लोक किती जमला । मुळामुठा नदीच्या कांठीं मुत्सद्दी जमला ॥ तंवा नाना बोलला सगळ्याला । "ब्रह्महत्या घडली राघोबाला । प्राण गेला तरी बेहेत्तर ! पण या राघोबाला पेशवा म्हणायला । जो जो नसेल तयार या जागेला । त्यानं त्यानं ऐकावं या बोला । वाळूचं लिंग केलंय तयार या जागेला । या लिंगावर हात ठेवून आतांच करा प्रतिज्ञेला" । हरिपंत फडके रणशूर । सखाराम बापू बोकील । त्रिंबकराव मामा रणशूर । नाना फडणीस मुत्सद्दी थोर ॥ यांनीं केला मोठा निर्धार । अन्–घरोघरीं गेले ते वीर ॥ चाल ॥ एक मोका मिळाला सर्वांला । निजामानं बखेडा सुरूं केला । तंवा त्याच्या बंदोबस्ताला । राघोबा फौज घेऊन निजामावर गेला । बरोबर नेलं नाना फडणीसाला । तंवा वाटलं नानाला । कारस्थान पुरं करायला । एवढा मोका चालून हा आला । आतां जर सोडावं पुण्याला । तर कारस्थान करावं कसं बोला । म्हणून नानानं आजाऱ्याचा बहाणा केला । अन् हळूच पुण्याला आला ? । गंगाबाईला ठेवलं पुरंदराला । तिच्या नांवानं कारभार सुरूं केला । इ. स. १७७४ सालाला । **सवाई माधवराव** जन्माला आला । आनंदी आनंद झाला । नाना फडणीस गेले साताऱ्याला । अन् पेशवाईचीं वस्त्रं आणविलीं **सवाई माधवाला** ॥ तंवा चाळीस दिवसांचाच तो बाळ होता झाला । तंवरच पेशवेपद लाभलं त्याला ॥ नानानं राघोबाचा डाव असा उधळला ! ॥ चाल ॥ जंवा बातमी कळली राघोबाला । तंवा राघोबा पुण्याकडं परतला । पण वाटेंत आडवलं त्याला । नागपूरकर भोसला खडा झाला । त्रिंबकराव मामा मदतीला । राघोबाचा पुरा फडशा झाला । तंवा राघोबा उत्तरेला गेला । शिंदे–होळकरांची मदत मागायला । पण त्यांनीं झिडकारलं त्याला । तंवा राघोबा गुजराथेंत गेला । हरिपंत फडके

पाठलागाला । राघोबा कासावीस झाला । तंवा इंग्रजांची मदत मागायला । राघोबा गेला सुरतेला । अन् ताम्राशीं त्यानं तह केला (६-३-१७७५)। राघोबाला पेशवा करायला । इंग्रज तयार झाला। मोबदला म्हणून साष्टी बेट लुबाडलं त्या वेळा । अन् १९ लक्षांचा मुलूख तोडून दिला । राघोबानं असा तह केला । **कर्नल कीटिंग** धांवला मदतीला । अन् राघोबा चाल करून आला । पण वॉरन हेस्टिंग्जनं हुकूम फिरविला । अन् इंग्रज फौज फिरली माघारा । **कर्नल ॲप्टन** पुरंदरला आला । अन् त्यानं पुरंदरचा तह (२९-२-१७७६) नवा केला । इंग्रजांनीं सोडलें राघोबाला । नानाचं कारस्थान पार पडलं त्या वेळां ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

पुरंदरचा तह जरि झाला । तरी तो अम्मलांत नाहीं आला । इंग्लंडांतल्या डायरेक्टरांनीं सुरतेचा तह कायम केला ! । तेव्हां वाटलं नानाला । कीं आतां इंग्रजाला ताळ्यावर आणायला । एक युक्ति करावी या वेळा ॥ फ्रेंच वकील **सेंटल्युबिन** होता आला । नानानं जवळ केलं त्याला । पण हा सगळा देखावाच केला । कारण नाना जाणून होता दोघांला । इतक्यांत प्रकार असा झाला । कीं मोरोबादादा (भानु) इंग्रजाकडं गेला । मोरोबा नानांचा वैरी झाला । मोरोबा बोलला इंग्रजांला । कीं "राज्य द्यावें राघोबाला । अन् आम्ही देऊं सवलती तुम्हांला" । इंग्रजांनीं मदत करण्याचा बेत हो केला ॥ जी ॥ तंवा नाना बोलले मोरोबाला । "मोरोबा विचार जरा करा । पंतप्रधानकी तुम्ही करा । ही दगदग नको मला । पण जर जाल परक्याला बोलवायला । तर समजा घात झाला । आपल्या हातानंच जर घरांत घ्याल तिसऱ्याला । तर सुरुंग लागेल मराठेशाहीला । राघोबानं काय प्रकार केला । तो सारा ठाऊक आपणाला । म्हणून विनवणी करतों तुम्हांला । कीं या सोडा अविचाराला" । असं म्हणून

नानानं फडणिशी दिली मोरोबाला ॥ जी ॥ निःस्वार्थीपणा असा कुठं मिळणार बोला ?। पुढं कारभार जमेना मोरोबाला । म्हणून बोलवलं पुन्हां नानाला । इंग्रजांनीं लढाईचा पुन्हां घाट घातला !। तंवा मराठ्यांच्या फौजा एकवटल्या झुंज देण्याला । महादजी, तुकोजी, हरिपंत हे जमले एका जागेला ॥ वडगांवला सामना झाला । अन् त्यांत टोपीवाला आला घाईला । इंग्रजांनीं तह केला । पण तो तह कागदावरच राहिला । तीन चार वर्सं सामना चालला । गॉडर्डसाहेब मोठा हुषार झाला । त्यानं वश केलं शिंद्यांला । अन् १७८२ सालाला । सालबाईचा तह त्यांनीं केला । तंवा राघोबा शिंद्याला शरण गेला । मग राघोबाला कैदेंत ठेवलं कोपरगांवाला । १७८४ सालीं राघोबाचा अंत झाला । पुढं महादजी आणि नाना यांच्यांत थोडा बेबनाव झाला । तें सारं आतां सांगीन पुढच्या चौकाला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

महादजी शिंद्यानं मोठा पराक्रम केला । अन् हिंदुस्थान आणला हाताला । बादशहाला बादशहा केला । आणि सनदा घेतल्या त्या वेळा । वकील-इ-मुतालीक किताब मिळाला । पुढं शिंदे आले पुण्याला । तंवा सवाइ माधवराव होते गादीला । रंगपंचमीचा दिवस उगवला । तंवा पाटीलबाबांनीं स्वतः रंग उडवला । मोठा दरबार भरला । २१ जून १७९३ ला । अन् बादशहानं दिलेला पोशाख पेशव्याला नजर केला । शिंद्यांनीं सवाई माधवाला । नानाविरुद्ध तयार करण्याचा प्रयत्न केला !। शिंद्याला वाटलं त्या वेळा । जशी सत्ता आपली दिल्लीला । तशीच ती चालावी पुण्याला । अन् बडतर्फ करावं नानाला । पण **हरिपंत फडके** यांनीं यत्न केला । आणि शिंदेनानांचा बखेडा दूर केला ॥ चाल ॥ निजामानं दिलं ना खंडणीला । तंव्हा नानानं त्याला तगादा केला । तंवा भर दरबारांत

मश्रीउल्मुल्क दिवाण बोलला सदरेला। " पेशवा कोणच्या झाडाचा पाला? । तुंबा देऊन त्याला। आतां पाठवूं गंगातीराला।" असला घोर अपमान केला । तंवा मराठ्यांच्या फौजा निजामांशीं चालल्या लढाईला ।। ७२००० स्वार तयार झाला । २८००० पायदळ झुंजेला। १९२ तोफा माऱ्याला । निजामाची फौज आतां ऐका सांगतों तुम्हांला । ११०००० फौज होती झुंजेला। ( १९० ) दीडशें. तोफा जागजागेला । घनाघोर युद्ध खर्ड्याला । त्यांत निजामाचा धुव्वा उडविला ।। आनंदीआनंद झाला । पर इकडं दैवाचा खेळ दुसरा चालला ।। सवाई माधव बेचैन झाला। अन् १७९५ सालाला । आक्टोबरच्या पंचवीस तारखेला । सवाई माधव बेफाम झाला । अन् त्या लहरींत तो गच्चीवर गेला । अन् कारंज्यावर देह टाकला । तंवा शरीराचा चक्काचूर झाला !।। नाना फडणीसं मोठ्या दुःखानं भाजून गेला ! ।। ५ ।।

● ●

## चौक ६ वा

१७९४ सालाला । फेब्रुवारी १२ तारखेला । महादजीचा अंत जाहला **वानवडी** गांवाला । मग दौलतराव शिंदे सुभेदार झाला। १७९६ सालाला। डिसेंबरच्या चौथ्या तारखेला । रावबाजी पेशवा झाला। नानाचा कारभार पटेना त्याला । १७९७ सालाला। ऑगस्टच्या १५ तारखेला । तुकोजी होळकराचा अंत झाला !। नानाचा एक हात गेला। तंवा नानाला कैद करण्याचा बेत त्यानं केला । शिंद्याच्या छावणींत मेजवानीचा थाट केला। तिथं नेलं नाना फडणीसाला । अन् घाटग्यानं पकडलं त्याला । अहमदनगरच्या किल्ल्यांत ठेवलं नानाला। घाडग्याचा सगळा कारभार झाला । त्यानं छळलं पुणें गांवाला । पुढें शिंद्यानं १० लाख रुपये घेऊन मुक्त केलं नाना फडणीसाला। पुन्हां नाना कामावर आला । सातारकरांनीं

१६०७८

बंड केलं त्याच वेळेला । तंवा त्या बंडाचा बंदोबस्त केला । नाना फडणीस थकुन होता गेला । अन् १८०० सालाला । मार्चच्या १३ तारखेला । ( फाल्गुन व. ३ शके १७२२ ) नाना फडणीस कालवश झाले गेले स्वर्गाला ॥ जी० ॥ राज्याचें शहाणपण गेलें पार विलयाला ॥ जी० ॥ ६ ॥

● ●

## उपसंहार

राज्य राखिलें चाळीस वर्षें दूर ठेवलें परक्याला । चतुरपणाची कमाल करुनी कीर्ती नेली दिगंताला ॥ मूळगांव वेळास नानांचें, स्मारक झालें जागेला । भानुकुळाचा वास्तु फिरुनिया भानुकुळांतचि तो आला ॥ स्मारक करुनी भव्य तयाचें अखंड ठेवा स्मरणाला । देईल स्फूर्ति नाना आजहि असल्या पडत्या काळाला । **पांडुरंग** कवि धांवुनि आला वर्णन तुमचें करण्याला । नाना ! नाना गुण वर्णाया हर्ष होतसे हृदयाला ॥

रचना–२४–३–१९४३.

श्रीशिवराज्याभिषेक

# पोवाडा ———————— :१२:

छत्रपती की जय । छत्रपती की जय । श्री शिव छत्रपती की जय । दऱ्याखोऱ्यांतुन सह्यगिरीच्या भरला जयजयकार । वृक्ष डोलती, नद्या उसळती, नाचति अपरंपार ॥ जी ॥ रानफुलांचा सडा पसरुनी वेली डोलती हवेवरी । पशुपक्षीही आनंदानं ललकारित ते गडावरी ॥ जी ॥

● ●

## चौक १ ला

बारा वर्षांचा शिवबा झाला घेतली शपथ दारुण । रोहिडेश साक्षी ठेवुन प्रतिज्ञा केली राज्य स्थापिन ॥ जी ॥ चाल ॥ खळ दुर्जन संहारुन । करिन सज्जनांचं रक्षण ॥ जी ॥ चाल ॥ जिजाइनं प्रेरणा दिली बाळ शिवबाला ॥ शहाजीनं मोठ्या शर्थीनं पाया घातला ॥ मित्रांनीं जीव ओवाळून वरुन टाकला ॥ जी ॥ शिवाजीनं सावधानपणे व्यूह मोडला ॥ गडामागुन गड घेऊन पाय रोवला ॥ जी ॥ चाल ॥ तोरणा घेऊन तोरण बांधुन सुरवात केली राज्याची । पुण्याई सारी एक होऊन अवतरली महाराष्ट्राची ॥ जी ॥ कटाव ॥ खजिना कल्याणहून चालला । जात होता तो विजापूराला । बोरघाटांतच सारा लुटला । प्रतापगडला विजय मिळविला । पन्हाळगडचा वेढा लढविला । शाहिस्त्याचा काटा काढला । राजा गेला मग आग्ऱ्याला । तिथं शत्रूनं फास टाकला । कैद केलं श्रीशिवरायाला । पण पेटाऱ्यांतून निसटून गेला । किल्ल्यांमागुन किल्ले घेऊन । राज्याचा विस्तारच केला ।

एका कोंबांतून कोंब दुसरा । त्यांतुन तिसरा । त्यांतुन चौथा । असे पाठोपाठ अंकूर यावे । पल्लवशाखा । फुलें फळेंही त्यांतुन सारे बाहेर पडती । वृक्ष दिसे मग नयनमनोहर ॥ शिवराजानें बीज लाविलें । अंकूर फुटले । वाढत गेले । हळू हळू मग राज्यवृक्ष हा चारी बाजूनं फुलतच गेला ॥ चाल ॥ निर्भय केलं सर्वाला । प्रेमाचं छत्र जनतेला ॥ जी ॥ सुखी केलं महाराष्ट्राला ॥ आईची माया जनतेला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ जनतेचं सौख्य तें सौख्य झालं राजाला ॥ जी ॥ जनतेचं दुःख तें दुःख गांजतें त्याला ॥ जी ॥ जनतेचा आनंद तोच आनंद त्याला ॥ जी ॥ जनतेचं रक्षण हेंच वेड जीवाला ॥ जी ॥ असा राजा शिवाजी आवडता सर्वाला ॥ चाल ॥ राज्याभिषेकाचा केला मोठा सोहळा । तो आता वर्णीन ऐका पुढच्या चौकाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

शके १५९६ आनंद संवत्सर । ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (तेराव्या) तिथीला होता शनिवार ॥ जी ॥ सूर्योदयाच्या आधीं धरला तीन घटकांचा सुमुहुर्त । तयारी केली अभिषेकाची हर्ष मावेना गगनांत ॥ जी ॥ चाल ॥ क्षीरवृक्षाचें सुवर्णमंडित । सव्वा हात उंच केलें आसन । वरती बसले शहाजीनंदन । सोयराबाई शोभे बाजुला । पुत्र संभाजी जवळ बसला । अष्टप्रधान आठी बाजुला । कलश सोन्याचे हातीं घेऊन । उभे राहिले आठ दिशेला । पूर्वदिशेला मोरोपंतांनीं तूपकलश हातीं धरला । रामचंद्रानीं दहीकलशानं शोभा आणली पश्चिमेला ॥ हातीं घेऊन मधुकलशाला रघुनाथ पंडित उत्तरेला । दुग्धकलश हंबीररावांनीं दक्षिणेस हातीं धरला ॥ चाल ॥ अण्णाजी दत्तो आग्नेयीला । जनार्दन पंडित नैर्ऋत्येला । बाळाजी आवजी वायव्येला । बाळाजी पंत ईशान्येला ॥ चाल ॥ तयारी झाली मुहूर्त आला वाजत गाजत

त्यावेळा । गागाभट्टांच्या वेदमंत्रांनीं रायगड सारा दुमदुमला ॥ चाल ॥ वेद मंत्रांचा घोष चालला । पुण्यनद्यांचें पाणी आणलें । सागरजळ मंगल आणविलें । आम्रपल्लवें सिंचन केले । एक सुलक्षणी घोडा आणिक हत्ती तेथें उभे राहिले । धम् धम् धम् धम् वाजत भेरी । गोड तुतारी । सनई सुंदर । कुंइ कुंइ कुंइ कुंइ शिंग वाजलें । कर्णे वाजले । नौबत झडली । धडम् धडम् धडधडत चौघडा । १०८ तोफांचा धडाका । आठ दिशांना देतो धडका । सुवासिनी पंचारती करिती । तोरणमाळा मंद डोलती ॥ चाल ॥ महाराष्ट्राचें मंगल सारे सगुण रूपानं अवतरले । धन्य रायगड, धन्य सोहळा धन्य पाहणारे झाले ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

३ खंडी ३२ शेर ३२ मासे सोने घेऊन तयार केलें सिंहासन ॥ जी ॥ चाल ॥ रत्नजडित सिंहासन । वरती शोभे जिजानंदन ॥ जी ॥ चाल ॥ जणुं नक्षत्रें खालीं उतरलीं झगमग झगमग करणारीं । रायगडावर वसती केली सिंहासनाच्या सभोंवरीं ॥ जी ॥ मेघावरती बसुनी आला इंद्र देव तो गिरीवर । झिम झिम झिम झिम सिंचुनि पाणी करि अभिषेका गडावर ॥ जणु किरणांचें पाणी करुनी चंद्र वर्षतो गडावर । निसर्ग फुलला डोलुं लागला शिवास पाहुन धरेवर ॥ जी ॥ लाल रंगाचे कपडे भरजरी शिवरायाच्या अंगांत । वैभव आणि वैराग्य शोभले अशी न शोभा दुनियेंत ॥ जी ॥ चाल ॥ कैकांचा सन्मान केला । भरजरी वस्त्र कितिकांला । शिरपेंच कैकांला दिला । मानाच्या तलवारी दिल्या कैक वीराला । हज्जारों होन खर्चिले दानधर्माला । गोरगरीब श्रीमंत भेदभाव नाहीं केला ॥ नजराणे कैक ते देती शिवरायाला ॥ **ईस्ट इंडिया कंपनीनं** दिला नजराणा त्याला । **हेन्री**

**ऑक्सिडन टॉमस-रॉबिन्सन्** हे वकील आले दरबाराला ॥ अन् भरदार नजराणा दिला ॥ राजानं केली मग तुला । १६००० होन भार भरली सुवर्णतुला । दानधर्म त्याचा मग केला । संतोष झाला सर्वाला । **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ ३ ॥

रचना-२६-६-१९६१.

सुरतेवर छापा !

# पोवाडा —————————— :१४:

मोठा पराक्रम शिवरायाचा विजेसारखा संचार। धडा दिला सुरतेला त्यानं ऐका कसा तो प्रकार ॥ ध्रु० ॥

• •

## चौक १ ला

शिवाजीचा सूड घेण्याला। शास्ताखान आला। दख्खन देशाला। बरोबर फौज घेउनी फार ॥ जी ॥ येतां येतां चाकणला आला। त्यानं वेढा घातला किल्ल्याला। तिथं फिरंगोजी नरसाळा। तय्यार झाला। झुंज देण्याला ॥ चाकणचा किल्ला जिंकून। मोठ्या तडफेनं। चाल करून। पुण्याला शास्ताखान आला। लालबाग शिवाजीचा खास, वाडा पुण्यास। तळ ठोकून लालबागेंत खान हो बसला ॥ दोन वर्सं लढा चालला। शिवाजीनं हल्ला चढविला। अन् खानाचीं बोटं कापून दूर पळविला ॥ शास्ताखान गेला आग्ऱ्याला। सारं कळलं औरंगजेबाला। औरंगजेब भडकून गेला। अन् शिवाजीचा काटा काढायला। जयसिंह दिल्लीरखान चालले सूड, घेण्याला ॥ पण त्यांना तोंड देण्याच्या आधीं। शिवाजीनं केला सुरतेवर हल्ला। तो कसा आतां सांगीन पुढच्या चौकाला ॥ १ ॥

• •

## चौक २ रा

मोगलांशीं सामना द्यायला। आतां आणावा पैसा कोठून ?। दुस्मनाशीं सामना देतांना पडूं लागली पैशाची वाण ॥ जी ॥ शिवाजीनं

विचार जरा केला । " दुस्मनांनीं लुटलं आम्हांला । कैक वर्सं प्रकार हा झाला । गडगंच संपत्ती नेली लुटून त्या वेळा । आतां तीच आपली संपत्ती परत लुटून आणली तर त्यांत पाप कोणतं बोला ? । शिवाय दुस्मनाला वचक बसवायला । कांहीं तरी केलं पाहिजे मला " । असं म्हणून सुरत लुटण्याचा बेत त्यानं केला ॥ चाल ॥ सुरत सधन बंदर । होतं व्यापाऱ्यांचं नगर ॥ परदेशी जहाजं येतीं रोज सुरतेला ॥ कैक कोटींचा व्यापार रोज चालला । सरदार **इनायतखान** बंदोबस्ताला । शिवाजीनं गुपचुप बेत सारा ठरविला ॥ अन् १ जानेवारी १६६४ला । १०,००० फौज घेऊन राजा चालला ॥ १२९ मैल चालून गेला । आणि पांचव्या दिवसाला । तळ पडला गणदेवीला । तिथनं ३९ मैलांचा टप्पा राहिला । तेव्हां राजानं लिहिलं सुभेदाराला । आणि तिथल्या धनिकाला । कीं " बादशहानं आमचा उच्छेद मांडला । घरदार देवळं किती पाडलीं अंत ना त्याला । जुलुमाच्या खालीं भरडलं साऱ्या जनतेला ॥ हैराण केलं सर्वाला । किती पैसा लुटून त्यांनीं नेला । आतां प्रजेला दिलासा द्यायला । आम्ही आमचा झेंडा उभा केला । पण पैशाची जरुरी आम्हाला । म्हणून ५० लक्ष रुपये द्यावे आम्हाला । अशी मागणी आमची तुम्हांला । जर द्याल एवढ्या पैशाला तर आलों तसे परत आम्ही जाऊं, वचन तुम्हांला " ॥ शिवाजीच्या पत्रानं मोठा खळबळाट केला । आश्चर्य वाटलं सर्वाला कीं शिवाजी आला कसा सुरतेला ! । शिवाजी हा सैतान झाला । पंचवीस हात मारतोय उडीला । जमीनीतनं कोस कोस गेला । आकाशातनं उडून पण गेला । असं ऐकलं होतं तें खरं ठरलं या वेळा ॥ आतां काय करील ठाऊक कोणाला ? । लोक बोलले इनायतखानाला । " खानसाब ! कांहींतरी करा आणि हें संकट दूर करा " । पण इनायतखान खुनशी फार झाला । त्यानं शिवाजीला धडा शिकवायचा बेत हो केला ॥ शिवाजीचा काटा काढायला । त्याला दगाफटका करण्याचा त्यानं डाव एक केला ॥ २ ॥

● ●

२२।१।८८

## चौक ३ रा

दोन इसम मग इनायतखानाचे गेले राजाच्या भेटीला। लवून मुजरा केला त्यांनीं राहिले आदबीनं बाजूला ।। झाड चंदनी मधें सुवासिक साप आले दोन झडपायला। खंजिर गुपचुप कमरेला पण हांसरा चेहरा वर झाला ।। मारेकरी मग जवळ जाउनी बोलले श्रीशिवरायाला। "निरोप खानाचा हुजूर, सांगतों ऐका महाराज या वेळा ।। जी ।। तुमचा दरारा चारी बाजुला जसा सिंहाचा जंगलाला। अस्मानांतला सूर्य जणू काय पुढंच दिसला आम्हाला ।। जी ।। कीर्ती तुमची नवखंडाला सुभेदारही बावरला। देऊं खंडणी पण खानाचा निरोप प्रेमाचा तुम्हाला ।। जी ।। बोलून इतके जवळ चालले मारेकरी त्या वेळेला। तुटून पडले दोघे अचानक वार खंजिराचा केला ।। जी ।। शिवाजी राजा सावध होता चटकन सरला माघारा। शिवरायाचे लोक धावले त्यांनीं पकडलं दोघाला ।। जी ।। खंजिराचा वार लागला शिवाला रक्त सांडलं भूवरती। शिवरायाला कवच देवाचें, नाहीं कुणाची मग भीती ।। जी ।। हरामखोरांना पकडुन त्यांचे तुकडे तुकडे मग केले। शिवरायाचे शूर मावळे कधीं न फिरले माघारे ।। जी ।।

।। चाल ।। शिवाजीनं सूड घेण्याचा बेत मग केला ।। ८ जानेवारी १६६४ ला। शिवाजीनं सुरतेवर केला जोराचा हल्ला ।। जाळपोळ लुटालूट चालली जागोजागेला ।। जी ।। ज्यांनीं ज्यांनीं राजाच्याविरुद्ध होता कट केला। त्यांनाच बडवलं त्या वेळा। जे आले झुंजायला। त्यांचाच नायनाट केला । पण गरिबांना–जनतेला धक्का नाहीं लावला। कैक व्यापारी होता कैद केला। राजानं सोडलं सर्वाला। शिवराज फिरले माघारा। असा अजब तडाखा दिला। पांच कोट रुपयांची लूट केली त्या वेळा ।। गेला पन्नास लाख मागायला। पण पांच कोटी मिळाले त्याला। इनायतखान वाड्यांतच लपून राहिला।

पुढं होण्याची छाती नाहीं त्याला । असा मोठा विजय मिळविला । असा मोठा दणका दिला शत्रूला अन् राजा मोठ्या झडपेनं फिरला माघारा । यश चढतं शिवरायाला । **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ जी ॥ ३ ॥

रचना–२०–६–६७.

# स्वामी श्रद्धानंदांचा खून

# यावरील

# पोवाडा —————— : १५ :

काशि आली झोंप तुम्हांला कळेना मला। हाय ! हिरा भंगला नाहीं, मोल तेजाला। देहाचा बळी देऊन घ्यावं सूडाला। मरणाला भ्यालं तर जाल नर्क भोगायाला ॥ ध्रु० ॥

● ●

## चौक १ ला

पंजाब-देश सधन। जालंदर जिल्हा छान ॥ त्यांत एक गांव तलवण। त्यामाजि झालं जनन ॥ अठराशें छप्पन सालीं। स्वारी जन्मली। पुण्याई आली. फळाला झाला मोठा आनंद। ज्यानं पुढं घेतला धर्माचा छंद। हिंदुचा तोडला सारा भयबंध ॥ (चाल) ॥ बाळ बारा दिवसांचं झालं। मुंशिराम नांव ठेवलं ॥ जशी कळा वाढे चंद्रास। मुंशिराम तसा दिसादीस ॥ (चाल) ॥ धिप्पाड जसा काय दिसतो डोंगरी कडा ॥ तो उग्र जसा काय रायगडचा 'खूबलडा' ॥ गंभीर जसा काय गुरुसागर चोखडा ॥ तो टणक जसा काय दिसतो वाळुचा खडा ॥ ज्याला पाह्यला लोक प्रीतिनं राहतो खडा ॥ तो शब्द जसा काय झडझडतो चौघडा ॥ तो शूर जसा काय मानाजी फांकडा ॥ शत्रुला सदा वांकडा। सरकारला सदा रोकडा। पर आपल्या लोकांशीं कधीं नाहीं हो तिडा ॥ सरकारला मोठी पिडा। राखायला धर्म उचलला ज्यानं हो

विडा ॥ धारातीर्थी लढतां लढतांना टाकिलं धडा ॥ त्याचं वर्णन काय करणार मी हो बापडा ॥ हळु हळु वर्सांमागुन वर्स संपलीं ॥ वकिलीची परिक्षा दिली । जालंदरला त्यानं मग सुरू केली वकिली ॥ धनदौलत हो वाढली । हळु हळु चैन वाढली । देवधर्म नुरला अंतरीं । अशी स्वारी होती संसारामधिं रंगली ॥ पण वेळ आली हो बरी । दयानंद स्वामी प्रसिद्ध भूमंडळीं ॥ दृढभक्तिभावानं तोषाविला श्रीहरी ॥ मुंशिराम गेला भेटायला बरेलीपुरीं ॥ तें दिव्य तेज पाहून विरला अंतरीं ॥ त्यानं डोकं ठेवलं दयानंद–चरणावरी ॥ गुरुशिष्य जोडी हो बरी । विवेकानंद आणि रामकृष्ण, अर्जुन आणि श्रीकृष्ण, रामदास आणि शिवराणा, या जोड्या योग्य संगतिला असति खरोखरी ॥ मग बोलला त्यांना लौकरी । " महाराज ! पापी मी फार । उद्धार करा लौकर ॥ केलं पाप माग मी फार । आज वेळ आली सुंदर ॥ दयानंद स्वामींनीं केली कृपा त्यावरी ॥ झाला शिष्य आर्यसमाजी दीक्षा वरी ॥ हरिद्वारीं कांगडी केली पसंत लौकरी ॥ एकोणीसशें दोन सालीं गुरुकुल स्थापन करी ॥ मग पंधरा वर्षं खर्चलीं त्यानं गुरुकुलीं । किती शाखा काढल्या गणतीही नाहीं हो पुरी ॥ ( चाल पहिली )॥ ईश्वरी असे अवतार ! थोडे होणार । करिती संहार । दुष्टांचा, धर्मकार्य करण्याला । जो शूर झाला नरवीर त्याचा भूवर । होइ बोलवाला ॥ १ ॥

## चौक २ रा

एक गांव होतं छानदार । पांच हजार । होतं घरदार । त्यांत बडे होते हिंदु सरदार । नव्हति पर राहिली त्यांची तलवार । भ्याडपण शिरलं अंगामधिं फार ॥ तत एक मुसलमान खान । बंगला बांधून । राहिला ताठ्यानं । होता आडदांड, भीत घरदार । केवढाले दंड मोठे पिळदार । ज्याचं गांवाला होतं भय फार ! ॥ एक गोष्ट सांगतों तुम्हांला ।

भरंवसा मला । माझ्या यत्नाला । येईल यश, दादा ! मग फार ! घाला मज भीक जातों दारोदार । सांगतांना कंठ झाला बेजार ॥ चाल ॥ एक पोरगी वीस वर्षांची एक म्हातारी ॥ दोन माणसं होतीं गांवांत तंवा राहिलीं ॥ पोरगीचं नांव त्या **कमळा** ऐका सत्वरीं । ती कमळा होती सुंदर देखणी बरी ॥ ती बाईल एका हिंदूची होती सुंदरी । तो राहिला नाहीं बघण्याला आपली अस्तुरी ॥ दैवानं हाणली हो त्याच्या मानेवर सुरी ॥ हा देह टाकून गेला देवाच्या घरीं । मग दुःख झालं लइ तिला । हातानं पुसलं कुंकवाला । दगडानं फोडलं वांगडिला । तिनं दूर केलं विषयाला । चित्तांत बंदी मदनाला । सुखवेल वाळुन गेला । प्रेमाचा झरा आटला । देहाला वणवा लागला । नियमांचा पाहरा चित्ताला । असा तिनं बंदोबस्त केला । गोपालकृष्ण भजनांत काळ चालला ॥ म्होरं काय घडलं दादानो ! सागतों तुम्हांला ॥ जरा जागं करावं कानाला । सोडावं आतां झोपेला । नाहींतर बडगा बघा आला । अन् पाठीचा कणा मोडला ! । ऐकावं आतां गोष्टीला । एके दिवशीं कमळा जात होती एका देवाला ॥ जातांना दिसली खानाला । पापाचा आला उमाळा । ‘ कंवा पळविन या बेटिला ! । असं झालंय अल्ला मला ’ । असं बोलुन गेला धरण्याला । परं लागली नाहीं हाताला । मग गेला आपल्या जागेला । पर झोप येईना त्याला । काय कमळे ! ठाऊक तुला ? । प्रसंग आला जीवाला । काय होईल बाई ! उद्यांला । काय ठाव बोल ग तुला । कसं सांगू मी आंता तुला । सांगायला लाज पर मला । दादांनो, सांगतों तुम्हांला । सांगावं काय बाईला ? । काय ऐकूवतंय तुम्हांला ! । ऐकाजी ! प्रकार काय झाला । चौकाचा आकार झाला । सुरू करीन पुढच्या चौकाला ॥ मग देईन साऱ्या खबरेला । दादांनो ! चित्त लावून ऐका बोलाला ॥ ॥ चाल ॥ असा काळ आला घडोघडी । करा तांतडी । तोडा ही बेडी । नाहिंतर नर्कवास भोगाल । करा करा विचार घोर हा काळ । होईल वाली तुमचा **गोपाळ** ॥ २ ॥



● ●

## चौक २ रा

दुसरे दिवशीं भल्या पहाटेला। एका थेरडीला । नेलं बंगल्याला । खान मग बोलला काय तिजला । " थेरडे ग ! पैसा देईन तुजला । कामाची ग काळजी एक मजला ॥ ती बेटी–ठाव ग तुला । आण रस्त्याला । आज सांजेला । दीस बुडण्याच्या ग टाईमाला । हेंच बघ काम माझं तुजला । आणीन तिला बंगल्याला " ॥ पैशाचा मोह लागला । लाज नाहीं तिला । 'होय' मग बोला । बोलून आली आपल्या जागेला । जातीची काळजी नाहिं तिला। गेली साठीला । बुद्धिनाश झाला ॥ चाल ॥ मग सांचं थेरडि कमळेच्या गेली घरट्याला ॥ आणि बोलली काय हो तिला । 'चला बाई ! जाऊं देवाला' । मग कमळा बोलली हो तिला। "आजीबाई ! सकाळिं देवाला । गेलें होतें आतां कशाला ?" । पर थेरडी बोलली कमळेला । 'अग । येकादसतीथिला । जावं सांचं बाई देवाला । अशी रीत सांगतें मी तुला । म्हातारीच्या ऐक बोलाला " । मग कमळा चालली देवाला । हातांत घेतलं फुलाला । चंदनी गंध पुंजेला । उदबत्ती ओवाळायला । अशी कमळा आली रस्त्याला । मोटारचा आवाज जाहला । आलि मोटार त्या जागेला । जोरानं धरलं कमळेला । मोटारींत घातलं हो तिला । आली घेरी तंवा बाइला। परक्याचा स्पर्श जाहला । पार गाडी गेली बंगल्याला !। अशी गोष्ट सांगतांना आलं पाणी डोळ्याला ॥ रडताय कां ? ऐका गोष्टीला । आधिं ऐका साऱ्या गोष्टीला । मग लावा फडकं डोळ्याला । जें फूल देवपूजेला । तें आतां खानपूजेला । विपरीत काळ हो आला । गांवांत झाला बोलबाला । असं असं नेलं बाईला । बोलवलं एका सभेला । चार हजार हिंदु तो आला । येक येक बोलाय लागला । जोरानं हात हापटला । अन् बोलाया लागला लोकाला । "काळीमा आज लागला । एक बाई नेलि बंगल्याला । हें रुचलं नाहिं हिंदुला " । असा ठराव त्यांनीं मग केला । अन् पाठविला तोच दिल्लीला ।

घरोघर सारा लोक गेला ! ! । कसा झाला भ्याड हो कांहीं कळेना मला ॥ कां नाहीं लावली आग बंगल्याला । एक शूर नाहिं पुढं आला । कीं जो बंगल्यांत बघा गेला । ज्यानं त्याच्या धरलं नरड्याला । अन् धाडलं घोर नर्काला ! । काय जपताय लइ जीवाला । अर मान गेल्यावर कवडी मोल जीवाला ॥ (चाल) ॥ किती जपलं जरी जीवाला । मृत्यु हा आला । चुकेना कोणाला । मोठमोठे गेले सारे नरवीर । हिंदुनो ! धरा चित्तामधिं धीर । धर्माच्या कामीं जाउं द्या शीर ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

आज तीनशें वर्षांपूर्वीचे । दिवस भाग्याचे । गेले राज्याचे । गंजून गेली पार तलवार ! । दीन हीन झाले सारे सरदार ! । ओसाड झालं सारं घरदार ! ॥ भर दिवसा बायका पळविती । इज्जती घेती । आहे काय छाती । कोणाची सोडविण्याला त्रास । मुसलमान झाला भारी दुबळ्यास । मरणाची भीति पडली जीवास ॥ काय लाज गेली रे तुमची । आयाबहिणींची । राखा लाज घरची । नाहींतर आला व्यर्थ जन्माला । अपकीर्ति झाली भूवर । मरण लौकर । आलं तर बरं । वाटतं जीवाला ॥ मिळेना अन्न खाण्याला । पाणी पिण्याला । झालों मरणाला । योग्य व्यसनांनीं घेरलं आम्हांला । हलाखीची नोकरी पत्करली । आली ताबेदारी । गेली बाणेदारी । सोडलं लाजेला ॥ अफु चिरूट सिगारेट विडी । नित्य हा ओढी । गेला देशोधडी । सोडलं घरदार । दारुमधिं सदा झाला हा तर्र्र्! । व्यसनांनीं केला याचा संहार ॥ चाल ॥ जशि कोल्हीं कुत्रीं कुरतडुनि मुडदे फाडती ॥ तसे मुसलमान क्रिश्चन लच्के तोडती ॥ हिंदुच्या अंगांतुन रक्तधारा वाहती ॥ पर मुडद्यासारखं बघा थंडगार राहती । हाणा लाथा बुक्क्या,

तरी निमुटपणें सोसती ॥ अशी फिरली दैवाची गती । त्यांना पडली पूर्व विस्मृती । वडिलांच्या नांवाला माती । त्यांनीं लावली नाहीं पर खंती । जरी जोडे मारले तरी गप्प कसे राहती ॥ असे झाले लोचट नाहीं त्याला परिमिती ॥ अशी झाली आमची अवनती ॥ चाल ॥ असा दीन हिंदु पाहिला । **मुंशिराम** फार गहिंवरला ॥ मग त्याचा निश्चय झाला । राखीन आपल्या धर्माला ॥ जोर अंगीं वीराचा आला ॥ भीतीचा नाश हो झाला ॥ संसार त्यानें सोडला । सर्वस्व दिलं गुरुकुला । सत्याग्रह दिल्लीला झाला । तेव्हां गेला तिथं मदतीला । सभा नको होती सरकारला । म्हणून ठेवलं होतं गुरख्याला । गोळ्यांचा बार मग केला । पर **श्रद्धानंद** पुढें झाला । आणि बोलला काय गुरख्याला । मारा गोळ्या आतां छातीला । नाहीं चिंता देहाची मला । छातीचा कोट पुढं केला । गुरख्यानं त्याला पाहिला । सरकारला धाक वाटला । सारा हुकूम रद्द मग केला । धन्य धन्य झाला त्रिभुवनीं त्याचा बोलबाला ॥ चाल ॥ सौख्याचा करून संन्यास । घेइ संन्यास । झाला उदास । देहावर ठेवलं तुळशीचं पान । केली भगवी छाटी त्यानं परिधान । पुण्याला त्याच्या नाहीं परिमाण ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

धेड म्हार मांग चांभार । सात कोटी दूर । लोटुनी पार । संघटण होइ कसे सत्वर ? । जो देव घडवी तुम्हांला । तोच बघा त्याला । भेद मग बोला । केला कुणीं हाय ! असा दुस्तर ॥ नाहीं उच्च नीच वर्णाला । देवाघरीं थारा । हाय ! मग बोला । घेता का आपणावरती पापाला । आला तुमचा राग देवाला ॥ चाल ॥ हा उच्च–नीचता–भाव । झुंजायला देइ हो वाव ॥ दोघांच्या भांडणीं खास । लाभ आणि मजा तिसऱ्यास ॥ चाल ॥ मुसलमान आणि क्रिस्ताव फांस टाकती ॥ दीनदुबळे त्यांच्या फासांत किती अडकती ॥ धर्मांतर करुनी धेड

मजा मारती ॥ साठ कोटि हिंदुची होती मागं गणती ॥ पण आज सारे बावीस कोट दिसती ॥ असं होइल तर काय हिंदु-धर्माची गती ॥ डोळे उघडून आता तर बघा असली ही स्थिति। कशी होईल ही उन्नति । हा टाका भेद काढून ऐका विनंति। जे असती लोक दुर्मती । ते भेदभाव मानती । थोरांची असली ना कृती ॥ चाल ॥ कां दोष चंद्रकिरणाला । जो शिवे म्हारपोराला । सूर्यानं भेद कधीं केला । हा म्हार मांग हा झाला ॥ हा ब्राह्मण आणि हा धेड, असा पृथ्वीनं भेद कधीं केला ? ॥ देव सदा सर्वांच्या हृदयामधिं रंगला ॥ कां विटाळ कधीं अग्नीला ? । "विद्या-विनय-संपन्न-ब्राह्मण-गो-हस्तीला ॥ शुन-श्वपाकिं पंडित समदर्शी जाहला" ॥ असं सांगे कृष्ण समरांगणिं त्या जिष्णुला ॥ तो गीता ग्रंथ आज पूज्य आम्हीं मानिला ॥ पर सांगितलेला धडा नाहीं गिरविला ! ॥ स्वार्थाचा भाव राहिला । कधीं जाऊन विचारपूस केली आहे कां मांगाला ॥ "काय सुखदुःख होत रे तुला ? । काय अन्न पाणी खायाला । काय औषध मिळतंय तुला ? । काय खोपट धड राहण्याला। काय शहाणपण दिलं रे तुला" । काय बोध धर्माचा केला । काय देशाधर्माचं संकट कळलं त्याला ? ॥ काय गोड शब्द बोलला । सदा निंदा, शिव्यांचा मारा त्यांच्यावर झाला ॥ चाल ॥ चला सोडून सारी लाज । उठा झणिं आज । सोडून नीज । नाहींतर होइ सारा संहार । पेटून जाइल सारं घरदार । जपण्याला झालं पाहिजे तय्यार ॥ ५ ॥

• •

## चौक ६ वा

रणदुंदुभि हा गर्जला । स्वतः पुढं झाला । दौऱ्यावर गेला । केलं त्यानं जागं साऱ्या लोकाला । सरकारला भयंकर झाला, । मुसलमान सारा । घाबरून गेला ॥ सुरू केली शुद्धिचळवळ । वाढवाया बळ । यवनांचा काळ । झाला मग देश हिंदुनी सारा । उपदेश करित लोकाला ॥

परधर्मी हिंदु जो गेला। फिरून हो त्याला। हिंदु बनविला। झाला हा काळ साऱ्या यवनाला। मरणाची भीति नाहीं त्याला। धन्य जगिं झाला। साहेब भ्याला॥ चाल ॥ **मलकाना** रजपुत झाले मुसलमान अती॥ त्यांना शुद्ध करण्याला 'शुद्धिसभा' स्थापिती॥ मुसलमान झाले जरी होती हिंदूची रीती॥ मग श्रद्धानंद स्वामी त्या स्थळीं जाती॥ हिंदूंचा करुनि संस्कार धर्म फिरविती॥ म्लेंच्छांच्या पायाची आग मस्तका जाती। मलबारला मोपले मग नंगा नाच घालती॥ ॥ चाल ॥ मुल्तान सहारनपूर। गुलबर्गा आणि अजमीर॥ मुंबई दिल्ली विजापूर। आणि किती घालावी भर॥ कलकत्ता कोहाट मलबार। सोलापूर आणि नागपूर॥ चाल ॥ गांवांतनं असल्या यवनांचा दंगा मग झाला॥ किती लोक गेले तुरुंगाला। किती लोक मुकले प्राणाला। पर जागा सारा देश झाला। दंग्यानं दंगा उभा केला। जसं झाड तोडावं बुडख्याला। मग लागली फांदी जोराला। तसा तंटा वाढतच गेला। धमकीचीं पत्रं स्वामीला। दररोज येती दिल्लीला। पर बोलला आपल्या लोकाला। "देहाची परवा कधिं राहिली नाहीं स्वामीला। कधिं सोडूं नका यत्नाला। होते हिंदु साठ कोटिला। पर आले आतां बावीसाला। पुन्हां वाढवा आपल्या संख्येला। आणि पसरा आपल्या धर्माला। नका बसवूं त्यांच्या पीराला। ताबूत शत्रू हिंदूला। अहो भजा रामचंद्राला। नका देऊं एक पै त्याला। नाहींतर आपला घात झाला"। असा बोध हिंदूंना केला। एकोणीशें तेवीसांत मलबार प्रांतीं गेला॥ प्रकार सारा पाहिला। बाटवलं ज्या ज्या लोकांना। पुन्हां केलं हिंदु सर्वांला। असा सारा देश हिंडला। मग फिरून दिल्लीला गेला। झाला क्षीण फार देहाला। तंवा घेरलं रोगानं त्याला॥ चाल॥ किती देती औषधं त्याला। सर्वांना प्यारा। जीव तो झाला। रोग जरा त्यांचा मागं पडला। पडला पर दैवयोग फिरला। ऐका प्रकार जो जो घडला॥ ६॥

• •

## चौक ७ वा

"डॉक्टर लोक चाहे कुछ कहे। पर आत्माका यही शब्द सुनाई देता है। अब शरीर काम का रहा नहीं अच्छा है। इस समय जाने के लिये हि तय्यार मैं हूं" ।। असं बोलती लोकाला। जणुं काय त्यांना। मृत्यु दिसला। घराकडं एक यवन आला। बोलला काय ऐका अबदुल्ला ।। "तकलीफ अल्प देता हूं। धर्म इस्लाम। मेरा पर राम। भजनको दिया कमलमुख है। धर्मकी चर्चा प्यारी है। आपका दर्शन का लाभ बहु है ।। घसा माझा कोरडा झाला। पाणी पिण्याला। द्यावं हो मला"। ऐकून स्वामी धर्मसिंहाला। 'जा! पाणी दे जा रे त्याला। बोलले, आंत गेला। पाणी आणण्याला ।। पाणी पिऊन झाल्यावर गेला। लोटा ठेवण्याला। तोंच बार झाला। नीचानं धरलं पिस्तुलाला। एक गोळी भिडली काळीजाला। दुसरीचा त्यानं बार भरला ।। तीन गोळ्या लागल्या स्वामीला। धर्मसिंह आला। तोहि चीत केला। **धर्मपाल** आला त्याच समयाला। जीवाची आशा सोडून त्याला पकडून। पाडलं धरणीला ।। नगरांत झाला बोलबाला। वर्दी पोलिसला। सुप्रिटेंट आला। बांधून नेलं त्याला तुरुंगाला। फाशीची शिक्षा रशीदाला झाली, पर गेला! लाल हो गेला!! ।। चाल ।। छातितनं एक रक्ताचा लोट चालला ।। रक्तानं लाल रंग दिला साऱ्या देशाला ।। शोकाच्या समुद्रांत सारा देश हो बुडला ।। बेधडक घरीं शिरून मारलं स्वामीला ।। असला हाच एक प्रसंग पहिला हो आला ।। पृथुराज तानाजी बाजी आणि संभाजी देत प्राणाला ।। दयानंद, लेखराम रामचंद्र यादीला ।। श्रद्धानंद आले कामाला। आणि किती आले कामाला नाहिं गणतीला ।। किती बळी जाणार कांहीं कळेना मला ।। चला, उठा, टाका झोपेला। आग लागली हो देशाला। द्या जीव बळी धर्माला ।। चाल ।। **जय स्वामी श्रद्धानंद**। लागला छंद। गातों मी मंद। वंदना सारा लोक जमला। तय्यार तुमच्या गौरवाला। शाहीर '**पांडुरंग**' आला ।। ७ ।।

रचना-१-८-१९२७.

# लो० टिळक

# यांचा

# पोवाडा —————— : १६ :

जय **लोकमान्य श्री बाळ गंगाधर** । भूषण झाला जगताला वंद्य नरवीर । जगण्याचा मंत्र ज्यानं दिला । केला उपकार । देशार्थ नित्य तळमळ । गरिबांचा मोठा आधार । बडा झुंजार ।। ध्रु० ।।

• •

## चौक १ ला

स्वातंत्र्यसूर्य मावळला । जन सारा व्याकुळ झाला ।। परवशता खाई जिवाला । मुळिं चैन नसे हृदयाला ।। मोहनाग पाया डसला । मग विवेक मरुनी गेला ।। चाल ।। पाश्चात्य चांगले सारे । पौर्वात्य तृणासम झाले । जन सारे मोहुनि गेले ।। चाल ।। नोकरींत जो तो रमला । मोहानें भरुनी गेला ।। चाल ।। अशा वेळीं लोकमान्य बाळ आला जन्माला ।। १८५६ सालाला ।: जुलैच्या तेवीस तारखेला । रत्नागिरी शहरांत याचा जन्म जाहला ।। रत्नागिरी जिल्ह्याला सांपडला हा हिरा ।। मग बाळ गेला **पुण्याला** । बाळ मोठा बुद्धिवान झाला । झपझपा परीक्षेच्या पायऱ्या चढून हो गेला ।। १८७६ सालाला । बाळ बी. ए. पहिल्या वर्गांत पास हो झाला । १८७९ ला । वकिलीची परीक्षा दिली त्यानं त्या वेळा ।। इंग्रजांची नोकरी कां जनतेची सेवा–हा विचार बाळानं केला । अन् राष्ट्राची सेवा करण्याचा विडा उचलला ।।

१८८० सालाला । **न्यू इंग्लिश स्कूल** सुरू केलं ज्ञान देण्याला ॥ १८८१ साला । **केसरी–मराठा** पत्रं आलीं जन्माला ॥ १८८२ सालाला। १०१ दिवसांची शिक्षा झाली बाळाला ॥ १८९७ साला। दीड वर्ष सक्त मजुरीची शिक्षा बाळाला ॥ १९०८ ल्या सालाला । सहा वर्षे काळेपाणी शिक्षा दिली वीराला ॥ तंव प्रेतकळा आली पुण्याला । सगळीकडं हाहाकार झाला । १९१४ सालाला । तुरुंगातनं सोडलं वीराला । पुन्हां नवकळा आली पुण्याला । पण कामाचा ताण जीवाला । देह सारखा खंगतच गेला । अन् १९२० सालाला । एक ऑगस्टच्या हो दिवसाला । **लोकमान्य टिळक भास्कर गेला अस्ताला** ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

"**स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क मंत्र हा राष्ट्राला** ! देउनि त्यानें जड राष्ट्राचा वृक्ष पुन्हां हा टवटविला ॥ राज्य इंग्रजी जणू पूतना आली प्राण हरायाला । बाळकृष्णानें अतुलबलानें देह तिचा जर्जर केला ॥ जी ॥ कर्मयोगाचा बोध कराया कृष्ण धावला त्या वेळा । **गीतारहस्य** लिहुनी यानें तोच बोध राष्ट्रास दिला ।। जी ॥ अपार बुद्धि, अपार शक्ति, अपार तळमळ जीवाला । पुरुष असे हे जन्मा येती अपार कार्यें करण्याला ।। जी ॥ चाल ॥ धुतलेल्या तांदळासारखं ज्याचं हो शील ॥ विवेकाचं आणि बुद्धीचं मोठं भांडार ॥ समुद्राच्या सारखा गंभीर । मेरुसारखा सदा जो स्थिर । वटवृक्ष जसा गरिबांचा मोठा आधार ॥ दुःखाचे आले डोंगर । तरि बुद्धि ज्याची खंबीर । बाळ गंगाधर अभिधान । मानाचं स्थान । करांव स्मरण। होई कल्याण ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

लोकमान्य टिळकांची सेवा आली फळाला या वेळा। भारत आतां स्वतंत्र झाला जगताच्या कल्याणाला॥ लोकमान्य तूं, पुरुषोत्तम तूं, कर्मयोगी तूं, तूं वीर। वंदन करितों हात जोडुनी **पांडुरंग** हा शाहीर॥ ३ ॥

रचना–१ ऑगस्ट १९६०.

कै. दे. भ. नाट्याचार्य

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

यांचा

## पोवाडा —————— : १७ :

रात्रंदिन जो राष्ट्रासाठीं माशासारखा तळमळला। दिव्यासारखा सदाच जळला नमन तया **कृष्णाजीला** ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

तो भव्य चेहरा वदे करारी बाणा ॥ ती दृष्टी भेदक जसा बहिरिससाणा ॥ चाल ॥ सागरापरिस गंभीर । हिमराजासम जो स्थिर ॥ शत्रुला चंडभास्कर। स्वजनांना शांत हिमकर ॥ प्राणानं शोभे शरीर। राष्ट्राला तसा हा वीर ॥ जी ॥ चाल ॥ जशी पात खड्गाची तसा बुद्धिचा डौल ॥ जशी मूठ खड्गाची तसा पक्का विचार ॥ सच्छील जसं कांहीं गंगाजळ निर्मळ ! ॥ जसा झोत पाण्याचा तसा बुद्धिचा खेळ ॥ चाल ॥ ध्येयनिष्ठा ज्याची पाहून। मोठमोठे गेले शरमून ॥ मनावरचा ताबा पाहून। कितिकांचं रंगलं मन ! ॥ जी ॥ ढगावरती धांवे विमान। ढगांचें नाहीं बंधन ॥ जी ॥ प्रयत्नांचं करुन विमान। सुखदुःख-मेघांच्या वरनं ॥ जी ॥ ध्येयाचा तारा रोखून। हा पुरुष चालला धीरानं ॥ चाल ॥ गाइन त्याचं चरित्र आतां ऐका बंधुनो ! या वेळा ॥ मिळेल स्फूर्ति, सुचेल युक्ती। उजळा येईल बुद्धीला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

शके १७९४ च्या कार्तिक वद्याष्टमीला। २३-११-१८७२ इसवी सनाच्या तारखेला ॥ जी ॥ महान् विभूती जन्मा आली पहा **सांगली नगराला**। **खाडिलकरकुळ** कृतार्थ झालें, नांव कृष्णाजी बाळाला॥ जी ॥ ॥ चाल ॥ रत्नागिरी जिल्हा कोंकणांत। देवगड तालुका त्यांत ॥ नारिंग्रे गांव विख्यात। गिरावळवाडी असे त्यांत ॥ जी ॥ प्रभाकरपंत तेथून आले हरिपुरला ॥ तिथनं गेले **उगार** गांवाला। सांगलीच्या दरबारांत मोठी नोकरी लागली त्या वेळा ॥ मोठे निस्पृह म्हणून लौकीक फार गाजला ॥ वडिलांचा अंत हो झाला। अन् चार महिन्यांनींच श्रीकृष्ण आला जन्माला ॥ हरिपंत मोठे भाऊ, आई आणि कृष्णा, असे राहिले सांगली नगराला। हरिपंत करती नोकरीला। संसार कसाबसा चालला। वडिलांचं सुखं नव्हतं त्याला। दारिद्र्य लागलं जन्माला। महाभारत रामायण आई सांगते कृष्णाला। बाळ कुमारावस्थेंत आला। तंवा मल्लखांब कुस्ती सुरपाट्या खेळ खेळला॥ त्यांत एकदां पाय मोडला। तो जन्मभर अधूच राहिला। वयाच्या १७ व्या वर्षाला। १८८९ सालाला। मॅट्रिकची परीक्षा दिली आनंद झाला ॥ १८९२ सालाला। B.A. ची परीक्षा दिली हर्ष सर्वाला ॥ चाल ॥ प्रख्यात **सांगली हायस्कूल**। तिथं नोकरी धरली सत्वर ॥ दैवयोग होता प्रतिकूल। त्यानं सोडलं सांगलीनगर ॥ चाल ॥ केसरी लोकमान्यांचा गर्जू लागला ॥ इंग्रजी राज्याला कासावीस करण्याला ॥ केसरीनं नेलं कृष्णाला ।१८९६ सालाला। **कृष्णाजी** गेले कायमचे निघून पुण्याला ॥ जी ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

गुलामगिरीचा नाश कराया लढती झुंजार। लोकमान्य टिळकांनीं धाडले परदर्शी वीर ॥ चाल ॥ वासुकाका गेले जपानाला। कृष्णाजी गेले

**नेपाळला** । तिथं जाऊन करती कार्याला । कुंभार बनले त्या वेळा। कौलांचा कारखाना सुरू केला। मागविलीं यंत्रं त्यासाठीं त्यांनीं त्या वेळा ॥ त्यांनीं मनांत विचार असा केला । कीं कौलाच्या यंत्रांनीं शस्त्र तयार करून । पाठवावीं गुप्त मार्गानं हिंदुस्थानाला । पण यत्न सफळ नाहीं झाला । कुणकुण लागली इंग्रजाला। आणि हा बेत हाणून पाडला । कृष्णाजीकाका मग आले परत पुण्याला ! ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

१८९६ सालाला। मोठा दुष्काळ। शेतकऱ्यांना अवजड झाला शेतसारा फार । सरकारचा जुलमी दंडा करतो हैराण। शेतकऱ्यांचा पक्ष घेतला तेव्हां केसरिनं ॥ जी ॥ विजापुरीं सोलापुरीं गेले दौरा काढण्याला । काकासाहेब जागृत करिती शेतकरी सारा ॥ जी ॥ प्लेग उसळला पुण्यांत मोठा अनर्थ ओढवला। गोरे सोजीर मस्त होउनी छळती सर्वांला ॥ घरादारांतुन शिरुन फेकती वस्तु रस्त्याला । लुटालूट किति करती छळती सोजीर त्या वेळा ॥ प्लेग बरा पण नकोत असले गोरे सोजीर। जनहृदयाचा तोल उडाला, जुलमाचा कहर ॥ **रॅण्ड साहेबाचा** खून जाहला खळबळ बहु झाली । धरपकडीनं कमाल केली रडारडी आली ॥ किति तरुणांना पकडुन नेलं फटके देण्याला । **चाफेकर बंधूंना** चढविलं तेव्हां फांसाला ! ॥ असंतोष कां असा भडकला लेखन त्यावरती । कृष्णाजीपंतांनी केलं केसरींत पुढती ॥ 'सरकाराचं डोकं ठिकाणीं आहे का' लिहून। टिळक चालले तुरुंगवासा शिक्षा घेऊन ॥ चाल ॥ **केसरी** चालविल कोण। भयभीति सारी सोडून ॥ जी ॥ लोकांची बाजू मांडून। जनसेवा करिल हो कोण॥ ॥ चाल॥ कृष्णाजीपंतांनीं **केसरी** हातीं घेतला ॥ अन् टिळकांच्या जोमानं पुढं त्यांनीं चालविला ॥ केसरीनं वाचा फोडली कैक जुलमाला।

॥ जी ॥ धडाडीचे लेख वाचून तरुण खडबडला ! ॥ चाल ॥ केसरी मित्र सर्वांला । कृष्णाजीकाकांनीं केला । १८९९ साला । टिळक आले शिक्षा भोगून परत पुण्याला ! ॥ त्यांनीं शाबासकी दिली काकांला । कीं केसरीचं ब्रीद चालवलं आनंद झाला ॥ जी ॥ पुनश्च हरिः ॐ म्हणून टिळकांचा केसरी पुन्हां गर्जू लागला ॥ जी ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

पारतंत्र्याचा नाश कराया अधीर जन झाले । गुप्त मंडळ्या स्थापन करुनी तरुण धगधगले ॥ पारतंत्र्याच्या राखेखालीं । स्वतंत्रतेची ज्योत झळाळी । तरुणांच्या हृदयांतुन आली धडकुन बाहेर । क्रांति कराया गुप्तपणानं सजले ते वीर ! ॥ तळहातावरि शीर घेउनी, मरणाच्या छातीवर बसुनी । धगधगलेला अग्नि धरोनी तळहातावरती । मायभूमिला मुक्त कराया किति दौडत येती ॥ जी ॥ वंगमहाराष्ट्रांनीं हालविलं इंग्रजी राज्याला । धरपकडीला जुलुमशाहिला पुन्हां ऊत आला ॥ किर्लोस्कर नाटक मंडळी नासीक शहराला । खेळ **शारदा** पाहावयाला जॅक्सन तो आला ॥ जी ॥ गंधर्वाच्या अभिनयगानीं प्रेक्षकजन बुडला । जॅक्सन साहेब रंगुनि गेला नाग जसा डुलला ॥ जी ॥ चाल ॥ इतक्यांत उडाला बार । जॅक्सन जाहला ठार ॥ जी ॥ देह झाला रक्तबंबाळ । श्रोत्यांनीं केली धांवपळ ॥ जी ॥ चाल ॥ पोलीसांनीं घेरलं सर्वांला । जितका तरुण होता तितका झाडून सारा पकडला ॥ गुन्हेगार कोण जाहला । हें कळलं नाहीं कोणाला । तरुणांचा छळ फार केला । मिरचीची पूड डोळ्याला । कोलदांडा घातला पायाला ॥ टांगून मारलं कैकांला । देशभर हाहाःकार केला । तंवा केसरिनं इषारा दिला । असा असंतोष कां भडकला । त्याचा विचार सरकारनं नाहीं केला । **बॉंबचं रहस्य लेख** लिहिला, । आणि नऊ लेख लिहिले त्या वेळा ।

तीन टिळकांचे अन् सहा काकांचे (खाडिलकरांचे)। हे लेख झोंबले सरकाराला। अन् टिळकांवर खटला उभारला। ज्या लेखासाठीं खटला भरला। तो लेख होता खाडिलकरांनीं लिहिला। सहा वर्षं काळे-पाण्याला। सरकारनं धाडलं टिळकांना धक्का सर्वांला॥ चाल॥ १९०८ सालाला। ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला। केसरीचे संपादक झाले काका त्या वेळा। ११ जानेवारी १९१० सालाला। संपादकपणा त्यांनीं सोडला। तात्यासाहेब केळकर आले धुरा वाहण्याला॥ काकांच्या तिखट लेखणीनं **कर्झन** सैतान होता खवळलेला॥ त्याचा रोष केसरिवर झाला। केसरी आणि काका–या दोघांचा नाश करायला। कर्झन होता टपलेला;। त्यातनं केसरीला बचावायला। असा होता बदल केलेला। झुंजार असा लढवय्या कुणी पाहिला?॥ ५॥

● ●

## चौक ६ वा

स्वातंत्र्याची तीव्र लालसा भरुनी हृदयाला। नसानसांतुन ओढ घेउनी करिते कार्याला। परराष्ट्रांतिल घडामोडिच्या वार्ता सजवोनी। केली जागृती या पुरुषानं घराघरांमधुनी। बोअर युद्धाचा भडका उडाला आफ्रिकेंत अति जोरानं। बोअर सैनिक धडक्या देती केला इंग्रज हैराण॥ जी॥ पराजयाची रांग लागली इंग्रज थरथरला। इंग्रज-सुद्धां हरतो प्रत्यय आला जनतेला॥ चाल॥ १९१४ सालाला। महायुद्ध भडकलं ग्रासलं युरोप खंडाला॥ तंवा युद्धाचा आढावा दर महिन्याला। काकासाहेब घेऊं लागले माहिती देण्याला॥ **चित्रमय-जगतांत** सुरु केली माला॥ चाल॥ रूसो-जपानी युद्ध जाहलं आशियां खंडाला। खडे चारतो पिवळा–काळा–आदमी गोऱ्याला॥ रशियाची रेवडी उडविली विजय जपानाला। अजिंक्य नाहीं गोरा म्हणुनी दुंदुभी वाजविला॥ जी॥ चाल॥ उत्पन्न केला विश्वास हिंद हृदयांत॥ गोरा

हा माणुसच झाला नाहीं देवदूत, ॥ भावना केली जागृत हिंदराष्ट्रांत ॥ चाल ॥ कभिन्न काळा ढग आकाशीं होता आलेला । विश्वासाची किनार दिधली काकांनीं त्याला ॥ जी ॥ कणाकणानं बुद्धि खर्चली स्वातंत्र्यासाठीं । राष्ट्रासाठीं जगणं मरणं ही तळमळ मोठी ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

स्वातंत्र्याचा प्रचार करण्या नाटक संभार । नाट्यदेविच्या गळ्यांत घाली नवनाटकहार । रेखिव पात्रें शब्दयोजना करुनी भरदार । रंगभूमिला बहरविली अति रम्य चमत्कार ॥ चाल ॥ रसिकता लुब्ध होऊन डोलूं लागली ॥ शारदा रंगिं रंगून बोलूं लागली ॥ ती गानदेवता गोड गाऊं लागली ॥ ती नाट्यसृष्टि हौसेनं नाचूं लागली ॥ चाल ॥ जणुं गोकुळिचा कृष्ण हा आला । त्यानं वेड लावलं सर्वांला । लहानथोर सारे झाडून चालले नाटकाला ॥ म्हातारे म्हाताऱ्या नाहीं अपवाद त्याला ॥ प्रेक्षकांचा तोबा उडाला नाहीं असा एकही खेळ नाहीं झाला ॥ गारुडी खिळवी नागाला । तसा पाहणारा खिळून राहिला ॥ नाहीं तहान, भूकही नाहीं लागली कोणाला ॥ नाहीं ऊन, नाहीं जागरण, नाहीं कंटाळा ॥ नवरस हात जोडून उभे सेवेला ॥ असा रंगभूमिचा दिमाख यानं वाढविला ॥ महाराष्ट्र नाटक मंडळी गद्य नाटकाला । किर्लोस्कर नाटक मंडळी संगीत नाटकाला । मग गंधर्व नाटक मंडळी लागली झळकायला ॥ असा संच होता जमलेला । पण नाटकातनं प्रचार कसला केला ? । कलेसाठीं कला – हें खूळ मान्य नव्हतं याला । अश्लीलतेला नाहीं थारा दिला । कामुकता नाहीं दृष्टीला । बाष्कळपणा नाहीं नाटकाला । नवरस करुनिया गोळा । खेळवले नाटकांतून अद्भुतहि कला ! ॥ चाल ॥ **कर्झन कीचक** उभा करुनिया खवळवि लोकाला । **भाऊबंदकीनं** नाश जाहला सांगे

स्वामी ग्रंथ ... , ठाणे, ...



सकलाला ॥ सत्याकरतां शस्त्र उगारुन पत्नीच्या वरती । **हरिश्चंद्र** आदर्श ठेविला जनतेच्या पुढती ॥ ध्येयापासुन दूर कधींही जाऊं नका भुवनीं । बोध देतसे **कच** सर्वांला तो **विद्याहरणीं** ॥ **सावित्री मेनका** तसें तें **सवतीमत्सर** । **सवाई माधवराव, मोहना** आणि **स्वयंवर** । ॥ चाल ॥ **मानापमान बायकांचें बंड**हि लिहिलें ॥ तें **प्रेमध्वज, द्रौपदी** नाटकहि आलें । **त्रिदंडी संन्यास**हि आलें ॥ चाल ॥ रंगभूमिची सेवा केली समरस होऊन । **नाट्याचार्य** म्हणोनी केला गौरव जनतेनं ॥ पंधरा नाटकें सुंदर सुमनें गुंफुनिया माला । अर्पण केलीं श्रीकृष्णानं रंगदेवतेला ॥ ७ ॥

●

## चौक ८ वा

१९२० सालच्या जुलै महिन्याच्या शेवटाला । **लोकमान्य** सोडुनिया गेले नश्वर पार्थिव देहाला ॥ केसरीचा संबंध सोडला काकांनीं त्या वेळेला । लोकमान्याचे संपादक मग झाले जाऊन मुंबईला ॥ मालक नोकर भेद पाहुनी लोकमान्य सोडुनि गेले । नवाकाळ दिनपत्र काढुनी कार्य आपुलें सुरू केलें ॥ १९२३ सालीं ७ मार्चच्या दिवसाला । धाडस करुनी स्वतःच यांनीं **नवाकाळ** तो सुरू केला ॥ पैशाची टंचाई पडली तरी न काका डगमगले । होतं नव्हतं तें सारं पणाला लावुन कर्तव्यचि केलें ॥ १९२६ सालीं हजार रुपयांचा दंड । नवाकाळला झाला तरीही पडला नच त्याला खंड ॥ १९२९ सालीं, एक वर्षाची शिक्षा झाली । साबरमती तुरुंगांत ठेवलें त्यांना नेऊन । उतारवय किति हाल जाहले परि शांतिब्रह्म ॥ चाल ॥ गांधींचें राजकारण । काकांनीं दिलें पसरुन ! ॥ चाल ॥ काँग्रेसला पाठिंबा दिला । नवाकाळ त्याला वाहिला । हिरिरिनं प्रचार केला । गांधी हेच टिळकांचे लढाऊ वारस ॥ हा काकांचा महामंत्र झाला ॥ खादीची दीक्षा त्यांनीं दिली घरादाराला ॥

वैराग्यवृत्तीचे धडे दिले सर्वांला ॥ मालक नोकर भेदभाव नाहीं केला ॥ असा थोर पुरुष भाग्यानं येतो जन्माला ! ॥ ८ ॥

## चौक ९ वा

कौटुंबिक आपत्ति कोसळे काकांच्या वरती । गौरीबाई पत्नी गेली सोडुनियां जगतीं ( २८-३-१९४५ ) ॥ घर संभाळून चरखा फिरवी गरगर भक्तीनं । सूत कातुनी भारतभूला अर्पी प्रेमानं ॥ जी ॥ बाबुलनाथ कधीं नच चुकला, नित्य असा नेम । आला गेला कधीं न विन्मुख हाच खरा धर्म ! ॥ जीवन जगतें ज्योत जशी ती जाळुनि देहाला । धर्मपत्नी ही तशीच जगली जाळुनि सौख्याला ! ॥ सागर-जीवनरूप होतसे नदी समुद्रांत । काकांच्या सुखदुःखजीवनीं समरस तीं होत ! ॥ चाल ॥ **शांता** कन्या सोडुनि गेली । सून लाडकी मरुनी गेली ! ॥ पुत्र **विनायक** डोळ्यापुढती नेला हिरावुन काळानं । नातू लाडका होतकरूही नेला देवानं ॥ एकामागुन एक कोसळे ही संकटमाला ! ॥ धीर वीर गंभीर परी हा पुरुष अचल झाला ! ॥ भार नवाकाळाचा टाकुनी **यशवंतावरती** । विरक्तजीवन कंठुं लागले काका त्या पुढती ! ॥ छंद लागला वेदान्ताचा करितो अभ्यास । स्थितप्रज्ञता आली अंगीं झाला भवनाश ॥ चाल ॥ उपनिषदावर भाष्य लिहोनी । मराठी वाङ्मय समृद्ध करुनी । नव्या दृष्टिनं अर्थ लावुनी । कर्मयोग शिकविला जगाला वेदान्तामधुन । मुनिवर्यांचें जीवन जगले काका संपूर्ण ! ॥ प्रशांत रात्रीं आकाशांतुन तारा कोसळला ! । हंसतमुखानं पुढं होऊनी भेटे मृत्यूला ! ( २६-८-१९४८ ) ॥ जी ॥ ज्योत जिवाची मालवली । ब्रह्मरूप होऊन गेली । परमात्म्याची भेट जाहली जन्ममरण बंधन तुटलें । पुण्यात्मा हा निघुनी गेला दिगंतरीं यश दुमदुमलें ! ॥ अखंड लेखन वाचन चिंतन व्यसन हेंच या पुरुषाला ।

मृत्यु उभा तरि पुढें तरी हा नच सोडी या व्यसनाला ! ॥ अखंड जीवन होम करोनी पुण्यात्मा गेला । परमात्म्यांतचि आत्मा मिसळुनि विश्वरूप झाला ॥ पंचमहाभूतांचा जरि हा देह जळुनि गेला । आत्मा परि हा अमर सनातन विश्वांतरिं भरला ! ॥ नातु त्यांचा **पांडुरंग** हा करितो कवनाला । नम्रपणानें मस्तक नमवुनि अर्पी चरणाला ॥ स्फूर्ति दिली मज कृष्णाजींनीं कवनें करण्याला । कृतज्ञतेनें भरुनी गेला शाहीर या वेळा ! ॥ ९ ॥

रचना–२६–८–१९४९.

महात्मा गांधी

यांचा

# पोवाडा —————— : १८ :

सत्याची ढाल अहिंसेची घेऊन समशेर । विश्वाला धडे देण्याला झाला तयार । हा कोण भरतभूमिचा पुत्र तेजाळ । साधुसंत राजकारणी, अग्रणीं जनीं, महात्मा वीर ।। ध्रु० ।।

● ●

## प्रास्ताविक

मूर्ति बावळी, तनू हडकुळी, मांस मुळीं नच अंगाला । चमक परी डोळ्यांत विलक्षण थक्क करी हा जगताला ।। पहा ! पहा ! हा कोण चालला थुंकुनिया स्वार्थावरती । जिंकुनी कामक्रोधवासना । कुठें चालला दौड गती ।। एक उपरणं दुसरा पंचा–दोनच वस्त्रं ज्या पुरती । उजव्या हातीं काठी लाकडी-झरझर चाले शीघ्र गती ।। अज्ञसूज्ञही बांधव सारे देवासम ज्याला भजती । असा महात्मा कोण जाहला ? लोक जयाला हो नमती ।। चरित्र त्याचें गाइन आतां श्रवण कराया तुम्हि जमला । काव्यसुंदरी ! येइ झडकरी प्रसन्न कर जनमेळ्याला ।।

● ●

## चौक १ ला

बाळ अठरा वर्षांचा झाला । बॅरिस्टरची परीक्षा द्यायला । मोहनदास चालला विलायतेला । तंवा माताजी बोलल्या लेकाला ! “ बाळ ! शिकायला जा विलायतेला । पण एकच सांगतें मी तुला । एक माझे

शब्द या वेळा। मदिराक्षी मांस मदिरेचा विटाळ जर झाला। तर तुझी आई देइल जीवाला। असं सांगतात लोक रे मला। कीं जो जो जातो इथ्नं विलायतेला। तो तो विलायती होऊनच आला। आईबाप ठेवतो बाजूला। गोऱ्या बायका आणतो घराला। दारुचा घोट हवा त्याला। मांसाचं खाणं रोज लागतं तसल्या माणसाला॥ म्हणून सांगितलं एवढं मीं तुला" ॥ चाल॥ आईचे शब्द ऐकून। पाण्यानं भरले नयन। काळजाचं पाणी होऊन। डोळ्यावाटे चाललं वाहून॥ आईचं दुःख पाहून। मोहनदास झाला बहु खिन्न॥ मातेला बोलला नमून। डोकं पायांवरी ठेवून॥ घसा त्याचा आला भरून। बाळ बोलला दीन होऊन॥ "आई, देतों तुला वचन। दूर राहिन त्यांच्यापासून॥ चाल॥ मदिराक्षी गोऱ्या ग स्त्रिया तुझ्यासम मला॥ मदिरेचा घोट विषासारखा माझ्या जीवाला। मांसाचा मोह पडणार नाहीं ग मला॥ असं राखिनं माझ्या शीलाला॥ अभ्यास पुरा करून येईन देशाला॥ दे निरोप आई ग मला"। असं मोहनदास बोलला। आईनं निरोप त्याला दिला॥ गंधाचा टिळा डोक्याला। अक्षता लावल्या कपाळाला। साइसकट दही आइनं दिलं बाळाला॥ मग गेला बाळ विलायतेला। व्हिक्टोरिया हॉटेलांत उतरला। तिथं काय प्रकार झाला। तें सांगिन पुढच्या चौकाला॥ १॥

• •

## चौक २ रा

आंग्ल तरुण-तरुणींचा जमला मेळावा त्या रात्रीला। झकपक पोषाख तसाच 'मेकअप' करुनि सज्ज तो नाचाला॥ आरसे बिलोरी चारी भिंतीला जमीन झाली स्फटिकाची। नाचांतुन जे भाव प्रकटती चित्रं दाविती ते त्यांची। मदिरा पिउनी, भान विसरुनि नाच चालला हो जेव्हां। मोहनदासाला स्वस्थ पाहुनी सर्व हासती त्या तेव्हां॥ गोरा

जंटलमन हांसता हांसता बोलला मोहनदासाला। "कोण तूं? इंडियन? कशास आलास? पोशाख जंगली का केला?॥ हाकलुन द्या या काळ्या आदमीला 'ब्लडी फूल' रे हा झाला। नाच, गाणं काय येतयं तुजला! कशाला आलास जन्माला" ॥चाल॥ मोहनदास गोंधळून गेला। अन् लागला विचार करायला.॥ 'एकदोन दिवसांतच आलों घाईला। जीवाचा कंटाळा आला। तर दोन तीन वर्षं काढुं कशीं बोला?'। इतक्यांत विवेक त्याला बोलला। "हां वेडया! असल्या गोष्टींत कां आला जिवाचा कंटाळा तुला?। पचवावं वीष तंवा घ्यावं शिवपदाला"। मोहनदास बोलला आपणाला। 'इथं राहून भागायचं नाहीं मला'। असं म्हणुन गेला रिचमंडला। तिथं त्याचा एक मित्र होता त्याच्याकडं गेला। मित्राला जाऊन बोलला। कीं, "इथं रहायचं कसं शिकव मला। कीं ज्यामुळें सूख होईल जीवाला"। तंवा मित्र त्याला बोलला। "मोहनदास! ऐक सांगतों तुला। मी सांगतों तसं जर करशील-वागशील-तर गोरे लोक झेलतील रे तुला ॥ चाल॥ कर सर्ज फ्लॅनेलचा कोट। विलायती बूट। दारुचा घोट। घेउनी गोड॥ मांसाचा घास घे गडया लाज ती सोड। गोड गोड गोऱ्या मैत्रिणी। गोड साजणी। नखरा करूनी। येतील जेव्हां। नाचावं त्यांना भेटून हौसेनं तेव्हां॥ चाल॥ कर सूटबूटाचा थाट। इंग्रजांचा हो गड्या भाट ॥ चाल॥ व्हायोलिनच्या गती दोन चार येऊं देत तुला॥ मग होशील जंटलमन पुरा। कर जरा पैशाचा चुरा। वडिलांचा पैसा, त्याची काळजी कशाला तुला?॥ धिक्कार हिंदी लोकाला। म्हण मूर्ख आपल्या लोकाला। दे शिव्या आईबापाला। मूठमाती देवा-धर्माला। म्हणें इंग्रज देव आम्हांला। मग होशील जंटलमन खरा। देतील मान मग तुला"। असं बोलणं ऐकलं-पण गांधी गुदमरून गेला। जसं कढतं तेल कानाला। मित्राचे बोल ते तसे मोहनदासाला॥

मग बोलला आपल्या मित्राला। "काय निंदूं आपलं आपणाला?। अन् शिव्या देऊं आईबापाला?। हें जमणार नाहीं मला। बरं व्हायोलिन तेवढं शिकव मला। तेवढंच आधीं जमतंय का पाहतो या वेळा।" एक व्हायोलिन आणलं त्या वेळा। अन् गांधींना पहिला धडा दिला। पण दोन महिने पहिलाच धडा चालला!!। तंवा कंटाळून सोडलं नादाला। मग भगवद्गीतेचा नाद लागला। तंवा मनाला पडला विरंगुळा। असो-**इनरटेंपलमध्यें** गेला शिकायला। तीन वर्षं अभ्यास केला। बॅरिस्टर झाला, आनंद झाला। परत आला हिंदुस्थानला। मानसन्मान मित्रांनीं केला। मोठे मोठे हार गळ्याला। तंवा मोहनदास बोलले लोकाला। "राजकोटला घेऊन चला मला। आईचा ध्यास लागलाय जीवाला। आईला सांगायचंय मला। कीं, शपथेतनं पार मी झालों-आई या वेळा"॥ तंवा थोरले भाऊ बोलले त्याला। कीं, 'मातोश्री गेल्या स्वर्गाला'। तो चटका बसला जीवाला। कोमेजलं चित्त बाळाचं हर्ष मावळला॥ थोडा वेळ सुचेना कांहीं त्याला। काळीज अश्रुरूपानं लागलं वाहायला॥ असो-पुढं विवेक केला॥ पुढचं सारं सांगिन आतां पुढच्या चौकाला॥ २॥

● ●

## चौक ३ रा

बॅरिस्टरचा धंदा करायला चालला आफ्रिकेला। मुहूर्त पाहून बॅरिस्टर हा बोटीवर चढला॥ जलनौकेचा सात दिनांचा प्रवास तो सरला। आठव्या दिवशीच्या संध्याकाळीं प्रकार काय झाला॥ वादळ झालें पाणी उसळलें दरिया खळवळला। उंच उंचशा लाटा देती धडक्या गगनाला॥ जलनौकेला उंच उडविती लाटा त्या काळा। रूप भयानक घेऊन सागर भिववी बोटीला॥ अफाट दर्या त्यांत बोट ती ठिपका जणुं काळा। लाटेसरशी उंच उडवितो भीषण हा चाळा॥

जलनौका ती सावध भारी भीति न मुळिं तिजला। लाटेवरती करुनि चढाई राखी जीवाला ॥ भवसागर हा सुखदुःखाच्या लाटा सळसळती। जीवित नौका कशी हांकावी-जणु दाखवि जगतीं ॥ खेळ पाहुनी जलनौकेचा त्या संध्याकाळीं। अस्त जाहला गगनमणीचा, रजनी मग आली ॥चाल॥ झोंप लागली मोहनदासाला। एक स्वप्न पडलं मग त्याला। काय ऐका सांगतों तुम्हांला। किर्रर झाडी चारी बाजुला। रात्रींचा काळ तो झाला। सोसाट्याचा वारा वेगानं चालला झरझरा ॥ मोहनदास चालला सरसरा। पहाटेचा सुमार झाला। जंवा जंगलाच्या बाहेर पडला। तंवा दोन रस्ते दिसले डोळ्याला। कुठं जायचं समजेना त्याला । एक रस्ता गुलाबांनीं फुलला दोन्ही बाजुला ॥ मखमली गाद्यांनीं रस्ता होता झाकलेला ॥ नभिं चंद्र होतां फुललेला। फळं, पुष्पं, जागोजागेला। थंडगार पाणी घेऊन प्रवाह चालला ॥ तीन मैल सारखा देखावा दिसला डोळ्याला। मग एक पर्वत आला। हिरेमाणकं वरच्या बाजूला। त्यांचा एक तलाव बांधला। पण पाणी होतं विषारी-यमदूत करति पहाऱ्याला ॥ मग दुसऱ्या रस्त्याकडं गेला। तो काट्यांनीं होता भरलेला। खाचखळगे जागोजागेला। नभिं सूर्य होता जळणारा। मधें जर तहान लागली कोणाला। तर पाण्याचा थेंबही दिसणार नाहीं डोळ्याला। एक झाड नाहीं विसाव्याला। वारा मुळीं नाहिं सेवेला। उकाड्यानं जीव गुदमरला। सात मैल रस्ता चालला। मग एक पर्वत दिसला डोळ्याला। स्फटिकांचा तलाव एक होता वरच्या बाजुला ॥ त्यांत राजहंस पक्ष्यांचा मेळा। अमृताचा तलाव तो झाला। मोहनदास कांठावर बसला। इतक्यांत बोटीचा कर्णा वाजला। अन् मोहनदास जागा झाला। **आफ्रिकेचा** किनारा लागला। किनाऱ्यावर पाय ठेवला। तों तें स्वप्न दिसलं डोळ्याला। आफ्रिकेंत प्रकार काय झाला। तें सांगिन पुढच्या चौकाला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

धापा टाकित इंजिन आलं स्टेशनाला। दहा डबे जोडले होते त्याला। मोहनदास फर्स्टक्लासांत जाऊन बसला। इतक्यांत प्रकार काय झाला। तिथं एक गोरा उतारूं आला। तो झटकन् आंत शिरला अन् 'जागा खाली कर' असं गांधींना बोलला। मोहनदास करती विचाराला। तें स्वप्न दिसलं डोळ्याला। गोऱ्यानं ठोसा देऊन काढलं बाहेर त्याला। मोहनदास बोल्ले गार्डाला। 'माझं तिकिट फर्स्टक्लासचं आहे तर खालीं कां काढलंस मला?'। पण गार्ड बोलला। 'गोऱ्याला जागा दिली पाहिजे मला॥ अन् तूं जा पुढच्या गाडीला'। स्वप्नाचा देखावा पुन्हा दिसला डोळ्याला॥ स्टेजकोचच्या गाडींतुन लोटलं बाहेर एकदां त्याला॥ पुढें **जोहान्सबर्गला** गेला। तिथं हॉटेलांत मनाई गांधीला। काळा आदमी गांधी म्हणून अपमान झाला?। खिन्नता आली चित्ताला। **प्रे. क्रूगरच्या** घरासमोर आला। तिथं चालायची बंदी गांधींना केली त्यावेळा॥ तंवा पुन्हा स्वप्नाचा देखावा दिसला डोळ्याला। अमृताच्या तलावावर होता दिवा लावलेला। इन्नर व्हॉईस (Inner Voice) म्हणति हो त्याला। 'आंतला आवाज' म्हणति हो त्याला। त्यानं केली प्रेरणा गांधींना। कीं फूटपाथ सोडूं नको या वेळा। गांधींनीं सत्याग्रह केला। फूटपाथवरनं लागले चालायला। तों इतक्यांत पहारेकरी आला। अन् गांधींना बोलला। 'ए काला आदमी! चल जाव इधरसे'। गांधी बसले त्याच जागेला। तों पहारेवाल्यानं पाय उगारला। लाथेनं मारलं गांधीला। अन् भिरकावुन दिलं दूर त्याला। गांधींनीं डोळा झांकला। तों प्रल्हाद दिसला डोळ्याला। डोळा उघडला। तों दुसरी लाथ फाडकन् बसली डोक्याला। पुन्हा डोळा झाकला। तों ध्रुवबाळ दिसला डोळ्याला। गांधींनीं नमस्कार केला। मग गांधीजी सनद काढायला गेले कोर्टाला॥ पण गोऱ्या बॅरिस्टरांनीं गिल्ला केला कीं 'सनद देऊं नये काळ्या आदमीला!!'। १८९७

सालाला। गांधीजी गेले दर्बानला। पण गोरे लोक उतरूं देईनात त्याला। २४ दिवस बोटीचा कोंडमारा। एके दिवशीं गांधी उतरले दरबानला। तिथनं गेले अलेक्झांड्रा चौकाला। तों गोऱ्यांचा जमाव झाला गोळा। अन् त्यांनीं केला दगडांचा मारा। गांधींच्या अंगातनं चालल्या रक्ताच्या धारा। पण हांसत हांसत चालले त्या वेळा। हिंदी मजुरांच्या केलं सेवेला। म्हणून त्यांचा आवडता झाला। पण हें रुचेना गोऱ्याला। म्हणुन असा त्यांचा छळ केला। पुढं बोअर युद्धाचा वणवा भडकला। त्यानं केली मदत इंग्रजाला। वैऱ्याला मदत करणारा। गांधीविना कोणीहि न झाला। सुखदुःख सारखं जीवाला। शत्रुमित्र सारखेच त्याला। कोण वंदणार नाहीं त्याला ? । लोकांनीं महात्मापदीं स्थापिलं त्याला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

तुरुंगवास तीनदां भोगून। झगडा लढवून, विजयी होऊन। आले गांधीजी भरतभूमीला॥ १९१५ सालाला। जानेवारीच्या नवव्या तारखेला। कीर्तीच्या माळा चढवून आले देशाला ॥ लोकमान्य टिळक तो तिलक आर्यभूमीचा। गांधीजी फुलांचा हार जसा चमेलीचा। हिंदमाता शोभूं लागली। पुत्रांची जोडी ही भली। दिगंतरीं नेलं कीर्तीला। माथा उजळला। जोर पुण्याचा॥ काळाला सांगा कोणाचा येइल कळवळा। त्यानं नेलं लोकमान्याला।तंवा कोण हिंदमातेला धीर देणारा॥ गांधीजी बोलले आईला। "आई, शोक आवर या वेळेला। मी हजर तुझ्या सेवेला"। सर्वस्वाचा होम केला। आश्रम एक काढला साबरमतीला। तिथनं हालतीं सूत्रं गरागरा ॥ चाल ॥ रौलेट ॲक्ट जुलमी लोकाला। जालियनवाला बागेचा इतिहास ठाउक तुम्हाला। त्याचा प्रतिकार करण्याला। असहकारिता आली जन्माला। १९२१ सालाला। हज्जारो लोक तुरुंगाला। विद्यार्थी शाळा कॉलेज सोडुन बाहेर आला। वकिलांनीं सोडलं वकिलीला। प्रोफेसर सोडती नोकरीला। लाखो लोकांनीं आत्मयज्ञ केला। देशभर वणवा पेटला। तंवा १९२२ सालाला।

सरकारनं पकडलं गांधींना । अन् सहा वर्षं धाडलं तुरुंगाला । पण ईश्वरी योगायोग भला । अन् दोन वर्सांतच सोडलं वीराला । पुढं १९३० सालाला । कायदेभंगाचा लढा सुरू केला । 'दांडी मार्च' झाला । देश सारा खडबडून गेला । सरकारचं स्वास्थ्य विलयाला गेलं ते वेळा ॥ लाखो लोक गेले तुरुंगाला । पुन्हां गांधीजींना नेलं येरोड्याला । तिथं स्वप्न पडलं गांधींना एका रात्रीला ॥ तें आतां सांगतों तुम्हाला । गांधीजी करति भजनाला । इतक्यांत प्रकार काय झाला । **काम** येऊन पुढं उभा राहिला । गांधिजींनीं हाकलिलं त्याला । मग दुसरा प्राणी आला । शस्त्रास्त्र त्याच्या हाताला । डोळा लालेलाल होता झाला । **क्रोध** म्हणति लोक त्याला । गांधीजींनीं दुरूनच नमस्कार केला । पुढं **लोभ** आला । मग **मोह-मद्-मत्सर** एका मागून एक हे आले त्याच जागेला ॥ पण कोणालाही थारा नाहीं दिला । मग साधुसंत आले जागेला ॥ चाल ॥ **मिराबाई, सूरदास, नरसीमेहता** आणि **कबीर,** दिसले डोळ्याला ॥ **दधीची** दिसले डोळ्याला । तंवा गांधीजी ताडकन् उठून गेले भेटायला ; मिठी मारली एकामेकाला । काय सांगावा तो सोहळा ॥ चाल ॥ स्वप्न संपलं जागा झाला गांधी महात्मा तो जेव्हां । दारं उघडलीं त्या तुरुंगाचीं बाहेर पडला तो तेव्हां ॥ शक्ति पाशवी थयथय नाचे करिं घेऊन समशेरीला । तोफा बंदुका वायु विषारी बॉंबगोळे बळि घेण्याला ॥ सत्य लोपलें, असत्य भरलें, हिंसामय पथ जगताला । आलि शिसारी या मार्गाची चटका बसला हृदयाला ॥ आत्मबलानें शक्ति पाशवी आत्मसात् हा करण्याला । गांधी महात्मा शीघ्रगतीनें पहा चालला या काळा । **बलहीनांची एक अहिंसा, भ्याडपणा म्हणती त्याला । प्रबलांची ती दुसरि अहिंसा जिंकुनि येते हिंसेला** ॥ परमेशाच्या पदकमलाला '**पांडुरंग**' करि विनतीला । आयुष्याची दोरी भलि दे संत महात्मा गांधीला ॥ ९ ॥

रचना-१९-८-१९४७.

## बार्डोलीचा लढा !

# पोवाडा ———————— : १९ :

साहेबाचं राज्य लइ छान । सुखाची खाण । म्हणती जे कोण । मासला एक सांगतों मी हो त्याला । सांगीन इंग्रजांची लीला । ऐकावं र दादा ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

शेतकरी कर्जबाला झाला । सूत काढण्याचा धंदा मेला । साठ लाख भिकारी तो झाला । पोटभर अन्न न खायाला । शेताचा सारा जबर केला । उद्योगधंदा ठार झाला । खोऱ्यानं पैसा दूर नेला । जाति जाति-मंदि तंटा केला । हिंदु-मुसलमान वैरी केला । वरवर देश सुखी दिसला । आतां पर सारा किडून गेला ॥ ऐकावं र ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

गुजराथ प्रान्तांत । सुरत जिल्ह्यांत । जंवा बारडोली तालुक्याला । साहेबानं जुलुम लई हो केला । तंवा शेतकरी कसा लढला । सांगतों मी र दादा ॥ आधींच जबर होता शेतसारा । शेतकरी होता कष्टलेला । भाकरी दोन वेळ न पोटाला । दोन भाकऱ्याहि न वेळेला । कपडा धड नव्हता हो अंगाला । एकोणीसशें अठ्ठावीस सालाला । शेताचा सारा जास्त केला । वीस रुपयांचा तीस केला । तीसाचा गेला चाळीसाला । ऐंशीचा गेला शंभराला । विचार रयतेचा नाहीं घेतला ।

रयतेचा वाली कोण बोला ? । राजानंच मोठा जुलूम केला । कुंपणानंच खाल्लं हो शेताला । ज्यानं सुख द्यावं हो रयतेला । तोच रयतेचा वैरी झाला । शेतकरी कर्जबाला झाला । तशामंदि सारा जब्बर केला । दूध तुम्हीं पाजलं हो सापाला । वीष पर त्याचं करून आला । पुन्हां चावायला हो रयतेला । हराम लई दादा० ॥२ ॥

● ●

## चौक ३ रा

हज्जारों मैलावरनं आला । साहेब तुमच्या हो देशाला । शंभर वर्सं झालीं त्याला । तंवापासून तोफा डागून दरडावून लुटलं हो गरिबाला । दरवडेखोर मोठा झाला । डोक्यावर तुमच्या नाचण्याला । त्यानं मोठा बंदोबस्त केला । हुकूम मनाईचा हत्याराला । कलेक्टर ठेवला हो जिल्ह्याला । दोन हजारांचा मलिदा त्याला । जागजागीं ठेवलं पोलिसाला । फौज गरिबाला चिरडण्याला ठेवली रं दादा ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

रयतेनं तंवा अर्ज केला । " मायबाप तुम्हीं आमचं झाला । शेताचा सारा जब्बर केला । एकदां दिवसाला न खायाला । उपासमार झाली कुटुंबाला । रुपये पांच पंचवीस वर्षाला । पांच माणसांच्या कुटुंबाला । करावं कसं तितक्यामंदिं बोला । सावकार दारामंदिं आला । पाऊस पडेना हो वेळेला । दुष्काळानं जबडा उघडा केला । पटकी प्लेगानं कहर केला । दुसरा कांहीं धंदा दिसेना मजला । देऊं कसा सांगा जब्बर सारा । घेऊं नका चिमटा हो पोटाला । आपण आमचे राजे मोठे झाला । सांगावं दुःख हो कोणाला ? । सांगावं दुःख हो तुम्हांला । सारा लई डोइ जड झाला । नेमावं पंच चौकशीला ।

अन् विचार करुं द्यां हो, एकदां त्याला" । म्हणून रयतेनं अर्ज केला । एकदां नाहीं पन्नासदा केला । ऐकावं रे दादा ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

गोऱ्या साहेबानं जवाब लिवला । "रयतांनो, खोटा अर्ज केला । हज्जारों मैलावरनं आला । साहेब तुमच्या कल्याणाला । शंभर वर्षं झालीं त्याला । तंवापासून कष्ट सोसून सुखी केलं गोर-गरीबाला । अन् आतां गरीब कसलं. झाला ?। पैसा तुम्हीं देतां मोटारीला । अजून जगलेले दिसतां मजला । तुमच्या हितासाठीं सारा चढला । द्यावा मुकाट्यानं आज त्याला । नाहींतर डागीन तोफेला । मीच येईन सारावसुलीला मस्त तुम्हीं झाला" ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

दुःख लइ झालं हो रयतेला । उलट्या काळजाचा राजा झाला । पाण्यानं डोळा भरुन गेला । **वल्लभभाई** तंवा बोलले त्याला । "धडधडीत अन्याय हा केला । देऊं नका पैही साहेबाला । साहेब लइ मस्तीखोर झाला । अशा पेंचांतुन सुटण्याला । एकच उपाय दिसतो मजला । करावा सत्याग्रह या वेळा । असाल जर तयार हो बोला । येतों मी तुमच्या तालुक्याला । लोक तंवा बोलला त्यांना सारा । "तय्यार आम्हीं या कामाला । समदं लोक चिडलेत या वेळा । हुकुम काय सांगा" ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

सरदार गेले बार्डोलीला । लोक त्यांनीं सगळा गोळा केला । बोलला मग समद्या लोकाला । "मस्ती लइ आली साहेबाला । गर्वानं साहेब

धुंद झाला। बुटानं ठेचतो गरीबाला। पैशावर तुमच्या लठ्ठ झाला। भाकरीचा तुकडा ना तुम्हांला। गव्हाची पोळी रोज त्याला। बूट छान-दार साहेबाला। कपडा धड तुमच्या न अंगाला। लेकरीचा कोट साहेबाला। चालणं अनवाणी शेतकऱ्याला। मोटारगाडी साहेबाला। मोडकी झोंपडी शेतकऱ्याला। मोठा बंगला साहेबाला। गुलाम म्हणतो तो तुम्हांला। पिळूनशान् काढलं शेतकऱ्याला। अन् आतां सारा जबर केला। देऊं नका पैही साहेबाला। घेऊं द्या वसूल करुन त्याला। करा सत्याग्रह या वेळा। हाल लइ होतील या वेळा। साहेब येईल मारण्याला। बसेल चाबकाचा फटकारा। फुटतील रक्ताच्या हो धारा। निघेल घरदार लिलावाला। धाक लइ घालेल त्या वेळा। त्यानं किती जरी जुलूम केला। तरी न सोडावं शांततेला। तयार जर असाल या गोष्टीला। होईन मी म्होरक्या चळवळीला"। संमदे लोक बोलले तंवा त्याला। "यावं गरीबांच्या मदतीला। आतां जुलुमाचा कहर झाला। ऐकूं आम्हीं तुमच्या सांगण्याला। मरुं, पर धरुं शांततेला। ऐकावं रं दादा ॥ ७ ॥

● ●

## चौक ८ वा

फेब्रुवारी पांच तारखेला। सारा भरण्याचा दिवस आला। कोणी पर सारा नाहीं भरला। सत्त्याऐंशीं हज्जार लोक खातेदार। समदा तंवा एकरूप झाला। धास्ती पडली हो साहेबाला। उपाय जबरीचा सुरू केला। पाटील तलाठ्यांनीं संप केला। सनदी शिपायांनीं ठराव केला। कीं कामावर जायचं नाहीं या वेळा। नोटीस आली शेतकऱ्याला। "दोन दिवसांची मुदत तुजला। मुकाट्यानं द्यावा शेतसारा। नाहींतर जप्ती येईल बोला"। शेतकऱ्यानं धरलं नोटिशीला। अन् फाडून तिचा चेंदामेंदा केला। कंसावाणी दुष्ट राजा झाला। जप्तीचा हुकूम त्यानं केला। हराम लइ दादा ॥ ८ ॥

● ●

## चौक ९ वा

जप्ती न्यावी दिवसाच्या वेळेला । राच्चं करूं नये हो जप्तीला । कुलुपं जरी असतील दाराला । तर हुकूम नाहीं कुलपं तोडण्याला । शेतकरी जेव्हां काढील कुलपाला । तंवाच करावं हो जप्तीला । कच्चा माल करावा जप्त बोला । बैलाची जोडी शेतकऱ्याला । शेतकीचं सामान ठेवावं त्याला । सैपाकाचीं भांडीं ठेवावीं त्याला । काढावं मग उरल्या सामानाला । कायदा वसुलीचा असा झाला ॥ एकावं र दादा ॥९॥

• •

## चौक १० वा

सरदार बोलले शेतकऱ्याला । " दिवसभर लावा कुलपं दाराला । नाहींतर येईल जप्तीवाला । राच्चं मग खुशाल काढा त्याला " ॥ शेतकऱ्यानं कुलपं लावलीं घरला ॥ हुशार लई दादा ॥ हुकूम तंवा जप्तीचा हो आला । हुकूम आला पाटील तलाठ्याला । कीं " जर नाहीं दिला शेतसारा । तर करा जप्त सामानाला । पाटील तलाठ्यांनीं लिवलं साहेबाला । " नका सांगूं कामगिरी आम्हांला " । सनदी शिपायांनीं संप केला । घरात्नं हो माल काढायाला । माणूस मिळेना हो गांवाला । माणूस कुणि मिळेना साहेबाला । पठाण मुंबईत्नं म्हणून नेला । जप्तीचं काम दिलं हो त्याला । पठाण किति सुदा माणूस झाला । आहे ठाव साऱ्या दुनियेला । गांवोगांव जप्तीला तो गेला । कुलपं पण होतीं दरवाजाला । हुकूम नाहीं कुलपं तोडण्याला । जप्तीवाला साहेब लाल झाला । तंवा साहेबानं जुलूम केला । हुकूम दिला त्यानं पठाणाला । " जाऊनशान करावं जप्तीला " । पठाण मग गांवोगांवीं गेला । जुलूम त्यांनीं लइ हो तंवा केला । लाठीनं मारलं कितीकांला । अब्रुची चाड नाहीं त्याला । बायकापुढं नग्न उभा झाला । गाडी बैल सारा जप्त

केला । नेलं म्हशींना कोंडवाड्याला । अन् अन्न-पाण्यावीण डांबलं त्यांना । बैल तडफडून कितिक मेला । हुकूम नसतांना । रात्र असतांना । तोडून कुलपांना । कितिकांच्या घरामंदि शिरला । पठाणांनीं हाहाःकार केला । दाद पण घेणार कोण बोला ? । चोराचोरांचा खेळ झाला । पठाण साहेबाला प्यारा झाला । लोकांचा वैरी जो जो झाला । तो तो आवडला साहेबाला । ऐकावं रं दादा ॥ १० ॥

● ●

## चौक ११ वा

सरदार गांवोगांवीं गेला । लोक त्यानं सम्दा गोळा केला । बोलला मग सरदार लोकांला । "रयतांनो, ऐका माझ्या बोला । पोटभर अन्न नाहीं तुम्हांला । तें मिळेस्तों देऊं नका शेतसारा सरकारला । रयतांनो, तुम्ही राजा केला । राजा नोकर तुमचा झाला । तुम्ही त्याला देता शेतसारा । देता तो तुमच्या कल्याणाला । पोलीस, फौजदार, मामलतदार आणि कलेक्टर हा सारा नोकर तुमचा झाला । अन् तोच चिरडतो तुम्हांला । नोकर लई डोईजड झाला । करा त्याच्या बंद पगाराला । त्याच्यावर बहिष्कार घाला । शिरूं देऊं नका असल्या घातक्याला । येऊं देऊं नका घरीं त्याला । जहरी सापाचं पिल्लू झाला । चावा तो घेतोय नरडीला ॥ ११ ॥

● ●

## चौक १२ वा

"शेतकऱ्यांनो, ऐका माझ्या बोला । तुम्ही शेताचे धनी झाला । शेतामंदि तुम्हीं घाम गाळला । तुम्हीच पिकविता हो धान्याला । देता तुम्ही धान्य साहेबाला । देता तुम्ही धान्य सावकाराला । जेवढं धान्य येईल वर्साला । तेवढं सारं देतां दुसऱ्याला । अन् तुम्ही कंगालच राहिला । कपडा धड ना तुमच्या अंगाला । मूठभर धान्य ना पोटाला । कर्जाखालीं

मरुन तुम्ही गेला। नोकरांनीं तुमचा छळ केला । धरती गाडी बैलही बेठीला । ज्यानं त्यानं गांजलं हो तुम्हांला । असल्या जुलुमातनं सुटायला। सत्याग्रह तुम्हीं सुरुं केला। सरकारनं लइ हो जुलुम केला। पठाण त्यानं धाडला वसुलीला । त्यांनीं फार अत्याचार केला। पण तुम्हीं धरावं शांततेला। तुमच्या परीक्षेचा काळ आला । देव तुमचा पाठीराखा झाला। शेवटीं यश येईल तुम्हांला। लढा निकराचा सुरू झाला। साहेब आणील गोऱ्या लष्कराला। सुटेल तोफेचा लाल गोळा। आग लागेल घरादाराला। बसेल चाबकाचा फटकारा। मांस मग लोंबेल अंगाला। निघेल घरदार लिलांवाला। अत्याचार होतील त्यावेळा। साहेब जंवा डागेल तोफेला। तंवा छातीवर गोळा तुम्ही झेला। छाती मग दाखवा साहेबाला। अन् मग तुम्ही सांगा त्याला। "साहेबा! आतां तूं सोड बंदुकीला । छातीवर झेलिन गोळीला । अन् हांसत कवटाळीन मरणाला। तोफेचा धाक नको मजला। जुलुमाचा कळस तूंच केलास। लुटून नेलंस आमच्या घरदाराला। शेतकरी आतां जागा झाला। पैही देणार नाहीं तुला"। ऐकावं रं दादा ॥ १२ ॥

● ●

## चौक १३ वा

चढती पर कमान जुलमाला। गोरी फौज नेली बारडोलीला। गोळ्या मग तोफाबंदुकीला। आणीबाणीचा काळ आला। कैद केलं रविशंकराला। कैद केलं कैक पुढाऱ्यांला। पण शेतकरी थोडाही न डरला। छळ रयतेचा जबर केला। पण कोण पैही देईना त्याला। जरि साऱ्या योजलं उपायाला। तरी कांहीं उपयोग ना झाला। असं जंवा पडलं हो नजरेला। तंवा साहेबाचा पारा खालीं आला। अन् झाला तय्यार समेटाला। पंच मग नेमले चौकशीला। पुढं पंचांनीं निकाल दिला। त्यांत रयतेचा विजय झाला ॥ १३ ॥

रचना-एप्रिल १९२९.

# पंडित जवाहरलाल

# यांचा

# पोवाडा ——————— : २० :

हा हिंदभूमिचा लाल । **जवाहरलाल** । तरुणांचा खरा आदर्श वंद्य तेजाळ । स्वार्थाचा करुनिया होम पेटवी जाळ । तरुणांचं रक्त सळसळे । भीति दूर पळे । शत्रु थरथरवि जणुं काय काळ । **पांडुरंग** शाहीर त्याचं कवन गाणार ॥ जी ॥

● ●

## चौक १ ला

१९२९ सालाला । डिसेंबरच्या २७ तारखेला । राष्ट्रीय सभा लाहोरला । जवाहरलाल अध्यक्ष झाले लढा देण्याला ॥ संपूर्ण स्वातंत्र्य मंत्र दिला सर्वांला ॥ कायद्यांचा भंग करण्याचा आदेश दिला ॥ एप्रिलच्या १० व्या तारखेला । जवाहरलाल नेहरूनीं कायदेभंग सुरू केला ॥ मीठ तयार केलं प्रयागाला । तंवा कैद केलं वीराला । हा देशाचा अपमान झाला । दांडी यात्रा केली महात्म्यानं कायदा मोडण्याला ॥ ॥ चाल ॥ फोफावली फार चळवळ । तिनं व्यापलं गांवोगांव सारं ॥जी॥ मग समेट करी सरकार । विजयानं शोभे जवाहर ॥ जी ॥ अध्यक्षपदाची माळ शोभे वीराला ॥ धाडसी राजकारणी झाला बोलबाला ॥ त्यागांत हार जाईना वीर कोणाला ॥ त्यानं मनं जिंकून लोक आपलासा केला ॥ जी ॥ भारताचं भाग्य उज्ज्वल । म्हणून प्रेमळ । जवाहरलाल ।

लाभले आज पुढारी खास। **महात्मा गांधी** सद्गुरु ज्यास। वंदन करितों आज मी त्यास ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

युद्धाचा वणवा पेटला। भारतांत दडपशाहीनं नंगानाच केला। महात्म्यानं राज्यकर्त्यांना इषारा दिला। 'हिंदुस्थान सोडून चला'। तंवा सरकारनं पकडलं सर्वांला। जवाहरलाल गेले तुरुंगाला। महात्माजी गेले तुरुंगाला। असा कांहीं काळ मग गेला। १९४२ वर्ष गाजलं त्या वेळा। सुभाषचंद्र करती चढाईला। असंतोष माजुन गेला। तंवा हिंदुस्थानचं समाधान करण्याला। **वेव्हेल साहेब** आले भारताला ॥ अन् बंधमुक्त केलं सर्वांला। हंगामी सरकार स्थापलं राज्य करण्याला ॥ उपाध्यक्षपद मानाचं जवाहराला। सरदार पटेल मदतीला। राजेंद्र अन्न देण्याला। असा राष्ट्राचा संसार मांडला। स्वातंत्र्यसूर्य उदयाला। आतां येणार शंका ना मला। जवाहर धुरा वाहण्याला। एशियाटिक परिषद त्यांनीं भरविली दिल्लीला। परिषद झाली थाटानं पुराणा किल्ल्याला। साऱ्या राष्ट्रांनीं धन्यवाद दिले जवाहरलालाला ॥ अध्यक्षपद समितीचं त्यांनीं दिलं त्याला ॥ असा भारतमातेचा पुत्र वंद्य जगताला ॥ जी ॥ आणीबाणीचा काळ राष्ट्राला। अशा वेळीं धुरा वाहण्याला। जवाहरलाल लाभले आपणाला। अभिमान वाटतो हा मला। सुखशांति साऱ्या दुनियेला। लाभेल शंका नाहीं मला। **पांडुरंग** शाहीर आला कवन करण्याला ॥ २ ॥

रचना- १-७-४७.

## स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर

## यांचा

# पोवाडा ——————— : २१ :

ध्यास लागला स्वातंत्र्याचा बाळपणापासुनि ज्याला । त्या वीराचें यश गाण्याला **पांडुरंग** हा कवि आला ॥ ध्रु० ॥

● ●

### प्रास्ताविक

भारतभूच्या उदरीं आले हिरे किति तरी जन्माला । अखिल जगाला मोहविणारा कोहिनूर एकच झाला ॥ किती धनुर्धर झाले गेले यशोदुंदुभी गाजविला । तोड नसे परि धनंजयाला अर्जुन तो अर्जुन झाला ॥ कृत्रिम मोती वरुन दिखाऊ कितिक पातले उदयाला । क्षणभंगुर तें तेज तयांचें, अस्सल मोती हा झाला ॥ काव्यकल्पना किती कराव्या अंत नसे मत्प्रतिभेला । तुफान वारा उठवि तरंगा; परिमल नेई भ्रमराला ॥ भाग्य आपुलें म्हणुनी आला असा वीर नर जन्माला । भिडवा खांदा, लढवा युद्धा, तुडवा भेकडवृत्तीला ॥ चरित्र ऐशा नरवीराचें आज सांगतों तुम्हांला । माणुस आम्ही, नव्हेत मेंढ्या, चला दाखवा जगताला ॥

● ●

### चौक १ ला

स्वातंत्र्य जरी परक्यांनीं नेलें लुटून । जरि पारतंत्र्याच्या बेड्या बसल्या रुतून । तरि नव्हत्या ठिणग्या विजलेल्या पार संपूर्ण । तरुणांच्या

जळत्या हृदयांत । जाळ धडाडून । चालला भडकून ॥ जी ॥ पारतंत्र्य गोड कोणाला ? । मान ज्याला सोडून गेला अशा पुरुषाला । बेडूक दंग चिखलांत, परी हंसाला । तिटकारा तसल्या जगण्याचा नित्य जीवाला ! ॥ विलायती राज्य जरि छान वाटलं कैकाला ॥ तरी कैकांचा जीव गुदमरुन कासाविस झाला । जशि ताटातूट आईची होई बाळाला । पोपट पिंजऱ्याच्या आंत । फळं गोड खात । बोला चैनींत काय तो झाला ? ॥ अधिकारी गोरे विजयाच्या सदा धुंदींत । नेटिवांना गुलाम समजून छळती मस्तींत । देवांचे अवतार गोरे ताराया आले हिंदभूमींत । असं सांगती करती अपमान सदा ऐटींत ॥ चाल ॥ आधींच असा तिटकारा आला । अन् त्यांत अठराशें सत्याण्णव साला । प्लेगानं कहर तो केला । घरोघरीं मृत्युचा घाला । झडपून लहानथोर नेला ! । किति आयांनीं आक्रोश केला । किति कर्तापुरुष ते वेळा । प्लेगानं पटापट नेला । किती बायका रडति धयधया आकांत केला ॥ किति पोरं हिंडती वणवणा कुणि नाहिं थारा । धडधडति चिता; चितेनं लोक जेर झाला ॥ तंवा प्लेगाची सांथ थांबवायला । सरकारनं कायदा केला कीं ज्या घरीं प्लेगानं माणुस लागला । तें घर सोडणें सर्वांला । तिथंच ठेवून आजारी माणसाला । असा विचित्र हुकूम केला । आतां घरीं ठेवुन आजारी माणसाला । घराबाहेर जाईल कोण बोला ? । लोक सारा चिडून गेला । मग घरीं शिपाई लोक गेला । अन् लागला फिनेलनं घर धुवायला । आजाऱ्याकडं बघतो कोण बोला ? । बिचारा तळमळुन मेला । मायेचं माणूसहि नाहीं जवळ अंतःकाळाला । इकडं घरं धुतांना चीजवस्त फेंकती रस्त्याला । किति माल चोरुन नेला । असा त्यांनीं सत्यानास केला ! । माणसापरी माणुस गेला अन् घराचा सत्यानास झाला ! ॥ प्लेग बरा पण शिपाई नको असं झालं सर्वांला । तंवा वाटलं कैकाला कीं गोरा राज्य खाऊन बसला । अन् लागला सतावायला अन् हिंदी

लोकांना मारायला । तंवा तरुणांचा पारा भडकला । तशांत राणीच्या उत्सवाची सक्ति लोकांला !! । तंवा कांहीं जणांनीं कट केला । अन् ठार केलं रॅण्डसाहिबाला ।।चाल।। पकडलं कैक लोकांला । **लोकमान्य टिळक** तुरुंगाला ।। जी ।। तंवा छळलं कैक तरुणांला । कुणी खून केला शोधायला ।। द्रविडानं दिलं खबरेला । **चाफेकर** चढले फांसाला ।। भाऊ भाऊ भिडले फांसाला । हातीं घेतलं भगवद्गीतेला ! ।। जयघोष गीतेचा केला । फांसानं चाफेकर नेला ! ।। १ ।।

● ●

## चौक २ रा

वाचुनि वार्ता खिन्न जाहला बाल विनायक त्या दिवशीं । दीर्घ उसासा टाकून बसला जाउनिया देवीपाशीं ।। जी ।। मध्यरात्रिची वेळ जाहली झोंप लागली सर्वांला । हात जोडुनी दीन होउनी बाळ बोलला देवीला ।। जी ।। " शूरवीर हे कितीतरी गे कवटाळुनि त्या मृत्यूला । मरतां मरतां अमर जाहले, वंद्य जाहले जगताला ।। जी ।। कीटक मरती, पक्षी मरती, पशुही पावत मरणाला । भेकड मरती, फितूर मरती, मरण चुकेना कोणाला ।। जी ।। कितिक जन्मले मरुनी गेले, दया नसे मुळिं काळाला । नरवीरांचें मरण मला दे विनंति ही तव चरणाला ।। जी ।। वीज तळपते मरुनी जाते परी दिपविते सर्वांला । दे चपलेचें मरण मला गे ! आई ! मागणं हें तुजला ।। जी ।। चाल ।। दाहराला लाभलं मरण । तें मरण देवि दे मजला ।। जें मरण गोविंदसिंहाला । जें दिलंस बंदा-वीराला ।। लाभलं वीर तान्याला । संभाजी वीर राजाला ।। जें दिलंस वीर भाऊला । जें विश्वासराव बाळाला ।। जनकोजी शिंदे वीराला । जें दिलंस लक्ष्मीबाईला ।। जें वीर तात्याटोपेला । जें वासुदेव फडक्याला ।। जें दिलंस चाफेकराला । तें मरण देवि ! दे मजला ।। चाल ।। तळमळ लागो जीवाला । हा देशमुक्त करण्याला । दे धैर्य शौर्य ग मला "।।चाल।।

डोळे मिटुनी, हात जोडुनी **बाळ विनायक** तो बसला । भक्तिभावानं नम्र होउनी कौल मागतों दुर्गेला ॥ जी ॥ चाल ॥ करिं धरून शंख चक्राला । जणुं बोलली देवि बाळाला । " होईल सफल कामना तुझी रे बाळा । धर धैर्य कर यत्नाला " । मग बाळ उठुनिया गेला । पर चैन नाहीं जीवाला ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

स्वातंत्र्याचें बीज रोंवण्या मित्रमेळा तो सुरू केला । **अभिनवभारत** जन्मा आलें, प्रसार जगतावरि झाला ॥ जागोजागीं संस्था काढुन तरुणांचें जाळें विणलें । जिवंतपणिंही मस्तक छाटुन ज्या वीरांनीं करिं धरिलें ॥ स्वातंत्र्याची चळवळ केली देश सर्व जागा झाला । सरकारासहि भीती पडली सावरकर झाला गोळा ! ॥ कामदेवाच्या छत्राखालीं नित्य रमावें हो ज्यांनीं । कामदेवाला पार जाळलें कितीतरी त्या तरुणांनीं ॥ तिघे बंधुही सिद्ध जाहले स्वातंत्र्यास्तव मरण्याला । धन्य धन्य तें सावरकर-कुळ भूषण झालें जगताला ॥ त्रिनेत्र जणुं हे शिवदेवाचे; कीं भीमार्जुन यदुवीर । मुरारबाजी, बाजीप्रभुही, तानाजी हे त्रय वीर ॥ चाल ॥ असो आतां ऐका गोष्टीला । विनायक बी. ए. झाला । तंवा पुढं बॅरिस्टर व्हायला । विनायक चालला विलायतेला । तंवा मुंबईच्या बंदरावर सारा । सखासोयरा जमला । अन् बोलला—" विनायक, तुला निरोप द्यायला । हा तुझा मित्रगण आला । मनाला छंद लावलास अन् चाललास होय विलायतेला ! । बरं ! बॅरिस्टर होऊन परत ये । मोठा गाउन घालुन ये बरं त्या वेळा । आम्ही येऊं पुन्हां स्वागताला । मोठी माळ गळ्यांत घालायला । आज गरीब आहेस तूं । दुसऱ्यांच्या मदतीनं चाललास विलायतेला । पण उद्यां बॅरिस्टर झाल्यावर काय तोटा पैशाला ? । सरस्वती वश आहे तुला । मग लक्ष्मीही वश होईल तुला । मात्र

विसरूं नकोस बरं आम्हांला"। तंवा विनायक बोलला। "गड्यानो, तुमच्या एकेक शब्दागणीक कसा चटका बसतोय जीवाला। भविष्यकाळ ठाव कोणाला?"। मग बोलला प्रिय पत्नीला। "थोड्या सोसा वियोग-दुःखाला। पुढं होईल संसार भला"। डोळ्यातनं पाणी घळघळा। शिट मारली बोटीनं चालली घेऊन त्याला॥ शरीरानं चालला विलायतेला। पण घुटमळलं मन सोडिना मायभूमीला!॥ तंवा कोण धीर देणारा। विनायक खिन्न झाला। तंवा समुद्र बोलला बाळाला। "बाळा! भिऊं नको आज या वेळा। अगदीं विलायतेपर्यंत मी सोयरा तुला। परत आणीन मायभूमिला"। असं म्हणून समुद्र लागला हंसायला। आणि वर वर यायला लागला बाळाला भेटायला। जंवा समुद्रानं धीर दिला त्याला। तंवा विनायक शांत झाला। अन् बोलला समुद्राला। "सागरा! सोयरा तूं मला। तूंच आधार माझ्या जीवाला। आतां चिंता कसलि नाहीं मला"। तंवा सागर बोलला। "जर प्रसंग जीवावर आला। तर नेईन अंगावरनं तुला। पण माझी भीति धरूं नको बाळा, वचन हें तुला"॥ बोट गेली विलायतेला। तिथं श्यामजी कृष्णवर्मा आले न्यायला भारतभुवनांत (इंडिया हाउस) नेलं मग त्याला। तिथं तरुणांचा मेळावा केला। क्रान्तीचा मंत्र सर्वांला। बॉंबची विद्या शिकायला। तीन जण गेले पॅरिसला। तिथ्नं बॉंबचीं पुस्तकं धाडलीं हिंदुस्थानाला॥ इकडं असा होता प्रकार झाला। कीं बंगालच्या फाळणीनं देश चिडूनिया गेला॥ तंवा बॉंबगोळे लागले पडायला। त्यांत हपीसर लागले मरायला। पकडलं कैक लोकांला। बाबू बिपिनचन्द्रपालांना धाडलं तुरुंगाला॥ खुदीराम बोस तुरुंगाला। शिवरामपंत गेले तुरुंगाला। टिळकांना नेलं तुरुंगाला। फांशीच्या शिक्षा धडाधड दिल्या कितिकांला॥ ३॥

• •

## चौक ४ था

एकोणीसशें नवव्या सालाला। प्रकार काय झाला। गणेशपंताला। (बाबारावांना)। जन्मठेप शिक्षा झाली अनिवार। प्रसिद्धिलं चोपडं (रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें?) हाच आधार!। देशभर मोठा झाला हाहाकार!॥ विनायकाला देशिं येण्याला बंदी मग केली। घरीं गणेशपंताची पत्नी एकटी राहिलेली। सांभाळ तिचा करण्याला नाहीं कुणी वाली। कुणी थारा देइना तिला। सरकारची भीति सर्वांला। हाल हाल झाले जीवाला। स्मशानांतलं देऊळ राहण्याला। धगधगल्या चिता प्रेतांच्या, दिवे बाईला। कोल्हे कुत्रीं घुबडं रात्रीची सोबत तिला॥ हाल हाल झाले जीवाला। जीव नको झाला बाईला। दारोदारीं भिक्षा मागून काळ कंठला!॥ एके दिवशीं काळानं नेलं झडपून तिला!॥ वीराचं मरण असं आलं वीरपत्नीला!॥ असो इकडं प्रकार काय झाला। तरुणांचा सारखा छळ झाला। किती जण फांसावर दिला। कितिकांना हद्दपार केला। तंवा तरुणांचा जीव भडकला। इंग्लंडांत प्रकार काय झाला। सर कर्झन वायली अन् लालकाकाला। भर रस्त्यांत ठार केला। मदनलाल डिंगऱ्यानं बघतां बघतां खून केला। सारा गोरा चवताळुन गेला। सरकारानं पकडलं डिंगऱ्याला। तंवा कांहीं हिंदी लोकांनीं ठराव केला। कीं डिंगरा पागल झाला। जो तो लागला निषेध करायला। तंवा विनायक पुढं झाला। अन् बोलला "हा जो तुम्ही ठराव केला। माझा विरोध आहे त्याला"। तंवा सारा लोक चिडला अन् बोलला कीं "हाणा, लाथा बुक्क्या वेड्याला। अन् द्या काढून बाहेर त्याला"। इतक्यांत एका गोऱ्यानं त्याच्या डोळ्यावर ठोसा दिला। त्या सरशी डोळा फुटला। अन् रक्त लागलं बळबळा वाहायला। इतक्यांत एक ठोसा बसला गोऱ्याला। त्यासरशी जमिनीवर पडला। तंवा लोक सारा पळून हो गेला!॥ चाल॥ मदनदाल डिंगऱ्याला फांशीची शिक्षा

जाहली मग घोर । फांसावरती चढतां चढतां काय बोलला तो वीर ।
॥ जी ॥ स्वातंत्र्यास्तव तडफडणाऱ्या तरुणांचा जो छळ झाला । छळ-कर्माचा सूड म्हणोनी मी दोघांचा वध केला ॥ या जन्माचें सार्थक झालें वीरमरण आलें मजला । मायभूमिला मुक्त कराया घाल देवा ! मज जन्माला ॥ ४ ॥

• •

## चौक ५ वा

एकदां काय प्रकार झाला । किर्लोस्कर मंडळी आली नाशकाला । शारदा खेळ लागला । खेळाला जॅक्सन साहेब आला । गंधर्वाचें काम बघायला । लोक होता चिक्कार जमला । दहा वाजतां खेळ सुरु झाला । गंधर्व लागले गायला । तंवा साहेब गुंगू लागला । गाण्यानं भारलं सर्वांला । टाळ्यांचा कडकडाट चालला । इतक्यांत प्रकार काय झाला । पिस्तुलाचा बार झाला । तंवा लोक लागला सैरावैरा धावायला । जॅक्सन साहेब खुर्चीवरनं पडला । तंवा शिपायांनीं घेरलं सर्वांला । अन् पकडलं कैक तरुणांला । चाबकांनीं फोडलं सर्वांला । कितिकांना विंचू डसवला । मिरच्यांची धुरी कितिकांला । कितिकांच्या तोंडामधिं केलं लघुशंकेला । सरकारचा धाक सर्वांला । कोणी थारा देईना तरुणाला । शाळेतनं मज्जाव झाला । कोर्टांत नेलं आरोपीला । न्यायाधिशानं निकाल दिला । कान्हेरे कर्वे देशपांडे गेले फांसाला । देश सारा हादरुन गेला । सरकारला संशय आला । कीं हा एक मोठा कट झाला । अन् **विनायक सावरकर** याचं मूळ झाला । म्हणून त्याला पकडायला । वारंट पाठवलं इंग्लंडला । पुढचा प्रकार सांगीन आतां पुढच्या चौकाला ॥ ५ ॥

• •

## चौक ६ वा

आलं धरणं तंवा विनायक होता पॅरिस शहरीं गेलेला । शामजी वर्मा आणि मॅडम कामा, हरदयाळ बोले त्याला ॥ चाल ॥ ‘ विनायक !

सेनापती झालास । इथंच राहून हालीव सूत्राला । जर जाशील इंग्लंडाला । तर पकडून नेतिल रे तुला । म्हणून जाऊं नको विचार कर जरा । जर सेनापतीच गेला तर जोर कसा येईल चळवळीला ? "। तंवा विनायक बोलला, " काय म्हणतां ? इथंच राहावं या वेळा ! । मित्रांनीं आत्मयज्ञ केला । थोरला भाऊ गेला जन्मठेपेला । अन् धाकटाही त्याच रस्त्याला । सवंगड्यांनीं छळ सोसला । अन् कवटाळलं त्यांनीं मृत्यूला ॥ चाल ॥ लोटुनि त्यांना-मित्रसख्यांना-घोर मृत्युच्या जबड्यांत । राहुं करुं मी सांगा इकडे ? योग्य वाटतो कां बेत ? ॥ पुढेंच व्हावें मरुनी जावें, घ्यावें वीराच्या मरणा । व्राण सतीचें करीं घेतलें, मरणाची भीती कवणा ? " ॥ चाल ॥ असं म्हणून विनायक वीर बोटीवर, चढला ॥ मृत्युच्या घोर जबड्यांत धावूं लागला ॥ तंवा समुद्राला बोलला " सागरा ! प्राण तळमळला ! । तूं विश्वासघात रे केला । ' सृष्टीची मजा पाहायला । चल नेतों ' बोललास रे मला ! । पण ठेव लक्ष्यांत या बोला । बोलवीन अगस्त्यमुनीला । त्यांच्याकडून हटकीन तुला ! " । इंग्लंडचा किनारा लागला । बोटीतनं खालीं उतरला । अन् गाडीतनं चालला लंडनला । गाडी आली स्टेशनाला अन् विनायक खालती उतरला । तों ' हियर हियर ' आवाज झाला । शिपायांनीं घेरलं त्याला । अन् नेलं ब्रिस्टनच्या तुरुंगाला । तिथनं धाडायचं हिंदुस्थानाला । ती वार्ता आतां सांगीन पुढच्या चौकाला ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

विलायतची बोट मग चालली हिंदुस्थानाला । सभोंवारीं गोरे सोजीर । हातांत नंगी तलवार । मध्यें होते सावरकर । हातींपायीं बेड्या अवजड । काढण्यांनीं बांधलं शरीर । अशा बंदोबस्तानं चालले घेऊन त्याला ॥जी॥ तंवा विनायकानं विचार केला । ' कीं साहेबांची घमेंड जिरवायला ।

कांहीं तरी केलं पाहिजे मला । जें गाजेल चारी खंडाच्या काना-कोपऱ्याला । अन् दिसेल सर्वांला कीं हिंदुस्थान शेळ्यामेंढ्यांचा देश नाहीं झाला ॥ तिथं सुद्धां देशासाठीं मरायला । अन् मरतांना मृत्युला दटावयाला । हज्जारों आलेत जन्माला '। असा विचार मनामधिं केला। पण बोटीवरती उपाय काय बोला ? । चौफेर शिपायांचा पहारा । डोळ्यांत सारखा तेल घालुन राहिला । इतक्यांत बोट लागली फ्रान्सच्या किनाऱ्याला ! । बोट लागली मार्सेलिस बंदराला । तंवा सावरकर बोलले शिपायाला । "पहाट झाली शौचाला न्यावं मला " । संडासांत नेलं मग त्याला । दार बंद केलं पण कैद्याला पाहायला । कांच लावली होती दाराला । विनायक मोठा हुशार झाला । त्यानं आपला झगा आंतनं दारावर टाकला । अन् दरवाजा आंतनं बंद केला । वाटोळी खिडकी बाजूला । एका उडीसरशी पकडलं तिला । अन् बोलला सागराला । "झेल झेल समुद्रा ! मला । जर करशिल विश्वासघाताला । तर त्याचं पाप लागेल तुला " । समुद्रानं हा उचलला । त्यासरशीं उडी घातली समुद्रांत वीर नाहींसा झाला ॥ समुद्र अंगावरनं घेऊन चालला । इकडं पहारेवाल्याला संशय आला । म्हणून त्यानं लाथेनं दरवाजा फोडला । अन् आंत गेला तों काय लागला बोंब मारायला । सारा शिपाई खडबडून जागा झाला । पण पार हिरमुसून गेला । अन् लागला ओरडायला । "भाग गया, भाग गया, पकडा पकडा कैद्याला " । आग्ऱ्यात्नं शिवाजी जसा गेला । तसाच पराक्रम यानं केला । इकडं विनायक लागला पोहायला । वरनं चालला बंदुकीचा मारा । पण चुकवत चुकवत गांठला किनारा । तों दगडी तट आड आला । पोहुन पोहुन होता दमुन गेला । पण धैर्याचा मेरु जो झाला । आडवील कोण हो त्याला ? । हां हां म्हणतां तट दगडांचा चढुनिया गेला । अन् लागला सारखा धांवायला । धांवता धांवता थकुन हो गेला । गोरे शिपाई धांवले

पकडायला । पण विनायक पुढंच चालला । पुढं ससा मागं लांडग्यांनीं पाठलाग केला ॥ तोंडातनं फेस चालला । डोळे लागले गरगरा फिरायला । अंग सारं लागलं कापायला । फ्रान्सचा शिपाई हवा होता त्याला । ओलाचिंब पोशाख झाला । एक शिपाई दिसला हो त्याला । तंवा विनायक थांबला । इंग्रज शिपायांनीं गांठलं त्याला । अन् लागले ओढायला । तंवा विनायक फ्रान्सच्या शिपायाला बोलला । "मॅजिस्ट्रेटाकडे घेऊन चला मला । इंग्रज शिपाई आलेत धरायला । पण फ्रान्सच्या भूमिवर त्याची सत्ता काय बोला ? ॥ हा कांहीं बदमाश नाहीं झाला"। इंग्रज शिपाई लागले डोळे वटारायला । तंवा फ्रान्सचा शिपाई बोलला । "हा कैदी म्हणतोय तसंच करावं लागेल मला"। इतक्यांत छन् छन् आवाज झाला । सोन्याच्या नाण्यांनीं फ्रान्सचा शिपाई गार झाला ॥ अन् कायद्याचा विसर त्याला पडला । इंग्रज शिपायांनीं बांधलं वीराला । अन् दरदरा ओढीत नेलं त्याला । नेतां नेतां लाथा–बुक्क्यांचा मार अंगाला ॥ ७ ॥

• •

## चौक ८ वा

बोटीवरती पुन्हां चढविलं शूरवीराला । दिनराज अस्ताला गेला अंधार झाला । लाल डोळे फिरवून गोरा बोलला काय त्याला । तें आतां सांगतों तुम्हांला ऐकावं बोला ॥ गोरा शिपाई बोलला, "हे पागल, हराम, अबी तुमकू मार डालेंगे"। असं म्हणून गोऱ्यानं एक शिवी हसडली त्याला । त्यासरशी विनायक बोलला ! "संभाळुन बोला रे बोला । नाहींतर आतांच घेईन जीवाला । माझा संसार मी कधींच आहे जाळला । आतां प्राणांची पर्वा कोणाला ? । जर जगायचं असेल तुला । तर जाऊं नको माझ्या वाटेला । अरे शेंदाड शिपाई तुम्ही झाला । जंवा बोटीतनं उडी टाकून लागलों पोहायला । तंवा कां

आला नाहींत रे पकडायला ? । तुम्ही पोटासाठीं करताय नोकरीला । मुलं बाळं घरं आहेत तुम्हांला । पण हा बच्चा सिंहाचा झाला । गोरा शिपाई थंडगार झाला । पण तंवापासून जखडलं शूरवीराला । हातकड्या दोन्ही हातांला । खळखळती बेडया पायाला । असा पक्का बंदोबस्त केला ॥ चाल ॥ समुद्र सरला बोट लागली हळुहळु मुंबई बंदराला । प्रकार पुढचा ऐका बंधुंनो आतां सांगतों तुम्हांला ॥ स्पेशल गाडी तयार केली शिपाई चारी बाजूंला । हातापायांतुन ठोकून बेडया रस्त्यांतुन नेती त्याला ॥ लोक हजारों उभे राहिले स्वागत त्याचें करण्याला । 'जयोऽस्तु वीरा ! जयोऽस्तु वीरा' नाद मोहवी गगनाला । स्पेशल न्यायाधीश नेमिले न्यायकर्म चालविण्याला । किती अपराधी न्यायमंदिरीं येउन होता बसलेला ॥ सशस्त्र पहाऱ्यांतून चालला न्यायमंदिरीं तो वीर । किति डोळ्यांतुन अश्रु गळाले, कितिक गाळती अंगार ! ॥ विनायकाला पाहुनि तेंव्हां उभे राहिले, रणवीर । 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय' ऐसा घोर उसळला जयकार ॥ चाल ॥ न्यायाधिशानं निवाडा केला ॥ अन् दिलं घोर शिक्षेला । **पन्नास वर्सं** तुरुंगांत धाडलं वीराला ॥ एक जन्मठेप **सोमणाला** । पंधरा वर्सं **ब्रह्मगिरीबुवाला** । दहा वर्सं **खरे** वीराला । दहा वर्सं **मराठे** वीराला । सात वर्सं **नागपुरकराला** । तीन वर्सं **विश्वासराव डावऱ्याला** । सहा महिने **नारायणरावाला** । अशा दिल्या शिक्षा कैकांला । तंवा देश सारा गहिंवरून गेला ॥ चाल ॥ मातृभूमिच्या चरणावरतीं फुलें वाहिलीं वीरांनीं । सर्वस्वाची होळी केली धन्य जाहले या भुवनीं ॥८॥

● ●

## चौक ९ वा

डोंगरीच्या तुरुंगांत नेलं विनायकाला । चक्की दिली पिसायला । कैद्याचा पोषाख दिला । दिवसामागून दिवस चालला । एके दिवशीं

शिपाई बोलला । ‘ चलो, साहेब बुलाता है तुला ’ । विनायक हपीसांत गेला । प्रियपत्नी आली होती भेट घ्यायला । खडाडाडा दरवाजा उघडला । अन् आंत घेतलं भेट घेण्याला । निराशेचा घोर अंधार होता पसरला ॥ मृत्यूच्या घोर जबड्यांत आली भेटायला ॥ डोळ्यांतनं अश्रु घळघळा । थरथरा कंप देहाला । ओटाबाहेर शब्द येइना, कितिक अडखळला ॥ काळोखी आली डोळ्याला । मनुष्यानं मनुष्य ठेवण्याला पिंजरा बांधला ॥ स्वार्थानं धुमाकुळ केला । देवाच्या राज्यांत नाहीं वाव तुरुंगाला ॥ पण मनुष्यानं प्रकार काय केला ! । असो, आतां ऐका गोष्टीला । कैद्याच्या पोषाखांत आणलं त्याला भेटायला । मनिं चर्रर झाली बाईला ॥ ‘ पन्नास वर्ष ’–हें चित्र दिसलं डोळ्याला । हा नाद दिसला कानाला । हा शब्द दिसला जिव्हेला । विनायक धैर्यगिरी झाला । मृत्युला त्यानं ठार केला । मग बोलला प्रिय पत्नीला । “ कां ओळखलं कां मला ? । आतां मोठा संसार मांडला । बोळक्यांचा चुराडा केला । धीर धरून कंठा काळाला । कधीं जर उद्वेग वाटला जीवाला । तर विवेक करावा जरा ॥ चला ॥ लग्नाची माळ पडतांना । आशेचा शैल चढतांना । रोगांची पाठवून सेना । काळानं नेले जीव नाना ॥ सतारी तार छेडतांना । किन्नरी गोड गातांना । प्रेमाचा ओठ लावतांना । काळानं नेले जीव नाना ” ॥ चाल ॥ वीरपत्नी बोलली वीराला । “ आपण जपा आपल्या जीवाला । माझी चिंता मुळीं नच करा ” तुरुंगाच्या छायेखालीं चालला संवाद जरा । ताटातूट केली झटदिशीं, आंत नेलं त्याला ॥ वीरपत्नी गेली माघारीं जीव भडकला ॥ ९ ॥

● ●

## चौक १० वा

ठाण्याच्या तुरुंगामधिं नेलं शूरवीराला । तिथ्नं ‘ चलान ’ झालें तय्यार अंदमानाला । महाराजा बोटीनं नेलं हिरावुन त्याला । अंदमान

बेट प्रलयात । वीरांचा नाश करण्यांत । तिथं ठेवलं वर्स पन्नास, ऐकावं बोला ।। चाल ।। तिथं कैद्यांचा छळ फार झाला । तेलाच्या घाण्याला जुंपलं शूरवीराला । काथ्या कुटुन दोऱ्या वळणाचं कामं दिलं त्याला ।। केराच्या गाड्या ओढायला । मोठमोठे दगड फोडायला । जेलरानं नेलं वीराला । 'बारी बाबा' आला ऐकून कितिक तळमळला ।। तिथं **गणेशपंत** दिसले डोळ्याला । हाल हाल झाले जीवाला । एके दिवशीं प्रकार काय झाला । क्षयरोग रोगांचा राजा दिसला डोळ्याला ।। क्षयरोग बोलला बाबाला ( बाबाराव सावरकरांना ) । " आतां लावतों नख नरडीला " । झडूं लागला देह वीराचा रोग भडकला ।। भाऊ भाऊ चिंतातुर झाला । तंवा स्वप्न पडलं विनायकाला । काय आतां सांगतों तुम्हांला । क्षयरोग बोलूं लागला । " वीरांनो, ऐका बोलाला । माझं नांव सांगतों तुम्हांला । 'अंदमान' नांव हो मला । इथं जो जो माणूस आहे आला । तो तो माझ्या हातनं नाहीं कधिं गेला । एक दिवस घालीन झडपेला । अन् घेऊन जाईन तुम्हांला " । असं म्हणून जवळ उभा राहिला । आकार सांगतों तुम्हांला । हाडकांचा पिंजरा जणु झाला । मांस रक्त नव्हतं अंगाला । काळा ठिक्कर चेहरा दिसला । कफाचा बडका तोंडाला । नखं मोठमोठीं बोटाला । हातीं होता काळा काळा भाला । दुसऱ्या हातीं दोरीचा फास तय्यार झाला ।। धिप्पाड देह पण होता बांक कमरेला ।। आतां ऐका पुढच्या गोष्टीला । चौदा वर्सं झुंज दिली रोगाला । पुढं आणलं मायभूमीला । रत्नागिरी आणि येरोड्याला । पुन्हां ठेवलं भावाभावाला । तिथं काढलं कैक वर्षाला । पुढं स्थानबद्ध केलं एकाला । भाग्याचा तारा उजळला । जंवा जमनादास प्रधान झाले । तंवा बिनशर्त सोडलं दोघांला । आनंदी आनंद झाला । मृत्युशीं झुंज झुंजून पराक्रम केला ।। **पांडुरंग** शूरवीरांचा गाइ पोवाडा ।। १० ।।

रचना–८–८–१९३९.

# नेताजी सुभाषचंद्र बोस

## यांचा

## पोवाडा (भाग १ ला) —— :२२:

जय हिंद हिंद हा मंत्र दिला सर्वांला। जय हिंद हिंद जय हिंद घोष दुमदुमला ॥ प्रयत्नांचा करुनि पर्वत अजरामर झाला। नेताजी **सुभाषचंद्राला । पांडुरंग** शाहीर करतो नमन या वेळा ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

१८९७ सालास। जानेवारी दिनांक तेवीस ॥ जी ॥ **कटक** गांवीं आला जन्मास। नांव **सुभाष** ठेवलें खास ॥ जी ॥ सुभाषचंद्र नांव जरि त्यास। तरि तेज ग्रासी सूर्यास ॥ जी ॥ ॥ चाल ॥ **जानकीनाथ** हे वडिल सुभाषचंद्राला। रायबहाद्दूर असा वडिलांचा किताब झाला ॥ धनदौलत मानसन्मान भरपूर त्याला ॥ आठ पुत्र मोठे धुरंधर जानकीनाथाला ॥ जी ॥ शरच्चंद्र बोस हे भाऊ सुभाषचंद्राला ॥ जी ॥ आठी पुत्र जसा एक एक चमकता हिरा ॥ जी ॥ सप्तर्षि जसे शोभती अंतरिक्षाला ॥ जी ॥ ग्रहगण देतो भूषण अंतरिक्षाला ॥ जी ॥ पण त्यांत चंद्राची सर येईना कोणाला ॥ जी ॥ दिग्गज अष्ट आधार धरती मातेला ॥ जी ॥ असो, आतां ऐका गोष्टीला। देशाचं वेड लागलं बोस कुळाला ॥ जी ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

सुभाषचंद्र दिसामासांनीं मोठा जाहला ॥ जी ॥ सोळा वर्सं झालीं वयाला । १९१३ सालाला । मॅट्रिकची परीक्षा दिली उत्तीर्ण झाला ॥ जी ॥ मोठा हुशार म्हणून लौकिक सर्वत्र झाला ॥ जी ॥ मग प्रेसिडेन्सी कॉलेजांत गेला । तिथं दुसऱ्या वर्गांत शिकत असतांना । रामकृष्ण मिशनचा होता उत्सव चालला ॥ जी ॥ स्वामी विवेकानंद भाषण करती त्या वेळा ॥ जी ॥ बोलतां बोलतां त्यांनीं एक प्रश्न केला । " अरे **भारतमाता** बोलवी तुम्हांला । हांक ऐकेल असा इथं कोण आहे कां बोला ? । हीं हिमालयाचीं उंच उंच हीं शिखरं बोलावतायत धडे देण्याला ॥ हिमालयाच्या गुहा बोलवती तपाचरणाला ॥ जी ॥ तप करून सिद्धि मिळवायला । आणि मग भारताचा उद्धार करण्याला । कोण आहेत तयार हो बोला ? " ॥ चाल ॥ स्वामीजींचे तेजस्वी बोल । हृदयांत शिरले बहु खोल ॥ जी ॥ सुभाषाला लागली तळमळ । त्यानं बेत केला तात्काळ ॥ जी ॥ हा १७ वर्षांचा बाळ । जाण्याला झाला तयार ॥ जी ॥ चाल ॥ १९१४ सालाला । दिवाळीच्या पूर्वी घरदार सोडून गेला ॥ जी ॥ घरीं ठाऊक नाहीं कोणाला । अकस्मात नाहींसा झाला । अभ्यास ठेवला बाजूला । बाळ थेट हिमालयांत गेला । सद्-गुरूंचा शोध करण्याला । दऱ्याखोऱ्यांतनं लागला भटकायला । पाण्याच्या शोधासाठीं जसा धांवतो तहानेला ॥ जी ॥ पाडस जसं भेटायला जाई आईला ॥ जसा मासा पाण्याविण सारखा कासाविस झाला । तसा सुभाष गुरुसाठीं होता व्याकुळ झाला ॥ जी ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

इकडं घरीं प्रकार काय झाला । सुभाष गेला पण घरीं पत्ता नव्हता कोणाला ॥ जी ॥ चिंता लागली जानकीनाथांना फार त्या वेळा

॥ जी ॥ त्यांनीं एक तार केली-काशींतल्या रामकृष्ण मठाच्या अध्यक्षाला। कीं "महाराज, माझा सुभाष तुमच्याकडं आलाय कां हो तें तारेनं कळवावं मला। तारेनं जबाब परत दिला। पण तारमास्तरनं अक्षरांचा घोटाळा होता केला। Subhas died not come असा तारेंतला मजकूर झाला। तंवा घरच्या मंडळींनीं तार खात्यांत पुन्हां तपास केला। तेव्हां died नको did असा शब्द हवा होता–असा जबाब त्यांना मिळाला। जानकीनाथ बोलले आपणाला,। "देवा! सुभाष कुठंही असो! सुखी ठेव माझ्या बाळाला" ॥ तिकडं सुभाष गेला तप करण्याला। हिमालय पर्वतांतल्या गुहेला। सत्याचा शोध करण्याला। सद्गुरु कुठं दिसेल त्याचा ध्यास लागला जीवाला। पण सद्गुरु दिसेना बाळाला। तंवा तडक फिरला माघारा। सुभाषानं विचार मनिं केला। "**जनसेवा** म्हणजेच **देशसेवा**–जनतेच्या रूपानं परमात्मा विनटला" ॥ जी ॥ सुभाषचंद्र पुन्हां परतून आले गांवाला ॥ जी ॥ **प्रेसिडेन्सी कॉलेजांत** पुन्हां गेले शिकायाला। तिथं एकदां प्रकार असा झाला। कीं एक इंग्रजी प्रोफेसर बोलला। "हिंदी लोक कुत्र्यासारखे आम्हांला। त्यांना कुत्र्यासारखेच वागविलें पाहिजे मला"। हे शब्द ऐकून सुभाष संतापून गेला ॥ जी ॥ अन् तडक त्या प्रोफेसराजवळ गेला अन् असा त्याच्या कानांत एकदम ओरडला। कीं तो प्रोफेसर दचकून गेला ॥ पण त्याचा परिणाम असा झाला। कीं कॉलेजात्नं काढून टाकलं सुभाषाला। सुभाषचंद्र शांतचित्तानं घराकडे गेला ॥ जी ॥ वडिलांनीं विचारलं, "कां रे घरीं आलास?"। सुभाषानं सारा प्रकार सांगितला। तेव्हां वडिलांना आनंद झाला। पण शिक्षणाचं पुढं काय बोला?। क्षमा मागून कॉलेजांत जाण्याला। सुभाषानं नकार साफ दिला। तीन वर्षं सुभाष तसाच राहिला। पुढं **स्कॉटिश मिशन कॉलेजांत** दाखल झाला। अन् १९१७ सालाला। सुभाष बी. ए. ऑनर्स हो झाला। तंवा वडिलांनीं विचार केला। कीं

आतां I. C. S. होण्याला । सुभाषाला पाठवावं या वेळा ॥ असा बेत करून वडिलांनीं-विलायतला धाडलं सुभाषाला ॥ जी ॥ ३ ॥

●

## चौक ४ था

१९२० सालाला । आय्. सी. एस्.च्या परीक्षेंत सुभाष चौथा आला । वडिलांना आनंद झाला । अन् त्याच परीक्षेंत इंग्रजी विषयांत त्यानं पहिला मान मिळविला । किति तारा पत्रांचा मोठा वर्षाव झाला ॥जी॥ I. C. S. ची परीक्षा म्हणजे मोठा मोह ! जर मनुष्य I. C. S. झाला । तर मोठी नोकरी मिळणार त्याला । अन् **कलेक्टर-कमिशनर** असे हुद्दे मिळणार त्याला । अन् कलेक्टर म्हणजे जिल्ह्याचा जणु राजाच झाला । दोन तीन हजार रुपये पगार महिन्याला । अन् मानमरातब तर सारखा चालला । I. C. S. परीक्षा होणं म्हणजे भाग्य मोठं-असं वाटतं होतं त्या काळा । पण सुभाषानं वेगळाच प्रकार केला । I. C. S. ची पदवी घेण्याला । सुभाष नाहीं तयार झाला । सर वुइल्यम ड्यूक वगैरे मंडळी बोलली त्याला । "सुभाष ! तूं I. C. S. झालास । अन् आतां हें वेड कां लागलं तुला ? । अरे, I. C. S. होण्याकरितां किती धडपडतात या वेळा । अन् तूं तर I. C. S. वर लाथ मारायला । तयार झालास-हा अविचार वाटतो आम्हांला" । तंवा सुभाषचंद्र त्यांना बोलला । "I. C. S. म्हणजे एक बडा नोकर-अन् तो सुद्धां इंग्रजांचा नोकर-**इंग्रजांचा नोकर व्हायला । हा सुभाष नाहीं आला जन्माला । तर मायभूमीची सेवा करायला । अन् तिचे पांग फेडायला । मी आलों आहे जन्माला** । सोनेरी पिंजरा पोपटाला । डाळिंबाचे दाणे खाण्याला । सोन्याची काठी बसायला । दास दासी हजर सेवेला । खास राजा घालतो आंघुळीला । अन् काम कांहींच नाहीं त्याला । पोटाची चिंता नाहीं त्याला । तरी पहा पोपट कसा झाला ? । रंग त्याचा झडत

चालला। देहाचा तजेला चालला। तो पोपट सारखा खंगतच चालला। कारण एकच आहे याला। तो पिंजरा सोनेरी जरी झाला। तरी तो त्याचा कैदखानाच जन्माला। तसाच नोकरीचा हा प्रकार झाला। परक्यांचं राज्य चालवायला। हा सुभाष कधीं न तय्यार निश्चय हा झाला ।। जी ।। पारतंत्र्य शाप मोठा झाला। मायभूमि रडते ढळढळा। म्हणून तिला मुक्त करण्याला। **आयुष्य खर्च करण्याचा निश्चय मीं केला** ''। धन्य धन्य सीमा मुळिं नाहीं अशा त्यागाला ।। जी ।। ४ ।।

● ●

## चाक १ वा

१९२१ साल। असहकारची मोठी चळवळ ।। जी ।। महात्माजी नेता खंबीर। राष्ट्रांत भरविलं वारं ।। जी ।। कोर्ट कचेऱ्यांवर बहिष्कार। सरकारशीं नको सहकार ।। जी ।। चाल ।। प्रक्षोभ देशभर केला। देश सारा गद्गदा हालला। त्यावेळीं सुभाषचंद्र होते इंग्लंडला। त्या चळवळींत भाग घेण्याला। सुभाषचंद्र आले माघारा। गांधींची भेट त्यांनीं घेतली प्रथम **मुंबईला** ।। जी ।। मग बंगालला सिंह हा गेला। तिथं चित्तरंजन दासांचा पट्टशिष्य हा झाला ।। जी ।। नॅशनल कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून नेमलं तंवा त्याला ।। जी ।। प्रिन्स ऑफ वेल्सवर बहिष्कार घातला। म्हणून तुरुंगांत धाडलं सुभाषाला। **हा पहिला तुरुंगवास** झाला। सहा महिने तुरुंगवास घडला। पुढं सोडलं शूर वीराला। इकडं दासबाबूंनीं स्वराज्य-पक्ष होता काढला। त्यांत सुभाष सामील झाला। पुढं चित्तरंजन दासबाबू झाले मेयर कलकत्त्याला। अन् सुभाष त्यांचा चीफ ऑफिसर झाला। पुढं १९२४सालाला। पुन्हां पकडलं सुभाषचंद्राला। अन् तुरुंगांत पाठवलं मंडालेला। तिथं सुभाष आजारी फार झाला। क्षय जडला सुभाषचंद्राला। तंवा १३ मे १९२७ ला। सरकारनं सोडलं सुभाषला। १९२९ सालाला।

सुभाषला पुन्हा धाडलं तुरुंगाला ।। कलकत्त्याचे मेयर म्हणून नेमलं लोकांनीं त्याला ।। जी ।। पुन्हां धाडलं त्याला तुरुंगाला । पुढं हवापालट करण्याला । २३ फेब्रुवारी १९३३ सालाला । सुभाषचंद्र गेले युरोपाला । तीन वर्सं मुक्काम केला । १९३६ सालीं आले हिंदुस्थानला ।। जी ।। सरकारनं पुन्हा पकडलं त्याला । पुढं १७ मार्च १९३७ ला । सोडून दिलं सुभाषचंद्राला । १९३८ सालाला **हरिपुरा** काँग्रेसचे अध्यक्ष नेमिलं त्याला ।। जी ।। १९३९ सालाला । काँग्रेस झाली **त्रिपुरीला** । पुन्हा अध्यक्ष नेमलं वीराला । पण मतभेद गेला विकोपाला । अन् राजिनामा द्यावा लागला त्याला । मग फॉरवर्ड ब्लॉक म्हणून एक नवाच पक्ष काढला । १९४० सालाला । पुन्हा कलकत्त्याचे मेयरपद आलं त्यांच्या वाट्याला । कलकत्त्याला हॉलवेलचा पुतळा होता उभा केला । तो काढून टाकण्यासाठीं चळवळ केली त्या वेळा । अन् फॉरवर्ड ब्लॉक पत्रांत **दि डे ऑफ् रेकनिंग** हा लेख लिहिला । म्हणून पुन्हा शिक्षा झाली सुभाषाला । सुभाषांच्याच घरीं नजर कैदेंत ठेवलं सुभाषाला । घराभोंवतीं पहारा बसविला । अन् आंत कोंडून ठेविलं शूर वीराला ।। जी ।। ५ ।।

• •

## चौक ६ वा

१ सप्टेंबर १९३९ सालाला । हिटलरनं डॅन्झिगच्यासाठीं पोलंडवर हल्ला चढविला । तेव्हां युद्धाचा जाळ भडकला । हिटलरनं सारा यूरोप आणला कबजाला ।। रशियाशीं समेट त्यानं केला । लोकशाही राष्ट्रांना धक्का जोराचा दिला ।। दोन वर्सं जर्मनीनं जोर भयंकर केला ।। इकडं वाटलं सुभाषचंद्राला । हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा काळ चालून आला ।। पण शस्त्रास्त्रं नाहींत लढण्याला । अशा वेळीं शस्त्रास्त्रं मिळवायला । अन् दुसऱ्या राष्ट्रांची मदत मिळवायला । कुणी तरी पाहिजे बाहेर गेला ।

आतां पाहिजे उठाव आपणच केला । पण काय करावं समजेना त्याला । देशासाठीं जीव तळमळला । सुभाषचंद्र करती विचाराला । " इथं ठेवलयं नजर कैदेंत मला । आतां शिक्षा देतील मला । मग देशसेवा कशी करावी बोला " । म्हणून धाडसानं पळून जाण्याचा बेत त्यांनीं केला ।। जी ।। ता. २६ जानेवारी १९४१ या दिवसाला । सुभाषचंद्र निसटून गेले ठाव न कोणाला । चोहोंकडं होता सरकारी पहारा । पण पहाऱ्याला चुकवून सुभाष नाहीसा झाला ।। जी ।। अशा अजब योजलं युक्तीला । तें कळलं नाहीं कोणाला । सरकारनं तपास सुरू केला । C. I. D. चारी बाजूला । देशाच्या कानाकोपऱ्यांत शोधलं त्याला ।। जी ।। पण पत्ता नाहीं कोणाला । कुणी बोलती सुभाषचंद्र गेले तप करण्याला ।। जी ।। कोण म्हणती सरकारनं नेलं दुसऱ्या जागेला ।। जी ।। कोण म्हणती वेष पालटून वीर तो गेला ।। जी ।। देशभर हाहाःकार झाला । खरा प्रकार कळेना कोणाला । लहान थोर वृद्ध तरुणांनीं-आसवांचा हार तयार केला । अन् तो मनानं वाहिला त्याला । पुरोगामी पक्षाच्या सभा जागजागेला ।। जी ।। तंवा आम्हीं होतों उमरावती नगराला । तिथं डॉ. शिवाजीराव पटवर्धन थोर पुढारी झाला ।। जी ।। त्यांनीं सभा घेतली त्या वेळा । आयुरारोग्य सुभाषाला द्यावं अशी विनंति करण्या देवाला । सभा भरली मोठी त्या स्थळा । हजारों लोक सभेला । ईश्वराला भार घालायला । कीं उदंड आयुष्य द्यावं देवानं सुभाषचंद्राला ।। जी ।। तंवा सुभाष विरह रचून शाहीरानं-तो पोवाडा सभास्थानीं म्हटला । तोच आतां जसाच्या तसा-मी गातों पुढच्या चौकाला ।। जी ।। ६ ।।

● ●

## चौक ७ वा

काय झालं समजेना मला । सुभाषचंद्राला । नाहींसा झाला । लागला हिंदभूमिला ध्यास । पुन्हा भेटीची लागली आस । येइल कधिं कळलंय

कां हो कोणास ? ॥ चाल ॥ सुभाषचंद्रा ! लागली हुरहूर तुझ्या ' आईला ' ॥ तुझ्यावीण कासाविस तिचा जीव रे झाला ॥ दिनरात्र तुझ्या नांवाचा छंद रे तिला ॥ चाळीस कोटि मुलं जरि असलीं हिंदभूमीला ॥ तरि तूंच आवडता खरा । तुझ्याविण चैन ना तिला । याचं कारण सांगतो मी रे तुला । राज्यपद होतं आईला । पण कोण माणुस रे आला । त्यानं मारली लाथ आईला । सिंहासनाखालीं ओढलं तिला । अन् लागला थयथय नाचायला । जीवें मारलं कैक बाळाला । तंवा त्यान हिंदभूमिला । दासीपणा लावला करायाला । जुनं फाटकं वस्त्रं अंगाला । अंगाखांद्याचा दागिना नेला । हें सोसवेना हिंदभूमिला । तंवा लागली हुंदके देण्याला । " हाय ! हाय । दैवाचा फासा कसा उलटला ॥ अरे तुम्ही माझीं इतकीं मुलं झाला । पण माझे हाल दिसत नाहींत का तुमच्या डोळ्यांला ? ! अरे ! एकसुद्धां मायेचा पूत असा नाहीं झाला । कीं जो ऐकेल माझ्या हांकेला । अन् बसवील सिंहासनावर मला " ॥ चाल ॥ आईचा सवाल ऐकून । तूंच गेलास आधीं धांवून ॥ जी ॥ घेतला छंद जीवानं । आईला मुक्त करीन ॥ प्रतिज्ञा केलिस दारुण । आणि दिलंस काया वाचा मन ॥ जी ॥ बाळपण आणि तरुणपण । देशाला केलंस अर्पण ॥ जी ॥ किति हाल सोसलेस बाळा । त्याला उपमा नाहीं या वेळा । फार छळलं बाळा रे तुला । तरि भीति ठाव नाहीं तुला । I. C. S झालास । पण दिलीस लाथ नोकरीला । सौख्याचा मोह नाहीं तुला । एकच छंद लागला जीवाला । सरतेशेवटीं क्षय झाला तुला । तरीसुद्धां भ्यालास नाहीं त्याला । मरणाची भीति नाहीं तुला । **मरणच मेलं पाहुन रे तुला** । आईसाठीं क्षणक्षण वेचलास । म्हणून आईचा पंचप्राण झालास आतां या वेळा ॥ जी ॥ तुझ्यावीण चैन कसं नाहीं तिच्या जीवाला ॥ जी ॥ चाल ॥ गेलास सोडुनी बाळा । आईस आज कां बोल ॥ कुणी चेटुक केलं तुजला । झालं काय आतां बोल ॥ कां निराश झाला जीव । गेलास म्हणोनी बोल ॥चाल॥ राष्ट्रपतिपदाच्या वरुनी । खेचलं तुला मित्रांनीं । हें बक्षिस दिधलं

म्हणुनी । गेलास सख्या ! कां बोल ॥ जी ॥ आशेचे दिसती न किरण । अंधार चालुनी आला ॥ दशदिशा व्याप्त त्या झाल्या । स्वार्थानं सारा भरला ॥ आपलाच बांधव सारा । आपणांस वैरी झाला ॥ चाल ॥ राजकारणांतहि स्वार्थ । धर्मकारणांतहि स्वार्थ । स्वार्थानं केला घात ॥चाल॥ म्हणुनि कां तुला तिटकारा । जगताचा आला बोल ॥ जी ॥ गेलास तपाचरणाला । अज्ञात जागि कां बोल ॥ नेलं कुणी कां दुष्टांनीं । माराया तुजला बोल ॥ जगण्याचा कां कंटाळा । तुज आला सखया ! बोल ॥चाल॥ तूं हिंदभूमीचा चंद्र । तूं हिंदजनांचा चंद्र । लागला मनाला छंद । आनंद कधीं डोळ्याला । देशील एकदां बोल ॥ जी ॥ चाल ॥ कधीं दिसशील पुन्हां डोळ्याला । तें एक ठाव रे तुला । तळमळ तंवर जीवाला । हे सर्वसाक्षी भगवंता, विनंती तुला ॥ कीं, सुखरूप ठेव रे त्याला । हे दिवस रात्रिंनो ! सांगणं हेंच तुम्हांला ॥ दशदिशाबाईनो ! हेंच मागणं तुम्हांला ॥ तुम्ही जपा आमच्या वीराला । जेऊं घाला तुम्ही स्वतः त्याला । नाहींतर कुणी तरी चारतील विष बाळाला । न्हाऊं घाला स्वतः तुम्ही त्याला । घेउं द्या झोप रोज त्याला । जसं जपाल आपल्या पोराला । तसं जपा सुभाषचंद्राला । दीर्घायु दे रे देवा त्याला । प्रार्थना हीच रे देवा तुझ्या चरणाला ॥ असा चौक तिथं रचून होता गाइला ॥ १९४१ सालाला । फेब्रुवारीच्या बावीस तारखेला । शनिवारचा दिवस तो झाला । हज्जारोंनीं उदंडायुष्य चिंतलं त्याला ।।जी॥७॥

● ●

## चौक ८ वा

सुभाषचंद्राचं काय झालं चिंता लागली सर्वांला । निराशेची ती गडद छाया कासाविस करि हृदयाला ॥ जी ॥ सुभाषचंद्र परि निसटुन गेले, कसे न ठाऊक कोणाला ॥ मातृभूमिच्या उद्धाराचा ध्यास लागला जीवाला ॥ जी ॥ आग्र्यांतुन तो शिवाजी राजा ठकवून औरंगजेबाला । हां हां म्हणता निघुनी गेला–हाच दाखला तुळनेला ॥ जी ॥ वीर

विनायक झेंप टाकुनी बोटींतुन निसटुन गेला। वीर असे हे अखंड देती स्फूर्ति विव्हळ देशाला ॥ जी ॥ घराभोंवतीं सशस्त्र पहारा पहारा करि दिनरात्रीला। चुकवुनि पहारा वीर धीर नरसिंह पहा निसटुनि गेला ॥ शिपाई सारे मोहवुनी श्रीकृष्ण गोकुळाला गेला। तसे शिपाई मोहुनि गेले, झोप लागली सर्वाला ॥ जी ॥ जागे होऊनी वार्ता देती शिपाइ अम्मलदारांना। सुभाषबाबू निकल गये हैं, How we don't know या वेळा ॥ जी ॥ चाल ॥ पुढं १९४१ च्या नोव्हेंबरला। सरकारनं प्रसिद्ध केलं कीं सुभाष मिळाले शत्रुपक्षाला। तेव्हां कळलं साऱ्या हिंदला। कीं, सुभाष जिवंत आहेत अन् गेले कर्मयोगाला ॥चाल॥ सोडोनि भरतभूमीस। सुभाषचंद्र गेले युरोपास ॥ जी ॥ कसे गेले गूढ सर्वांस। कुणि म्हणती पायीं प्रवास ॥ जी ॥ कुणि म्हणती विमान साहाय्यास। जपान्यांनीं नेलं सुभाषास ॥ जी ॥ सुभाषचंद्र गेले युरोपास। परि नाहीं चैन करण्यास ॥ वश करती अक्षराष्ट्रांस। भारताचे तोडण्या पाश ॥ चाल ॥ एक उपाय सुचला तंव्हा त्यांना योग्य त्या वेळा ॥ जी ॥ शेंकडों हिंदी शिपाई होता कैद झाला। त्यांच्याच जर उभारलं फौजेला। तर फौज येईल कामाला। असा विचार मनांत होता चालला। तंवा इकडं पूर्व देशाला। एक मोठा प्रकार घडून आला। जपान्यांनीं युद्धाचा वणवा होता पेटवला॥ जावा-सुमात्रा-सिंगापूर-सयाम-ब्रह्मदेश असा सारा देश हां हां म्हणता त्यांनीं सर केला ॥ जी ॥ अन् हज्जारों हिंदी शिपायाला। त्यांनीं कैद केलं त्यावेळा ॥ ७०००० हिंदी वीराला कैद केलं होतं त्या काळा ॥ सुभाषचंद्रांनीं इकडं युरोपांत विचार केला कीं आपण जावं आतां सिंगापुरला। तिथून हिंदुस्थान सोडवायला। फौज घेऊन सोपं जाण्याला। असं म्हणून १९४३सालाला सुभाषचंद्र आले सिंगापूरला। तिथं स्थापलं **आझाद हिंद सरकारला**। अन् १४ आक्टोबर १९४३ ला ब्रिटन अन् अमेरिका-या देशांच्या विरुद्ध-युद्धाचा पुकारा त्यांनीं केला ॥ जी ॥ **आझाद हिंद सेनेनं** मुकाबला सुरू केला ॥ जी ॥ १८ मार्च १९४४ सालाला।

आझाद हिंद सैन्यानं-मोराई, कोहिमा वगैरे ठाणीं जिंकून इंफाळला वेढा त्यांनीं दिला। तिथं पराक्रम त्यांनीं केला। पण दारूगोळा सारा संपला। तंव्हा माघार घ्यावी लागली फौजेला। जपान्यांचा पाडाव जंव्हा झाला। तंव्हा पुढचा विचार करायाला। ता. १७ ऑगस्ट १९४५ सालाला। (सुभाषचंद्र सिंगापुराहून चालले टोकियोला) ।। जी ।। विमानाचा प्रवास तो झाला। सायगांवहून बँकॉकला जायला। विमानात्नं नेता चालला। कर्नल हबीबउर रहेमान होते संगें त्यावेळां। १८ ऑगस्टला। इंडोचायनांत ताइवेनमधें ताइहोकू येथें जरा विश्रांतिचा काळ लाभला। मग दुपारीं २ च्या ठोक्याला। पुढील प्रवास पुन्हां सुरू झाला। आभाळांत विमान फिरू लागलं होतं गरगरा ।। जी ।। पण दोन तीन मिनिटांतच प्रकार काय झाला। त्या विमानांत्नं एकाएकीं स्फोट झाला। तंव्हा विमानाचा पंखा एक ताडनं मोडून गेला ।। जी ।। विमान धाडनं आलं धरणीला। पेट्रोलची टाकी फुटली अन् सारे जण पेट्रोलनें भिजले पूर्ण त्यावेळा ।। जी ।। त्यांतच तंव्हा विमानानं पेट घेतला। नेताजी सुभाष विमानात्नं बाहेर आले पण कपड्यांनीं पेट घेतला। अन् नेताजी शूर रणवीर भाजून गेला ।। जी ।। लगोलग उपचार सुरू केला। पण-दैवाचा होता घाला आला। तारीख १८ ऑगस्टला। रात्री ९ च्या सुमाराला। नेताजी सुभाषचंद्रानं देह ठेविला ।। जी ।। असा वीर शूर रणधीर स्वर्गाला गेला! ।। कुणी म्हणति सुभाषचंद्र अजून दिसतील डोळ्याला ।। या लोकीं अजून संचार त्यांचा चालला ।। अशा मोठ्या योगिराजाला। यमराज कसा नेईल सांगा आम्हांला ।। आणि हें जर खरं असेल-अन् जर सुभाष दिसतील तर आनंदी आनंद होईल हिंदभूमिला ।। असं खरं ठरो-प्रार्थना ईशचरणाला। **पांडुरंग** शाहीर मी गातों त्यांच्या कवनाला ।। जी ।। ८ ।।

**नेताजी की जय! जयहिंद!**

रचना-२३-१-४६.

# नेताजी सुभाषचंद्र बोस

## यांचा

## पोवाडा ( भाग २ रा ) —— :२३:

आझाद हिंद सैनिक करुनि तय्यार । जय हिंद मंत्र देऊन रणांगणावर । ज्यानं अजब कार्य असं केलं भूतलावर । तो सुभाषचंद्र झुंजार । करा जयकार । **पांडुरंग** त्याचा झाला शाहीर ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

डिसेंबरच्या सातव्या तारखेला । १९४१ सालाला । लढाईचा जाळ भडकला पूर्वखंडाला ॥ जी ॥ जपानानं मलायावर केला जोराचा हल्ला ॥ जी ॥ सिंगापुरचा अभेद्य असा किल्ला । जपान्यांनीं आठ दिवसांतच चोळागोळा केला ( १५-२-४२ ) ॥ जी ॥ असं वाटलं होतं इंग्रजाला । कीं सिंगापूर अभेद्य तट झाला । जरि साक्षात् कळिकाळ आला । तरी सिंगापूर रडवील त्याला । पण जपान्यांनीं हां हां म्हणतांना किल्ला सर केला ॥ जी ॥ जोहोरातनं पाण्याचा पुरवठा सिंगापुराला ॥ जी ॥ जपान्यांनीं हल्ला चढविला अन् तो पाण्याचा सांठाच फोडून काढला । तंवा ज्यां पिकलं फळ यावं हाताला । तसा सिंगापुरचा किल्ला आपोआप आला हाताला ॥ जी ॥ सिंगापुरला हिंदी लोक कैक होते त्या वेळा ॥ जी ॥ तंवा मेजर फुजीवारा बोलला हिंदी लोकांला । (ता. १७-२-४२ ) । "हिंदी भाई हो, ही आज सोन्याची संधि

थाली तुम्हांला ॥ जी ॥ स्वातंत्र्य हिंदुस्थानाचं पूर्ण मिळवायला ॥ जी ॥ आतांच जर उठाव तुम्ही केला । तर आम्हीं देऊं मदत तुम्हांला " ॥ हिंदी लोकांनीं विचार जरा केला । अन् बोलविली एक मोठी सभा त्यांनीं त्या स्थळा ॥ रास बिहारी बोस अध्यक्षपद सजवायला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ सदिच्छा मंडळ स्थापून । सभेचें झालें विसर्जन ॥ जी ॥ पुन्हां २८ मार्च १९४२ ला ॥ दुसरी परिषद भरली टोकियोला । त्यांत हिंदी स्वराज्य संघ स्थापण्याचा ठराव त्यांनीं केला ॥ जी ॥ आझाद हिंद फौज स्थापण्याचा ठरावही झाला ॥ जी ॥ संघाच्या शाखा भराभरा वाढू लागल्या । १० मे १९४२ च्या सुमाराला । ९९००० सभासद झाले स्वराज्यसंघाला ॥ जी ॥ १ मे १९४२ ला । मंडाले शहर जपान्यांच्या लागलं हाताला ॥ जी ॥ तेंवा मे च्या १९ तारखेला। बँकॉकला हिंदी लोक जमला । आठ दिवस सारखा खल झाला । जावा, सुमात्रा, इंडोचायना, बोर्निओ, मांचुको, हॉंगकॉंग, ब्रह्मदेश, मलाया–जपान–या साऱ्या देशांतुन होता हिंदी जन आला ॥ जी ॥ त्यांनीं आझाद फौज स्थापण्याचा नक्की बेत केला ॥ जी ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

९ ऑगस्ट १९४२ ला । 'चले जाव 'चा ठराव केला । **करा** किंवा **मरा** असा आदेश महात्म्यानं हिंद राष्ट्राला दिला ॥ जी ॥ सरकारानं तेंवा पकडलं साऱ्या पुढाऱ्याला । तेंवा क्रान्तीचा वणवा भडकला । सारा हिंद क्रान्तीज्वालांनीं धडधडून गेला ॥ जी ॥ हज्जारोंना डांबलं तुरुंगांत जागोजागेला ॥ जी ॥ " पुढारी काय सांगतील, त्याची वाट पाहूं नका या वेळा "–असा आदेश गांधीजींनीं दिला । लोकांनीं सुचेल तसा सारा यत्न सुरू केला ॥ जी ॥ सरकारनं गोळीबार केला जागोजागेला । हज्जारों मरुनिया गेला । चळवळ टाकली दडपून त्यांनीं त्या

वेळा ॥ जी ॥ पण तिकडं सिंगापुरला । आझाद हिंद फौजेचा ठराव होता झाला ॥ कर्नल **मोहनसिंग** सेनापति भला । पण मोहनसिंगाचा संशय जपान्याला आला । म्हणून त्यांनीं अटक केली सिंगाला । पुढं काय होणार कळलं नाहीं कोणाला ॥ जी ॥ तंवा पहिली आझाद फौज बरखास्त केली त्या वेळा ॥ असा तिकडं प्रकार होता झाला । पण १८ जून १९४३ ला । सुभाषचंद्र सुखरूप पोचले टोकियोला । बर्लिन-हून पाणीबुडी गेली घेऊन वीराला ॥ जी ॥ सर्वांना आनंद झाला । तंवा सुभाषांनीं वृत्तपत्रांना संदेश दिला । कीं "गेल्या महायुद्धांत ब्रिटिशांनीं चांगलं ठकवलं आम्हांला ॥ पण आतां हिंद जागा आहे झाला । आतां आम्हीं फसणार नाहीं या वेळा । आतां वीस वर्षांचा काळ लोटला । पण आज सोन्याचा संधिकाळ लाभला ॥ जी ॥ हा जर काळ फुकट दवडला । तर पुन्हां शेंकडों वर्षं दास्य नशिबाला । ब्रिटिशांनीं हिंदभूमीचा नाश फार केला ॥ जी ॥ दारिद्र्य लागलं नशिबाला । म्हणून आम्हीं आतां निश्चय आहे केला । कीं रक्ताचं मोल देऊन करूं यज्ञाला ॥ जी ॥ शत्रुच्या तलवारीस भिडवूं शस्त्र या वेळा" ॥ जी ॥ २१ जून १९४३ ला । रेडियोनं सुभाषबाबू बोलले हिंद लोकांला ॥ जी ॥ कीं "व्हा सज्ज मोठ्या त्यागाला" । **स्वातंत्र्यवेल रक्ताच्या तळ्यावर** चढला ॥ जी ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

२ जुलै १९४३ ला । सुभाषचंद्र सिंगापुरांत गेले आनंद झाला ॥ जी ॥ सुभाषांचं दर्शन घेण्याला । पुरुष स्त्रिया मुलं–सारीं झाडून गेलीं स्वागताला ॥ हिंदी, मलायी, चिनी, जपानी–अशा लोकांचा समुदाय झाला ॥ तंवा एकजण त्यांना म्हणाला । "सुभाषबाबू ! तुमच्या कार्याचा आदर आहे मला । पण हे जपानी फसवत नसतील ना तुम्हांला ?" ।

तेंवा सुभाषचंद्र त्यांना बोलला ।। "मेरे भाई, प्रश्न छान केलास पण निदान न फसला जाईन इतपत मेंदू असेल सुभाषाला । असं नाहीं कां वाटत तुम्हांला !।। आपण जर घेतलं योग्य काळजीला । तर कोण फसवतील आपणाला ?" । असो ! पुढं काय प्रकार झाला । हिंद स्वातंत्र्य संघाचे–सुभाषचंद्र झाले अध्यक्ष कार्य करण्याला ।। ९ जुलै १९४३ ला । लष्करी मेळा होता जमला । जनरल टोजो होता हजर राहिला । तेंवा सुभाषचंद्र बोलले लष्कराला । "बांधव हो ! ऐका या बोला । आजचा दिवस अभिमानाचा झाला । आझाद सैन्य झालें तयार असं समजुं द्या आज जगाला । अन् तो जाहीर करण्याचा मान आज प्रथम मला मिळाला । म्हणून आनंद होतो फार मला । या सिंगापुरच्या मैदानाला । आझाद फौजही जमली युद्ध करण्याला ।। व्हा तयार प्राण देण्याला । तोडा पाश हिंदभूमीचे मान तुम्हांला ।। बंधुनो, ऐका या बोला । **चलो दिल्ली** हा घोष यापुढं बोला । आपल्यांतला जिवंत कोण राहील हें सांगणं कठिण या वेळा । पण त्यांची चिंता नाहीं आपणाला । आम्ही विजयी होऊं–अन् दिल्लीच्या लाल किल्ल्याला । हा झेंडा जेव्हां लावूं–अन् करूं विजयकवायतीला । तेव्हां तोच सोन्याचा दिवस होईल आम्हांला ।। जी ।। ईश्वर आशीर्वाद देवो आमच्या कार्याला" ।। असं बोलणं सुभाषचंद्राचं भिडलं हृदयाला ।। जी ।। जनरल टोजोनं सलामी दिली आझाद फौजेला । सुभाषचंद्र होते टोजो । जवळ उभे त्या वेळा ।। जी ।। दीड तास कवायत झाली, भरतं हृदयाला ।। जी ।। ३ ।।

• •

## चौक ४ था

२९ ऑगस्ट १९४३ ला । सुभाषचंद्र आझाद फौजेला । सर सेनापति म्हणून झाले लढा करण्याला ।। जी ।। पुढं २१ आक्टोबर

१९४३ ला। आझाद हिंद सरकार स्थापलं त्या वेळा ॥ जी ॥ तंवा हज्जारों लोक समेला। त्यांत सुभाष सिंह गर्जला। "भाईनो! ऐका माझ्या बोला। आजचा दिवस सोन्याचा झाला। आझाद हिंद सरकार स्थापलं या वेळा ॥ जी ॥ हें सरकार करील स्वतंत्र हिंदभूमीला ॥जी॥ या सरकारशीं एकनिष्ठ राहण्याला। आतां मी शपथ घेतों या वेळा। "ईश्वराला ठेवून साक्षीला। या पवित्र घेतों शपथेला। कीं हिंदुस्थान स्वतंत्र करण्याला। हा सुभाष जिवन्त जोंवर राहिला। तंवर स्वातंत्र्य-लढा चालवील ऐका या बोला ॥ जी ॥ चाल ॥ हिंदुस्थानचा सेवक राहीन। हिंद जनांची काळजी वाहीन ॥ जी ॥ रक्ताचे बिंदु सांडीन। पर कच कधीं न खाईन" ॥ जी ॥ सुभाषचंद्र बोलती त्या वेळा। सारा लोक चित्रासारखा होता स्तब्ध राहिला ॥ जी ॥ पुन्हां लागले सुभाष बोलायाला। "बंधुंनो! ऐका या बोला। या तिरंगी झेंड्याखालीं व्हावं आतां तुम्ही गोळा ॥ जी ॥ सैन्यांत सामील होऊन चालवा युद्धाला ॥ जी ॥ **जय हिंद** शब्द उच्चारा एकमेकांला ॥ जी ॥ धन-दौलत सारी द्यावी युद्धकार्याला ॥ जी ॥ असं बोलले सुभाषचंद्र तेव्हां साऱ्या लोकांला। मग प्रधान मंडळ आलं शपथ घेण्याला। त्यांचीं नांवं सांगतों आपणाला ॥ सुभाषचंद्र मुख्य राज्याला। कॅ. मिसेस लक्ष्मी स्त्रीशाखेला। एस्. ए. अय्यर वृत्तप्रसाराला। ए. सी. चतर्जी जमाबंदीला। अझीझ अहमद, एन्. एस्. भगत, कर्नल जगन्नाथराव भोसले, गुलझारसिंग, कियानी, लोकनाथन्, इ हसन कादीर, कर्नल शहानवाज–हे सारे लष्कराचे प्रतिनिधि साहाय्याला ॥ जी ॥ ए. एम्. सहाय चिटणीशीला। रासबिहारी बोस प्रमुख सल्ल्याला। ए. एन्. सरकार कायदेखात्याला। करीम गनी, देवनाथ दास, डी. एम्. खान, ए. एल्लापा, जे थिबी, सरदार ईशरसिंग हे सारे सल्ला देण्याला ॥ चाल ॥ आझाद हिंद सरकार झालें स्थापन। नेताजी सुभाषचंद्रांनीं केलें भाषण। तो समारंभ पाहून। हज्जारों लोकांचे झाले तृप्त नयन ॥ जी ॥ ४ ॥

## चौक ५ वा

२२ आक्टोबर १९४३ ला। झांशीच्या राणीचा जन्मदिवस तो झाला ॥ जी ॥ झांशी राणी रेजिमेंट झाली सुरू त्या दिवसाला ॥ जी ॥ महिलांनीं रक्त काढून घेतलं शपथेला ॥ जी ॥ नेताजी बोले सर्वांला "बहिणींनो ! धन्य तुम्ही झाला। असा दिवस मागून मिळणार नाहीं तुम्हांला ॥ जी ॥ झांशी राणी पथक उभारलं आज या स्थळा ॥ जी ॥ झांशीच्या राणीनं संग्राम जंवा सुरू केला ॥ तंवा वीस वर्षं वय होतं तिला। अन् जंवा पडली धारातीर्थाला। तंवा बावीस वर्षांची होती शूर ती अबला ॥ जी ॥ आज हिंदुस्थान देशाला। हज्जारों झांशीच्या राणी हव्यात आम्हांला ॥ अन् आज बघून या देखाव्याला। माझं हृदय आलं भरभरून आतां या वेळा" ॥ जी ॥ असो पुढं काय प्रकार झाला। २१ आक्टोबर १९४३ ला। ब्रिटन–अमेरिकेविरुद्ध आझाद सरकारनं युद्धाचा पुकारा केला ॥ "चलो दिल्ली" असा आदेश सैन्याला दिला। पण पैशाविना चालणार कसं बोला ?। सुभाषबाबूंनीं पैशाचं नांव काढतांच ॥ दोन कोटि रुपये जमले एकाच दिवसाला ॥ अंदमान निकोबार बेटें–जनरल टोजोनं दिलीं आझाद सरकाराला। **शहीद** नांव दिलं अंदमानाला। अन् **स्वराज्य** नांव निकोबाराला। अंदमानांत कितिक वीरांचा छळ होता झाला ॥ तींच बेटें आलीं हाताला। हा चांगलाच शुभशकुन झाला। १९४३ च्या डिसेंबरला. । नेताजी सुभाषचंद्र गेले शहीद बेटाला। अन् पोर्ट ब्लेअरवर तिरंगी झेंडा फडकविला ! ॥ तो दिवस धन्य धन्य झाला ॥ जी ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

पैशाची तंगी पडलेली मोठी पाहून। सुभाषांनीं हृदय पिळून केलं भाषण। "भाई हो ! कसं चालणार पैशावांचून। शिपायांनीं केलं

रक्तदान । आतां तुम्ही द्यावं सर्वस्व उदार होऊन " ॥ जी ॥ चाल ॥ हे शब्द भिडले नेत्याचे खोल हृदयाला ॥ जी ॥ गोरगरीब देती सर्वस्व राष्ट्रकार्याला ॥ खिशांतील पैसा पैसा त्यांनीं काढून दिला ॥ धोबी, न्हावी, दुकानदार, गवळी देती द्रव्याला ॥ पाण्याचा ओघ तसा ओघ पैशाचा झाला ॥ एकदां काय प्रकार हो झाला । सुभाषांना घातला होता हार सभेच्या वेळा ॥ इतक्यांत कल्पना एक सुचली मनाला । कीं हार लिलाव करावा त्या वेळा । " तंवा सुभाषांनीं पुकारलं सभेला । हा हार विकत कोण घेतंय बोला ? । जो पैसा येईल तो जाईल फौज फंडाला " । एका तरुण पंजाबीनं एक लाख रुपयांचा बोल केला । मग कुणी दीड लाख, चार लाख, सव्वाचार लाख, चढाओढ चालली त्या वेळा । तंवा तो पंजाबी तरुण उतावीळ झाला । अन् ' पांच लाख ' एकदम ओरडला । पण कुणी सात लाखांचा आंकडा जाहीर केला ॥ तंवा हा पंजाबी तरुण कासाविस झाला । त्याला वाटलं " आपण आता किती आंकडा बोलावा म्हणजे तो हार मिळेल आपणाला " ? । इतक्यांत एक उपाय सुचला त्याला । चटकन् तो सुभाषचंद्राजवळ गेला । अन् " मी माझी सर्व दौलत दिली " असा घोष त्यानं केला । तंवा सुभाषांनीं आनंदानें धरलं त्याला । अन् बोलले शूर वीराला । ' शाबास धन्य आहेस तूं । हा हार आतां तुझाच झाला । आमची फौज विजयी होईल तेव्हां तो विजय तुझाच झाला " । तरुणानं घेतलं हाराला । अन् तो हार लावला डोळ्याला । मग त्यानं छातीवर ठेवला । अन् तो तरुण बोलू लागला । " ऐहिक पाश माझा सारा तटातट तुटला ॥ आतां माझे प्राण अर्पण राष्ट्रसेवेला " ॥ एक मुस्लिम कोट्याधीश होता । त्यानं आपलं सर्वस्व जडजवाहीर, इस्टेट, वगैरे सर्व एक कोटि रुपयांचे एकदम दिले युद्ध-कार्याला ॥ जी ॥ सेवक-ए-हिंद पदक देउन नेताजींनीं दानशूराचा गौरव केला ॥ अशा कैक लोकांनीं मोठा स्वार्थत्याग केला ॥ जी ॥ साऱ्या जातिपंथाचे लोक एकचित्तानं करती साहाय्याला ॥ जी ॥

मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, हिंदु हे सारे एकचित्तानं लढती त्या वेळा ॥ जी ॥ एकीचा प्रश्न सुभापांनीं पार सोडविला ॥ जी ॥ ६ ॥

• •

## चौक ७ वा

१९४४ जानेवारी महिन्याला । फौजेनें बिनीचें ठाणें नेलें रंगूनल । अन् स्वातंत्र्ययुद्धाला त्यांनी आरंभ केला ॥ जी ॥ फेब्रुवारीच्या चौथ्या तारखेला । शूर वीर महिला पण चालल्या झुंज देण्याला ॥ जी ॥ १८ मार्च १९४४ ला । सरहद्द ओलांडून आझाद फौजेनं हिंदुस्थानच्या हद्दींत झेंडा रोवला ॥ जी ॥ तंव **इंफाळला** वेढा त्यांनीं. दिला । इकडं ४ जून १९४४ ला । आझाद हिंद बँकेची स्थापना केली रंगूनला ॥ जी ॥ तीस कोटि रुपये बँकेचा द्रव्यनिधि झाला ॥ जी ॥ ६ जुलै १९४४ला। सुभाष सप्ताह मोठा सुरू झाला । त्यांत सुभाषांनीं प्रार्थना केली महात्माजीला । " महात्माजी ! आशीर्वाद द्यावे आमच्या कार्याला ॥ देशाला स्वतंत्र करण्याला । यांखेरीज दुसरा मार्ग कसला दिसेना मला ॥ म्हणून मी हा मार्ग सुरू केला । जर यांच्यांत अपेश आलं मला । पुन्हा आसरा तुमच्या चरणाचा द्यावा आम्हांला " ॥ तिकडं इंफाळच्या आघाडीवर प्रकार काय होता झाला ॥ जी ॥ ब्रिटिशांनीं जोर फार केला । जपान्यांचा पराभव झाला । तंव्हा शरण जाण्याचा बेत त्यांनीं ठरविला । अन् ३ मे १९४५ ला । आझाद हिंद फौजेनं-ब्रिटिशांच्या ताब्यांत दिलं रंगून शहराला ॥ जी ॥ पुढं पकडलं आझाद पुढाऱ्यांना अन् आणून ठेवलं दिल्लीच्या लाल किल्ल्यांत सर्वांला ॥ जी ॥ तंव्हा खटला त्यांच्यावर झाला । कॅ. शहानवाज, कॅ. धिलन आणि कॅ. सैगल यांच्यावर आधीं खटला भरला । तो खटला हिंदुस्थानांत दुमदुमून गेला । तंव्हा त्या खटल्यांत तिघांच्या जबान्या काय झाल्या । तं आतां सारं सांगीन पुढच्या चौकाला ॥ जी ॥ ७ ॥

• •

# चौक ८ वा

७ डिसेंबर १९४५ ला। कॅ. शहानवाज यांनीं जबाब असा लिहून दिला। "लष्करी किंवा कोणत्याहि कोर्टांत माझा खटला चालावा। असा कोणता अपराध मीं केला ?। मायभूमि स्वतंत्र करण्याला। आम्हीं युद्धाचा मार्ग सुरू केला। आझाद सेनेंतला शिपाई मी खरा ॥ जी ॥ जेव्हां मी या सेनेंत सामील झालों-तेव्हांच जाळून टाकलं आम्ही स्वार्थाला। घरदार बंधु माता पिता-असला पसारा ॥ जी ॥ हा सारा सोडून मी चाललों युद्ध करण्याला ॥ जी ॥ प्राणाची पर्वा नाहीं मला। १९४४ सालाला जानेवारीच्या हो महिन्याला। ब्रिटिशांच्या बाजूनं माझा भाऊ लढणारा। पण, त्याच्याशींही मी मुकाबला केला। अन् जखमी केलं भावाला। चीन टेकडीच्या बाजूला। मी अन् माझा पुतण्या-दोन महिने समोरासमोर तळ ठोकून लढलों त्या वेळा ॥ जी ॥ राजा कीं देश-असा प्रश्न माझ्या समोर आला। तेव्हां देशानं खेंचलं हो मला ॥ चाल ॥ सुभाषचंद्र नेताजी थोर। नमवीन त्यांना मी शीर ॥ सुभाषचंद्र वन्द्य आम्हांला। देशप्रेम त्यांच्या हृदयांत वाही झरझरा ॥जी॥ मर्यादा नाहीं त्यागाला। जपान्यांच्या इच्छेला नाहीं मान त्यांनीं दिला ॥ जी ॥ जपान्यांनीं टाचेखालीं कसं तुडवलं मलायाला। तें मीं पाहिलं होतं त्या वेळा। असा त्रास होऊं नये भारताला। म्हणून आम्ही शस्त्र धरण्याचा मनसुबा केला ॥ जी ॥ अन् उभी केली आझादी फौज-नेता लाभला ॥ जी ॥ जपान्यांनीं सुद्धां जर विश्वासघात असता केला। तर त्यांच्याशींही लढण्याचा आम्हीं निश्चय होता केला ॥ जी ॥ अतिपूर्व भागांतील हिंद लोकांनीं सारी दौलत दिली आझाद सरकाराला। कुटुंबेंच्या कुटुंबें सामील झालीं त्या वेळा ॥ जी ॥ ब्रिटिशांनीं पिळलं भारताला। हा विचार सतावीत होता मला। म्हणून ब्रिटिशांच्या मिठींतून भारताला सोडवायला। मीं जीवनाचा होम सुरू केला ॥

आझाद फौजेनं त्याग भयंकर केला ॥ जी ॥ हाल अपेष्टांचा डोंगर पुढं उभा झाला । पण आझाद वीर नाहीं डगमगला । सर्वस्व केलं अर्पण हिंदभूमीला ॥ जी ॥ आम्हीं लढलों सारेजण देश मुक्त करण्याला ॥जी॥ आतां आपण वाटेल तें आमचं करा "। असा जबाब खणखणीत शूर वीरानं दिला ॥ जी ॥ धिलन–सैगल–यांनीं सुद्धां जबाब तेजस्वी दिला ॥ जी ॥ न्यायाधीशांनीं दोषी ठरविलं सर्वांला । पण सर सेनापतिनीं विवेक जरा केला । अन् सोडून दिलं सर्वांला । आनंदी आनंद झाला हिंद लोकांला ॥ जी ॥ ८ ॥

● ●

## चौक ९ वा

सुभाषचंद्रांचं काय जाहलं नक्की कळेना कोणाला ॥ कुणि म्हणतीं जग सोडून गेले विमान पडलं धरणीला ॥ कुणि म्हणती हा वीर कुठंतरी असेल, येईल माघारा ॥ हिंदजनांना भेटायाला आशा वाटती जीवाला ॥ जी ॥ खरं काय तें असेल ठाऊक एका श्रीपरमेशाला । जगच्चालका ! विश्वदयाळा ! सुखी ठेव नरवीला ॥ जी ॥ **पांडुरंग** हा नत चरणाला, आला गौरव करण्याला । जगिं दुःखाचा नाश होउं द्यां, लाभो वैभव सर्वांलां ॥ जी ॥ ९ ॥

**नेताजी की जय ! जय हिंद !**

● ●

## जय-हिंद-गीत !

जय हिंद हिंद बोला । स्वातंत्र्यमंत्र झाला ॥ ध्रु० ॥ सेना सुसज्ज केली । परदास्य तोडण्याला ॥ जयहिंद हाच त्यांचा स्वातंत्र्यमंत्र झाला ॥ १ ॥ निःसंग होउनिया । तोडोनि पाश सारे ॥ सर्वस्व होम केला । जय हिंद हिंद बोला ॥ २ ॥ पन्नास हजार सेना ज्यानें तयार

केली ।। शस्त्रास्त्रं घेऊनिया । समरास सज्ज झाली ।। नमवूनि मान त्याला । जय हिंद हिंद बोला ।। ३ ।। नेता **सुभाषचंद्र** । आकाशीं चंद्र जैसा ।। वंदूनिया तयाला जय हिंद हिंद बोला ! ।। ४ ।।

• •

## भरतवाक्य-भैरवी

आतां बंद करतों पोवाड्याला । मागणं शेवटचं शंकराला । लाभो स्वातंत्र्य भारताला । भारत एक देह झाला । हिमाचल-सेतु-बंध त्याला । सिंधुसागर पश्चिमेला । गंगासागर प्राग्दिशेला । भारत आपला देश झाला । लागो हा छंद जनमनाला ॥ ऐकावं देवा ! ॥ १ ॥ रसिकगण जमला ऐकण्याला । आयुरारोग्य देई त्याला । याच जन्मांत याच डोळा । वैभव दिसो भारताला । **पांडुरंग** करतो प्रार्थनेला ।। ऐकावं देवा ! ।। २ ।।

रचना-११-४-१९४६.

# भागानगर ( हैद्राबादचा सत्याग्रह )

## पोवाडा ——— : २८ :

चला आला धर्मावर घाला । वीर किति गेला । सत्याग्रहाला । हैद्राबादी झाला धर्मसंहार । हिंदु धर्माला केलं त्यांनीं ठार । चला किति हिंदु झाले बेजार ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

हिंदुस्थान देश हिंदूचा । हिंदु धर्माचा । हिंदु नीतीचा । कितिक वर्षांचा झाला हा खास । हिंदु धर्माचा नाश करण्यास । हल्ले किति झाले ठाव जगतास ॥ चाल ॥ या धर्मापायीं कितिकांनीं । शिरकमलं तोडलीं हातांनीं ॥ करिं धरली दिव्य समशेर । या धर्मापायीं शिवबांनीं ॥ किति वीर शूर रणधीर । लढतांना झाले रणिं ठार ॥ देबालचा राजा दाहीर ॥ यासाठीं झाला रणिं ठार ॥ तानाजी बाजी रणधीर । संभाजी नांव महशूर ॥ गुरु तेगबहाद्दर थोर । गुरु गोविंदसिंह तेजाळ ॥ दयानंद स्वामिवर थोर । श्रद्धानंद हुतात्मे वीर ॥ आर्य लोक लढवय्ये थोर । धर्मार्थ लढती झुंजार ॥ चाल ॥ अशा कैक वीरांनीं धर्म जतन हा केला ॥ सौख्याची राखरांगोळी करुनिया गेला ॥ वीर भाऊ चालुन गेला रणां-गाणिं पडला ॥ विश्वास बाळही गेला । जनकोजी शिंदे ठार झाला । पंचप्राण धर्माच्या पायीं ओवाळून दिला ॥ तोच धर्म व्याकुळ झाला । निजामानं हिंदु लोकांचा छळ मांडला ॥ माधवराव पेशव्यानं एकदां धडा

दिला त्याला। पण आज तो विसरुन गेला। चला धावा, हिंदु गांजले, त्यांच्या मदतीला ॥ १ ॥

• •

## चौक २ रा

इंग्रजी छत्राच्या खालीं। दैना फार झाली। मायभूमी झाली दासी हातीं पायीं बेड्या अनिवार । आलि अवकळा धर्माला फार । हिंदुधर्माला कुणि न आधार ॥ हिंदुधर्म नष्ट करण्याला । करती किति हल्ला । हैराण केला। निजामानं लावला घोर गळफांस। हिंदु लोकांना देतो बहु त्रास। हिंदुधर्माचा चालला ऱ्हास ! ॥ चाल ॥ अहो, शेंकडा पंचाण्णव प्रजा हिंदु जरि झाली ॥ तरि कोणी नाहीं त्या वाली। घाण्यात्नं गाळावे तसे गळती या काळीं ॥ अधिकारी मुसल्मान छळती हिंदुंना भारी ॥ हिंदूंना कसलीही सत्ता नाहीं या काळीं ॥ जातां येतां गुंड बायकांची करती टवाळी ॥ चाल ॥ मुसल्मान छळती हिंदुला। बाटवती कैक लोकांला । आग लावती घरादाराला। आज कोण मुसलमान आला। चीजवस्त लुटून हो गेला। बायकांशीं अविनय केला। अन् मालकालाच दरडावुन गेला। कीं 'गोष्ट सांगशील कोणाला। तर चिरीन उभा उभा तुला'। अशात्नं जर मालक गेला तक्रार करायला। तर अधिकारी छळती हो त्याला। मोंगलाई कारभार हा झाला। मुसल्मान बांधती मशिदीला । परवाना लागेना त्याला। पण जर हिंदू लागले देऊळ बांधायला। तर परवाना लागतो काढायला। पण परवाना देणार कोण त्याला। तशांत जर परवाना दिलाच। तर सख्त ताकीद बांधणाऱ्याला। कीं देवळाचा कळस जर मशिदीच्या उंच वर गेला। तर देऊळ मिळेल मातीला। जर जन्माला यायचं असेल कुणाला। अन् जर उत्सव करायचा असेल कुणाला। तर मुलाचा कीं मुलीचा जन्मोत्सव-हे पंधरा दिवस आधीं कळवलं पाहिजे सरकारला !!। मोंगलाई कायदा हा झाला !। मरायच्या

आधीं पंधरा दिवस कळवलं पाहिजे सरकारला । अन् प्रेतयात्रेला परवाना पाहिजे घेतला । हे असले कायदे हिंदुला । पण मुसलमान बादशहा झाला ! । मग त्याला धरबंध कसला ? ॥ चाल ॥ वर्षानुवर्ष हिंदूंची अशी धुळदाण । या परकी लोकांनीं केली; गेला अभिमान । गार्यींच्या माना किति तुटती, हिंदूंचे खून ! शिवराय आला जन्माला । नीचांना मार त्यानं दिला । पुढं मराठ्यांनीं छेडलं निजामाला । पर आज फिरला हा काळ । जुलमाचा जाळ जाळी भडकून ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

शें–दीडशें वर्सं हिंदूंचा निजामी राज्यांत असा छळ चालला । घरंदारं, धर्म आणि अब्रू गेली मातीला । पण बोलायची छाती कोणाला । निजामाची भीति सर्वांला । जुलमाचा कळस असा झाला । तंवा **प्रतिकार आला जन्माला** । हिंदु सारा झटन् जागा झाला ॥ चाल ॥ सोलापूर नगर विख्यात । तिथं सभा झाली प्रख्यात ॥ लढण्याचा गंभीर बेत । आर्यांनीं केला सभेंत ॥ रणशिंग फुंकलं जोरांत । चढाईचं निजामी मुलखांत ॥ हिंदु जमले नागपुरांत । **सावरकर** अध्यक्ष त्यांत ॥ पन्नास हजार लोक सदरेंत । पीळ पडला त्यांच्या हृदयांत ॥ जय महादेव गर्जत । रणवीर चालले समरांत ॥ चाल ॥ झडुं लागल्या दुंदुभि चालले वीर झुंजार । निजामाशीं झुंज करण्याला आर्य रणधीर । दाखवायला पुन्हां निजामाला मराठी वार । तळमळती हिंदू ते किती । हाल भोगती । नसे त्या पार ॥ आला हिंदुधर्मावर घाला । पाहतां काय चला । चला समराला । चालले किती वीर झुंजण्याला । मृत्यु-मगरीशीं झुंजण्याला । चला वणव्याशी खेळण्याला ॥ धर्माचा झाला कोंडमारा निजामी राज्यांत । हिंदूंच्या धर्मकृत्यांचा झाला हो अंत । हिंदूंचीं घरं यवनांच्या चाललीं दाढेंत । हिंदूंच्या छातींतुन सुरा । रक्त

घळघळा । नित्य वाहात ॥ चाल ॥ किति बायका पळवुन नेल्या । गुंडांनीं भ्रष्ट हो केल्या ॥ मुली बाळी पळवुन नेल्या । घरोघरीं हाहाकार झाला । कोणी वाली नाहीं कोणाला । जुलमाचा कळस असा झाला ॥ तंवा चालले वीर झुंजेला ॥ चाल ॥ मायपाश सारे तोडून । किति आर्य आले धावून ॥ लहानथोर योद्धे होऊन । लढाईला चालले धावून ॥ हातीं भगवा झेंडा घेऊन । सत्याची ढाल बांधून । दहा हजार शूर लढवय्या । तुरुंगाच्या जबड्यांत गेला ॥ मोठमोठे झुंजाराहे चालले धर्मयुद्धाला । कवळीं पोरं चाललीं युद्धाला । किति तरुण चालले युद्धाला । म्हातारे काठी टेकत चालले युद्धाला ॥ वीर **यशवंतराव जोशांनीं** लढा उभा केला ! ॥ हा पहिला लढवय्या पुढं जंवा झाला । तंवा छळलं नीचांनीं त्याला । चाबकाचे फटके अंगाला । अंधारकोठडी राहायला । भले शाबास वीरा लढवय्या मुजरा हा तुला ॥ तूं पहिला बंडवाला खरा । आग लावलीस घरादाराला अन् धावलास झुंज द्यायला । धर्माची ढाल, तलवार धैर्याची तुला ॥ तुझं रक्त सांडलं भूमिला । पण रक्ताच्या जळत्या थेंबांनीं वणवा पेटवला ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

दहा हजार वीर खिचपत । निजामी तुरुंगांत । हाल किति होत । सांगतों मी आतां ऐका वृत्तान्त । चौदा वीरांचा झाला हो अंत । चला धावून मनीं जर खंत ॥ चाल ॥ जेव्हां वीर निजामी हद्दींत जाती लढण्याला ॥ तंवा त्यांना पकडून देती घोर शिक्षेला ॥ मग नेती त्यांना तुरुंगाला । तिथं काय प्रकार झाला । अधिकारी सारे मुसलमान छळती वीरांला ॥ दोन दोन दिवस झाले तरि खाणं नाहीं कोणाला ॥ उपासमार रोजची जीवाला । कपडे न अंग झाकायला । धड जागा नाहीं

झोपायला। सापांचा संचार झाला। शिपाई देती लाथा-बुक्क्यांला। अशांत एकदां प्रकार काय झाला। कीं औरंगाबादच्या तुरुंगाला। उपासमार झाली पोटाला। जीव सारा कासावीस झाला। तंवा वीर बोलले तुरुंग्याला ( जेलराला )। "कांहीं तरी द्यावं खायला। दोन दिवस उपास सोसला। पण आतां कंठीं प्राण आला"। पण विचारपूस करतो कोण बोला ?। तंवा चिडून दाद लावून घ्यायला। वीरांनीं सत्याग्रह केला। त्याचा सूड घ्यायला। एके दिवशीं एका रात्रीला। खोल्यात्नं डांबलं सर्वांला। दहा वाजतां रात्रीच्या वेळा। पांचपन्नास शिपाई लोक आला। अन् वीरांना लागले चोपायला। खोल्यात्नं काळोख केला ॥ अन् काठीनं फोडलं सर्वांला। निःशस्त्र वीर पाहुन केला भ्याड हल्ला ॥ दंडा बेडी घातली कोणाला। हातबेड्या घातल्या कितिकाला। डोक्यावर काठीचा मारा। बुक्क्यांचा मार नाकाला। रक्ताचा सडा भूमिला। कितिकांना झीट हो आली त्याच वेळेला। धोंडूमामा साठे लढवय्या घायाळ झाला। धाक घातला आण्णासाहेबाला। 'कीं तुमको भी ठीक करेंगे !॥ आर्यांचा बळि किति पडला। किति कण्हती रडतो त्या वेळा। किति जखमा झाल्या वीराला। पण मलमपट्टी नाहीं कोणाला। असा औरंगजेबी जुल्म आज झाला। कुमार कांति सोलापुरचा वीर। बारा वर्षांचं वय सुकुमार। त्याला नेलं तुरुंगाच्या आंत। अन् दिले फटके जोरात रक्तबंबाळ ॥ तंवा नरपशु बोलला बाळाला। 'बोल हिंदुस्थान कौनका ? हिंदूका ?" असं म्हणून फटका एक दिला। वेताच्या काठीनं काढलं मांसाचा गोळा ॥ असा फटका फटक्यावर दिला। पण बाळ गंभीर झाला। टिपुस सुद्धां नाहीं डोळ्याला। तंवा शस्त्र रोखून नीच बोलला बाळाला। "काफर साला ! बोल हिंदुस्थान मुसलमानका"। असं म्हणून शस्त्र परजुन त्यानं हात धरला ॥ पण वीर बाळ गरजला। "नाहीं ! नाहीं ! हिंदुस्थान हिंदुओंका, नहिं किसीका बापका"। जणु बाल संभाजी झाला। असे कडवे बोल ऐकून शिपाई लाल झाला। अन्

सपासप फटके त्यानं मारले वीर बाळाला ॥ तंवा बाळ बेशुद्ध झाला । पण तसंच कोंडलं हो त्याला । अन् तो राक्षस निघून गेला । पुढं चक्कीचं काम दिलं त्याला । अतोनात छळलं बाळाला । पण बच्चा दबला नाहीं त्याला । रक्ताचा सडा घालून धन्य तो झाला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

आषाढी एकादशी धर्मदिवस हिंदूंचा । देवाच्या नांवें गुंगून दंग राहण्याचा । पण तेच दिवशीं गुंडांनीं दंगा भयंकर केला । वर्णन त्याचं करण्याला शाहारा हो आला ॥ गुंडांनीं हैद्राबादेंत दंगा सुरुं केला । संध्याकाळीं सहाचे वेळेला । तीनशें मुसलमान जमा झाला । हातीं घेऊन लाठी तलवारीला । महबुबपुरा रस्त्यावरनं वकील वाडीकडे गेला ॥ रस्त्यांत जो जो हिंदु दिसला । त्याला त्याला लाठीमार दिला । शंकरराव कळवेकरांच्या घरावर हल्ला त्यांनीं केला ॥ दार लागलें फोडायला । पण दरवाजा खंबीर झाला ! । मग गेले सुंदर भुवनवाडीला । तिथं त्यांनीं आक्रांत केला । खिडक्यांचा चक्काचुर केला । विटा दगड फेकती भरभरा । जवळच निजामी पोलीस पहाऱ्याला । पण तो तसाच उभा राहिला । गवळी गुड्याकडं गुंड गेला । तिथं मोटार-ड्रायव्हरच्या घरावर हल्ला । भिंतीवरनं गुंड घरांत आला । पन्नास साठ होते गणतीला । आंत भाऊ पुजा करातं बसला । गुंडांना मारलं सर्वांला । ट्रंका फोडून पैसा सारा लुटला । अन् भावाचीं तीन बोटं कापलीं त्यांनीं त्या वेळा ॥ इकडं जंगली विठोबाच्या देवळांत प्रकार काय झाला । देवाच्या मिरवणुकीला रथ होता तयार केला । त्यावर केला गुंडांनीं हल्ला । अन् रथ छिन्नभिन्न पार केला ! । तंवा लक्ष्मणाचार्य ऐंशी वर्षांचा पुजारी धावत आला । त्याला गुंडांनीं लाठीमार दिला । एकानं ठोसलं नाकाला । दुसऱ्यानं तलवारीचा वार केला ।

तंवा म्हातारा घायाळ झाला ! देवदर्शनासाठीं जो जो आला । त्याला त्याला त्यांनीं मार दिला । कपाळाच्या झाल्या चिथड्या डोळा हा फुटला ॥ गालांतनं रक्त, कितिकांच्या आलं वळवळा ॥ तोंडांतनं गुळण्या रक्ताच्या झाल्या कितिकाला । वीस पंचवीस बायका आल्या होत्या देवदर्शनाला । तंवा काय प्रकार झाला । पांच पन्नास गुंड मोटारींत चढला । अन् त्यांनीं मारलं बायकापोरांला । अन् बायकासकट मोटारवाला कुठं गेला याचा पत्ता नाहीं कोणाला । शिपाई होता बाजूला । पण नुसता बघत उभा राहिला ! । असा असला प्रकार तिथं आज चालला । जुलमाचं रूप घेऊन औरंगजेब आला । हैद्राबादच्या हिंदुंवर घाला । पण तो समजा आपणावरच झाला । हिंदुस्थान हिंदुंचा झाला । जसे शरिराच्या एका बोटाला । जर कुठं काटा लागला । तर सारा देह कासाविस झाला । तस जर एका हिंदुवर घाला आला । तर सारा हिंदु पाहिजे धांवला । हिंदु म्हणून जगणार कीं मरणार । असा सवाल आज मी केला । 'मला काय त्याचें' वृत्तीला । चला गाडा पार रसातळाला । जर असेल मानानं आतां जगणं तुम्हांला । तर निकराचा लढा पाहिजे केला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

हिंदूंचा देश हा राहील आज नांवाला । परक्यांचा सुळसुळाट साऱ्या देशभर झाला । पंचवीस कोटि हिंदु पर भांडाभांडीनं मेला । जातिभेद घेती जीवाला । हिदूंच्या झाल्या चिरफाळ्या, बोल दैवाला ! ॥ कुणि म्हणती ब्राह्मणांनीं सारा देश बुडविला । कुणि म्हणती क्षत्रियांनीं क्षात्रधर्म दान केला । कुणि म्हणती वैश्य घरबुडवे । चालला गलबला ! सगळ्यांनीं देश बुडविला । फितुरांनीं देश बुडविला । परक्यांनीं द्वेषबुद्धीचा जाळ पसरविला ! ॥ आमच्यांत फूट

पाडून परका घरिं आला । आधीं पाहुणा म्हणून तो आला । तोच मालक घराचा हो झाला । अन् मालकाला लावलं देशोधडीला । बाराशें वर्सं झालीं त्याला । इसवी सन आठव्या शतकाला । महंमद कासीम सिन्धमधिं आला । पण हिंदु सारा उदासीन राहिला । म्हणून त्यानं जिंकलं सर्वांला । हिंदूचीं मुंडकीं कापुन ढीगच्या ढीग केला ॥ किति बायका मुकल्या शीलाला । बळजबरी करून किति बायका नेल्या देशाला ॥ डोळ्यांदेखत नेल्या पर चेव येईना कोणाला ! ॥ अल्लाउद्दीन खिलजी मग आला । त्यानं रक्ताचा सडा घातला । कितिकांनीं झुंज दिली त्याला । पद्मिनीनं जोहार केला । किति वीर झुंजतां झुंजतांना रणीं ठार झाला ! ॥ महंमद गझनी चालुन आला । त्यानं असाच हाहाकार केला । सोरटी सोमनाथ पाडलं धरणीला । देवळांचा विध्वंस केला । त्या जागीं बांधलं मशिदीला । पुढं बाबर आला देशाला । त्यानं असाच चुराडा केला । जंवा अकबर आला गादीला । तंवा राणा प्रताप देतो झुंजेला । पुढं अवरंगजेब बादशहा झाला । त्यानं तरी कहरच केला । चार परके त्याच सुमाराला । आले दक्षिण देशाला । अन् लागले राज्य करायला । चार सुऱ्या घुसल्या हिंदूच्या अंगिं त्या वेळा ॥ तीन सुऱ्या गंजुन गेल्या । पण निजामाची सुरी जी घुसली त्या वेळेला । ती आजपर्यंत कापती हृदयाला । मानेवरती हिंदूच्या बसलीं भुतं वेळोवेळा ॥ तंवा त्यांना चोपायाला । मागं **एक पंचाक्षरी** आला होता जन्माला । जिजाईनं जन्म दिला त्याला । त्याच्यासाठीं तानाजी मेला । त्याच्यासाठीं बाजी ठार झाला । त्याच्यासाठीं मुरारबाजी गेला । शाहिस्तेखानाच्या मानगुटीवर तो बसला । अफझलखान त्यानं ठार केला । अवरंग्याला चकवून तो आला । पुढं **दुसरा पंचाक्षरी** आला । त्यानं झेंडा नेला दिल्लीला । तंवा भुतं गेलीं भूतलोकाला ॥ हिंदुनो ! स्मरा इतिहास आज या वेळा ॥ ६ ॥

• •

तंवा म्हातारा घायाळ झाला ! देवदर्शनासाठीं जो जो आला । त्याला त्याला त्यांनीं मार दिला । कपाळाच्या झाल्या चिंधड्या डोळा हो फुटला ।। गालांतनं रक्त कितिकांच्या आलं घळघळा ।। तोंडांतनं गुळण्या रक्ताच्या झाल्या कितिकाला । वीस पंचवीस बायका आल्या होत्या देवदर्शनाला । तंवा काय प्रकार झाला । पांच पन्नास गुंड मोटारींत चढला । अन् त्यांनीं मारलं बायकापोरांला । अन् बायकासकट मोटारवाला कुठं गेला याचा पत्ता नाहीं कोणाला । शिपाई होता बाजूला । पण: नुसता बघत उभा राहिला ! । असो असला प्रकार तिथं आज चालला । जुलमाचं रूप घेऊन औरंगजेब आला । हैद्राबादच्या हिंदुंवर घाला । पण तो समजा आपणावरच झाला । हिंदुस्थान हिंदुंचा झाला । जसे शरिराच्या एका बोटाला । जर कुठं काटा लागला । तर सारा देह कासाविस झाला । तस जर एका हिंदुवर घाला आला । तर सारा हिंदु पाहिजे धांवला । हिंदु म्हणून जगणार कीं मरणार । असा सवाल आज मी केला । 'मला काय त्याचें' वृत्तीला । चला गाडा पार रसातळाला । जर असेल मानानं आतां जगणं तुम्हांला । तर निकराचा लढा पाहिजे केला ।। ९ ।।

● ●

## चौक ६ वा

हिंदूंचा देश हा राहील आज नांवाला । परक्यांचा सुळसुळाट साऱ्या देशभर झाला । पंचवीस कोटि हिंदु पर भांडाभांडीनं मेला । जातिभेद घेती जीवाला । हिदूच्या झाल्या चिरफाळ्या, बोल दैवाला ! ।। कुणि म्हणती ब्राह्मणांनीं सारा देश बुडविला । कुणि म्हणती क्षत्रियांनीं क्षात्रधर्म दान केला । कुणि म्हणती. वैश्य घरबुडवे । चालला गलबला ! सगळ्यांनीं देश बुडविला । फितुरांनीं देश बुडविला । परक्यांनीं द्वेषबुद्धीचा जाळ पसरविला ! ।। आमच्यांत फूट

पाडून परका घरिं आला । आधीं पाहुणा म्हणून तो आला । तोच मालक घराचा हो झाला । अन् मालकाला लावलं देशोधडीला । बाराशें वर्सं झालीं त्याला । इसवी सन आठव्या शतकाला । महंमद कासीम सिन्धमधिं आला । पण हिंदु सारा उदासीन राहिला । म्हणून त्यानं जिंकलं सर्वांला । हिंदूचीं मुंडकीं कापुन ढीगच्या ढीग केला ॥ किति बायका मुकल्या शीलाला । बळजबरी करून किति बायका नेल्या देशाला ॥ डोळ्यांदेखत नेल्या पर चेव येईना कोणाला ! ॥ अल्लाउद्दीन खिलजी मग आला । त्यानं रक्ताचा सडा घातला । कितिकांनीं झुंज दिली त्याला । पद्मिनीनं जोहार केला । किति वीर झुंजतां झुंजतांना रणीं ठार झाला ! ॥ महंमद गझनी चालुन आला । त्यानं असाच हाहाकार केला । सोरटी सोमनाथ पाडलं धरणीला । देवळांचा विध्वंस केला । त्या जागीं बांधलं मशिदीला । पुढं बाबर आला देशाला । त्यानं असाच चुराडा केला । जंवा अकबर आला गादीला । तंवा राणा प्रताप देतो झुंजेला । पुढं अवरंगजेब बादशाहा झाला । त्यानं तरी कहरच केला । चार परके त्याच सुमाराला । आले दक्षिण देशाला । अन् लागले राज्य करायला । चार सुऱ्या घुसल्या हिंदूच्या अंगिं त्या वेळा ॥ तीन सुऱ्या गंजुन गेल्या । पण निजामाची सुरी जी घुसली त्या वेळेला । ती आजपर्यंत कापती हृदयाला । मानेवरती हिंदूच्या बसलीं भुतं वेळोवेळा ॥ तंवा त्यांना चोपायाला । मागं **एक पंचाक्षरी** आला होता जन्माला । जिजाईनं जन्म दिला त्याला । त्याच्यासाठीं तानाजी मेला । त्याच्यासाठीं बाजी ठार झाला । त्याच्यासाठीं मुरारबाजी गेला । शाहिस्तेखानाच्या मानगुटीवर तो बसला । अफझलखान त्यानं ठार केला । अवरंग्याला चकवून तो आला । पुढं **दुसरा पंचाक्षरी** आला । त्यानं झेंडा नेला दिल्लीला । तंवा भुतं गेलीं भूतलोकाला ॥ हिंदुनो ! स्मरा इतिहास आज या वेळा ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

मग परका इंग्रज आला। हुशार फार झाला। भेद सुरु केला। उरला सुरला देश गटम् केला। पैसा पाण्यासारखा लुटून नेला! हिंदु मुसलमान दूर केला ॥ चाल ॥ इंग्रजी राज्यानं देश शुष्क जरि केला॥ तरि इंग्रज बरा पण मुसलमान नको असं झालं आहे सर्वांला। निराशेचा अंधार झाला। मुसलमान चढेल फार झाला। देऊ लागलाय पीडा हिंदूला। मुसलमान थोडा जरि झाला। तरि सवलती दिल्या फार त्याला। तरि समाधान नाहीं त्याला। पाकस्थान करण्याचा त्यांनीं घाट घातला। मुसलमान तेवढा सारा एक आहे झाला। राव रंक गरीब श्रीमंत सारा एक झाला। हिंदुंनो! सवाल तुम्हाला। जर आपसांत भांडाभांडी कराल आज या काळा। तर समजा नाश सर्वाचा लवकरच झाला॥ चला एका झेंड्याखालीं चला। लहानथोर गरीब-श्रीमंत भेद दूर करा॥ हिंदूच वैरी हिंदूला। घरबुडवे आले जन्माला। हिंदूंच्यापेक्षां मुसलमान जवळचे त्याला। हिंदु-मुसलमान एकीचा ध्यास जीवाला॥ पण यश येईना त्याला। मुसलमान शिरजोर झाला। मोठमोठा महात्मा हाय खाऊन बसला। झाला बुद्धिभ्रंश हो त्याला। नंगानाच भुतांनीं चालवला। त्याला ताळ्यावर आणायला। आज एक **तिसरा पंचाक्षरी** आला॥। जन्माला॥ सरकारानं पन्नास वर्सं शिक्षा दिली त्याला। अन् पाठवलं अंदमानाला। भुतंच भुतं अंदमानाला। एक भुतांचा राजा झाला। त्यानं छळलं फार त्याला। त्याचा त्यानं बंदोबस्त केला। चौदा वर्सं होता अंदमानाला। तिथ्नं रत्नागिरी तुरुंगाला। मग आला येरोड्याला। तिथ्नं किल्ली कुलपातनं बाहेर आला। तो **हिंदुसभेचा अध्यक्ष** झाला। कितीकांचा नक्षा उतरवला। मी मी म्हणणारा धूम पळून गेला!। लुंगीवाला घाबरून गेला। दाढीवाला लागला दाढी चोळायला। पिशाच्यांचा मेळा पार दडुन बसला। असा **पंचाक्षरी** आलाय भुतं

काढायला। आतां निजामावर मोर्चा फिरवला। सारे पाश तोडुनी चला। वर पांगी सोडा ढोंगाला। कर जोडुन सांगतों तुम्हांला। कीं आतां त्याच्या झेंड्याखालीं चला। संग्राम आलाय रंगाला। निजाम आलाय रंजीला। श्रीकृष्ण साहाय्य कार्याला। जर नसेल हें शक्य तुम्हांला। तर द्यावा **पैसा** कार्याला। जर नसेल शक्य तुम्हांला। तर द्यावं **चित्त** कार्याला। पण करूं नका द्रोह स्वजनांचा आज या वेळा॥ देई देवा यश युद्धांत विनति चरणाला॥ **पांडुरंग** वीर पुरुषांचा शाहीर झाला॥ ७॥

रचना-एप्रिल १९३९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# यांचा

# पोवाडा ————————: २५ :

दलितांचा केला उद्धार । भला आधार । खरा झुंजार । कीर्ति ही गेली दिगंतीं खास । दलितसेवेचा लागला ध्यास । **पांडुरंग** गातो त्याच्या कवनास ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

१८९१ सालास । १४ एप्रिलास दापोली गांवास । पराक्रमी **भीम** आला जन्मास । अजरामर झाला वंद्य सर्वांस । धन्य धन्य झाला वंश तो खास ॥ जी ॥ भीमाचे वडील रामजी होते सुभेदार ॥ भीमाची आई भीमाबाई धार्मिक थोर ॥ भीम होता सहा वर्षांचा । तेव्हां आई गेली परलोका सोडुनी पोर ! ॥ **मीरा** आत्या भीमाचा करी मोठा सांभाळ ॥ भीमाला भिवा ती म्हणे लाडकें पोर ॥ **मंजुळा तुळशी** या बहिणी असा संसार ॥ **बळराम आनंदराव** भाऊ भीमाचे थोर ॥ लष्करी शाळेचे **रामजी** हेडमास्तर ॥ पेन्शनर झाल्यावर आले सातारा शहराला: ॥ भीम लागला तिथं शिकायला । आंबेडकर मास्तरांनीं त्याला **आंबेडकर** आडनांव दिलं भीमबाळाला ॥ १ ॥

●

### चौक २ रा

एकदां काय प्रकार झाला । भीमाला जायचं होतं गोरेगांवाला । आनंदराव होते सोबतीला । भाऊ भाऊ बसले गाडींत एका दिवसाला ॥

**मसूर** स्टेशन आल्यावर उतरले तीघेजण गोरेगांवला जाण्याला ।। एक बैलगाडी उभी होती बाहेरच्यां हो बाजूला ।। गाडींत पटापट मुलं चढली त्या वेळा ।। बैलगाडी चालली गोरेगांवला । संध्याकाळचा सुमार झाला । गाडीवान् होता वारकरी । " विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म " बोलला ।। तोंडातनं अभंगाचा सारखा सपाटा चालला ।। त्यानं विचारलं त्या दोघाला । "अरे कुणाकडं जायचं तुम्हांला ? " ।। "रामजीकडं" आवाज उमटला । "अरं त्यो म्हार रामजी तर न्हवं ना ?" ।। "हं तोच ! आमचे ते वडील, त्यांच्याकडे जायचं आम्हांला" । गाडीवान् भडकून गेला । त्याला वाटलं भ्रष्टाकार झाला । अन् तो गर्जून बोलला । "कारट्यांनो ! विटाळ झाला मला । अन् माझ्या गाडीला अन् बैलाला । चला, उतरा गाडी खाली करा । नाहींतर चाबकानं फोडतो या वेळा । जर असंच नेलं तुम्हांला । तर गांवकरी वाळींत टाकतील मला । कारटयांनो धर्म बुडविला" । तंवा भीम बोलूं लागला । "गाडीवान् दादा, रात्रीचं राहावं कुठं बोला ? । पाहिजे तर दुप्पट भाडें घ्या पण गांवांत नेऊन सोडा आम्हांला ।। दोन रुपये भाडं जास्त देऊं । पण एवढे उपकार करा" । रुपयांच्या नादानं गाडीवान् गार झाला । अन् लागला बोलायला । "पोरांनो ! इकत्या रात्रीं कुठं सोडून जाऊं रे तुम्हांला । माझ्या लेकरावाणी तुम्हीं रे मला । देवाच्या घरीं समदं सारखंच । चला घेऊनशान जातों तुम्हांला । नेतों तुम्हां सर्वांला । गोरेगांवला गेलीं तीं मुलं त्याच रात्रीला ।। २ ।।

● ●

## चौक ३ रा

इंग्रजी शिक्षण घेण्यासाठीं आला **भीम** हा मुंबईला । एल्फिन्स्टन् हायस्कूलच्यामध्यें भीम गेला हा शिकण्याला । परळ भागांत बिऱ्हाड केलें एक खोली ती राहण्याला । जेवणखाणं निजणं बसणं सामानसुमान-

त्या जागेला ॥ भांडींकुंडीं लांकडें गोवऱ्या एकाच खोलींत हे सारे ॥ दळायचं जातं होतं उशाला, पायाजवळ होतें बकरें ॥ घरची अडचण अशी जाहली हायस्कुलांतहीं सुख नाहीं । जातिविषाचें वीष पसरलें होतें दाहक तें पाहीं ॥ चाल ॥ वर्गात होता एक फळा । खाण्याचे डबे त्यामागें होते त्या वेळा । गुरुजी बोलले भीमाला । "आंबेडकर, फळ्यावर लिही जा आतां या वेळा" ॥ गुरुजींनीं खडू दिला त्याला । अन् हा भीम तिकडं चालला । तंवा विद्यार्थ्यांनीं गिल्ला केला । अन् पटपटा डबे उचलले त्यांनीं त्या वेळा ॥ कां तर विटाळ होईल अन्नाला । तो घाव वर्मी लागला । संस्कृत शिकायचा विचार भीमानं केला । पण ते शिकवेना कोणीही त्याला । १९०७ सालाला । मॅट्रिकची परीक्षा झाली पास जाहला ॥ आनंदीआनंद झाला । तंवा भीमाचं कौतुक करण्याला । एक सभा झाली त्या वेळा । भीमाचा गौरव केला । तंवा केळुस्कर मास्तरांनीं त्याला । बुद्धाचं चरित्र दिलं भेट त्या वेळा ॥ तेव्हांपासून बुद्धाचा छंद लागला हृदयाला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

एल्फिन्स्टन् कॉलेजांत गेले **भीमराव** मग शिकण्याला । सयाजीराव महाराज धुरंधर करती मदत त्या वेळेला ॥ १९१२ सालाला । बी. ए.ची परीक्षा दिली आनंद झाला । मग पुढचा अभ्यास करण्याला । १९१३ सालाला । भीमराव गेले **अमेरिकेला** । **कोलंबिया विद्यापीठांत** अभ्यास केला ॥ तिथं भेदाभेद दिसेना डोळ्याला । नवं जग दिसलं डोळ्याला । खूप खूप अभ्यास केला । अन् १९१५ सालाला । M. A. ची पदवी लाभली भीमरावाला । १९२४ सालाला बॅरिस्टरची पदवी भूषवी भीमरावाला ॥ Ph. D. पदवी ही आली भेट देण्याला ॥ भारतांत आले

भीमराव आनंद झाला ॥ दलितांचा कैवारी झाला । दलिताची उन्नती हाच छंद हृदयाला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

कुलाबा जिल्हा कोंकणांत । आहे **महाड** तालुका त्यांत ॥ १९२७ ला । मार्च १९, २० तारखेला । अस्पृश्य परिषद भरली महाड गांवाला ॥ बाबासाहेब अध्यक्षपदाला । हज्जारों अनुयायी होता तेथें जमलेला ॥ चवदार तळें गांवाला । पण त्या तळ्यावर जाण्याची बंदी होती दलितांला ॥ त्या तळ्यांत्लं पाणी होतं खुलं मुसलमानाला ॥ पाणी होतं खुलं खिश्चनांला । पण पाणी नव्हतं खुलं दलिताला । तेव्हां सत्याग्रह करण्याचा ठराव सभेमधिं.झाला । अन् हज्जारों वीर चालले तळ्याच्या बाजूला ॥ तारीख २० मार्चच्या दिवसाला । पाण्याचा सत्याग्रह झाला । आंबेडकर होते आघाडीला । हज्जारों वीर पाठीला । आंबेडकरांनीं इषारा दिला । अन् त्या वीरांनीं पाण्याला हात लावला । अन् पाणी पिऊन फिरले माघारे वीर त्या वेळा ॥ वीरेश्वर मंडपांत होता जमाव बसलेला ॥ इतक्यांत प्रकार काय झाला । गांवांतल्या हिंदूंनीं हल्ला जोराचा केला । अन् काठ्यांचा मारा थडाथडा त्यांच्यावर झाला ॥ पुन्हां डिसेंबरांत सत्याग्रह झाला । १५००० अनुयायी होता तेथें जमलेला ॥ दुकानदारांनीं बहिष्कार घातला । कुठं जागा मिळेना सभेला । तेव्हां एक मुसलमान पुढं झाला । अन् त्यानं दिली जागा सभेला । खाण्यापिण्याचा सारा माल बाहेरून आणला । तेव्हां **भीमराव सिंह** गरजला । तळं काबीज करूं तेव्हांच मागें फिरूं । नाहींतर मरून जाऊं । **केशवराव जेधे** मदतीला । **दिनकरराव जवळकर** आले मदत करण्याला ॥ असा मोठा मेळावा तळ्याकडं चालला ॥ पण सरकारनं १४४ कलमांचा होता पुकारा केला । कलेक्टर आले त्या स्थळा । अन्

बोलले साऱ्या लोकांला । " आतां जरा सबूरीनं चला । चवदार तळें हें खाजगी, असा दावा कोर्टांत आहे चालला । त्याचा निकाल होई तों थांबा-हेंच हिताचं होईल तुम्हांला " । तंवा सत्याग्रह मागं घेतला । पण भडकलेल्या तरुणांनीं भडक प्रकार काय केला । मनुस्मृति ग्रंथ जाळला । या ना त्या रूपानं राग बाहेर आला ।। कोर्टानं निकाल पुढं दिला । **चवदार तळं खुलं झालं साऱ्या जनतेला** ।। ५ ।।

● ●

## चौक ६ वा

२ मार्च १९३० ला । अस्पृश्यसभा एक भरली नाशीक शहराला। १५००० लोक जमा झाला। बाबासाहेब अध्यक्षपदाला । **बाळासाहेब खेर** आले होते भाग घेण्याला । काळाराम मंदिरांत शिरणें-हा सत्याग्रह सुरू झाला । हज्जारों सत्याग्रही चालले त्याच बाजूला ।। देवळाच्या जवळ झुंजार येऊन पोंचला ।। देवळाच्या चालकांनीं बंद दरवाजा केला ।। **रामालाच** टाकलं तुरुंगांत त्यांनीं त्या वेळा ।। रामनवमीचा दिवस उगवला । रामाचा जन्म जाहला । रामाचा रथ ओढण्याचा वेळ जंवा झाला । तंवा स्पृश्यास्पृश्य सर्वांनीं रथ ओढावा असा सल्ला मॅजिस्ट्रेटानं दिला । रथयात्रा सुरू होणार । इतक्यांत प्रकार काय झाला। मारामारी झाली सुरू सारा गोंधळ झाला ।। बाबांच्या डोक्यावर मारा दगडांचा झाला ।। तेव्हां मंदिरच एक वर्ष बंद ठेवण्याचा चालकांनीं विचार केला । पुढं १९३५ सालाला । **काळाराम मंदिर** खुलं झालं साऱ्या जनतेला ।। ६ ।।

● ●

## चौक ७ वा

गोलमेज परिषद तीनदां भरविली लंडन शहरीं साहेबानं । भारतीयांना हक्क देण्याला विचारविनिमय तो करून ।। अस्पृश्यास्तव

स्वतंत्र मतदार संघ मागणी बाबांची । मतदारसंघ एक असावा अशी याचना गांधींची ॥ चाल ॥ २० ऑगस्ट १९३२ ला । जातीय निवाडा दिला । अस्पृश्यांचा मतदारसंघ वेगळा केला ॥ बाबांना आनंद झाला। पण गांधीजींच्या काळजाचे झाले तुकडे त्या वेळा ॥ येरवड्याच्या तुरुंगांत होते गांधी त्या वेळा । त्यांनीं हा निवाडा रद्द करायला। तुरुंगांत उपास सुरू केला । २० सप्टेंबर १९३२ ला । राष्ट्राला पेंच हा आला । डॉ. आंबेडकर आले भेटायला २२ तारखेला । अन् एकच मतदारसंघ ठेवण्याचा करार केला । येरवडा करार म्हणती हो त्याला । ता. २४ सप्टेंबरच्या दिवसाला । ब्रिटिश सरकारनं सम्मति दिली त्याला । तंवा २६ सप्टेंबरला । गांधीजींनीं उपास सोडला । राष्ट्राचा जीव बचावला आनंद झाला ॥ चाल ॥ घटना भारती तयार करायला । समिति एक आली जन्माला । डिसेंबरच्या ९ व्या तारखेला १९४६ सालाला ॥ २९ ऑगस्ट १९४७ ला । घटना पोटसमितीचे अध्यक्ष झाले बाबा त्या वेळा ॥ रात्रंदिवस कष्ट फार करून । भारताची घटना केली तयार त्यांनीं त्या वेळा । ( ४ नोव्हेंबर १९४८ ला ) । अन् २६ जानेवारी १९५० ला । ती घटना आली अमलांत आनंद झाला ॥ **घटनेचे मनु बाबासाहेब** लौकिक हा झाला ॥ ७ ॥

● ●

## चौक ८ वा

हिंदुधर्माचा त्याग कराया बाबा झाले तय्यार । बुद्धाचें आकर्षण भारी, तोच धर्म झाला प्यार ॥ १९५६ सालाला । १४ आक्टोबरच्या दिवसाला । बाबांनीं बौद्ध होण्याचा दिवस ठरविला ॥ नागपूर शहर निवडलं याच कार्याला । बुद्धधर्म समानतेचा धर्म साऱ्या जगाला ॥ मानवता याच धर्मांत दिसे डोळ्याला ॥ दसऱ्याचा दिवस निवडला । २५०० वर्षें झालीं होतीं बुद्धाच्या निर्वाणकाळाला । म्हणून १९५६

हे वर्ष केलं पसंतीचं याच कार्याला ॥ अंबादरी रस्त्यावर मोठा मंडप घातला ॥ एक लाख हरिजन आले होते त्या वेळा ॥ मंडपांत व्यासपीठ होतें एका बाजूला ॥ बुद्धाची मूर्ति होती ठेवली उंच भागाला ॥ दोन सिंह दोन्ही बाजूला । फुलं आणि धूपदीप यांचा वास दरवळला ॥ सकाळीं झाला सोहळा । ८० वर्षं ज्यांच्या वयाला । असे ब्रह्मदेशाचे बुद्धभिक्षु **चंद्रमणी** हे देती बौद्धदीक्षेला । नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा सम्बुद्धस । अशी केली सुरवात मंत्राला । अन् बाबासाहेब पत्नीसह घेती बौद्ध दीक्षेला ॥ बुद्धाच्या पायावर तीनदां केलं नमनाला ॥ मग त्या लाख लोकांनीं बुद्धधर्म घेतला ॥ बुद्धं शरणं गच्छामि । धम्मं शरणं गच्छामि । संघं शरणं गच्छामि । अशा तीन शरणांचा तीनदा उच्चार केला । अहिंसा, अस्तेय, अव्यभिचार । सत्य आणि शुद्धाहार या पांच शीलांचा बोध सर्वांना केला ॥ ८ ॥

• •

## चौक ९ वा

बौद्धधर्माची दीक्षा घेऊन दोन महिने नाहीं झाले । तोंच काळानें झडप टाकुनी बाबांना ओढुन नेलें ! ॥ चिंता राक्षसी हाल भयंकर श्रम ते केले अनिवार । शरीर त्यांचें पिचुनी गेलें रक्तदाबाचा बहु जोर ॥ जी ॥ गुरुवार ता. ६ डिसेंबर १९५६ सालाला । भीमहिरा हा पिचुनी गेला दया नसे मुळिं काळाला ॥ चाल ॥ बाबासाहेब होते दिल्लीला ॥ गुरुवारीं सकाळीं सहा वाजायला । चहा घेऊन त्यांचा गडी आला चहा देण्याला ॥ तो प्रकार दिसला: काय त्याला । जीवज्योत होती मावळली त्यांची त्या वेळा ॥ हां हां म्हणतां बातमी पसरली जागोजागेला ॥ संसद ( पार्लमेंट ) बंद ठेवलें मान देण्याला । हाहाकार सगळीकडं झाला । सारा भारत गहिंवरून गेला । नवबौद्ध तर आकुळ व्याकुळ झाला । आईचं दुःख जसं तसं दुःख सर्वांला ॥ रात्रीं दहा वाजतां

त्यांचा देह डाकोटा विमानांत ठेवला । अन् तें विमान चाललं मुंबईला । रात्रीं दोनच्या ठोक्याला । तें विमान पोंचलं मुंबईला । देह आणला राजगृहाला । डिसेंबर सातव्या तारखेला । दुपारी तीनच्या सुमाराला । अंत्ययात्रा चालली हळूहळू समुद्रकांठाला । पांच लाख लोक होते जमलेले अंत्ययात्रेला ॥ दादरची चौपाटी भरली गच्च त्या वेळा ॥ हारांचा ढिगारा झाला । पुष्पांचा वर्षाव चालला । संध्याकाळीं सूर्य चालला मावळायला । अन् चंदनाच्या चितेवर देह त्यांचा ठेवला ॥ बुद्धं सरणं गच्छामि–असा घोष दुमदुमुन गेला । बाबांचा देह पांचांत मिळुनिया गेला ॥ जी ॥ आज देह नष्ट जरि झाला । तरि कीर्तीनं कानाकोपरा भरून राहिला ॥ धन्य धन्य बाबांचा जन्म धन्य जाहला ॥ **पांडुरंग** शाहीर आला कवन गाण्याला ॥ ९ ॥

रचना–२९–३–१९६०.

## स्वातंत्र्याची पहाट !

## पोवाडा —————— : २६ :

सोनियाचा दिवस आला। कष्ट आले ते फळाला ।। चाल ।। गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून।। हाल झाले अती। परि नव्हती भीती। जनतेनं केला होता पण ।। गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून ।। केली मोठी चळवळ। मनामधीं तळमळ। स्वराज्याची हो लागली तहान ।। गेली० ।। एक लागला छंद। जन झाले हो दंग। आतां झाला आनंद। घरोघरीं उभारा तोरण। गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून ।। चाल ।। १८१८ सालाला। दुर्भागी हा भारत अपुला ।। पारतंत्र्यकर्दमांत रुतला। गुलामगिरीचा फास गळ्याला। परवशेतचा जाच मनाला। गुलाम म्हणुनी हिणवित याला।। चाल ।। नवं राज्य पाहून लोक गांगरून गेला ! ।। जो तो लागला नोकरी करायला। इंग्रजाचे गूण गायाला। इंग्रजाची टाप-टीप शिस्त जागोजागेला।। पर पोटांतला कावा नाहीं कळला। आवळा देऊन कोहाळा काढला। गुलामगिरी चांगली असं वाटूं लागलं त्या वेळा। पण **लोकमान्य टिळकांनीं** मोह पार घालविला ! ।। जी ।। लोकसेवा लागले करायला। केसरीनं करून गर्जना देश हादरविला ।। जी ।। हें खपलं नाहीं साहेबाला। त्यानं टिळक धाडले तुरुंगाला। तीन वेळा तुरुंगवास झाला। पाठविलं काळेपाण्याला। तिथं गीतारहस्य लिहून। परत आले देशसेवेला ।। १९०८ च्या सालाला। क्रान्तिकारक पुढें जाहले कार्य करण्याला।। चाफेकर गेले फांसाला। कैक वीर गेले फांसाला। दोन जन्मठेपेची शिक्षा सावरकरांला। असा मधें कांहीं काळ गेला। १९२० सालाला। लोकमान्य गेले स्वर्गाला। मग राष्ट्राची धुरा वाहण्याला। **महात्मा गांधी**

ते आले झुंज देण्याला ॥ जी ॥ सत्य-अहिंसा साथ देण्याला । त्यांनीं सरकारशीं असहकार केला । केली मोठी चळवळ देश थरारुन गेला ॥ वकील, डॉक्टर, नोकर, प्रोफेसर, मास्तर, विद्यार्थी, शेतकरी, दुकानदार, चट सारा तय्यार झाला । तुरुंगांत डांबलं कैकाला ॥ १९३० सालाला । कायदेभंगाची चळवळ झाली नाहीं तोड त्याला ॥ दांडीयात्रा केली महात्म्यानं कायदा मोडायला ॥ जी ॥ तंवा हज्जारों गेले तुरुंगाला । **गांधीजींना** धाडलं तुरुंगाला । **जवाहरलाल** गेले तुरुंगाला । **सरदार पटेल** तुरुंगाला । **पंडित मदनमोहन** चालले तुरुंगाला । **सरोजिनी नायडू** तुरुंगाला । **खान अबदुल गफारखान** गेले शिक्षा भोगायला ॥ देश सारा थरारून गेला । **नेताजी सुभाषचंद्र** गेले तंवा तुरुंगाला ॥ १९४२ सालाला । **हिंदुस्थान छोडो**—असा मंत्र महात्म्यानं दिला । तंवा ९ ऑगस्टच्या दिवसाला । पुढाऱ्यांना पकडलं मुंबईला । क्रान्तीच्या ज्वाळा धडकल्या चारी बाजूला ॥ कैक वीर भूमिगत झाला । अन् करतो राष्ट्रसेवेला । जनतेनं लढा चालविला । कोण पुढारी होता तंवा बोला ?। सातारा-बिहार प्रान्तानीं झपाटा फार केला ॥ तिकडं सुभाषचंद्र निसटून गेले–अन् त्यांनीं जाऊन सिंगापुरला । आझाद हिंद फौजेची स्थापना करून । शत्रूशीं मुकाबला केला । पण जपान्यांचा पाडाव झाला । तंवा आझाद हिंद फौज लागली इंग्रजाच्या हाताला । मोठमोठे लष्करी अधिकारी तुरुंगाला । लाल किल्ल्यांत डांबलं सर्वाला । मग त्यांचा खटला चालला । **भुलाभाई देसाई** होते बचाव करण्याला । त्यांत असं ठरलं कीं स्वातंत्र्य मिळवायला जर कुणी लढा सुरू केला ! तर तो त्याचा गुन्हा नाहीं झाला ! ॥ सरकारानं सोडलं सर्वाला । तंवा साहेबाला वाटलं आतां हिंदुस्थान हातचा चालला । म्हणून त्यानं स्वराज्य देण्याचा कायदा एक केला । अन् १५ ऑगस्ट १९४७ ला । हिंदुस्थान स्वतंत्र झाला । आनंदी आनंद झाला । जनतेनें हाल सोसून ।

स्वातंत्र्य आणलं दाराला । आतां पुढं करायचं काय बोला? ॥ चाल ॥ भांडणं पार विसरून । देशाचं करावं कल्याण ॥ एक जूट मोठी करून । देशाचं करावं कल्याण ॥ अज्ञान पार जाळून । ज्ञानाची गुडी उभारून ॥ राष्ट्राचा झेंडा रोवून । मानानं करावं वंदन ॥ चाल ॥ असं राष्ट्र बलवान करा । कीं अभिमान वाटेल सर्वाला ॥ असा सोन्याचा दिवस उगवला ॥ **पांडुरंग शाहीर** आला कवन गाण्याला ॥ जी ॥

रचना – १५-८-४७.

जय भारत !

## पोवाडा —————————— : २७ :

स्वातंत्र्याचा मंगलरवि हा आला उदयाला । भारत जय जय भारत जय जय जयजयकार करा ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

मंगल दिन हा यावा म्हणुनी जन वेडा झाला। याच्यासाठीं कैक तरुण तो फांसावर चढला ॥ चाल ॥ १८१८ सालाला । भारतरविचा ग्रास जाहला । गुलामगिरिचा विळखा पडला। १८५७ सालाला ।देशभक्तांनीं उठाव केला । कुंड पेटले धडाधडा । आहुति पडली तडातडा । वीर झुंजती । गर्जुनि उठती । शस्त्रं झडती खडाखडा । नद्या वाहती रक्ताच्या । भेरी वाजती मृत्यूच्या । किंकाळ्या मरणारांच्या । स्वतंत्रतेचा ध्रुव तारा । एकच दिसला डोळ्याला । झांशीवाली लक्ष्मीबाईनं होम जिवाचा तो केला । गुलाम गोषखान, तात्या टोपे, कैक वीर मरुनी गेला ॥ जी ॥ पारतंत्र्याचा रूळ वाफेचा चिरडुन टाकी सर्वाला । स्वातंत्र्याचें नांव घेणारा सत्वर प्राणाला मुकला ॥ जी ॥ वासुदेव बळवंत फडक्यांनीं यज्ञ पुन्हा तो सुरू केला। सरकारानं पकडुन शिक्षा जन्मठेपेची दिली त्याला ॥ स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क असे या मंत्राला । जाहीर करुनी लोकमान्य टिळकांनीं लढा तो सुरू केला ॥ चाल ॥ सिंह गर्जना करुनी उठला । जबडा पसरुनि कर कर दाढा। पारतंत्र्य हत्तीवर झडपा । घालुन त्याचा नाश कराया।

सरसावुनि उठला । मधमाशांचं मोहोळ उठलं दुश्मन घाबरला ॥ जी ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

महाराष्ट्राचा कर्मयोगी तो दीपासम झिजला । शत्रूशीं लढतां लढतांना क्षणक्षण वेचियला ॥ जी ॥ चाल ॥ बंगाल आणि महाराष्ट्र । क्रांतीची झालीं कोठारं ॥ तळहातीं शीर घेऊन । बेहोष जाहले वीर ॥ बेभान झालं सरकार । तरुणांना गांजलं फार ॥ किति चढले फांसावर । कैकांना शिक्षा भयंकर ॥ क्रांतीच्या ज्वाळा चौफेर । दडपशाही चालली घोर ॥ चाल ॥ १९२१ सालाला । महात्मा गांधीजी आले लढा देण्याला । त्यांनीं गदगदा हलवलं देशाला । हज्जारों त्यागी वीरांनीं आत्मयज्ञ केला ॥ जी ॥ १९४२ ला । क्रान्तीचा जाळ धडकला ॥ सुभाषचंद्र करती युद्धाला । थरकांप सुटला शत्रूला । १५ ऑगस्ट १९४७ ला । वसाहतीचं राज्य दिलं भारताला । भारताची घटना आज झाली । अन् लोकशाही प्रजाराज्याचा पाया घातला ॥ जी ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

स्वतंत्रभारत लोकशाहिचा काळ आज हा सुरू झाला । झेंडा फडफडे अति डौलानं जाऊन गगनाला भिडला ॥ **अशोकमुद्रा** नवराज्याची आज फुलविते हृदयाला । भूतकाळाचा भव्य नकाशा दिसे मनाच्या डोळ्याला ॥ जी ॥ २६ जानेवारी १९५० गुरुवार मंगल हा ठरला । माघ शुद्ध अष्टमीच आली भीष्माष्टमी म्हणती त्याला ॥ जी ॥ शके १८७१ दिन गुरुवार भाग्याचा ठरला । स्वातंत्र्याचें ध्येय गांठलें आनंदाला भर आला ॥ आनंदाच्या क्षणीं आज ही हुरहुर लागे जीवाला ।

कुठें महात्मा ? कुठं नेताजी ? विचार पेटवि हृदयाला ॥ जी ॥ चाल ॥ इंग्रज निघुनिया गेला । पण संकटं नवीं हीं कैक आलीं जन्माला ॥ नवराष्ट्र आलं जन्माला । आतां भारत मजबूत करण्याला । बंधुंनो, शपथ घेउनी लागा कार्याला । लिहिणं वाचणं शिकवा सर्वांला । अन्न वस्त्र द्यावं सर्वांला । नको थारा भेदभावाला । असं राष्ट्र बलवान् करा । कीं आदर्श होऊं या विश्वाला ॥ जी ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

मायभूमि हा पुत्र तुझा देइल प्राण राखिल मान । आई तुझ्या नांवाला काळिमा येइल असं मी कधीं न करीन ॥ जी ॥ तिरंगी झेंडा मायभूमिचा फडकाविन मी दुनियेंत । अखंड त्याचा मान राखण्या सुसज्ज ठेविन मी हात ॥ जी ॥ देशप्रेमापरीस दुसरे प्रेम नसे प्यारे मजला । ध्यानीं मनीं स्वप्नीं सदा हा ध्यास तुझा मम जीवाला । ऐका बंधुंनो ! बोल हिताचे बोल कधीं हे विसरूं नका । मायभूमिचा द्रोह करोनि चैन कधींहि करूं नका ॥ जी ॥ देशकार्य करण्याच्या वेळीं मागें कधिंहि राहूं नका । क्षुद्र भांडणें करतां करतां व्यर्थ काळ तो दवडुं नका ॥ चाल ॥ लांचलुचपत करूं नका । गरिबांना तुम्हीं फसवुं नका । दुहीं कधींही करूं नका ॥ चाल ॥ इभ्रत होइल कमी देशाची असें कांहींही करूं नका । मायभूमिचे सुपुत्र म्हणुनी कीर्ति जोडण्या विसरूं नका ॥ जी ॥ स्वार्थासाठीं देशहिताची होळी कधींही करूं नका । देशद्रोहीं देशघातकी दुर्लौकिक हा जोडुं नका ॥ जी ॥ स्वदेशसेवा नित्य घडावी छंद लागु दे जीवाला । **पांडुरंगाचा** प्रणाम घ्यावा भारतदेशा ! या वेळा ॥ जी ॥ ४ ॥

रचना-२६ जानेवारी १९५०.

जय महाराष्ट्र !

# पोवाडा : २८ :

### नमन

शिवाजीच्या महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ धु० ॥ टिळकांच्या रे महाराष्ट्रा, उदो रे उदो॥ जोतिबांच्या महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ क्रांतिकारका महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ ज्ञानदेवाच्या महाराष्ट्रा। नामदेवाच्या महाराष्ट्रा । चोखामेळ्याच्या महाराष्ट्रा । एकनाथाच्या महाराष्ट्रा । तुकारामांच्या महाराष्ट्रा। रामदासांच्या महाराष्ट्रा। मल्हारीच्या महाराष्ट्रा उदो ! रे उदो ! ॥

● ●

### चौक १ ला

झालं स्वप्न आज साकार । महाराष्ट्रा जयजयकार ॥ जी ॥ संपन्न देश असतील । किती फुलतील । किती होतील । परि मज महाराष्ट्र हा प्यार । अभिमान मला वाटतो फार । पोवाडा **पांडुरंग** गाणार ॥जी॥ महाराष्ट्र जीव कीं प्राण । नाहीं उपमान । राखण्या मान । महाराष्टाचा देईन प्राण । त्याच्यासाठीं माझं जीवन । त्याच्यासाठीं माझं चिंतन । गुंतला प्राण ॥ जी ॥ चाल ॥ महाराष्ट्रा ! तुझं वर्णन सांगतों तुला ॥ हा समुद्र करतो स्पर्श तुझ्या पायाला ॥ माणीक मोती उधळितो तुझ्या चरणाला ॥ येतो लाटालाटानं नित्य तुला भेटायाला ॥ तुझ्या शूरपणाची साक्ष देतो सकळाला ॥ महाराष्ट्रा ! तुझ्यावर हल्ला कोणी जर केला । तर लाटांनीं बुडविन त्याला । असं सांगतो दरिया दुनियेला। आंग्र्यांचं

आरमार फाडी शत्रुहृदयाला ।। देवगड जयगड कासाकिल्ला बाजुला ।। विजयदुर्ग सिंधुदुर्ग खडे पहारा करण्याला ।। चाल ।। रायगड, राजगड, प्रतापगड, सिंहगड, कमळगड, भैरवगड, वैराजगड, सज्जनगड, पन्हाळगड, राजमाची, विशाळगड, पुरंदरगड–हे किल्ले अलंकार तुला ।। चाल ।। महाराष्ट्रा, माझा तूं प्राण । तुझ्यावीण माझं मरण । तूंच माझं सारं जीवन । तुझ्यावीण मला ना चैन ।। तूं माझा, मी तुझा, जाण । तुझ्या-साठीं देईन प्राण ।। आकाश पडेल भूमिला । तो मृत्यु भिववील मला । दगडांचा वर्षाव जरि झाला । जरि वीज कडाडुन आली जीव घेण्याला । सोसाटयाचा वादळी वारा । जरि आला प्राण घेण्याला । तरि नाहीं सोडणार तुला । पृथ्वीच्या पाठीवर गेलों कुठं जरी भटकायला । तरि तूंच माझ्या हृदयांत चमकता तारा ।। १ ।।

● ●

## चौक २ रा

स्वातंत्र्याची ज्योत चमकते नयनानयनांत । पाहुनी तिजला दुश्मन् सारे थर थर थर करित ।। स्वातंत्र्याचा टिळा लावला तुजला शिवबानें । बहुमोलाचे साज चढविले बाजीरावानें ।। तानाजीनं ज्योत लावली सिंहगडावरती । बाजीप्रभुनें पावन केली गजाखिंड पुरती ।। विजयि शिवाजी घोडीवरुनी जिथं जिथं गेला । रम्य फुलांचा सडा पसरला त्या त्या जागेला ।। रानावनांतुन रानफुलांनीं सुवास पसरविला । शुभ्र फुलासम यश राजाचं मोहवि सकळाला ।। जी ।। चाल ।। अटकेपार झेंडा नेला । भीमथडीचा घोडा उडाला । सिंधु नदीचें पाणी प्याला । महादजी शिंद्यांनीं सारा । उत्तर भारत काबीज केला । इतिहास तुझा हा आण आतां चित्ताला ।। २ ।।

● ●

## चौक ३ रा

महाराष्ट्राची सुरम्य भूमी पिकवी कसल्या धान्याला। आतां सांगतों ऐका जन हो! जागं करोनी कानाला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ कोंकणप्रांतीं तांदुळ झाला। आंबे, अमसुल, फणस चांगला। काजू मटामट भक्षायाला। आंवळे आंबट चाखायाला। नारळ मंगलकार्यीं आला। सुपारी चटचट चघळायाला। किती औषधी दऱ्याखोऱ्याला। सागवृक्ष किती भरूनी गेला ॥ १ ॥ घाटावरती धान्यें पिकतीं। सांगिन आतां तीं तुम्हांला। भुईमुग, मटकी, गहू, जुवारी। मूग, पावटे, वाल, बाजरी। मक्का, करडी, स्वच्छ पांढरी। तीळ, काराळे, तूर चांगली। चणे, वाटाणे, मसूर डाळी। ऊस बागांनीं मजाच केली ॥ २ ॥ भाजीपाल्याची चंगळ झाली। भेंडी, पडवळ, कडू कारलीं। मेथी, मिरची किती वळवळली। हिरवीं, लाल वसईचीं केळीं। लसूण कांद्यानं बहार केली। वांगीं कृष्णाकांठिं चांगलीं। गोल बटाटे लाल रताळीं। टामाटोंनीं मजा उडवली। काटेकाकडी वेलावरलीं। डोकावत किती छान तोंडलीं। अंत नसे या धनधान्याला। कशी करूं यादी मी बोला। किती फुलांचा जमला मेळा। यत्न करोनी वैभवशिखरीं। चढवा पुनरपि महाराष्ट्राला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

पंढरी महाराष्ट्रांत। वैंकुठ असे प्रख्यात ॥ ठेवुनिया कटिवरि हात। पांडुरंग जागत येथ ॥ अगणीत भक्त भजनांत। नित्य येथ तन्मय होत ॥ चाल ॥ भक्तीचा तरु हा फुलला। वर भक्त-विहंगम बसला। भजनांतरिं रमुनी गेला। धन्य धन्य पंढरी होत ॥ जी ॥ ज्ञानेश्वर चोखामेळा। नामदेव गोरा सन्त ॥ एकनाथ, पाठक तैसे। दामाजी विठ्ठलभक्त ॥ तो तुकाराम देहूचा। देहासह निघुनी जात ॥ चाल ॥ नामाचा भरला गजर। तो मृदंग झणझण टाळ। तो वीणारव मंजूळ ॥ चाल ॥ देहभान

विसरुनि जात । हें क्षेत्र महाराष्ट्रांत ।। जी ।। या वारकरी पंथाची । संतांनीं दीक्षा दिधली ।। भेदभाव विसरुनि सारे । धर्माच्या छत्राखालीं ।। हा ब्राह्मण किंवा शूद्र । हा भेद नसे त्या काळीं ।। चाल ।। पंढरीराय सर्वांचा । पंढरीराय भक्तांचा । हा विठ्ठल महाराष्ट्राचा ।। चाल ।। ही असे जागती ज्योत । वैकुंठ महाराष्ट्रांत ।। जी ।। ती भवानी तुळजापुरची । जगदंबा कोल्हापुरची ।। आदिशक्ति या विश्वाची । ही स्फूर्ती सामर्थ्याची ।। देवता शूर वीरांची । ही महाराष्ट्र देशाची ।। चाल ।। तो जेजुरिचा मल्हारी । मार्तण्ड भक्त कैवारी । संकटें तोडुनी सारीं ।। चाल ।। भक्ताला सद्गति देत । मल्हारी महाराष्ट्रांत ।। जी ।। गाणगापुरीं गुरुदत्त । चिरशांति मनाला देत । नरसोबावाडी क्षेत्र । श्रीकृष्णातटिं विख्यात ।। औदुंबर गुरु दत्ताचें । आवडतें स्थान पवित्र ।। चाल ।। श्रीक्षेत्र आळंदी थोर । जेथ राही ज्ञानेश्वर । तें संतांचें माहेर ।। चाल ।। पतितांना पावन करित । हीं सारिं महाराष्ट्रांत ।। जी ।। तें महाबळेश्वर साचें । जें ज्योतिर्लिंग शिवाचें ।। त्र्यंबकेश निज भक्तांचें । हरि संकट तें कायमचें ।। नाशीक रामचंद्राचें । तें आवडतें स्थळ वसतीचें ।। चाल ।। त्या कृष्णा, गोदा, भीमा । कोयनाहि ती सुखधामा । सावित्री, वेणा, परमा, ।। चाल ।। नीरा, प्रवरा, जल देत । या नद्या महाराष्ट्रांत ।। **रामदास** सद्गुरु मोठे । सज्जनगडिं वसती झाली ।। **दासबोध** लिहुनी ज्यांनीं । कर्मयोग-दीक्षा दिधली ।। अति तीव्र तपस्या करुनी । राष्ट्राची सेवा केली ।। स्थापुनिया मठ अगणीत । धर्माची उजळुनि ज्योत । धर्माला उजळा देत ।। चाल ।। श्रीसमर्थ शिवगुरु होत । हे सन्त महाराष्ट्रांत ।। ४ ।।

● ●

## चौक ५ वा

महाराष्ट्र हा शिवरायाचा सत्याचा अन् शौर्याचा । त्यागी जीवन जीवन याचें संतांच्या सुविचारांचा ।। महाराष्ट्राचा नाश कराया दुश्मन्

धावुनिया आले । शिवरायाचे शूर मावळे झुंजाया सत्वर गेले ॥ भारतियांचें रक्षण करण्या महाराष्ट्र धांवुन गेला । अटकेवरती झेंडे लावुन पानपतीं संग्रामाला ॥ पानपतावर अपयश आलं तरि न मराठा डगमगला । **माधवराव, महादजी** यांनीं पुन्हां दरारा बसवीला ॥ इंग्रज आला तराजू घेऊन उत्तर भारत जिंकियला । महाराष्ट्र परि जिंकायाला अवजड झालं त्या वेळा ॥ नाना फडणिस नांव ऐकुनी इंग्रज कासाविस झाला । नाना गेले इंग्रजांनीं मग महाराष्ट्र काबिज केला ॥ चाल ॥ परि देशभक्तिची ज्योत । महाराष्ट्रहृदयीं तेवत ॥ इंग्रजानं देश जिंकला । पण शल्य मराठी हृदयाला । जागजागीं क्रांतिचा वणवा भडकूं लागला ॥ वासुदेव बळवंत वीर । तसे बाळ गंगाधर ॥ कान्हेरे कर्वे झुंजार । तसे वंद्य सावरकर । असे कैक चमकले वीर । देशाला वाहिलं शीर ॥ गांधीजींनीं लढा सुरू केला । महाराष्ट्र चालला आघाडीला । हज्जारों वीरानी आत्मयज्ञ सुरू केला ॥ कैकांना धाडलं तुरुंगाला । कैकांच्या फांस कंठाला । १९४७ ला । पारतंत्र्य गेलें अस्ताला । भारत पुन्हां तेजानं चमकूं लागला ॥ महाराष्ट्र आला जन्माला । १ मे १९६० ला । आनंदी आनंद झाला साऱ्या जनतेला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

महाराष्ट्र असे हा देश संतवीरांचा । जोतिबा फुले, भाऊराव कर्मवीरांचा । बाबासाहेब आंबेडकरांचा । सद्गुणी धैर्यवंताचा पापभीरूचा । लौकिक असा मनिं ठेवा महाराष्ट्राचा ॥ जी ॥ चाल ॥ यत्न करोनी महाराष्ट्राला चढवा वैभवशिखराला । जगदंबेची शपथ घेउनी आठवुनी शिवरायाला ॥ जातियतेचें जहर भयंकर । या पचवोनी. होवुनि शंकर । क्षुद्र भावना जाळुनि टाका थोर बुद्धिला द्या थारा । सद्गुणरूपी हिरे माणकें दिसोत जागोजागेला ॥ उच्चनीचता दूर करा । एकी करुनी

पुढें चला । पूर्वज तुमचे थोर तयांचे वंशज तुम्ही मनीं धरा । कलंक लागेल त्या थोरांना असें कांहिंही कधिं न करा ॥ अथांग भरला सागर तैसे अथांग प्रेमळ हृदयांत । सह्यगिरी हा निश्चल तैसे निश्चळ व्हा तुम्हीं चित्तांत ॥ असंख्य तारे हे झगमगती रम्य अशा आकाशांत । असंख्य सद्गुण लुकलुकोत हे त्यांच्यासम जनहृदयांत ॥ कर्तबगारी दिसेल मोठीं जेव्हां जेव्हां अनिवार । गाइल यश ते तेव्हां तेव्हां **पांडुरंग** हा शाहीर ॥ ६ ॥

रचना–१–५–१९६०.

महाराष्ट्राचा

# पोवाडा ————————— : २९ :

## महाराष्ट्राचें नमन

शिवाजीच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ बाजीरावाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ महादजीच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ मल्हाररावाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ भाऊसाहेबांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ विश्वासरावांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ माधवरावांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ लक्ष्मीबाईच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ तात्या टोपेच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ बापू गोखल्यांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ टिळकांच्या तूं महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ चाफेकरांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ सावरकरांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ कोतवालांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ भोसले कुळाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ ज्ञानदेवाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ नामदेवाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ चोखामेळ्याच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ कान्होपात्रेच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ तुकारामाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ रामदासांच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ मुक्ताबाईच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ जनाबाईच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ एकनाथाच्या महाराष्ट्रा ! उदो रे उदो ॥ १ ॥

याद राखा करील कोणी महाराष्ट्रावरती चाल । तुकडे तुकडे करील त्याचे महाराष्ट्राची तलवार ॥ ध्रु० ॥

• •

## चौक १ ला

हा सह्यगिरी रक्षाया तुजला खडा ।। यानं कैक पाहिल्या पिढ्या । हे गड आणि हीं क्षेत्रें बोलती घडघडा ।। हा पहा तोरणा किल्ला । स्वराज्याचं बांधलं तोरण इथं शिवबानं, पहा या जरा ।। जी ।। भवानीच्या कृपेनं हंडा इथं सांपडला ।। हा रोहिड्याचा डोंगर आला । रोहिडेश्वर साक्षिला । **हिंदवी राज्याची** शपथ घेतली या स्थळा ।। हा पहा शूरांचा मेळा । तानाजी येसाजी उभे एका बाजूला ।। दादाजी, नरसाजी, उभे दुसऱ्या बाजूला ।। शिवबानं रक्त काढून धरलं धारेला । अभिषेक महादेवाला । सारा मावळा तयार झाला । पारतंत्र्यपाश तोडायला । मावळ्यांनीं चराचर चिरलं आपल्या हाताला । अन् रक्तानं भिजविलं त्यांनीं महादेवाला ।। चाल ।। हिंदूंचं करण्या रक्षण । शिवराय बांधी कंकण ।। जी ।। धर्माचं करण्या रक्षण । शिवराय बांधी कंकण ।। जी ।। गाईचं करण्या पालन । शिवराय बांधी कंकण ।। जी ।। दुष्टांना ठार मारून । सुजनांचं करण्या पालन ।। जी ।। रोहिडेश सांब दैवत । महाजागृत । आशीर्वाद देत । पिंडींतून झाला रुद्र हुंकार । शिवाजी शंकराचा अवतार । यश राजाचं आतां गाणार ।। १।।

● ●

## चौक २ रा

हा पहा प्रतापगड आतां दिसतो डोळ्याला ।। ठार केलं चंद्ररावाला । अन् शिवाजीनं जावळी आणली हाताला । वाई, कऱ्हाड, सुभे अदिल-शहाचे आले कबजाला ।। शिवाजीनं धुमाकुळ केला । जणु सुटला जोराचा वारा । अन् अदिलशाही वृक्ष कडकडा मोडू लागला ।। तंवा शिवाजीचा नाश करण्याला । अफझुल्ला विडा उचलून चालून आला ।। अफझुल्ला वाईला आला । तिथ्नं आला प्रतापगडाला । सह्याद्रि पहातो गमतीला । भवानीनं आशीर्वाद दिला । जिजाईनं गंधाचा टिळा भाळीं

लावला ॥ शिवराज मंडपांत गेला । तिथं खान होता आलेला । जिता-मेला धरण्याचा विडा उचलून आला ॥ दगलबाज करतो युक्तीला । शिवाजीचं मुंडकं त्यानं दाबलं डाव्या बगलेला ॥ चाल ॥ चपळाई राजानं केली । बगलेची मिठी सोडविली ॥ जी ॥ वाघाची झडप मग घाली । वाघनखं पोटाला भिडली ॥ जी ॥ खानाचीं खांडोळीं केली । राजानं शर्थ ही केली ॥ जी ॥ शौर्याचा मूर्तिमंत हिरा । असा कोणी नाहीं देखिला । असं प्रतापगड सांगतो आपणाला ! तरुणांनो ! लक्ष देऊन ऐका तुम्हीं जरा ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

हा पहा पन्हाळगड उभा स्फूर्ति देण्याला ॥ शिवाजीनं किल्ला जिंकला । अन् राजा राहिला त्या स्थळा ।. फाजलखान, शिद्दी जोहार आले वेढायला ॥ जी ॥ त्यांनीं वेढा घातला किल्ल्याला । तंवा राजानं योजलं युक्तीला । समेटाचा बहाणा त्यानं केला । अन् रात्रीच्या वेळेला राजा निसटून गेला ॥ ठार केलं जागत्या पहाऱ्याला । राजा विशाळगडीं चालला । पण फाजल शिद्दीजोहार पाठलागाला । तंवा बाजीप्रभु शूर सरदार आडवी फौजेला ॥ गजाखिंडींत संग्राम झाला । बाजीप्रभु शौर्याचा पुतळा पडला भूमीला ॥ पावन केलं खिंडीला । **थरमापली ग्रीस देशाला । तशी ही खिंड महाराष्ट्राला** । पावनखिंड पाहून स्फूर्ति येइना ज्याला । तो पशू भार भूमीला । महाराष्ट्रा ! पुरे ही झोंप, ऊठ या वेळा ॥ झोपेनं सत्यानास केला । असं सह्याद्रि बोलतो तुला । ध्यानांत घेउनी बोल विचार कर जरा ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

हा आतां राजगड आला । शिवाजींनं राज्याचा पाया इथंच घातला ।। राजधानी होती या स्थळा । भेटायला औरंगजेबाला । राजा गेला होता आग्र्याला । तिथं बादशहानं कैद केलं त्याला । शिवपुऱ्यांत कोंडून ठेवलं पितापुत्राला ।। पण राजा चतुर फार झाला । आजाऱ्याचा बहाणा त्यानं केला । चार दिवसांत वाटलं बरं त्याला । मेवामिटाई वाटण्याचा त्यानं सपाटा सुरू केला । पहारेवाला गाफील झाला । अन् पेटाऱ्यांत बसून शिवराय निसटून गेला !।। पोलादखान होता पहाऱ्याला । तो औरंगजेबाकडं गेला । अन् त्याला बोलूं लागला । खावंद । घात फार झाला । दख्खनचा शिवा हातोहात पळून हो गेला ! ।। कसा गेला कळेना आम्हांला । भूत पिशाच्च अनुकुल त्याला । इंद्रजालविद्या ठाव त्याला । जमिनींत घुसून कीं गेला । कीं अस्मानांत उडून तो गेला ।। हें कांहीं कळेना आम्हांला । औरंगजेबाचा नक्षा पार उतरला । इकडं बैराग्याचा वेश केला । अन् शिवराजा मथुरेला गेला । तिथं ठेवलं त्यानं संभाजीला । अन् पायीं पायीं राजा राजगडीं परतून आला ।। शिवराय किल्ल्यावर गेला । पण वळखेना कोणी शिवबाला । जिजाबाई बोलली तंवा त्याला । "गोसावीबुवा ! कुठून तुम्ही आला ?" ।। "उत्तरेकडनं" आवाज उमटला ।। तंवा जिजा बोलली साधूला । "आमचा शिवा गेला होता आग्र्याला । तिथं कैदेत ठेवलं होतं त्याला । पण शिवा तिथ्नं निसटला । अशी बातमी समजली मला । पण अजून नाहीं परतून आला । बाळ शंभू त्याच्या जोडीला । तुम्हीं कुठं पाहिलंत का हो त्याला ?" ।। तंवा राजा बोलूं लागला । "हम यात्रिक फिरनेवाले । माईजी ! हमने नहीं देखा" । "बरं बावा ! मनाला शांत करण्याला । एक भजन म्हणाल का या वेळा । जर मराठींत गाल भजनाला । तर ठीक होईल या वेळा" । तंवा साधु बोलूं लागला । "अच्छा, बोलेंगे

मराठीमें। लेकिन हम अच्छी तरहसे नहि जानते। सुनिये माताजी :–

## भजन

मायापंजर तडतड तोडुनि जीव मुक्त झाला ।। ध्रु० ।।

कामादिक शत्रूंनीं फसवुनि बांधियले त्याला। विवेक करुनी शांतपणानें सुटुनी तो आला ।। पहा हा जीव मुक्त झाला ।। १ ।।

गोसाव्या ! तसा माझा शिवाजी कधीं येईल हो बोला ! " ।। जी ।। पुढं गोसावी गाऊं लागला। (भजन चालू) "जीवात्मा हा आला परि नच ओळखिलें त्याला। भेट घडे ही बहु दिवसांनीं बोल न कोणाला ।। पहा हा जीव मुक्त झाला " ।। २ ।।

जिजाबाई बोलली मग त्याला ! "फार उत्तम भजन बोललात। आतां चाललांत पुढं यात्रेला ?"। गोसावी बोलूं लागला। "तुम्हावीण जगावं कसं बोला ? । तुम्हींच लहानाचं मोठं केलं मला"। तंवा गूढ कळलं आईला। शिवाजीनं जिजाईचे पाय धरले त्या वेळा ।। आनंदी आनंद झाला ।। राजगड सांगतो ही कथा आज सवाला ।। जी ।। त्यानं पाहिला गोड सोहाळा। महाराष्ट्र तरुणांनो। नका विसरुं शिवबाला ।। जी ।। ४ ।।

● ●

## चौक ९ वा

हा पहा सिंहगड आतां दिसतो डोळ्याला ।। जी ।। हा सह्यगिरीला अलंकार जणु झाला ।। कोंडाणा म्हणत होते याला। उदयभान होता वर अम्मलदार किल्ल्याला ।। जी ।। बारा हजार पठाण दिमतीला। शिवाजीचं झालं राज्य साऱ्या महाराष्ट्राला। पण हा किल्ला नव्हता आला हाताला। तंवा जिजाईनं शपथ घातली राजाला। "शिवबा ! येत्या माघ वद्य नवमीला। हा किल्ला जोड राज्याला। नाहींतर तोंड दाखवूं नकोस मला "। शिवाजीनं प्रतिज्ञा केली किल्ला घेण्याला ।। पण तानाजी नव्हता जागेला।

तानाजींनं मुलाच्या बेत लग्नाचा केला । अन् मुहूर्त धरला माघ वद्य नवमीला । अन् अक्षत द्यायला राजाला । तानाजी गेला त्या वेळा । पण शिवाजीच्या ऐकून प्रतिज्ञेला । तानाजींनं लगिन ठेवलं बाजूला । अन् कोंडाणा किल्ला घेण्याचा बेत त्यानं केला ॥ चाल ॥ गोंधळ्याचं रूप घेऊन । रायाजीला वश करून ॥ डोणागिरी कडा निरखून । तानाजी गेला परतून जी ॥ यशवंती घोरपड छान । तिला कड्यावरती चढवून ॥ जी ॥ शें दोनशें वीर घेऊन । तानाजी गेला चढून ॥ जी ॥ हाणमार करून जोरानं । किती कांपला त्यानं दुस्मान ॥ जी ॥ हाणमार करतांना ताना घायाळ झाला ॥ अन् धाडकन् भूमीवर आला। पण मराठ्यांनीं किल्ला सर केला । शिवराय धांवून गेला । वीराचा गौरव केला । कोंडाणा नांव बदललं । **सिंहगड** नांव किल्ल्याला । बंधुंनो ! ऐका शौर्याला । घ्या बोध, सोडा अविचार आज या काळा ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

सह्यगिरीचा प्राण पहा हा दिसतो डोळ्याला । नांव तयाचे असे रायगड, भव्य पहा झाला ॥ जी ॥ राजधानीचा किल्ला म्हणुनी प्रसिद्ध जगतांत । महाराष्ट्राचं हृदय जणु काय येथें धडधडत ॥ जीं ॥ महाराष्ट्र-देहाला येथुनि लाभत चैतन्य । वीररसाचे प्रवाह येथुनि वाहाति जनमान्य ॥ जी ॥ वीररसाचे घुटके घेती मित्रे येथून । राजनीतिचे धडे, गिरविती शासनशास्त्रज्ञ ! ॥ सिंहासन हें छत्रपतींचें पाहुनिया ज्याला । स्फूर्ति येईना, असा मराठा कोण असे झाला ? ॥ जी ॥ रायगडाचा भव्य दरारा । शत्रु कापवी थराथरारा । खिन्नपणाला नाहीं थारा । भगवा झेंडा उडे फरारा । स्वातंत्र्याचा घुमवी वारा । रायगडाचा राणा । विसरूं नका त्या शिवरायाला । कार्य तयाचें मनीं आणा ॥ जी ॥ चाल ॥ राज्याभिषेक शिवबाला झाला या स्थळा ॥ सोळा हजार होनभार केली

सुवर्णतुला । गागाभट्ट अभिषेकाला । रामदास आशीर्वादाला । जिजाबाई पाहती सोहळा । ४ कोटी २६ लक्ष रुपये खर्च झाला। शिवसूर्य माध्यान्हीं आला । थरकांप राहुकेतुला । महाराष्ट्र धन्य धन्य झाला। शके १५९६ ला । ज्येष्ठ शु. १२ ला । शुक्रवार होता त्या वेळा । पहाटेच्या तिसऱ्या घटकेला । सूर्योदयाच्या आधीं त्या वेळा। अभिषेक झाला राजाला। ज्यांनीं तो सोहळा डोळ्यांनीं पाहिला । ते ते धन्य धन्य जाहले धन्य शिव झाला ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

महाराष्ट्राला बुडवायाला औरंग्या चालुन आला । पकडुनि त्यानें ठार मारिलें वीर संभाजीराजाला ॥ यवनी फौजा करती धुमाकुळ महाराष्ट्र बुडवायाला । परी धनाजी संताजींनीं चोप दिला बहु यवनाला ॥ '**धनाजी जाधव**' शब्द ऐकुनी मोंगल घोडा थरथरला । गनिमी कावा घालित घावा, दुस्मन घाबरुनी गेला ! ॥ अहमदनगरानजीक औरंगजेब स्वतः मरुनी गेला । शूर मराठा सुसज्ज झाला चढाई पुरती करण्याला ॥ बाजीरावानें उत्तर हिंदुस्थान आणला कबजाला । दुस्मन सारे मारमारुनी महाराष्ट्र विजयी झाला ॥ जी ॥ अटकेपार झेंडे रोवुन वीर मराठा घरिं आला । भव्य दरारा, शत्रु थरारा, कांपत होते त्या काळा ॥ जी ॥ शिंदे, होळकर, पवार, गायकवाड मराठे रणवीर । पानपतावर करती लढाई करि घेवुनिया समशेर ॥ जी ॥ महाराष्ट्र बंधुंनो ! पराक्रम विसरुं नका हे बहुमोल । **भूतकाळाचा विसर जयाला, जिणें तयाचें जगिं फोल** ॥ जी ॥ परंपरा ही मर्दुमकीची सोडुं नका या वेळेला। शक्तिदेविची पूजा करुनी व्हा बलशाली या काळा ॥ ७ ॥

● ●

## चौक ८ वा

अखंड हिंदुस्थान भंगलें झालें पाकिस्तान। भारतभूचे तुकडे झाले अविचारी थैमान ॥ जी ॥ अखंड भारत म्हणतां म्हणतां। खंड करोनी आतां देतां। पुढारी चकले बघतां बघतां। जागृत झाली आतां जनता। थडकुन उठेल बघतां बघतां। महाराष्ट्राचा वीर सारा उठविल सारें रान। देश मोठा हिंदुस्थान। घरबुडव्यांनीं केली घाण। क्षात्रवृत्तिला नाहीं स्थान। महाराष्ट्र परि आशास्थान। ऊठ महाराष्ट्राच्या तरुणा!। विकल्प काढूं नकोस नाना। क्षात्रवृत्तिला तूं जागवुनि घे जगताचा सन्मान ॥ चाल ॥ आंधळी श्रद्धा पुरे जहाली। बुद्धि त्यामुळें रुसुनी गेली। क्षात्रवृत्ति मावळुनी गेली। सत्य अहिंसा ढोंगी माजली। स्वार्थी झाले कैक पुढारी। स्वातंत्र्याची पहाट फुलली। आशा किलबिल करूं लागली। परि महाराष्ट्राची धडगत नुरली।; महाराष्ट्राला स्वातंत्र्यांतहि देतिल कोणि न मान। **पैसा नाहीं, बुद्धी विकली,** म्हणुनी हा अपमान ॥ जी ॥ स्वतंत्र झाला हिंदुस्थान। महाराष्ट्राला नाहीं मान। पदोपदीं होतो अपमान ॥ ८ ॥

● ●

## चौक ९ वा

**सैन्य जयाचें राज्य तयाचें**। विसरुं नका या तत्त्वाला। तयार फौजा कराल तर मग येइल सत्ता हाताला ॥ जी ॥ तलवारीच्या टोंकावरती राज्यश्री करिते वसती। सर्व संपदा धांवुन येती दुमदुमेल जागिं सत्कीर्ती ॥ **लक्ष्मी वरते रणवीराला**। शूर पती आवडतो तिजला। अनंत वैभव अनंत काळा। लाभत जगिं त्या उद्योगाला। महाराष्ट्र-तरुणांनो! आतां। सोडुन द्या ही उदासीनता। झटकुन द्या तुम्ही सारी चिंता।. उठा! उठा! तुम्ही सारे आतां। जागे होउनि घ्या करिं सत्ता। कानाडोळा कराल आतां। तर येइल चालुन चिंता चिंता!।

आधार पुढें कोणि न दाता। धंदे उरतिल तुम्हांस कसले। सांगिन ऐका ऐका आतां। भांडीं घासणें। धुणें वडवणें। पाणी भरणें। भाकरि करणें। मोटारीचे ड्रायव्हर होणें। कपडे शिवणें,। केस कापणें। लाकुड तोडुन ताडुन देणें। कारकुनांचीं कामें करणें। शिपाई पट्टेवाले होणें। बाबागाडी ढकलत जाणें। नोकरि करतां करतां मरणें। जळो जिणें हें लाजिरवाणें ॥ १ ॥ चाल ॥ महाराष्ट्रसिंहाच्या बच्चा! तरुणा! ओळख तव जात। **बकऱ्या मेंढया नव्हेत पूर्वज, बोल, घे झणीं चित्तांत** ॥ मस्त गर्जना करुनी आतां सोड दणाणुन भूमिला। भारतभूचा पालनवाला हो तूं आतां या काळा ॥ जी ॥ धर्म देश हा बुडवायाला भुतें नाचती चौफेर। कोल्हीं कुत्रीं वौ वौ करुनी करति अमंगळ संचार ॥ जी ॥ नीच लांडगे फार मातले भिवविंत फिरती हे स्वैर। झडप घालुनी, उडीव फडशा, तूंच एकटा आधार ॥ जी ॥ **वंगभंगाच्या पिंजऱ्यामध्यें वाघ बंगाली सांपडला। पंजाबांतिल वणव्यामध्यें शीख ससाणा गुदमरला!** ॥ जी ॥ हृदय फाडुनि बोल निघाले जळजळते हे अंगार। जाळुनि फोडुनि पार टाकतिल नैराश्याचें डोंगर ॥ महाराष्ट्रभूमीची सेवा नित्य कराया तयार। रचुनी काव्या घेउनि आला **पांडुरंग** हा शाहीर ॥ ९ ॥

रचना – १५ ऑगस्ट १९४७.

## ॲटम् बॉंब्

# पोवाडा ———— : 30 :

### ( ॲटम् बॉंब्चें आत्मवृत्त )

माझं नांव ॲटम् बॉंब् । जगीं झाली बोंबाबोंब । उठले आगीचे हे डोंब । जळले झाडांचेही कोंब । लाखो जीव मेले भूवरी । लाजेची गोष्ट ही खरी । धडकी ज्याच्या त्याच्या अंतरीं । परि नसे माझा दोष । विजयाची ज्यांना आस । त्यांनीं केला सत्यानास । मला धरून वेठीस । धिक्कार त्यांचा मी करी ॥ १ ॥ शक्ति माझी अमर्याद । नव्हती कोणालाही दाद । परी घेतला मी छंद । द्याया जगाला आनंद । व्हावं आतां प्रगट भूतलीं ॥ सुख सर्वांना देऊन । दुःख नाहींसं करून । नंदनवन मी करीन । अशी आशा होती अंतरीं ॥ शास्त्रज्ञांना बोलावून । प्रयोगशाळेंत नेऊन । त्यांना बोललों आवर्जून । " शास्त्रज्ञांनो, घ्या ऐकून । माझा उपयोग करून । सुखी करा माणूस लौकरी ॥ २ ॥ माझं अणुएवढं अंग । परि शक्ति हो अभंग । माझ्या शक्तीला ना भंग । प्रतिज्ञा माझी ही खरी । अणुएवढं यूरेनियम । त्यांत पदार्थ घालून । मला ठेवावं कोंडून ॥ चाल ॥ मग माझी शक्ति पुढं दिसेल खास तुम्हाला ॥ अणु एवढी शक्ति पुरे सारं जग जाळण्याला ॥ म्हणून चांगला उपयोग करा । जमीन खोदून कालवे खणण्याला । डोंगरांचें मैदान करण्याला । समुद्राची जमीन करण्याला । जमिनीचा दरिया करण्याला । वातावरण तापवून देण्याला । अणुएवढी शक्ति माझी बस्स होईल सर्वाला ॥ शक्तिचा उपयोग छान करा । सुखी करा साऱ्या विश्वाला " ॥ चाल ॥ असं बोललों शास्त्रज्ञास । यत्न केला रात्रंदीस । आला प्रयत्न फळास ।

जर्मनीत्नं नेलं खास । अमेरिकेच्या खंडास । हिटलरच्या जर हातास । लागलों असतों मी हो खास । तर जगाचा विनाश । असं वाटलं शास्त्रज्ञांस । म्हणून त्यांनीं नेलं लौकरी ॥ ३ ॥ अमेरिकेचे ते लोक । लोकशाहीचा हो शोक । त्यांचा चांगला लौकीक ॥ चाल ॥ म्हणून मला वाटलं त्या वेळा । माझा उपयोग करतील बरा । शास्त्रज्ञ बोलले अध्यक्षाला । अणुशक्ति आली हाताला । एक अणु विश्वाचा अंत करिल हो बोला ॥ पण तोच जर चांगल्या कामीं लावला । तर विश्वांत सौख्य वाढेल, करू काय बोला " ॥ अमेरिकेचा अध्यक्ष शास्त्रज्ञाला बोलला । ' तुम्ही म्हणतां संहार करण्याची अणुशक्ति आली हाताला । तर असा एक बॉंब करा कीं जो जास्तींत जास्त नाश करणारा झाला । तरच तुमचं म्हणणं खरं वाटेल मला " । शास्त्रज्ञांनीं नारिंगाएवढा गोल एक केला । त्यांत भरून ठेवलं त्यानं मला । ॲटम बॉंब रूपानं तंवा आलों जन्माला ॥ जपान्यांचा नाश करण्याला । एके दिवशीं विमानांत घालून नेलं हो मला ॥ हीरोशिमो बेटावर हळूंच टाकलं मला ॥ जी ॥ तों मोठा संहार झाला । हीरोशिमो बेटाचा चक्काचूर जाहला ॥ हज्जारों भाजून मेला । झाडंझुडपं झालीं चोळागोळा । पटापट पक्षी किती मरून पडले भूमिला । लहान मुलं बायका ही किती जळल्या त्या वेळा ॥ जी ॥ नागासाकी बंदरावर पुन्हां सोडलं त्यांनीं मला ॥ तंवा तिथं हाहाकार झाला । तंवा फार वाईट वाटलं हो मला । प्रगट झालों सुख देण्याला । पण दिला मृत्यु कितिकांला । एक गोष्ट गेलों करायला । पण झालं दुसरंच या वेळा । तंवा मी विचारलं शास्त्रज्ञाला । " अरे माझं नांव तरी काय ते सांग मला " । तंवा शास्त्रज्ञ बोलला । " ॲटम बॉंब नांव तुझं ठेवलंय, धाक सर्वांला ॥ ४ ॥

रचना- १३-११-४९.

# दूर रहा, दूर रहा !

## पोवाडा : ३१ :

### चौक १ ला

दूर रहा, दूर रहा, दारूपासुन दूर रहा। दारूपायी नष्ट जाहले कैक जगीं या जरा पहा ॥ दारू ढाकिण दुष्ट अवदसा शिरली ज्याच्या घरांत । कुटुंब त्याचं नष्ट जाहलं । बोल धरा हे चित्तांत ॥ चाल ॥ माझा होता छान संसार । छबकडी मोठी सुंदर ॥ जी ॥ माझी बायको सद्‌गुणी थोर । कुटुंबाचा मोठा आधार ॥ जी ॥ चाल ॥ कुणि गरजू आला जर घरीं । खट्टू अंतरीं । होउनी गेला । कधिं नाहीं ॥ दीन-दुबळा अपंग जनीं । खिन्न होउनी घरांतुन गेला । कधिं नाहीं ॥ चाल ॥ खाऊन पिऊन सुखी मी होतों होतं नंदनवन । लोक गांवांतिल वाखाणत मज धन्य धन्य जीवन ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

सुख आमचं हें बघवेना पण जीवनरामाला । सुखांत माती कालविण्याचा बेत त्यानं केला ॥ बोलत बोलत एका दुकानांत घेऊन मज गेला । पेय पेल्यांतुन प्यायला दिलं मज आनंदित झाला ॥ दारू होती, प्यायल्यावरती धुंदी मज आली । जरा वेळानं धुंदी उतरली फिरलों माघारीं ॥ चटक लागली रोज चाललें दारू पिण्याला । घरीं कुणाला ठाऊक नाहीं, नाश जवळ आला ॥ जी ॥ चाल ॥ पैसा मी सगळा उधळला । चार पोरं कारबारिण लागली देशोधडीला ॥ जी ॥ पोटभर

ना अन्न खाण्याला । कर्जाचा बोजा मी केला । सावकार येऊन बसला दाराला।। घरदार गहाण सारं पडलं–आक्रांत झाला ॥ जी ॥ चाल ॥ शेती गेली, वाडी गेली, झाली दुर्दशा सर्वांची । व्यसन दारुचं तरी सुटेना, उलटी फेरी दैवाची ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

एके दिवशीं दारु पिऊन चाललों घराला ॥ जी ॥ रस्त्यांत चिखल होता झाला । झोक गेला पडलों चिखलांत शुद्ध ना मला । ॥ जी ॥ नाकातोंडांतनं चिखल गेला ! । दारुनं जनावरासारखं केलं हो मला ॥ जी ॥ माझी बायको आली त्या जागेला । तिनं उचलुन नेलं घरीं मला ॥ कारबारिण बोलली मग मला । " कारबारी, किती सांगूं तुमास्नी या वेळा । हा सोडा दारुचा चाळा । संसाराचा सत्यानास झाला । सोन्यासारखीं पोरं वणवणती रस्त्यारस्त्याला ॥ जी ॥ घरीं धान्याचा एक कण नाहीं राहिला । नाहीं कपडा धड अंगाला । किती सांगूं तुमास्नी सोडा सोडा दारूला " ॥ चाल ॥ कारबारणीचं बोलणं ऐकून लाथ हाणली एक कमरेला । मूल कमरेचं ताड्‌नं उडालं कोसळली बाई धरणीला ॥ जी ॥ कनवटीचे चार पैसे घेतले हिसकून दारू पिण्याला । पुन्हा चाललों रस्त्यावरती विचार मुळिं ना मीं केला ॥ जी ॥ दारू प्यालों धुंदी चढली रस्त्यांत पडलों चिखलांत । नशीब माझं साधू दिसला जवळच माझ्या पुढ्यांत ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

भगवी वस्त्रं जटा डोक्यावर रुद्राक्षांची माळ गळा । हातीं कमंडलु, पायीं खडावा, भस्म चर्चिलं अंगाला ॥ जी ॥ चाल ॥ रस्त्यांत पडलों पाहून । त्यानं नेलं मला उचलून ॥ जी ॥ दूर दूर गेला घेऊन ।

झोपडींत ठेवलं नेऊन ।। जी ।। चाल ।। दारुचा अम्मल उतरला । पाहूं लागलों चारी बाजूला । तों समोरच साधू दिसला । त्यानें चेहरा हासरा जरा केला । अन् लागला साधु बोलायला । "काय, किसनभाऊ, रस्त्याला चिखल कसा लागला? । जो मनुष्य दारु लागला प्यायला । तो सात जन्म रौरव नरकांत पडला । सद्गती मिळणार नाहीं त्याला । माझ्या श्रीहरीची शपथ तुम्हाला । जर यापुढं शिवाल दारुला । तर पाप जन्माजन्माला" ।। चाल ।। उपदेशाचे शब्द दिव्य हे शिरले माझ्या हृदयांत । "दारू सोडली" बोलून आलों, घराकडं आनंदांत ।। जी ।। बोललों बायकोला कारबारणी ग, मी सोडली दारू आजपासून । तुझ्या पायाची शपथ बाई । आतां चांगला वागेन ।। ऐका बंधुंनो, ऐका, ऐका, कधीं दारुला शिवूं नका । **पांडुरंगाचे** बोल असे हे विसरुं नका, कधिं विसरुं नका ।। जी ।। ४ ।।

रचना-२२-१-१९६२.

भूदान–यज्ञ !

# पोवाडा —————— :३२:

### चौक १ ला

भूदानाचा मार्ग खरा हा पुण्याईचा मार्ग भला। इहपरलोकीं मार्ग सुखाचा असा न दुसरा मार्ग खरा ।। सत्य अहिंसा समता साधुनि मानवतेला तुष्ट करा। जियें विषमता दुःखें तेथें बोल हिताचे मनीं धरा ।। चाल ।। इंग्रजी राज्य जरि गेलें। तरि नसे सुखाचें वारें ।। राजकीय क्रान्ती झाली। विषमता परी नच गेली ।। चाल ।। उच्चनीच हा गरीब धनवान् रावरंक या भेदानें। दैवी शक्ती निघुनी गेली सांगावें हें खेदानें।। एकापाशीं जमीन भारी दुसऱ्यापाशीं नच जागा। सुखी कसा तो समाज होईल? समाजकार्या या जागा ।। चाल ।। एकास मिळे भरपूर। तर दुसरा दारोदार। एकास जमीन भरपूर। तर दुसरा उपाशी फार ।। जी ।। एकास वस्त्र भरपूर। दुसऱ्यास न चिंधीभर ।। जी ।। चाल ।। ही स्थिती भयानक करिल नष्ट सर्वाला ।। मग द्वेष येईल जन्माला। सूडाची ज्योत पेटेल जागोजागेला ।। मत्सर वैरी सर्वाला। मग समाज मातीमोल झाला। म्हणुन माझ्या देशबंधुनो! विचार जरा करा ।। जी ।। १ ।।

● ●

### चौक २ रा

रक्तलांच्छिता क्रांती किंवा क्रान्ति अहिंसावृत्तीनें। मार्ग असे हे दोन क्रान्तिचे करती क्रांति झपाट्यानें ।। चाल ।। पण रक्तलांच्छिता क्रान्ती। सुस्थिर कधीं नच झाली ।। चाल ।। रक्तानें रक्त घेण्याची इच्छा होईल।

द्वेषानें द्वेष भडकेल। मग वणवा जागोजागेला पेट घेईल ॥ जी ॥ चाल॥ जसं सुंदर वन असावं। पक्ष्यांनीं तिथं नांदावं। वाटसरूंनीं तेथें बसावं। फळं खाउन संतुष्ट व्हावं। पण ज्वालामुखी एकदम भडकावा अन् पार सारं जाळून टाकावं। तसा धक्का बसेल समाजाला। मग गुलामगिरी नशिबाला। म्हणून मार्ग रक्तक्रांतिचा दिसे नच बरा ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

सत्य, अहिंसा, त्यागबलानें गांधी महात्मा तो लढला। देश खडाडुन जागा केला इंग्रज मग निघुनी गेला ॥ पूज्य विनोबा शिष्य तयांचे फिरती गांवोगांवाला। भूमिदानाचा मंत्र सांगती सगळ्या भारत जनतेला ॥ जी ॥ द्रष्टा नेता योगी त्यागी शिष्य खरा हा गांधींचा। देशोदेशीं पायिं फिरुनी सल्ला देती मोलाचा ॥ जी ॥ चाल ॥ भारतांत तेलंगण। तिथं सुरू केलं भूदान ॥ जमीनदार देती जमीन। गरिबांना दिली वाटून ॥ अशी क्रांती केली शांतीनं। मग चालले समाधानानं ॥ चाल ॥ विनोबांनीं बिहार देशांत दौरा सुरू केला ॥ तिथं भरघोस यश कार्याला। भूदान चळवळीचा जोर वाढतच गेला ॥ आले अंकुर जागोजागेला। जागजागीं यज्ञ सुरू झाला। महाराष्ट्रदेशा, तूं झोपूं नको या वेळा ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

द्रव्यदानानें कार्य न पुरतें, तृप्ती होईल बेताची। श्रमदानानें वैभव वाढेल भरभराट ही देशाची ॥ तपोदानानें कार्यशक्तीची वाढ होतसे राष्ट्रांत। ज्ञानदानानें अज्ञानाचा नाश होतसे जनतेंत ॥ भूदानानें सद्गति लाभे इहपर मोलाचा ठेवा। समाज सुस्थिर प्रगतिपथावर राहिल मनिं हें तुम्ही ठेवा ॥ सर्व लेकरें भूमातेला सारखीच तीं

आवडती । सुख एकाला तें सर्वाला दुःखाची ही तीच गती ॥ चाल ॥ म्हणून ऐका बंधुनो, ऐका बोल हितकारी ॥ भूदान करुनिया जोडा पुण्य संसारीं ॥ या राष्ट्रामधिं तो कोणि नकोच भिकारी ॥ चाल ॥ चला आतां लागा कामाला । नका देऊं जागा आळसाला । हिंसेला नका देऊं थारा । या भरतभूमिला सुजला सुफला करा ॥ चाल ॥ शाहीर **पांडुरंगाचे** । बोल हृदयाचे । असती प्रेमाचे । करावे सफल विनवि तुम्हास । नसे मज कसला दुसरा हव्यास । **विनोबाचरणीं** लीन हा दास ॥ ४ ॥

रचना-२-२-१९५४.

## चिनी भस्मासुर !

# पोवाडा —————————— : ३३ :

### चौक १ ला

मायभूमिची इज्जत घ्याया चिनी भस्मासुर हा आला । उठा उठा तुम्ही झुंजारांनो, पळवुनि लावा दुष्टाला ॥ भोळा शंकर प्रसन्न झाला पंचशिलाचा वर दिला । वरलाभानं मत्त होउनी हत्यार घेऊन हा आला ॥ दुष्ट दुरात्मा कपटि रानटी क्रूर लांडगा हा आला । सह्याद्रीच्या नरसिंहांनो, झडप[1] घालुनी ठार करा ॥ हिमालयाच्या खिंडिखिंडितुन राक्षस हा चालुन आला । हर हर हर हर: महादेव हा आवाज भिडुं दे गगनाला ॥ संकट मोठें राष्ट्रावरती मनीं धरा या बोलाला । एक दिलानं झुंज देउनी हाकलुन लावा शत्रूला ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

कोल्हा, लांडगा, वाघ, सापावर विश्वास कधिंहि ठेवुं नका । तसाच विंचू ठेचुन काढा, विचार मुळिं तुम्हि करूं नका ॥ देशद्रोही देश-घातकी सामील जे जे शत्रूला, अद्दल घडवा कायमची तुम्ही त्यांना ऐका या बोलाला ॥ चाल ॥ पाठींत मारला खंजीर । शत्रुनं केला हा वार ॥ जी ॥ २ ॥

● ●

### चौक ३ रा

पूर्वज तुमचे महापराक्रमी शूर वीरांनो विसरूं नका । कोट करा छातिचा बंधुंनो, वेळ अकारण दवडुं नका ॥ शहाजीराजे महाधुरंधर

धाक लावला शत्रूला। छत्रपति श्रीशिवाजीराजे पुत्र शोभती वीराला॥ फिरंगी फिरवी शिवबा इकडे तिकडे मोगल गडबडला। नांव ऐकुनी श्रीशिवबांचे दुस्मान कासाविस झाला॥ शिवतेजाची वीज देतसे झटके मोगल राजाला। कांहीं सुचेना अन्न रुचेना झोंपहि येना डोळ्याला॥ भगवा झेंडा फडफड फडके भूषण वाऱ्याला झाला। फडफड करुनी गगनीं बोले 'धन्य शिवाजी अवतरला'॥ दऱ्याखोऱ्यांतून, मैदानांतून पाउल टाकी शिव जेव्हां। विजयश्रीचीं फुलें उमललीं त्या त्या स्थानीं मग तेव्हां॥ जी॥ शिवाजीनं आणलं स्वातंत्र्य महाराष्ट्राला॥ किति काळ भयंकर आला होता त्या वेळा॥ पण शिवाजी झाला सामोरा। मावळ्यांचं सैन्य खडं केलं झुंज देण्याला॥ चाल॥ प्राणांची कुरवंडी केली महाराष्ट्रानं॥ रक्ताचे सडे घातले महाराष्ट्रानं॥ तलवारी, भाले, परजले महाराष्ट्रानं॥ मायेचे पाश तोडले महाराष्ट्रानं॥ मृत्यूला मिठ्या मारल्या महाराष्ट्रानं॥ शत्रूंचा बीमोड केला महाराष्ट्रानं। प्रतापगडला शिवाजीनं केलं शत्रूला ठार॥ पन्हाळगडचा वेढा लढविती मोठे झुंजार। बाजी-प्रभु पावनखिंडींत पडले रणवीर॥ चाल॥ शाहिस्त्याला धडा शिकविला। शिवराया गेला आग्र्याला। तिथं कैद केलं राजाला। पण राजा पेटाऱ्यात्नं पार सुटूनहि आला॥ सिंहगड घेतांना ताना पडला धरणीला॥ ही परंपरा शूरांची आणा चित्ताला॥ ३॥

• •

## चौक ४ था

दिल्लीपतीला मदत केली पेशवाईच्या काळांत। एकछत्री मग भारत झाला वीर मराठे दिल्लींत। पानपतावर युद्ध पेटलें लाखों मराठे रणिं पडले। नसानसांतुन रक्त उसळलें शत्रूवर चालून गेले॥ चाल॥ जनकोजी शिंदे सुकुमार। विश्वासराव ते वीर। भाऊसाहेब लढतां लढतांना गेले स्वर्गाला॥ अशा कैक वीरांनीं देह रणीं ठेविला॥ प्राणांचा

बळी कैकांनीं देविला दिला। पण मराठ्यांच्या कीर्तिचा झेंडा सारखा फडकला। १८५७ साल। पेटलें पहा चौफेर॥ झांशीच्या राणीनं आत्मयज्ञ तो केला॥ वासुदेव बळवंत मोठा झुंजार झाला॥ लोकमान्य टिळकांनीं झगडा मोठा सुरू केला॥ महात्मा गांधींनीं झगडा नेला शेवटाला॥ १९४७ ला हा भारत स्वतंत्र झाला॥ धड पंधरावर्सं झालीं नाहींत त्याला॥ तर पुन्हां आला परक्यांचा हल्ला। दुनियेंत शांतता मंत्र घोष ज्यानं केला॥ त्याच्याच पाठींत खंजीर खुपसला। घ्या सूड त्याचा या वेळा। एकजूट करून शत्रूचा नायनाट करा। पुन्हां मिळवा हिमालय सारा। मग कैलासपतीची पूजा कराया चला। आजपावेतों हिमालयानं उत्तर सीमा राखियली। पण बेसावधपण धरुनि राहिलों आम्हीं भारतीय आजवरी॥ कावा साधला दुस्मानानं गाफिलपण हें पाहुनिया। सावध व्हा रे सावध व्हा रे रात्र वैऱ्याची समजुनिया। भारतीयांनो, एक होउनी करा बहाद्दर जंग भला। उठा उठा तुम्ही झुंजारांनो, पळवुनि लावा शत्रूला॥ ४॥

• •

## चौक ५ वा

नरसिंहांनो, मारा झडपा कोल्हे शिरले जाळींत। करा गर्जना महाभयंकर नखं सरसावून जोरांत॥ चाल॥ कटावाची चाल॥ कैक वर्षांचा आपला हिमालय। शंकर गौरी तिथें राहती। असंख्य साधू तप आचरिती। गंगा यमुना ब्रह्मपुत्रा या नद्या वाहती पवित्र करती। बद्रीनाथ आणि बद्रीकेदार हीं तीर्थक्षेत्रें तेथें असतीं। पशूपतीश्वर आपलें दैवत। जय शिवशंकर आपली गर्जना। गर्जुनी धावा देश रक्षणा। एकहि पळ नच दवडायाला। चला शत्रुवर तुटून पडा। वीर मराठा रणीं खडा। वीर रजपूत, वीर पंजाबी, आंध्र वीर ही वीर भारती खडाखडा। नौदल, भूदल, हवाईदल ही

एकवटोनी धडाधडा । चढवा हल्ला मारुनि काढा दुस्मन सारे तडातडा ॥ चाल ॥ जागा झाला, जागा झाला सिंह भारती हा आला । खाऊन टाकिल हा तुम्हांला दुस्मानांनो, मनीं धरा ॥ जी ॥ परतुन जावें आपल्या देशा आला तसे रे दुष्टांनो । येथेंच तुमचें मरण नाहींतर, ऐका भेकड नीचांनो ॥ जी ॥ माझा भारत, भारत माझा छंद लागु दे जीवाला । ध्यानीं मनीं स्वप्नीं सदाही ध्यास एक हा हृदयाला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

जर चिनी विजयी होईल । तर सर्वस्व लया जाईल ॥ जी ॥ माणुसकी मरून जाईल । संस्कृती खाक होईल ॥ जी ॥ सारीं देवळं नष्ट होतील । सारे देव जळून जातील । धर्माला आग लागेल । नीतिचा जीव जाईल । व्यक्तित्व नष्ट होईल । सारा देश गुलाम होईल । बायकांची अब्रू जाईल । मूलंबाळं ठार होतील । चंगीज-खान पुन्हां येईल । रक्ताचे पाट वाहतील । हातापायांत बेड्या पडतील । पाठीवरती फटके बसतील । जीणं लाजिरवाणं होईल । भारताचा नरक होईल ॥ चाल ॥ चाळीस कोटि भारतीय गुलाम...हें चित्र भयंकर पहा दिसतंय डोळ्याला । ते पहा रक्ताचे पाट चालले खळखळा । ते पहा शत्रूनीं कैक टांगले झाडाला । त्यांनीं पहा कैकांच्या गळा फांस लावला । पोरंबाळं कसे चरचरा चिरती तें पहा । बायकांच्या शीलाला धक्का लागतोय पहा । गोळ्यांनीं पटापट कैक मरती तें पहा । आगीचा डोंब उसळला किती तो पहा । थयथया अंगावर कसे नाचति तें पहा । असं चित्र दिसेल डोळ्याला । म्हणून बंधूंनो, एलगारा करा । छातीचा कोट करून बडवा शत्रूला । असा मारा जोराचा करा कीं कोसळेल भूमिवर सारा । नाहींतर पाठ फिरवुनी जाईल माघारा ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

पुष्पवृष्टि करण्याला बसले देव फुलें करिं घेऊन। पूर्वज तुमचे आतुरतेनें बघती डोळे लावून ।। गुरुनानक गुरु गोविंदसिंह हे पाहती पंजाबांतून । बाप्पा रावळ राणा प्रतापसिंह पाहती मेवाडांतून । बुक्कराय हे पाहत असतिल विजयनगरच्या वरतून । छत्रपति श्रीशिवाजी राजे पाहती रायगडावरनं ।। जी ।। कैक महात्मे साधुसंतहि टक लावुनि वर बसलेले । लोकमान्य गांधीजी सुभाषहि थोर महात्मे पहाणारे ।। चला उठा तुम्ही झुंजारांनो, पळही दवडूं नका आतां । विजयश्रीची माळ घेऊनि विजयदेवि येईल आतां ।। आग आगही होत जिवाची अंगारा पेटुन आला ।। मर्दांनो, मुजरा करण्याला **पांडुरंग** धांवून आला ।। जी ।। ७ ।।

रचना-१९६२.

## वीरवंदन !

## पोवाडा ................ : ३४ :

धन्य धन्य तुम्हि रणवीरांनो, कमाल केली शौर्याची । क्षात्रधर्महि डोलुं लागला करा सांगता यज्ञाची ।। सेनासागर खवळुनि उठला लाटा भिडल्या गगनाला । सेबर पॅटन पार बुडविले शत्रू मिळविला मातीला ।। गर्विष्ठांचें नाक कापलेत, अहंकार जिरुनी गेला । अशा लढाया कुणि ना केल्या धन्य धन्य रे तुम्ही झाला ।। पराक्रमांच्या तेजबलानें शत्रू चळचळा कापविला । दुनिया सारी दिपुनी गेली दिव्य पराक्रम तुम्ही केला ।। हिंदु मुस्लिम शीख पारशी ख्रिश्चन एकच या काळीं । पांच अग्नि जणुं धडकत उठले करती अधर्माची होळी ।। विळखा घालून प्राणघातकी असे कालिया बसलेला । बाळकृष्ण तुमच्या रूपानें आज जणुं काय अवतरला ।। शिवाजी राजे आणि मावळे कसे झुंजले त्या वेळा । दर्शन त्यांच्या पराक्रमाचें आज घडविलें आम्हांला ।। शीख धर्मगुरु गोविंदांचें दर्शन घडलें या वेळा । इब्राहिमखान गारदी जणुं पानपतावर अवतरला ।। अधीर झाले होते आत्मे शिवाजी बाजीरावांचे । झांशीवाली तात्या टोपे लोकमान्य गांधीजींचे ।। तृप्त जाहले असतिल सारे ऐकुनिया तुमच्या गाथा । "धन्य धन्य शाब्बास," असे हे बोल बोलती यश गाता । **धनंजयाची** निशाणबाजी **भीमगदेचा** तो टोला । **मारुतीची** ती झेप भयंकर दिसली आमुच्या डोळ्याला ।। तारे सारे फिक्कट झाले तुमच्या अद्भुत तेजानें । सूर्य चंद्रही सचिंत झाले तुमच्या तेजःकिरणानें ।। सिंहहि गेले भांबावुन ते गरुडहि थिजले जागेला । पराक्रमाचा वीररसाचा निनाद भिडला गगनाला ।। दिव्य लोकांतुन सुमनें उधळित असतिल पूर्वज या वेळा । चला पुढें तुम्ही झुंजारांनो, समरयज्ञ हा पूर्ण करा ।। उज्ज्वल यश हें ऐकुनि तुमचे कान निवाले या वेळा । गात पवाडे धवल यशाचे **पांडुरंग** तन्मय झाला ।। जी ।। १ ।।

रचना–१७–९–६५.

## वंदन करूं शूरवीरास !

## पोवाडा ............................................... : ३५ :

### चौक १ ला

स्वार्थाचा होम ज्यांनीं केला। जीव वाहिला। राष्ट्रकार्याला। लोकसेवेचा घेतला ध्यास। जणुं काय दीप झाला लोकास। वंदन करूं शूरवीरास ॥ जी ॥ चाल ॥ झालं समुद्राचं मंथन। हालाहल झालं निर्माण ॥ जी ॥ सारं जग गेलं घाबरून। रक्षील विश्वाला कोण ? ॥ जी ॥ शंकर आले धावून। हालाहल केलं प्राशन ॥ जी ॥ शिवकंठ गेला भाजून। नीळकंठ झालं अभिधान ॥ जी ॥ चाल ॥ अंगाचा दाह जाहला। नागाचा विळखा कंठाला। मस्तकीं धरलं चंद्राला। स्मशानांत थंडशा जागीं घेतला आसरा ॥ जी ॥ वैराग्यमूर्ति ही खरी। दिसे भूवरीं। शांति ज्या वरी। ज्यानं सुखी केलं साऱ्या जगतास। जगाला ज्याचा पूर्ण विश्वास। वंदन करूं शूरवीरास ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

राज्य लाथाडुन वीर चालला चौदा वर्सं वनवासाला। राक्षस सारे ठार मारिले धर्ममार्ग तो राक्षियला ॥ जी ॥ भ्रात्रासाठीं आत्मसुखाचा होम जयानं हो केला। धन्य लक्ष्मण, धन्य भरतही धन्य धन्य या जगिं झाला ॥ जी ॥ अचाट कामें शुद्ध मनानें रामास्तव ज्यानें केलीं। पवनपुत्र अंजानितनयाला नमनांजलि मी वाहियली ॥ जी ॥ देवकिनंदन धर्मरक्षणा नंदाच्या घरिं अवतरला। दुष्टांचा संहार करुनिया कर्मयोग

तो शिकविला ॥ जी ॥ वृत्रासुर तो दैत्य माजला । पीडत होता त्रैलोक्याला । जनतेचें रक्षण करण्याला । दधीचि ऋषिंनीं हाडें देउनी देवेंद्राला सुसज्ज केला । अन् वृत्रासुर ठार करविला ॥ चाल ॥ मुनी दधीची धन्य जाहले देह दिला जनकार्याला । वंदन करुं यां चला बंधुंनो, अशा महात्मा पुरुषाला ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

सत्त्वरक्षणा त्रिपादभूमी दान दिली बळि राजानं । शब्द दिलेला परत घेइना, धन्य धन्य भूपतिरमण ॥ राज्य दिलं स्वप्नांत दान परि पूर्ण केलं ज्यानं वचन । हरिश्चंद्र राजाला आतां करूं सर्वहि त्या नमन ॥ चाल ॥ भगवान् बुद्धानीं दयाधर्म सांगितला ॥ जी ॥ महावीर जैनांनीं तोच धर्म दाखविला ॥ ते बसवेश्वरही वंद्य भरतभूमीला ॥ येशु खिस्त महात्मा याचसाठीं अवतरला ॥ जी ॥ झरतुष्ट्र महात्मा धन्य होउनी गेला ॥ जी ॥ अहुरमस्जद दिव्य पुरुषानं लोक उद्धरला ॥ जी ॥ तो पैगंबरहि याचसाठीं अवतरला ॥ गुरु नानक गुरुंनीं विश्वधर्म सांगितला ॥ जी ॥ किति संत महात्मे करती याच कार्याला ॥ जी ॥ चाल ॥ देशोदेशीं जन्म घेउनी सुपंथ दर्शन ते करिती । धन्य महात्मे धन्य पुरुष ते धन्य जाहले भूवरती ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

राष्ट्राचं करण्या रक्षण । कैकांनीं केलं बलिदान ॥ जी ॥ थयथया जुलमी सैतान । जेंव्हां जेंव्हां आले नाचून ॥ जी ॥ तेंव्हां तेंव्हां झुंज देऊन । जनतेचं केलं रक्षण ॥ जी ॥ धारातीर्थी पडले मरुन । वीरांचं आलं मरण ॥ जी ॥ अशा शूरांना करुन वंदन । होऊं या धन्य आपण

॥ जी ॥ चाल ॥ बाप्पा रावळ पृथ्वीराजही प्रतापराणा दाहीर। देवगिरीचा रामरायाहि वंद्य जाहले रणशूर ॥ जी ॥ शिवाजी, ताना, मुरारबाजी, बाजीप्रभुही ते थोर। तसे सदाशिवरावभाऊही पानपतीं पडले वीर ॥ जी॥ धन्य जनकोजी विश्वासरावहि झुंजून पडले रणशूर। अभिमन्यूची आठवण देती धन्य धन्य हे रणवीर ॥ जी ॥ राणी लक्ष्मी झांशीवाली तात्या टोपे झुंजार। फडके कर्वे चाफेकरहि धन्य जाहले हे वीर ॥ बाबु गेनुची निधडी छाती कवटाळी ती मरणाला। राष्ट्रासाठीं प्राण अर्पिले धन्य धन्य ही नरमाला ॥ जी ॥ लोकमान्य टिळकांनीं राष्ट्रा निर्भयतेचा धडा दिला। देशासाठीं देह झिजविला वंदन करुं या आम्हीं त्याला ॥ जी ॥ वंद्य महात्मा गांधीजींनीं सत्य अहिंसा मंत्र दिला। जागें केलें राष्ट्र खडबडून वंदन करुं या हो त्याला ॥ जी ॥ चाल ॥ ज्यांनीं ज्यांनीं स्वार्थ सोडला। देह अर्पिला लोकसेवेला। जाळुन टाकले ज्यांनीं कुविचार। ज्यांनीं दुष्टांचा केला संहार। दीन दुबळ्यांचे झाले आधार। त्याना त्याना **पांडुरंग** नमणार ॥ ४ ॥

रचना–२३-९-६३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
४८००९ वि: काव्य
१५५८ नों. दि. २०/१/८९

# हैद्राबादची मोहीम

## पोवाडा —————— : ३६ :

### चौक १ ला

जुलुमशाही नष्ट कराया लोकशाही धांवुन गेली। विजय असो, विजय असो, विजय असो, तो या काळीं ॥ ध्रु० ॥

१५ ऑगस्ट १९४७ ला। इंग्रज इथून निघून गेला। हिंदुस्थान स्वतंत्र झाला। आनंद झाला। पण जातां जातां इंग्रजानें एक डाव केला। संस्थानं सारीं स्वतंत्र केलीं या वेळा॥ संस्थानांनीं स्वतंत्र राहावं-किंवा मिळावं हिंदुस्थानाला किंवा पाकिस्तानाला। जातां जातां झगडा लावून इंग्रज गेला॥ जी॥ भारतांत सातशें संस्थानं-त्यांचे राजे हुकुमशाह सदा गांजती लोकाला॥ सारी प्रजा हवालदील झाली वाली कोण बोला?॥ चाल॥ वल्लभभाई पटेल सरदार। राजकारणी मोठे हुशार॥ पोलादी पुरुष झुंजार। मनाचे मोठे खंबीर॥ निश्चयी करारी फार। भीति ना कधीं शिवणार॥ बार्डोलीचा लढा लढवून। केली इंग्रजशाही बेजार॥ चाल॥ त्यांनीं विचार मनामधिं केला। संस्थानांना वेळींच पायबंद जर नाहीं घातला। तर भारताचे तुकडे होतील घात राष्ट्राला॥ म्हणून त्यांनीं संस्थानिकांना वळविलं आपल्या बाजूला। अन् भारताच्या संघराज्यांत-सारा संस्थानिक सामील केला। पण एक हैद्राबाद राहिलं बाजूला। हैद्राबादचा निजाम मगरूर ताठर झाला। जैसे थे करार होता केला। तो संपणार होता १९४८ च्या नोव्हेंबरला। त्याच्या आंतच एक डाव त्यानं केला। तें आतां सारं सांगीन पुढच्या चौकाला॥ १ ॥

• •

## चौक २ रा

जैसे थे करार करुन । वेळ काढून । मोठ्या युक्तीनं । राखावं हैद्राबाद संस्थान । एक जातीय विषारी स्थान । करावं भारताला हैराण ॥ जी ॥ असा बेत दुष्ट करून । हुकुमशाही घाली थैमान ॥ रझाकार दल उभारून । प्रजाजन केले हैराण ॥ कासीम रझवी सैतान । केला धष्टपुष्ट निजामानं ॥ दोन लाख सैन्य उभारून । झाला मस्त सत्तालोभानं ॥ चाल ॥ धुमाकूळ वर्षभर केला । शाश्वती नाहीं कोणाला । लुटालूट जाळपोळ करून कैक बुडविला ॥ त्यांनीं चिरलं कैक लोकाला । रक्ताचा पाट वाहला । मांसाचा चिखल जाहला । किती बलात्कार त्यांनीं केले गणना कोणाला ? ॥ दहा दहा वीस वीस जणांना उभे करून ठार केलं त्यांनीं सर्वाला ॥ राक्षसांचा अवतार झाला । किति स्त्रियांना त्रास त्यांनीं दिला । मोजदाद करील कोण बोला ? । लोक सारा हवालदिल झाला । रामानंदस्वामींना धाडलं त्यांनीं तुरुंगाला ॥ देशभक्त धाडले तुरुंगाला ॥ चाल ॥ हैद्राबादी प्रजा गहिंवरून फोडे किंकाळी ॥ अहो जी ॥ "या धावा, वांचवा प्राण, व्हावं कैवारी ॥ अहो जी ॥ ये हिंदुस्थान सरकारा, कुणी तरी तारा । आतां या काळीं ॥ अहो जी ॥ तूं हिंदभूमिचा लाल जवाहरलाल धांव या काळीं ॥ अहो जी ॥ संपली दया का आतां । वाटते चिंता । मनाला भारी ॥ अहो जी ॥ चाल ॥ ऐकून अशा हांकेला । हिंद सारा कासाविस झाला । जो तो म्हणे चढाई करा । अन् वठणीवर आणा निजामाला । हिंदुस्थान सरकारनं विचार काय केला । तें आतां सारं सांगीन पुढच्या चौकाला ॥ जी ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

भारतानं लिहिलं निजामाला ॥ "तुम्ही प्रजेचा उच्छाद मांडला । हिंदुंना वाली नाहीं उरला । तुम्ही राजे, सारी प्रजा सारखीच तुम्हाला। असं असून पक्षपात केला । रझाकार मोकाट सुटला । अरबांना केलं तुम्ही गोळा । अन् जुलमाचा कहर तुम्ही केला । तुम्ही एक संस्थानिक झाला ॥ सार्वभौम राहण्याचा विचार तुम्ही जो केला । तो खोटा विचार झाला । जर प्रजेला सुख न द्याल । तर यावं लागेल आम्हांला । प्रजेला जबाबदार मंत्री नेमा या वेळा । रझाकार दळ बंद करा । कासीम रझवीला आवरा । अन् सामील व्हावं भारताला । तुम्ही निजामशहा, याचा विचार पुरता हो करा" ॥ निजामानं धिक्कार केला । कासीम रझवी लागला बरळायला । "हैद्राबाद स्वतंत्रच राहील । जर कोणी जाईल वाटयाला । तर हिंदुस्थान जिंकूं या वेळा । अन् असफशहाचा झेंडा फडकेल लाल किल्लयाला" । असं म्हणून अत्याचार केले नाहीं तोड त्याला । हिंदी मुलखांत रझाकारांनीं धुमाकूळ घातला । १४३१ खेडीं जाळून १७ कोटि रुपये लुटून नेले जागोजागेला ॥ ८७८८ घरें जाळलीं, ९२१ लोकांना त्यांनीं चिरलं चरचरा । ११९९ स्त्रियांवर गुंडांनीं बलात्कार केला ॥ निजामींत अत्याचार रोज किती चालला । त्याचा हिशेब कोण ठेवील बोला । पाण्यासारखा पैसा उधळला । जमा केला त्यांनीं दारुगोळा । **सिडने कॉटन** त्यांच्या मदतीला । त्यानं विमानातनं लढाईचं सामान आणलं त्या स्थळा । असा रोजचा प्रकार झाला । तंवा हिंद सरकारनं पुन्हां खलिता पाठवला । "हैद्राबादी प्रजाजन आणि हिंदुस्थान – हें एकच – यांत फरक नाहीं झाला । ९० टक्के हिंदुप्रजाजन पण त्यांना अधिकार कसलाहि नाहीं – तुम्ही जातीय राज्य चालविण्याचा चंग आहे बांधला । पण हें खपणार नाहीं आम्हाला । तर लोकशाही कारभार करा । रझाकार दल बंद करा ।

अन् व्हा सामील हिंदसंघाला । हें न कराल तर पोलीस कारवाई करावी लागेल आम्हाला । निजामानं जबाब धाडला । " आमच्या राज्यांत आबादीआबाद सर्वाला । त्याची काळजी नको तुम्हाला । बंडखोर दडपून टाकायला । रझाकार पाहिजेत आम्हाला । तुमच्या राज्यांत रझाकारांनीं दंगा केला । हें खोटं वाटतं आम्हाला । रझाकार फार सज्जन झाला । कासीम रझवी अच्छा अदमी झाला । असं असतां तुम्ही आरोप केला । हें चांगलं नाहीं या वेळा " । हिंदुस्थान सरकारानं पुन्हां लिहिलं निजामाला । " तुम्ही लिहिलं तें सारं खोटं वाटतं आम्हांला । प्रजेला धीर द्यायला । आमच्या फौजा ठेवणार शिकंदराबादला । रझाकारांचं बंड मोडायला । त्यांचा उपयोग होइल तुम्हाला । तर जाऊं द्या आमच्या फौजेला " । निजामानं खलिता लिहिला ॥ " तुमच्या फौजेचं काय काम बोला । इकडं धाडूं नका तुमच्या फौजेला । हा जैसे थे कराराचा भंग झाला । त्यांतून जर पाठवाल फौजेला । तर आमच्या फौजा सामना देतील, ऐका या बोला " ॥ जी ॥ निजामाच्या बंदोबस्ताला । आमच्या फौजा चालल्या – तें सांगीन आतां मी सारं पुढच्या चौकाला ॥ जी ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

हैद्राबादच्या बंदोबस्ताचा लढा सुरू झाला ॥ सप्टेंबरच्या १३ व्या तारखेला । १९४८ सालाला । सोमवारचा दिवस तो झाला । पहाटेच्या चारच्या ठोक्याला । हिंदी सैन्य चाललं जुलुमांचा नाश करण्याला ॥ पांच बाजूंनीं मोर्चा चढविला । अन् जसा उडवावा पाचोळा । तसा शत्रुंचा धुव्वा उडविला । एका दिवसांत शेंकडों मैलांचा झपाटा मारला ॥ ले. जनरल राजेंद्रसिंहजी-सरसेनापति मोहिमेला । मेजर जनरल चौधरी सोलापुरच्या आघाडीला । मेजर जनरल रुद्र मद्रासच्या

आघाडीला। मेजर जनरल ब्रार मुंबईच्या बाजूला। ब्रिगेडियर शिवदत्त-सिंह मध्यभागला। एअर-व्हाईस-मार्शल मुकर्जी विमानदळाला। वरंगळ बिदर विमानतळावर बाँबवर्षाव जोराचा केला। तुळजापूर-बिदर-बेझवाडा–नळदुर्ग–औरंगाबाद–हुमणाबाद–सूर्यपेठ, सदाशिवपेठ–अशीं कैक गांवं सर करून–शिकंदराबादकडं शूर शिपाई चालला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ विमानातनं करुनिया मारा। शत्रूंचा हटविला मारा ॥ रणगाडे चालले धडधडा। मारीत धडका सर्वाला ॥ जी ॥ सोमवारीं केलं चढाईला। बिजलीचा वेग लढाईला। अवघ्या पांच दिवसांत निजाम नामोहरम केला। शुक्रवारीं राजेंद्रसिंहांनीं निजामच्या एल्ड्रोसला संदेश दिला "कीं तुमच्या फौजेचा धुव्वा उडाला। हैद्राबादजवळ ३० मैलांवर आमचा जवान आहे पोचला। आतां जर कराल प्रतिकाराला। तर रक्तपात होईल या वेळा। तर हा रक्तपात टाळायला। शस्त्र खालीं ठेवा-अन् या शरण आमच्या फौजेला। नाहींतर तयार व्हा मरणाला"। शुक्रवारीं संध्याकाळीं साडेसातला निजामानं लढाई बंद करण्याचा हुकुम दिला ॥ रझाकार मोडून काढला। कासीम रझवीला पकडून बंदोबस्तांत ठेवलं या वेळा ॥ तुरुंगातनं सोडून दिलं राष्ट्रभक्तांला ॥ **रामानंदतीर्थ** स्टेट कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाला। तुरुंगातनं सोडलं सर्वाला। **लायकअली** मंत्रिमंडळानं राजिनामा दिला ॥ जुलुमाचा नायनाट झाला। अवघ्या पांच दिवसांत असा विजय मिळविला ॥ माझा प्रणाम **हिंदसेनेला**। माझा प्रणाम शूर वीराला। माझा प्रणाम **सरदार पटेलाला**। माझा प्रणाम **जवाहरलालाला** ॥ धन्य धन्य जवाहर झाला प्यारा सर्वाला ॥ **पांडुरंग** शाहीर गातो वीरकवनाला ॥४॥

रचना–२०-९-४८.

# पंडित जवाहरलाल नेहरू

## पोवाडा —————— : ३७ :



लेखक :

**महादेव दत्तात्रय खाडिलकर**

तथा

**दत्तकुमार**

हिंदमाता देविच्या कंठीं । रत्नं झळकती । अमोलिक किती । जवाहर 'लाल' हिरा जणु त्यांत । अर्पि तारुण्य देशकार्यांत । '**दत्तकुमार**' दंग कवनांत ॥ ध्रु० ॥

● ●

### चौक १ ला

काश्मीर नगरी खरी । स्वर्गसुंदरी । किं अलकापुरी । स्वर्ग भूमिही भरतखंडांत । वनश्री जिथें दंग ख्यालांत । झालें श्रीनगर नांव विख्यात ॥ मूळपुरुष 'राजकौल' जाण । निघाले तेथून । स्वर्ग सोडून । आले भूलोकीं दिल्ली नगरास । रुचे देवाला भूवरि वास । जगाचा सोडविण्याला त्रास ॥ दिल्लीस कालव्याकांठीं । बांधली कुटी । उपनामक्रांति । जाहली कशी सांगतों तुम्हांस । 'नहर' हा शब्द असे कालव्यास । म्हणुन कौल नेहरू म्हणाति हो त्यास ॥ पुढं झाले प्रसिद्ध नेहरू ।

ब्रीद ना हरूं । कुलासी तारूं । नाद दुमदुमे त्यांतुनी खास । अशा कुलामधीं आले जन्मास । जवाहर कंठमणी युवकास ॥ चाल ॥ १८८९ त । नवंबरांत । झालं जनन । चवदाव्या तारखेस जाण ॥ मोतीलाल । त्यांचे वडील होते गुणवान । धनवानहि बुद्धीमान ॥ चाणाक्ष वकीलही जसे । पुढारी तसे । धारिष्टपूर्ण । निर्भय वृत्ति ही छान ॥ काँग्रेसचें अध्यक्षस्थान । मोठा बहुमान । दिला देशानं । दोन वेळांहि सन्मानानं ॥ चाल ॥ आतां जवाहर बालपण ऐका सत्वरी ॥ आगगाडी साहेबाची मिरासदारी खरी ॥ दुसऱ्या वर्गात जरी । तिकिटानं शिरावं तरी । ' उठो, काला आदमी ' म्हणतांच यावं बाहेरी ॥ अशी दीन हिंद-पुत्रांची अवस्था खरी ॥ अशा वेळीं साहेबाला नरम कुणी जर करी ॥ तरी फुले हर्षानं जवाहराची स्वारी ॥ अभिमानी वृत्ति ही खरी । झालीं दहा वर्षं हो पुरीं । ज्ञानाची आवड भारी । जगाची वार्ता सारी । या वयांत वाचुन टाकी अधाशापरी ॥ तंवा चाले आफ्रिकेमधीं आंग्ल मशीनरी ॥ जरि बोअर लोकावरी । जाणली त्यांनीं हो तरी । जाणुनी, आली आंग्लांची त्यास ओकारी !! तेराव्या वर्षी थिऑसफींत शिरली स्वारी ॥ काव्य थिऑसफी ऐकली तुम्ही आजवरी ॥ पुढं रूसो-जपान युद्धाची माजे सुरासुरी ॥ रशियाचीं पावलं माघारीं । जपान करी शिरजोरी । पूर्वेची बसलि दहशत पश्चिमेवरी ॥ युरोपीय तोरा मुळिं नुरला जगतांतरीं ॥ जवाहरासि ऐकुन स्फुरण येई खरोखरी ॥ किती विशाल दृष्टी तरी । काय तुम्हां समजली स्वदेश वार्ता खरी ? ॥ आतां आळस सोडा तरी । घ्या करून माहिती सारी । तर येईल सद्दी बरी । नाहींतर लाथ परक्यांची पाठीवरी ॥ चाल ॥ अभ्यास विद्यार्थीवरा । करी चातुरा । देशाचा जरा । जवाहराकृति ही बालपणांत । अर्पि तारुण्य देशकार्यांत । '**दत्तकुमार**' दंग कवनांत ॥ १ ॥

रचना–१९–६–६७.

● ●

## चौक २ रा

'कोण मुख्य प्रधान असे । इतरही तसे?' । नावं पुसतसे । शिक्षकही आंग्ल शिष्य वर्गास । पाहती सारे एकामेकांस । देई उत्तर जवाहर त्यास ॥ नांवं सांगितलीं भडभडा । शिक्षकाहि खडा । वासुनि 'आ' बडा । फाकुनी डोळे पहातोय त्याला । जिथं इंग्रज बाळासही । नसे ठाव आपुली आंग्लाई । तिथं कसा जवाहर भाई । उत्तरा देई । नवल हें त्याला ॥ तिथं थाटे नित्य मजलिस । हिंदी लोकांस । येई आवेश । मोठ्या स्फूर्तीनं बोलती सारे । देशभक्ती जहालभाषणीं । परी खंत न धरिती कुणी । आय्. सी. एस्. होऊनी स्वार्थ साधनीं । बांधती मनीं । उंच मनोरे ॥ त्या सभेंत जाती जरी । जवाहर तरी । मौनता बरी । वाटे खळखळ उथळ पाण्यास । विद्या विनयानं शोभते खास । शांत गांभीर्य खोल सागरास ॥ मग संपविला विलायतवास । बॅरिस्टर पास । बारा सालास । होउनी आले परत देशास । काँग्रेस पाहिली बांकी-पुरास । जाहले पाहिलें दर्शन त्यास ॥ चाल ॥ जसं चंद्राविण आकाश । दिसे भकास । तशी काँग्रेस । टिळकाविणें भासे उदास ॥ बुटासुटांत दिसती बरे । प्रतिनिधी सारे । नसे परि ध्यास । राजकारणाचा मनास ॥ परि नामदार गोखले । देशभक्त भले । लागली ज्यास । तळमळ अंत-रंगास ॥ पडे छाप जवाहरावर । वाटे आदर । पाहुनी त्यास । एकलाच हिरा जणुं खास ॥ असा काँग्रेस देखावा । पाहिला मेळावा । बांकि-पुरास । मवाळांची वाटे मजलस ॥ चाल ॥ पुढं अलाहाबादेला सुरू केली वकीली ॥ पर दृष्टी पुढं धावली । कार्यास शोधित गेली । इतक्यांत स्वारी टिळकांची मुक्त जाहली ॥ होमरूल लीग निघाली । चळवळ सुरू जाहली । जवाहर झाले सामील त्यांत त्या काळीं ॥ परवृत्ति न संतोषली । कधिं अन्य बांधवा कळति सभा चळवळी ॥ शेतकरी काम करी । जमतिल झेंड्याखालीं ॥ अशि चिंता त्यास लागली । जणु भावी कार्याची रूपरेषा

आकळली ।। पुढं विवाह झाला तिथि पाहुन चांगली ।। हिमालयीं अमरनाथाची यात्रा केली ।। तिथं आला काळ पर होती वेळ चांगली ।। मार्गांत भेग थोरली । बर्फानं होति लपविली । पर पडता पाय उघडली । पाळी जिवावरी बेतली । पर ईशकृपा जाहली । कडा धरून दोन्ही धैर्यानं स्वारी वाचली । मग यात्रा मागं परतली । पर आस मनीं राहिली । कधिं जाइन फिरुनी अमरनाथ या स्थळीं ।। नच संकट शैलाधानें वृत्ति बदलली ।। चाल ।। पुढं देशकार्य हिमालय । चढे निर्भय । रोवुनी पाय । धैर्यानं संकटमय मार्गांत । अर्पि तारुण्य देशकार्यांत । **दत्तकुमार** दंग कवनांत ।। २ ।।

• •

## चौक ३ रा

नवयुगप्रभा फांकली । दिशा उजळली । चेतना स्फुरली । तुतारी-नाद भिडे कानाला । गेली निद्रा पार झडझडून । आली जाग पुन्हा खडबडून । असा झाला देश तय्यार ! गांधीजी थोर । दावी चमत्कार । वीस सालाला ।। जवाहरासि दिसला देखावा । तंवा एक नवा । किसान मेळावा । हलाखित सारा एक हो झाला । रामचंद्र बाबा पुढारी । त्यानं केला एक शेतकरी । असे सारे मेघ पाहुन । जवाहर मन-मयुर हौसेनं । नाचुं लागला ।। मग केला प्रवास हौसेनं । उन्हांतान्हांतून खेड्यामधून । शेतकरी सारा कराया शहाणा । दिली सत्याग्रह शिकवण । केलं दूर त्यांचं अज्ञान । आणि दिलं राजकीय ज्ञान । तसाचहि छान । दिला समजून भांडवली बाणा ।। पुढं सत्याग्रह सुरू झाला । धाडलं तुरुंगाला । मार्ग लाभला । तेथुनी संकटमय कांटेरी । काय दिवस रात्रिवांचुनी ? । सुख येई दुःखामागुनी । पारतंत्र्य वाळवंट तें । जंवा संपते । तंवा लागते । भूमि सोनेरी ।। चाल ।। दादाभाई, टिळक जरि गेले । तरि वाळवंट नाहिं सरलें ।। मोतिलाल होरपळून

गेले । तरि वाळवंट नाहिं सरलें ॥ चाल ॥ तरि देश पुढं जाणार । ध्येय गांठणार । सोसुनी हाल । काय सूर्य त्यास जाळील ? ॥ परि वाफ आत्मसरितेची । पंक्ति मेघांची । सूर्य झाकील । मग थंडवसा येईल ॥ तंव्हा पायीं वाळुचा चटका । अंगिचा भडका शांत होईल । मग देश पुढं जाईल ॥ धैर्याची धरुनिया कास । यशाची आस । मनीं राहील । तंव्हा वनराजी येईल ॥ तिथें साफ करुनिया भूमी । झोपड्या नामी । जंव्हा उठतील । तंव्हा देश ध्येय गाठील ॥ चाल ॥ असो आतां ऐका गोष्टीला । जवाहर सुटले त्या वेळा । मग संस्थानी मामला । पाहाया त्यास मिळाला । सत्याग्रह जैतोस झाला । शीखांनीं केला ते वेळा । बोलावलं जवाहराला । गेले जवाहर त्या स्थळा । पर मुलुख संस्थानी झाला । एकदम हद्द सोडायचा हुकूम जाहला ॥ काय पक्ष्यावानी उडुनिया जावं गगनाला ॥ काय भुतावानी अदृश्य व्हावं ते वेळा ? ॥ जंव्हा गाडी येइल टेसनाला । तंवर राहिन या जागेला । असं दिलं उत्तर त्याला । तंव्हा नेलं त्याला तुरुंगाला । तिथं उंदिरमामा करति लहरी राज्याला ॥ धुमाकुळ घुशींनीं रात्रंदिन घातला ॥ संस्थानी राज्याचा नमुना जणूं दावला ॥ घटकेंत कटाचा खटला उभा राहिला ॥ न्यायाधीश जादुगार भला । शेंदोनशें पानं लिहितोय एका घटकेला ॥ कायद्याचं पथ्य म्हणुनिया रजा दिली त्याला ॥ असा न्याय संस्थानी झाला । काय स्वराज्य म्हणावं याला ? । स्वराज्य नको लोकराज्य हवं आपणाला ॥ असा नाभा संस्थानामधीं प्रकार पाहिला ॥ चाल ॥ पुढं ढासळली प्रकृती । पत्नीची अती । डॉक्टर मती । बोलली, 'जावं युरोप खंडांत' । अर्पि तारुण्य देशकार्यांत । **दत्तकुमार** दंग कवनांत ॥ ३ ॥

• •

## चौक ४ था

युरोपांत फिरुनि चहुंकडे। पाहिले बडे। देश फाकडे। ऋद्धिसिद्धींनीं वास जिथं केला। बुद्धीचा दाता गणपति। त्रघा गेला त्यांच्या संगाती। आला वीट जणूं भारती। आंधळी भक्ति।। कार्य-निवृत्ति। पाहूनी विटला।। गेली अधंश्रद्धा लोपुन। पूर्ण जेथून। डोळसा ज्ञान। मिळतसे धरा एक विश्वास। आले जगावरी देश उदयास। धरिली हो ज्यांनीं बुद्धीची कास ।। चाल ।। ती आंग्लभूमि पाहिली। साम्राज्य जननि देखिली।। सोन्यानं होती नटलेली। तरि सौख्यवृद्धि ना झाली ।। मिष्टान्न भोजनें केलीं। पर मेदबुद्धि जाहली।। भांडवलशाही माजली। मजुरावरि घाला घाली।। न्यायदेवी आंधळी बनली। दुःखार्त प्रजा ही झाली।। दिनासि कुणी ना वाली। सर्वत्र स्थिती ही झाली ।। चाल ।। अपवाद त्यामधीं एक। रशियन लोक। दीनांची हाक। भेदुनी गेली जयांच्या कर्णा। भांडवलशाही बुडवुनी। ती मजुरशाही स्थापुनी। टाकिली भेद झडवुनी। भेद मिटवुनी। फुंकिला ज्यानीं जयाचा कर्णा ।। चाल ।। बेकारी बुडाली पूर्ण। मिळालें अन्न। सर्व लोकांना। तें स्वराज्य लक्षण जाणा।। बुडवुनी उच्चनीचता मिळाली समता। सर्व घटकांना। तें स्वराज्य लक्षण जाणा।। वाढवाया बुद्धि वैभव। मिळाला वाव। जेथ सर्वांना। ते स्वराज्य लक्षण जाणा ।। नसे राजकारणी मक्ता। मिळाली सत्ता। प्रजाजनांना। तें स्वराज्य लक्षण जाणा ।। तो राजलहर यमदूतीं। गाडुनी मार्ती। अभय दीनांना। तें स्वराज्य लक्षण जाणा। जर स्वराज्य असलें हवें। तुम्हाला नवें। ध्येय ठरवा ना। स्वातंत्र्य हिंदपुत्रांना।। साम्राज्य छत्र विषारी। जीवना मारी। स्नेह तोडा ना। मन बोले बोल हे नाना ।। चाल।। असे सारे देश पाहून मनीं हर्षला।। जरा उतार पडे पत्नीला। तंवा आले परत देशाला ।। मद्रास काँग्रेसला। ठराव त्यांनीं

मांडला। स्वातंत्र्य ध्येय उच्चार तंव्हा जाहला॥ पर आला इकडं सायमनसाहेब देशाला॥ किति हक्क द्यावे देशाला। चवकशी त्याची करण्याला। जो हक्क देशाचा झाला। तो म्हणे साहेब आपला। अपमान देशाचा झाला। धिक्कार देशानं केला। "गो बॅक, सायमन" बोला। कल्लोळ देशीं जाहला॥ साहेबाच्या स्वागत सिद्ध बावटा काळा॥ संयुक्त प्रांतीं जवाहर पुढं जाहला॥ आला रंग मिरवणुकीला। काळं निशाण संगे मदतीला। पाहून घोडेस्वार लाल झाला। त्यांनीं घोडा दौड हाकला। पर लोक नाहीं बघा भ्याला। तंव्हा फेरा लाठीचा आला। मार बसला कासाविस झाला। तिरमीरी आलि डोक्याला। पर धीर आत्मशक्तीचा त्यास लाभला॥ तंव्हा दुसरे दिवशीं आला रंग बहिष्काराला॥ हरताळ कडक जाहला। असा जंव्हा प्रकार पाहिला। तंव्हा गेला बेजारून साहेब विलायतेला॥ देशानं पुकारा केला। आम्ही मालक आमुचे, वाव नसे दुसऱ्याला॥ चाल॥ झाला नवा लोक अग्रणी। राजकारणी। नवी घाटणी। मांडली ज्यानं स्वराज्य लढ्यांत। अर्पि तारुण्य देशकार्यांत। **दत्तकुमार** दंग कवनांत॥ ४॥

● ●

## चौक ५ वा

पिटाळला साहेब सायमन। दडपशाहीनं। गेला हादरून। युवक जागृत सारा झाला। देश संपांनीं त्रस्त केला। उसळुनी चेंडु जणूं फिरला॥ सिमल्यास असेंब्लीमधीं। झाला काय विधी। सुंद प्रतिनिधी। भगतसिंगानं हरविली धुंद। बॉंब फेकून केली मति मंद। झाले सरकारचे डोळे लाल बुंद। दडपशाहीचा लागला छंद॥ अशी आली लहर वायुची। झंजावाताची। खूण ही साची। पुढारी याचा कोण होणार ?। महात्मा म्हणे वृद्ध मी फार। जवाहर जवान मर्द शिलेदार॥ जंव्हा घेतला त्याचा विचार। काय घेणार शिरावर भार। मुकुट काटेरी शिरीं।

धरणार । दिला होकार नाहीं डरणार । जाहला जगांत जयजयकार ।। चाल ।। तंवा लाहोर काँग्रेसमधीं । अध्यक्षपदीं । विराजमान झाले । जयनादें गगन दुमदुमलें । पित्यामागून आला पुत्र ! देशाचें सूत्र । हाता-मधीं धरलें । मोतिलाल मनीं हर्षले ।। देशाचें ध्येय स्वातंत्र्य । समाजवादी तंत्र । जाहीर केलें । चैतन्य नवें संचरलें ।। टाकला सवाल परि खडा । बोला घडघडा । पिळणुकही चाले । गरीबांचें अन्न जळालें ।। स्वातंत्र्य जरी पातलें । दैन्य काय सरलें ? । भेद काय मिटले ? । भांडवलदार कोसळले ? ।। भाकरीची खात्री जरी । मिळाली तरी । शेतकरी जमले । कामकरी पहा धावले ।। एकवटून शक्ती सारी । यत्न जर भारी । निक-रानं केले । स्वातंत्र्य तंवा पातले ।। चाल ।। असा दिव्य संदेश दिला । झाला समाजवादी अध्यक्ष असा बोलबाला ।। पुढें प्रलयाग्नी कायदेभंग भडकला ।। सौख्याचा होम त्यांनीं केला । सर्वस्व दिलं देशाला ! खंडोजी बल्लाळ दुसरा जणूं शोभला ।। आनंद भुवन प्रासाद दिला देशाला ।। स्वराज्य भुवन हें नांव सार्थ हो ज्याला ।। तुरुंगानं मृत्यू सन्निध नेलं पितयाला ।। मातेनं लाठीचा हल्ला सहनही केला ।। पत्नीचा रोग तुरुंगानं पुन्हा उलटला ।। सरकारनं सोडलं तिला । माफीची अट पर घातली जवाहराला । पर छावा सिंहाचा झाला । नाहिं नमणार सरकारला । असा बाणा त्यानं दावला। मग नेलं त्याला भेटीला। जंवा कळलं सारं पत्नीला। तंवा ऐका बोलली काय त्याला । ' नका नमवुं मान शत्रूला । माफीनं दुःख होईल माझ्या चित्ताला ।। वीर पत्नी बोलली अशा धीर वचनाला ।। सरकारनं सोडलं पर त्याला। पर इकडं मृत्युनं पाय वेगीं उचलला ।। एके दिवशीं नेलं बरं तिला। झालं दुःख साऱ्या देशाला । मृत्युनं डाव मांडला । खचवावं जवाहराला । पर जवाहरानं डाव त्याचा उधळला ।। उत्साह त्यानं राखला ।। हा त्याग अमर जाहला । जसं सावरकरकुळभूषण महाराष्ट्राला।। नेहरू तसे ते झाले युक्तप्रांताला।। देशानं त्याला निवडला । अध्यक्ष पुन्हा लखनौ काँग्रेसला ।। देशभर

वायुवेगानं दौरा काढला ॥ नैराश्यमेघ उधळला । तिसऱ्यांदां केलं अध्यक्ष फैजपुराला ॥ हा मान थोर लाभला । केलं जागं ब्रह्मदेशाला । झालिं शंभर वर्षं नव्हता कुणी हालविला ॥ चाल ॥ पेटविली स्फूर्तीची ज्योत । तरुण हृदयांत । निराशा लाट । परतवुनि चढवि जोम राष्ट्रांत । अर्पि तारुण्य देशकार्यांत । **दत्तकुमार** दंग कवनांत ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

महायुद्ध दुजे भडकलें । जगीं पसरलें । हिटलरी हल्ले । बसविती हादरे। युरोपखंडास । बुडविलें पूर्ण कैक राष्ट्रास । धाक इंग्लंडच्या पडे चित्तास॥ जर्मनीला सहाय्य जपान । इटलीही छान । दोघे मिळून । आशिया-आफ्रिकेच्या खंडांत । देति उडवून घोर आकांत । आंग्ल-अमेरिकन घेतले प्रांत ॥ चाल ॥ साम्राज्य असं धोक्यांत आलं पाहून । गडबडले सारे इंग्रज अमेरिकन । हिकमत एक लढविली त्यांनीं मग छान। ‘स्वातंत्र्य, समता, बंधुता धोक्यांत आली हो आतां । राखाया कसून कंबर । आम्ही तय्यार । सहाय्य सत्वर । द्यावं अशी दिली हांक ठोकून ॥ चाल ॥ जवाहरानं केली घोषणा । सोडा वंचना । उन्मत्तपणा सोडुनी बोला शुद्ध मनानं ॥ साम्राज्यलालसा सोडा । समतेचें सख्य तें जोडा । खांद्यास खांदा भिडवून । हिंदुस्थान पूर्ण । लढेल शौर्यानं ॥ चाल ॥ गांधींच्या अहिंसेंतून । हा नाद निघेना पूर्ण ॥ तितुकेंहि अल्प कारण । शत्रूंस नुरावे म्हणुन ॥ बाजूस होउनी पूर्ण । गांधीजी धरति हो मौन ॥ मग जवाहर धोरण । कॉंग्रेस धरी उचलून ॥ कृष्णार्जुन समरप्रसंग । जणु आला नवा घडून ॥ चाल ॥ पर कावा कपटी साहेबाचा पडला बाहेर ॥ युद्ध हेतु करीना जाहीर । सक्तीची युद्ध तयारी चालली देशभर ॥ देशाचा मान धोक्यांत आतां येणार ॥ पाहून गांधीजी झाले पुन्हा तय्यार ॥ बेचाळीस सालीं युद्धाचा केला पुकार ॥

'चलेजाव' दिला आदेश इंग्रजा घोर ॥ स्वातंत्र्यशक्ति उसळुनी उठल्या चौफेर ॥ स्वराज्याचा लढा अखेरचा झाला प्रखर ॥ बंदिवान झाला जवाहर । काँग्रेस नेते गिरफदार । कुठं ठेवलं त्यांना समजेना कुणाला सारं ॥ लोकांचा राग अनिवार । जागोजागीं प्रतिसरकार ॥ स्थापून इंग्रजी हुकुमत केली दूर ॥ दोन वर्षं चालला कहर । महायुद्ध सरलं नंतर । पुढाऱ्यांना सोडी सरकार । जवाहर फिरे देशभर । जनतेचं धैर्य पाहून तोषला फार ॥ सरकारी वायु-नौसेना, अन्य दळभार ॥ खिळखिळे जाहले पार । आझादहिंद सेनेचा झाला उपकार ॥ कैचींत धरी पण त्यांना ब्रिटिश सरकार ॥ सहाय्याला धावले जवाहर । खटाटोप मांडला फार । लाल किल्ल्यांतून सोडविले सारे शिलेदार ॥ इंग्रजांना झाली खातर । आतां सरला आपला अवतार । स्वराज्यदान संकल्प केला जाहीर ॥ मग मध्यंतर-सरकार । स्थापाया काँग्रेस-लीगला देइ अधिकार ॥ काँग्रेस निवडी जवाहर । त्यानं घेतला हातीं कारभार । 'झाली स्वातंत्र्याची पहाट' केला पुकार ॥ चाल ॥ साम्राज्य सत्तेचा अंत । महायुद्धांत । होईल, भाकित । जाहले ज्याचें सत्य जगतांत । राज्यसूत्र आलें त्याच्या हातांत । **दत्तकुमार** दंग कवनांत ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

स्वराज्याची पहांट जरी झाली । दिशा ढगाळली । काळोखी उरली । मार्ग नच मुळीं दिसे त्यांतून । घुबड घूत्कारित होती अजून । कोल्हेकुई नव्हती राहिली थांबून ॥ पाकिस्तानवाल्यांनीं उचल मोठी मग केली । नेहरूशीं नको सहकार्य आरोळी दिली । दंग्यांची तयारी साऱ्या देशभर केली । शस्त्रास्त्रं भारी जमवून । गुंडांना सज्ज करून । स्वराज्याला मोठा अपशकुन । करावा म्हणून । तयारी झाली ॥ वायव्य सरहद्दीवर । विषारी प्रचार । चालला जोरदार । द्वेषाचा भडका टोळीवाल्यांत ।

लीगवाल्यांनीं मांडला आकांत। होता त्यामागें इंग्रजी हात ॥ धैर्याचा मेरु जवाहर। करी विचार। जाण्या सत्वर। टोळीवाल्यांत मिसळण्याला। प्रेमानं मनं जिंकण्याला। शांत सरहद्द राखायाला ॥ रुचला न विचार मित्रांना। धोका सर्वांना। वाटला परि त्यांना। दूर सारून चालला रणधीर। पदोपदीं विरोध सोसून। प्राण संकटांत घालून। पटवून थोर हृदयाची ओळख साची। आला बहाद्दर ॥ चाल ॥ पर ज्यांनीं बळें पाघरूण घेतलं डोळ्यांवरून ॥ त्यांना कशी पटावी खूण ?। सुरु ठेवला प्रचार दारुण ॥ मुसलमानी प्रांतामधून। दंगली झाल्या भीषण ॥ निर्वासित हिंदु बघुन। भडकलीं हिंदूंचीं मनं ॥ नौखालीचा सूड म्हणून। बिहारांत झाली उठावण ॥ मुसलमानी वेडेपण। हिंदुंनीं धरलं पाहून ॥ जवाहर झाले विषण्ण ॥ बिहारांत गेले धावून ॥ हिंदुंना देति शिकवण। अविचार सोडा संपूर्ण ॥ न्यायनीति सारी सोडून। देशाची होईल धुळदाण ॥ आदेश असा ऐकून। बिहारांत शांति ये पूर्ण ॥ चाल ॥ मुसलमानी प्रांतांत दंगल वाढे परि घोर ॥ जाहले हिंदु निर्वासित दारोदार ॥ जीना म्हणति पाकिस्तान तोडून द्या सत्वर। तवर धाक दाविती 'दंगा असाच चालणार' ॥ दंग्यानं दंगा भडकेल। भारतांत यादवी माजेल। स्वातंत्र्य दूर जाईल। नष्टचर्य ओढवेल घोर। असा विचार करून पुढाऱ्यांनीं केला निर्धार ॥ पाकिस्तान मान्य करूनिहि व्हावं स्वतंत्र ॥ ब्रिटिशांनीं मान्य केला हा त्यांचा निर्धार ॥ स्वातंत्र्यदानाची केली तिथी जाहीर ॥ सत्तेचाळीस साल ऑगस्ट पंधरा मुक्रर ॥ भारताला पुण्यकाळ आला असा सुंदर ॥ पंतप्रधान झाले जवाहर। राष्ट्राची श्रद्धा अविचल राहिली ज्यावर ॥ चाल ॥ आशास्थान हिंदभूमिला। जवाहरलाल झाला। वीर एकला। दिसे नीति बुद्धिमान विख्यात। विशालता नित्य ज्याच्या हृदयांत। **दत्तकुमार** दंग कवनांत ॥७ ॥

• •

## चौक ८ वा

स्वराज्याचा नवा संसार । मांडी जवाहर । आशा देशभर । नवनव्या लोकमनीं उठती । उत्साहित सारे लोक दिसतीं । उलटपणें दैवगती होती ॥ आधार दोन तपावरी । ज्याचा खरोखरी । मिळे परोपरी । वृक्ष असा उन्मळून पडला । खून गांधींचा घोर झाला । भरत-भू-गोलचि डळमळला ॥ जणुं स्वराज्य मिळवायला । देह जन्मला । मिळवुनी गेला । महात्मा पुण्यश्लोक स्वर्गास । स्वराज्या सुराज्य बनवायास । जवाहर सिद्ध केला कार्यास ॥ पोरका झाला जवाहर । दुःख अनिवार । होत परि धीर । राखुनी झाला सिद्ध कार्यास । पंचवार्षिक योजना खास । आखल्या देश उद्धरायास ॥ चाल ॥ याच देहिं याची डोळा । देश समृद्धि सोहळा ॥ पाहाया जीव आंतुरला । श्रम अविश्रांत देहाला ॥ जगतांतुन सहाय्य धनाला । उभवीत देश कार्याला ॥ चाल ॥ असा समृद्धीचा खटाटोप मोठा मांडला ॥ अडचणी आल्या वेळोवेळा । परि मात तयावर करण्या चंग बांधला ॥ किति धरणं जागोजागेला । मोठमोठ्या कारखान्यांनीं देश सारा व्यापिला ॥ शेतीच्या पीक-वाढीला । कितीतरी दिलं मदतीला । अज्ञान, रोग, दारिद्र्य । यांच्या नाशाला ॥ देश रक्षणाच्या कार्याला । देश बांधवांनीं कटिबद्ध व्हावं या वेळां । यासाठीं यत्न नेहरूंचा सदा चालला ॥ परि त्यांच्या मनाची धाव न कळे कोणाला ॥ कार्याचा वेग दिङ्मूढ करी लोकाला । चालीनं त्यांच्या चालायला जमेना कोणाला ॥ अभिमन्यु जसा एकला । होता चक्रव्यूहीं अडकला । तसा प्रसंग नेहरूंवर आला । निःस्वार्थी कुशल वीरांचा तांडा मदतीला । हवा होता जवाहराला । स्वार्थी, कपटी, देशद्रोह्यांच्या बंदोबस्ताला ॥ बळ उणें पडत देखून खिन्न जाहला ॥ देशासाठीं यत्न जो जो केला । दुष्टांचा स्वार्थ त्यायोगें कसा पोसला ? ॥ हें कांहीं उमजेना त्याला । काश्मीर प्रश्नि भारताला । यूनोंत न्याय मिळण्याला । का विलंब लागे कांहीं समजेना त्याला ॥

इतक्यांत बासष्ट सालाला । चिनीभाई जंत्रा उलटला । भारताचा भाग आक्रमिला । त्या विश्वासघातानं धक्का बसला हृदयाला ॥ साऱ्या ध्येयस्वप्नांचा त्यांच्या चुराडा झाला ॥ सद्भाव, न्याय नीतीला । **पंचशील** दृढ करण्याला । देशाचं बळ वाढवण्याला । काय उपाय पाहिजे योजिला ॥ या चिंतनांत निमग्न जवाहर झाला ॥ वार्धक्य ग्रासी देहाला । अर्धांग वायुचा जोर त्यांत जाहला ॥ विश्रांति पूर्ण घ्यायला । डॉक्टरांनीं सांगितलं त्याला । देशाची चिंता पण व्यग्र करी चित्ताला ॥ विकलांग देह सोडून नवा धरण्याला ॥ महायोगी सिद्ध जणुं झाला । मे महिना बुधवारीं सत्तावीस तारखेला। एकोणीसशें चौसष्ट सालाला । सारीं कामं संपवून देह त्यानं ठेवला ॥ लालहिरा हिंदमातेच्या कंठांतून गळला ॥ जनतेच्या शोकाला पार नाहीं राहिला ॥ चाल ॥ त्रिखंड कीर्ती राजकारणी अखंड लोकप्रिय झाला । मुखंड मानवतावादी हा विश्वचि वाटे घर ज्याला ॥ विज्ञानाच्या युगांत मानव विशाल हृदयीं हवा कसा ॥ कित्ता जगापुढें ठेवण्या जन्म तयाचा होय असा ॥ वक्ता, पंडित, महान् लेखक, बाल जिवांना प्यार तसा । जगमित्राला महान् ऐशा जनसारा विसरेल कसा ? ॥ जीवनज्योती जवाहराची जनहृदयीं जागृत राहो । आत्मोद्धारा आत्मबलानें झटण्या स्फूर्तिप्रद होवो ॥ चाल ॥ **पांडुरंग** कवी विख्यात । झाला कृपावंत । म्हणुन हें गीत । दिसतसे त्याच्या कवनमालांत । **जवाहर** दीप्तिमान दिगंतांत । **दत्तकुमार** दंग कवनांत ॥ ८ ॥

## समाप्त

॥ ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ॥

॥ पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

॥ शुभं भवतु ॥

# विभाग २ रा

# लावण्या आणि इतर शाहिरी कवन

## ( १ ) लावणी १ ली ( पूर्वार्ध )

आली मंद वाऱ्याची लहर । वसंतीं बहर । आकाशीं चंद्र पहा फुलला ॥ सखी बोले आपल्या नाथाला ॥ " लगिनाच्या पूर्वीची कथा । सांगतें आतां । ऐकावी नाथा । सहज आठवण झाली मजला । बागेंत गंध दरवळला । आंब्याला मोहोर बाई भरला ॥ शिरपेंच शिरीं लावून । मंदील बांधून । तुरा खोंवून । होता तुम्ही घोड्यावरनं चालला । माझ्या हो बागेवरनं गेला । तुम्ही चोरलं माझ्या हृदयाला ॥ मुखचंद्र तुमचा बघून । आतुर झालं मन । तुरलं देहभान । कामानं वार जबर केला । हृदयांत मदन खळखळला ॥ चाल ॥ निशिदिनीं लागली तळमळ । ग साजणी ॥ कधीं राणी यांची होईन । ग साजणी ॥ अन्नपाणी गोड लागेना । ग साजणी ॥ चाल ॥ पर होता दैवयोग बरा । अनुकुल खरा । म्हणून मी झालें तुमची राणी । चंद्रिका चंद्राची रमणी ॥ १ ॥

हृदयाच्या मानसावर । प्रेमाचं कमल । त्यांत तुम्ही भ्रमर कीं हो झाला । तुम्ही हंस मी तुमची लीला ॥ तुम्ही माझे लळे पुरविले । लाड बहु केले । आज एक मागणं द्यावं मजला । नाहीं म्हणूं नका हो अबलेला ॥ ' तुझ्यावीण एकही क्षण । प्रिये न राहीन । तुला न सोडीन ' । वचन हें द्यावं नाथ मजला । मी असें शरण चरणाला " ॥२॥

कांतेचं बोलणं ऐकून । उतावीळ मन । मोठ्या प्रेमानं । कवटाळून भेटी रमण निजला । हृदयांत नाथ गहिंवरला ॥ मग बोले ' ऐक सुंदरी ! सुरूप साजिरी । मनोमंदिरीं । ठेवली मी जपुन सखे ग

तुजला । तुजवीण चैन नच मजला ॥ चाल ॥ सुकुमार तनु ही तंव कमल ग । मी भ्रमर ॥ तव गुलाबरंगी गाल ग । मी लाल ॥ तूं केतकी सुंदरशी ग । मी नाग ॥ पण ' तुझ्यावीण एकही क्षण । प्रिये ! न राहीन तुला न सोडीन ' । वचन हें देऊं कसं ग तुजला ? । " शिवराय बोलावीत मजला ॥ उद्यां सकाळींच घरांतुन । तुला सोडून । आलं मला जाणं । लढाईचा आज हुकूम आला " । हृदयांत नाथ गहिंवरला ! ॥ " कर्तव्यकर्म आधीं करून । लढाईवर जाऊन । विजयी होऊन । जगलों तर येईन पुन्हां ग घरला । प्रेमाची भेट मग तुजला " ॥ ३ ॥

दुसरे दिवशीं उठून पहाटेला । मर्दानं पोशाख केला । **तिनं ढाल** बांधली पाठीला । तलवार बांधली कमरेला । **गंधाचा टिळा** डोक्याला । भेटती एकमेकाला ॥ चाल ॥ घोड्यावर चढवून जीन । रिकिबींत पाय ठेवून । प्रिय पत्नीकडे पाहून । फेकला दौड मग घोडा ! ॥ ४ ॥

• •

## ( २ ) लावणी २ री ( उत्तरार्ध )

घोड्याची मनोरम गती । टापा वाजती । वरती हा वीर । मस्तकीं तुरा भरदार ॥ चिल्खतीं देह मढविला । घोडाही काळा । जणु हा मेघ । कीं वीज असे तें खड्ग ॥ तो मूर्तिमंत कळिकाळ । शौर्याचा जाळ । विषारी तीर । धडधडे शत्रुचें ऊर ! ॥ घोड्याची गती पाहून । दवकला पवन । धन्य सरदार । शत्रुचें छेदि जिव्हार ! ॥ चाल ॥ झडकरी गेला रणावर । चमकले वीर ॥ ' जय महादेव ' गर्जून । उसळले तीर ॥ करिं भाला आणि तलवार । शोभे खंजीर ॥ तलवारी विजा चमकती । वीर गर्जती । सुटे मग धार । रक्ताचा वाहला पूर ॥ १ ॥

किती पडले भूमिवर वीर । किती रणधीर । झाले घायाळ । किती झाले रक्तबंबाळ ! ॥ सरदार फिरे समरांत । करी वीरान्त । चपल तलवार । प्राणान्तक करितो वार ॥ दुर्दैव उभें पण पुढें । भूमिवर पडे । शूर सरदार । समरांत जाहला ठार ! ॥ २ ॥

मग घोडा सरदाराचा। शोकानं मरुनी गेला!॥ तो तुरा दिव्य मंदील। रक्तानं माखुन गेला!॥ शिरपेच मस्तकावरचा। मातीनं भरुनी गेला!॥ चाल॥ भंगली चपल तलवार। भंगले भाले खंजीर। शोकाकुल झाले वीर। विजयाचा तुटला तारा!॥ १॥

मग वारा दौड निघाला। वीराच्या गांवीं गेला॥ शूर वीर पत्नी होती। घरिं चिंता जाळी तिजला॥ वायुदेव (वारा) बोले तिजला। "बाई! तुझा पति ग मेला!"॥ चाल॥ झोंबले शब्द जिव्हारीं। मग तिजला घेरी आली। भूवरती पडली खालीं। सावध करि तिजला वारा!॥ २॥

बोलली प्रिया मग "देवा!। काशि करुणा तुजला नाहीं!॥ वर्सेहि एक रे पुरतें। लग्नाला झालें नाहीं। तोंच ही अवस्था माझी। हें कपाळ फुटलं बाई!॥॥ चाल॥ मी जगूं कशाला आतां?। मी आलें, थांबा नाथा!। टाकून मला कां जातां?। जीव हा खुळा हो झाला!"॥ ३॥

घेउनी करीं तलवार। ती तरुणी दौड निघाली॥ पति पडला समरीं जेथें। ती रमणी तेथें गेली॥ शत्रुंशीं लढतां लढतां। लढतांना मरुनी गेली॥॥ चाल॥ स्वर्गांत भेटली पतिला। आलिंगन देई त्याला। मग वियोग कधीं ना झाला। '**पांडुरंग**' कविता गाई!॥ ४॥

● ●

## (३) लावणी ३ री

होतं माझं सिंहासन। होतं माझं नंदनवन। होता त्रिभुवनीं मान। एक सखे! बाई॥ सूर्यचंद्र हे दिनराती। ओवाळती पंचारती। वारा झाडितो अंगण। नित्य सखे! बाई॥ इंद्र देतसे पर्जन्य। भूमिमाय देई धान्य। सर्व समृद्धीनं धन्य। झाले होते बाई॥ मोती देइ रत्नाकर। पृथ्वी माणकांचा हार। पर्वत ग पायावर। वाही धन बाई॥ नाना

देशिचे भूपाळ। उभे नित्य दारावर। करिती ग नमस्कार। मला सखे बाई॥ होती रत्नांची अंबारी। ठेवलेली माझ्या दारीं। वैभवाच्या शिखरावरी । होतें मी ग बाई ॥ मी ग राजा रघुवीर। खेळविला मांडीवर। आणि राजा युधिष्ठिर। बाळ माझं बाई॥ गोकुळीचा तो गोपाळ। लाडका ग माझा बाळ। खेळविला मांडीवर । नंदबाळ बाई !॥ शिवाजी ग महाराष्ट्राचा। प्रतापसिंह मेवाडाचा। माझ्या जीविच्या जीवीचे। लाडके ग बाई॥ जर वाकड्या डोळ्यानं । पाहतील मजला कोण। (तर) त्याला टाकती चिरून । माझीं मुलं बाई॥ कंस मारिला कृष्णानं। भीम मारी दुर्योधन। शिवबानं अफझुलखान। ठार केला बाई ॥ राखण्याला माझा मान । आला तानाजी धांवून बाजीप्रभु देई दान। जिवाचं ग बाई !॥ आज गेलं सिंहासन। आलं बाई ! दासीपण !॥ दैव माझं ग दारुण। ऊर जळे बाई !॥ सोडवील मजला कोण। या ग दासीपणांतून। चिंता जाळी रात्रंदिन । काय सांगू बाई !॥ १ ॥

## (४) लावणी ४ थी

### (चाल – एवढं एवढंस ग पांखरूं)

बाई कुणा सांगु या कळा। अंगाला लागल्या झळा ग॥ ध्रु०॥ सई, माझें फुललें यौवन। तिळमात्र रमेना मन। देहाची लोपली कळा। वाळला गळा। कंदर्प कापतो गळा॥ घरिंदारीं चित्त ना जडे। हें शेजघरहि नावडे। पती गेले मला सोडून। दुःखीं लोटून॥ अंगाला०। कोण मला न्हाऊं घालील। लाल रंग कोण उडवील। कोण अलंकारि नटवील। लाड पुरवील॥ अंगाला० ॥ १ ॥

मी त्यांची लाडकी फार। पळ एक न करती दूर। पर आज मला टाकुन। गेले एकटिला॥ अंगाला०॥ तानाजी पडला जेव्हां। मी होतें

सखये तेव्हां । मम नाथ करीं मज धरीं । समरभूवरीं । कितिकांचा कापला गळा ग ॥ अंगाला० ॥ अफझुल्ला वधिला जेव्हां । मी होतें सखये ग तेव्हां । शिवराज करी मज धरी । समरभूवरीं । कंठनाळ चिरला ॥ अंगाला० ॥ २ ॥

बाजीप्रभु पडला जेव्हां । मी होतें सखये ग तेव्हां । तंव माझं साह्य घेउन । शत्रु रोखुन । खिंडिमधीं धरला ॥ अंगाला० ॥ संताजी धनाजी जेव्हां । शत्रूस झटकती तेव्हां । मी होतें त्यांच्या सैन्यांत पतिसमवेत ॥ अंगाला० ॥ रणकुंड पेटलें जेव्हां । पानपतीं भीषण तेव्हां । मी दिल्या कितिक आहुति । सवें मम पती । अग्नि तर्पिला ॥ अंगाला० ॥ **संग्राम-देवता** जेव्हां ॥ रणिं शौर्य दाखवी तेव्हां । मी होतें तिची मैत्रीण । किं दुसरा प्राण ॥ अंगाला० ॥ ते ताल्या टोपे शूर । पाहिले ग मी रणवीर । त्यांच्यासह गेले पती, अजून ना येती । मला चुकवून ॥ अंगाला० ॥ ३ ॥

बाई शंभर वर्सं झालीं । हा वियोग मजला जाळी । जा आणा कुणी ग हुडकुन । नाथ मम प्यारा ॥ अंगाला० ॥ कोण मला ग कुरवाळील । तोंडांत घांस घालिल । कोण झूल करूनि जीवाची मला पाळिल ॥ अंगाला० ॥ ती वीज जशी मेघाला । मी तशीच मम नाथाला । तो हंस गेला सोडून मला, हंसीला ॥ अंगाला० ॥ मी लता धवल सुकुमार । सहकार तरू तो वीर । नित घालि मिठी मी कमरेला । सोडुन गेला ॥ अंगाला० ॥ "**पांडुरंग**" पुसे सर्वाला । ही कोण असे हो अबला ? पतिवियोग हृदया जाळी जिच्या अंगाला । या अशा लागल्या झळा ॥४॥

● ●

## ( ५ ) लावणी ५ वी

तूं कोण सखे सुंदरी । मदनमंजिरी । अतुल भूवरीं । तुझ्याविण देह झाला बावरा । किती असती मनोहारिणी । कुतुक कामिनी । नसे परि कुणी ।

तुझ्यावर नेत्र माझा गुंगला ॥ ध्रु० ॥ भ्रमरावलि रम्य तव केश। पंचशरपाश। ओढी हृदयास। त्यामधीं भांग छान रेखला। तें इंद्रचाप भ्रूलता। मीन तळपतां। नयन सर्वथा। तरल शोभला। मधें शोभत कुंकुम चीर। चंद्राची कोर। नासिका सरळ। जशी काय चाफेकळी साजिरी। मुखपद्मिं बिंदु चमकती। सूर्यकरतती। पाहुनी मती; मानवी रूपीं तव रंगली ॥ चाल ॥ कुचयुग्म शैलवर बरे। ते झाले ॥ तारकादंत हे तुझे। तेजाळे ॥ चाल ॥ तव नेत्र विद्ध मज करी। सुरूप सुंदरी। मनोमंदिरीं। दास हा पायिं लीन जाहला ॥ वर्षुनी दृष्टिजलधार। शांतवी अनळ। खचे मम धीर। हृदयिं हा मर्मीं शर लागला ॥ १ ॥

मी कुबेरसम धनपती। रत्न झळकती। धनाची न क्षिती। मूर्तिमान् सौख्यवृक्ष अंगणीं। पर ऐक ऐक भामिनी। नसे कामिनी। मृदुल-भाषिणी ॥ मम इंद्रसदनसम सदनीं। रम्य उपवनीं। मंजुभाषिणी। सारिका रमविल तव मानसा। त्या लता सुफल तरुवर। सुमन परिमल। मधुर कलकल। रंजविल तसा ॥ चाल ॥ किति दास दासी तुजपुढें। ते नमती ॥ सुग्रास भोजनें तुला तोषविती ॥ चाल ॥ हो प्रसन्न तूं मजवरी। स्वर्गसुंदरी। धन्य मज करी। तुझ्याविण देह झाला बावरा। किती असती मनोहारिणी। कुतुककामिनी। नसे परि कुणी। तुझ्यावर नेत्र माझा गुंगला ॥ २ ॥

मग स्वर्गसुंदरी वदे। "ऐकलं तुमचं वर्णन ॥ तुम्ही कुबेरसम धनपती। तृणसमान मजपरि धन ॥ घरीं तुमच्या सेवकजन। तृण-समान मज ते जन ॥ घरीं तुमच्या नंदनवन। पर माझें रमेना मन ॥ चाल ॥ काय सवत आहे का मला। स्नेहाळा ॥ हे मला वदा झडकरी। स्नेहाला ॥ मग भार्या मी होईन। स्नेहाळा ॥ चाल ॥ मानवी देह हा नसे। जना नच दिसे। तया परि दिसे। भुवनिं जो भाग्यवंत जाहला। वदा पण सवत आहे का मला?" ॥ ३ ॥

" आण तुझी ऐक भामिनी । सवत ना कुणी । नको भय मनीं । सवतीची भीति वाटे जर तुला । तुजविना अन्य मम मनीं । नसे मुळीं कुणी । चित्तहारिणी । तुझ्यापदिं चित्तमधुप रंगला ॥ चाल ॥ रविचंद्र असति साक्षिला । तेजाळे ॥ म्हण मला आजि आपुला । स्नेहाळे ॥ तुजवीण जीव कष्टला । नव बाले ॥ चाल ॥ मन्मती गुंग जाहली । शुद्ध हरपली । कासावीस उरीं । तुझ्याविण देह झाला बावरा । किती असती मनोहारिणी । कुतुककामिनी । नसे परि कुणी । तुझ्यावर नेत्र माझा गुंगला " ॥ ४ ॥

" जर नसे संवत हो मला । मम प्यारी । होईन कशी मी सुखी । संसारी । लागेल दुःख हो सदा । जिव्हारीं ॥ चाल ॥ मम संवत चमकते रणीं । पिशुनमर्दनी । दंग होऊनी । लावी मग रिपुरुधिराचा टिळा । करि नित्य रणांगणीं स्नान । स्वतः गोरीपान । तिचा पर प्राण समरीं रंगला ॥ सुकुमार जरी तनुलता दिव्य धवलता । मधुर मधुलता । जशी काय सौदामिनी शोभली । तरी मोठमोठे झुंजार । केले तिनं गार । तीच मज प्यार । तीच खरी, मी हो तिची सावली ॥ चाल ॥ असें माझें कवच चांगलें । ती सवत ॥ मम संरक्षण हो करी । ती सवत ॥ चाल ॥ प्रिय मज ती प्राणाहुनी । वीरमोहिनी । दास्यभंगिनी । तीच मम आस पूर्ण हो करी । तिजविण चैन ना मला । राग नच धरा । विचार जरा करा । राहुं द्या लोभ आज मजवरी " ॥ ५ ॥

तंव बोले ती मग तिला । " मी जातों ॥ त्या सुंदरीस वरुनिया । बघ येतों । " ॥चाल॥ झणाझणा झडती दुंदुभि । सुंदरी उभी । रणावरि, न भी । नभीं सुरवृंद गुंग जाहला । रुधिराचा पाट चालला । लाल खळखळा । असा गलबला । कधीं समरांत नाहीं जाहला ॥ रणचंद्र चमकता रणीं । समररोहिणी । चपलगामिनी । नेसुनी रक्तवसन धावली । आसक्त झाली अंतरीं । उताविळ करी । समरसुंदरी । त्याला तिनं घट्ट मिठी मारली ॥

॥ चाल ॥ कृतकृत्य वधूवर तदा ते झाले ! । उधळती वीर त्यावरी शिरकमळें । रणमंडपिं आनंदले ते सारे ॥ चाल ॥ "जय महादेव" गर्जना । धाक दे मना । काव्यकल्पना । किं जणु ते लग्नमंत्र चालले । हत्ती, घोडे जणु हे पाट । बसले वर भट । लग्नाचा थाट । असा हा-देवहि संतोषले ॥ इतक्यांत दिशा उजळली । प्रभा फांकली "पूर्व-सुंदरी ।" अकस्मात रणीं प्रगट जाहली । "सवतीस" पुढं पाहून-उताविळ मन । मोठ्या प्रेमानं । तिनं पण त्याला माळ घातली ॥ धन्य धन्य कवी '**पांडुरंग**' । वीरगुणगुंग । झाले अंतरंग । वर्णी हा समरलग्न-सोहळा । फुलविला मनकमळाचा कळा ॥ ६ ॥

● ●

## ( ६ ) लावणी ६ वी

कधीं भेटीन पतिराजाला । ग । असं झालं होतं बाई ! मला । ग । मुळीं चैन नव्हतं हृदयाला । ग । क्षण एक वर्षापर झाला । ग बाई ॥ १ ॥

माझं माहेर आभाळ वर । ग । माझं सासर जमिनीवर । ग । उतरलें मी शिखरावर । ग । गिरिराज आधार झाला ॥ ग बाई ॥ २ ॥

घडी घडी आतुर झालें । ग । धडाधडा खालीं उतरलें । ग । कडेबिडे नाहीं बघितले । ग । मन माझं झालं अधीर ॥ ग बाई ॥ ३ ॥

नाहीं म्हटली रात आणि दिन । ग । नाहीं म्हटलं ऊन आणि तहान । ग । नाहीं म्हटला कांटा कीं रान । ग । मन माझं झालं अनावर ॥ ग बाई ॥ ४ ॥

अशी चालली होतें पतिकडे । ग । पर होतें दैव वांकडें । ग । एक वैरी आला मजपुढें । ग । त्यानं धरलं अडवुन मला ॥ ग सइ बाई ॥ ५ ॥

बंधारा घाली मज पुढें । ग । माझा रस्ता त्यामुळं अडे । ग । काशि जाऊं आतां पतिकडे । ग । खुळ लागेल आतां मला ॥ ग सइ बाई ॥६॥

माझा वैरी झाला मानव । ग । स्वसुखाची त्याला बहु हाव । ग । परसुखावरी घाली घाव । ग । असा मेला निष्ठुर झाला ॥ ग बाई ॥ ७ ॥

काय करूं आतां मेल्याला । ग । कशि जाऊं आतां सासरा । ग ॥ कशि भेटूं पतिराजाला । ग । जीव माझा सुकुन हा गेला ॥ ग बाई ॥ ८ ।

खाई माणूस हा माणसाला । ग । छळी माणूस हा माणसाला । ग । याच्याहून राक्षसही बरा । ग । मग कसा जुमानेल मला ग तो बाई ॥ ९ ॥

मी बोलले ' **पांडुरंगाला** ' । ग । ' अशी गोष्ट सांग लोकाला । ग । ' ओळखु दे माझ्या नांवाला । ग । कर जाहीर या जुल्माला ' ॥ ग सखे बाई ॥ १० ॥

## ( ७ ) लावणी ७ वी

सांग मानवा ! काय जोडलंस जन्म सकळ गेला वाया । देहाचे बहु चोज पुरविले तरिही सुकली रे काया ॥ पूर्वजन्मिचें भाग्य म्हणुनी ही तुला लाभली नरकाया । काया नौका करुनि तरावें दुःखदायका नरका या ॥ शरदभ्रासम चंचल जीवित सरेल केव्हां न कळे रे । मृत्यु सदा तय्यार घेउनी पाश मानवा धरण्या रे ॥ विश्ववनीं नर सावज झाला व्याध मृत्यु मागें पळतो । वृद्धपणाचें जाळें पसरुनि नरहरिणाला तो धरतो ॥ नश्वर धनजन नश्वर जग हें एक अनश्वर या भुवनीं । चंद्रकिरणसम उज्वळ कीर्ती त्रिभुवन टाकी दुमदुमुनी ॥ कैक ईश्वरप्राप्ती करुनी कीर्तिवंत होऊन गेले । परोपकारी देह खर्चुनी धन्य जगीं दुसरे झाले ॥ मायभूमीला मुक्त कराया समरयज्ञ कुणि सुरू केले । आहुति देउनि निज देहाची कैक वीर पावन झाले ॥ अधर्मदंडन करतां करतां देह भूवरीं ठेवियले । जोंवरि सूर्यसुधाकर दिसती धवलयशान्वित ते झाले ॥ दुर्गंधीमधिं घरें बांधुनी कैक मूढ तेथें रमले । स्वातंत्र्याचे रम्य बगीचे कीटक ते

विसरुनि गेले॥ ऊठ नरा रे, जागृत हो रे, आत्महिताची करि चिंता। '**पांडुरंग**' हा तव पदकमलीं लीन जाहला भगवंता !॥

• •

## (८) लावणी ८ वी

## चंद्राला पाहून

नील अंबरीं सांग लौकरी कोणी तुज ठेविले। सख्या ! तव रूपी मन रंगलें॥ सवे तारका दुःखहारका ! घेउनी जाशी कुठें। सांग रे शंका मन्मनीं उठे।॥ सौख्यसागरा ! नसे आसरा तुजला नीलांबरीं। कसा तूं राहसि वद लौकरी ॥ चाल॥ हा दीप असे का देवानें लाविला। हा चेंडू असे का देवीनें फेकिला। हा तिलक असे का सृष्टिनें लाविला। विचार येती असे कैक रे ! चंद्रा ! तुजपाहुनी। मन्मनीं सखया रे! धावुनी !॥ १ ॥

रम्यपणाचा गाभा जणुं हा मूर्तिमंत राहिला। जनाला चटका हा लागला। शीतल किरणें रम्य उपवनें नटली ही राजसा। फुलाविसी रसिकांच्या मानसा। तप्त हृदय हें शांत होतसे, शांता अति शांतता। पाहुनी तुजला परसुखरता !॥ चाल॥ तव उपमा देती कविजन रमणीमुखा !। तें कटु परि वाटे मजला, तापांतका !। तूं तुजसम असशी विश्वा सुखदायका। कामिजना रमणीमुख तुजसम भासे वेडावले। योग्यता तव नच त्यांना कळे।॥ २ ॥

पाहुनि तुजला हेवा मजला वाटे यावे वरी। तुझ्यासह रंगावे अंबरीं॥ अहा ! भूवरीं पापें भरलीं मत्सरही आसुरी। घुमे तो स्वार्थहि अति माजुरी॥ नंदनवन हें कानन झालें, कारण हा नरपशू ! खरोखर बरा तयाहुनि पशू !॥ चाल॥ एकानें जगिं या दुसऱ्याला जिंकिलें। जिंकुनी तयाला कारागृहिं कोंडिलें !॥ आसुरी बलानें त्याला बहु गांजिलें॥

जगदीशाचीं मुलें तयाला आवडती सर्वही । नसे रे नावडतें कोणही ॥ ३ ॥

फास कशाला ? खड्ग कशाला ? कारागृह एवढें । कशाला समजेना बांधिलें ! । दुष्ट जगीं या सुष्टा छळिती अधर्म फोफावला । " बळी तो कानपिळी जाहला ! " सत्य लोपलें, असत्य भरलें विषय सुखीं रंगले ! मूढ हे देवाला विसरले ! ॥ चाल ॥ मन माझें विटलें या लोकां पाहुनी । उत्खिन्न जाहलें म्हणुनी तें निशिदिनीं । परि शांत होतसे तुजला अवलोकुनी । म्हणुनि हिमकरा ! वाटे मजला यावें नीलांबरीं ! तुझ्यासम रंगावे अंबरीं ! ॥

१२-८-३३.

● ●

## ( ९ ) लावणी ९ वी

## चंद्रिका कुण्या चंद्राची

चंद्रिका कुण्या चंद्राची चालली पहा ती नार ॥ ध्रु० ॥ डोळे पाणिदार सुंदर । जणु मदनाचे खंजिर । केस काळेभोर फुगिर । वेणींत फुलांची माळ ॥ १ ॥ नाकांत पाचेचा खडा । कांनीं मोतियाचा चौकडा । बाजुबंद शोभे चमखडा । लोंबते स्तनावर माळ ॥ २ ॥ गाल गुलाबी हो सुंदर । किती सांगू मधुमधूर । पोवळ्यांचा जणु अधर । कुंकवाची चिरी मजेदार ॥ ३ ॥ रुणझुणे पायीं झांजरी । ऐटीनं चाले सुंदरी । जणु कामदेवाची सुरी । मुळिं नसे तिला दरकार ॥ ४ ॥ कोण कोठली ही सुंदरी । अशी कधीं नाहीं बघितली । तारुण्य सळसळे उरीं । कामाची दिव्य तलवार ॥ ५ ॥

— १९३६.

● ●

## ( १० ) लावणी १० वी

# नार पराची

नार पराची धार पट्याची सरा मागं दूर। अहो जी सरा मागं दूर। तुम्ही घरंदाज थोर ।।ध्रु०।। चौदा चौकडे राज्य जयाचें धाक दारोदार। जयाचा धाक दारोदार। रावण झाला हो चूर ।। १ ।। पार्वतीचा मनिं संग धरुनिया गेला भस्मासूर। पर झाला भस्म पार ।। २ ।। ।। चाल ।। क्षयरोगी झाला हो चंद्र। अहो चंद्र ।। झाले ठार स्त्रियेच्या पायीं सुंद उपसुंद ।। द्रौपदिचा मनिं छंद लागला कीचक रणधीर। केला भीमानं ठार ।। ३ ।।

– १९३६.

● ●

## ( ११ ) लावणी ११ वी

# एक होती नाजुक नार

एक होती नाजूक नार। तिचा रे ओठ होता गुलजार ।। रंगानं जसं गुलनार। तिचा रे ओठ होता गुलजार ।। ध्रु० ।। डोळे पाणीदार मोत्यावाणी रे नाहीं तिला दरकार। केवड्याचा रंग अंगाला। अर जी जी ।। काळेभोर केस डोक्याला। अर जी जी ।। रुणझुण रुणझुण पाय वाजवित आली र हासरी नार। रंगानं जसं गुलनार। तिचा रे ओठ होता गुलजार ।। १ ।।

९-९-१९६४.

● ●

## ( १२ ) अंबाबाईचा गोंधळ

गजवदना तूं गोंधळाला ये रे ।। पशुपति नाथा गोंधळाला ये रे ।।
गोपाळकृष्णा तूं गोंधळाला ये रे ।। अयोध्येच्या राजा तूं गोंधळाला ये रे।।

शारदे ग देवी तूं गोंधळाला ये ये ॥ जेजुरीच्या खंडोबा गोंधळाला ये रे ॥ कोल्हापूरच्या अंबाबाई गोंधळाला ये ये ॥ तुळजापूरच्या भवानी गोंधळाला ये ये ॥ प्रतापगडच्या भवानी गोंधळाला ये ये ॥ अंबाबाईचा गोंधळ उदो ग उदो ॥ रूप जसं केवड्याचं पान । त्याली जडिताचं भूषण ॥ किरिटाची शोभा सुंदर । हिरे माणकं वरतीं भरदार ॥ पाठीवर शोभे कुंतल । लांबलचक काळेकाळे भोर ॥ कुंकवाची चिरी सुंदर । जशी शोभे चंद्राची कोर ॥ दातांची गोड ठेवण । जशा कळ्या ठेवल्या गुंफून ॥ निळं वस्त्र केलं परिधान । शरीराची शोभा खुलवून ॥ चाल ॥ शंखचक्र करिं पद्म घेतलं त्रिशूलभाला तलवार । सिंहावर आसन तुझं ग पायीं दिसे महिषासूर ॥ डाव्या हातामधिं महिषासुराचं मुंडकं ठेवलंस तूं धरून । थेंब रक्ताचे टपटप गळती पाट चालला भूवरनं ॥ चाल ॥ तुझं रुद्र रूप पाहून । दानवानी सोडला प्राण ॥ कंसाच्या हात्नं निसटून । गेलीस हां हां म्हणतां श्रापून ॥ देवकीचा गर्भ काढून रोहिणीच्या उदरीं ठेवून ॥ पांडवांनीं पूजलं भक्तीनं । त्यांना दिलंस अभयाचं दान ॥ दुष्टांचा नाश करून । सुजनांचं करशी पालन ॥ चाल ॥ भक्तजन आलों आम्ही तुझ्या सेवेला । मस्तक नमविन तुझ्या पायाला ॥ एकच मागणं तुझ्या चरणाला ॥ सेवा तुझी अखंड घडो आम्हाला ॥ सुख आणि वैभव दे सकळाला । **पांडुरंग** शाहीर शरण मी तुला ॥

१९-१०-४७.

• •

## ( १२ ) जोगवा

अंबाबाईचा जोगवा । आला भुत्या मागायाला ॥ ध्रु० ॥ जय जगदंब जय जगदंब ! अंबाबाईचा जोगवा आला भुत्या मागायाला ॥ ध्रु० ॥ जोगवा वाढावा माई । पुण्य जोडाल अक्षय पाही । आयुष्याची हो शाश्वती नाहीं । म्हणून जोगवा लवकर घाला ॥ १ ॥ अंबाबाईच्या

कृपेची पगडी। अहंपणाची गळ्यांत कवडी। करीं ज्ञानाची घेऊन दिवटी आला जोगवा मागायाला॥ निर्धाराचा शेला शेला। घेउनी भक्तीच्या पात्राला। सुखदुःखाचे चाळ करोनी। आला मागायाला॥ पांच धान्यें करुनी गोळा। वाढील जो जो हा जोगवा। भिणार नाहीं तो कळिकाळा। अंबाबाईचा जोगवा आला भुत्या मागायाला॥

१६–१०–४७.

• •

## (१४) असावा–नसावा

ऐश्वर्याच्या काळिं मनाला विवेक पुरता असावा। संपत्तीचा गर्व कधींहि ऐका बंधुंनो नसावा॥ उगाच गुर गुर गुर करणारा स्वभाव कधिंही नसावा। ऐनवेळिं पण अभिमानाचा पीळ मनाला असावा॥ जीव जिवाला देणारा प्रिय मित्र खरा तो असावा। मित्र मित्र म्हणतांना परि तो मारेकरि कधिं नसावा॥ चाल॥ पुत्र लाडका असावा। पण लाडावलेला नसावा। हुशार शाहणा असावा॥ गोरागोमटा सुशील शाहणा सधन जांवई असावा। अतिमरतुकडा रडका रोडका चिडका परि तो नसावा॥ चाल॥ सासू सासरा असावा। पण जाच सुनेला नसावा। हौशी नवरा असावा॥ चाल॥ गडी माणसं मोटारगाडी थाट मजेचा असावा। परी सुनेला काडीचाही कामधंदा तो नसावा॥ ॥ चाल॥ खिशांत पैसा, मनांत हौसा, घराला वासा असावा॥ मनांत पैसा, खिशांत हौसा, घरांत वासा नसावा॥ विवेक पुरता। विचार फिरता, प्रचार तरता असावा। विचार खोटा, धंद्यांत तोटा, व्यर्थ बोभाटा नसावा॥ चाल॥ मनांत ईश्वर असावा। पण ढोंगीपणा मुळिं नसावा। स्पष्टपणा जगिं दिसावा॥ चाल॥ शिष्य चांगला आज्ञाधारक तैलबुद्धिचा असावा। छंदी भंगी लटक्या भटक्या थापाड्या मुळिं

नसावा ॥ **पांडुरंगाचं** कवन ऐकण्या धीर जरासा असावा । **पांडुरंग** शाहीरावरती रोष कधींही नसावा ॥

१६–१०–४७.

● ●

## (१५) हौशी नवरा असावा

तरुण चांगला गोड मनाचा हौशी नवरा असावा । दुर्मुखलेला सदाच आळशी खुशालचेंडू नसावा ॥ जगाला जिंकील असा करारी निधड्या छातिचा असावा । पण बायकोचा आज्ञाधारक हुषार सेवक असावा । साऱ्या जगाला मुठींत ठेविल असा पराक्रमी असावा । पण मुठींत बायकोच्या राहण्यासाठीं कुरकुरणारा नसावा ॥ नेकटाय कॉलर बिडी सिगारेट यांतच उधळ्या नसावा । उंची पातळ फेस पावडर आणून देणारा असावा ॥ पगार महिन्याचा बायकोच्या हातीं नेहमीं देणारा असावा । पण खर्च कसा काय केलास म्हणुनी विचारणारा नसावा । बायकोला सोडून फिरायला जाणारा सिनेमा बघणारा नसावा । आज हवं काय तुला ग साजणी असं विचारणारा असावा ॥ बायकोच्या घरचीं दोन चार पांच सात माणसं पोसणारा असावा । पण आपल्या भाऊबंदांना कधींही बोलावणारा नसावा ॥ पडेल तें पानांत वचवच खाऊन हपीसला जाणारा असावा । भात असा कां ? भाजी अशी कां ? असं विचारणारा नसावा ॥ बायको किति जरी टाकून बोलली तरी रागावणारा नसावा । अंगाखांद्यांवर मुलांना घेऊन खेळविणारा असावा ॥ **पांडुरंगाचे** बोल मोलाचे ऐकून घेणारा असावा । बोल ऐकुनी घरीं जाऊनी तसं वागणारा नसावा ॥

ता. १६–१०–४७

● ●

# ( १६ ) असावी–नसावी

नणंद छोटी वटवटणारी धडपडणारी असावी। पर वयानं मोठी सदा उफराटी नणंद कधिंही नसावी ।। लाडकी बायको असावी। पण लाडावलेली नसावी। शांत मनाची असावी। आणा आणा आणा म्हणुनी छळणारी कधिं नसावी। कोंड्याचा मांडा करणारी हुशार शहाणी असावी ।। लिहितां वाचतां येणारी टापटीपवाली शाहणी असावी। पण बी. ए. एम्. ए. पास झालेली बायको कधिंही नसावी ।। पावलापावलाला रुसणारी आणि फुगणारी कधिं नसावी। सुखानं संसार करील असली साधी कारबारीण असावी ।। फॅशनवाली नसावी। साधी हौशी असावी ! कडकडणारी नसावी। रोज नव्या नव्या वस्तू-साठीं ओरडणारी नसावी। शांतपणानं संसाराला सुखी करणारी असावी ।। चाल ।। दोन तीन लेकरें असावीं। पण आठ दहा कधिं नसावीं ।। निरोगी बळकट असावी ।। कामांत कटकट, तोंडांत वटवट, मनांत लटपट नसावी। सदाच खटपट, कामांत झटपट, धंद्यांत वटवट असावी। धट्टीकट्टी जाऊ धाकटी आज्ञाधारक असावी। पण धुणं बडवतां भांडीं घासतां कुरकुरणारी नसावी ।। सासरीं गेल्यावर नवऱ्या मुलीला माया माहेरची असावी। पण नव्या सुनेनं सासरीं आणलेलीं माणसं माहेरचीं नसावीं ।। चाल ।। अंथरुणाला **ती** नसावी। पण डोळ्याला **ती** असावी। संसारांत **ती** नसावी ।। चाल ।। ही ती कोण ती जबाब द्यायला बुद्धि चांगली असावी। म्हशीसारखी मंदपणाची बुरणुसबुद्धि नसावी ।।

१६–१०–४६.

• •

# (१७) भेदिक लावणी

१. प्र :–कांहीं नसे त्यांतून प्रगटली सृष्टि चराचर। जबाब द्यावा या प्रश्नाचा करुनी सुविचार॥

उ :–कुणिही सांगिल जबाब याचा ऐका तुम्ही थोर। ब्रह्मतत्त्व जे आदिसनातन त्याचाच विस्तार॥ १॥

२. प्र :–दोस्ती सहांची करूं नका कधिं फसवितील चोर। सवाल केला उत्तर द्यावं आतां लौकर॥

उ :–काम, मद, मोह, मत्सर तैसे क्रोध, लोभ, चोर। जसा सुका पाचोळा उडावा तसे झाला गार॥ २॥

३. प्र :–इंद्रादिक देवांचा केला सुगर्व परिहार। कुणी ? कसा ? हो बोला मंडळी, करुनी सुविचार॥

उ :–लहान काडीचं रूप धरोनी ब्रह्म वदे बोल। "जाळशील कां" बोले अग्नीला शक्ति तुझी थोर। अग्नि लागला जाळायाला परि थकला फार। इंद्रादिक देवांची परीक्षा केली अशी घोर॥ ३॥

४. प्र :–सात वरती सात खालती फिरती अधांत्री रे। भाग्यवंत जन तरुनि जातिल कोण वदा सारे॥

उ :–भू भुव मह स्वह जन तप सत्य हे वरती अधांत्री रे। अतल वितल पाताल रसातल सुतल महातल रे॥ तसे सातवे तलातल असे फिरती अधांत्री रे। चौदा भुवनें तरुनी जातील भक्त हरीचे रे॥ ४॥

१९-१०-१९४७.

• •

# ( १८ ) नारळी पौर्णिमा

## चौक १ ला

आला नारळी पौर्णिमा सण । आनंदलं मन । केलीं मिष्टान्न । घरो-घरीं घमघमाट सुटला । लहान थोर आनंदानं भरला । पावसापाण्यानं सुकाळ केला ॥ झाडं झुडपं डुलती हिरवीगार । वेली सुकुमार । फुलांचा भार । भुईमुग शेतांतुन भरला । बाजरी तूर जोंधळाहि फुलला । झाला आनंद शेतकऱ्याला ॥ जी ॥ भरपूर पाणी विहिरीला । ओढ्या नाल्याला जागोजागेला ! नदीला पूर फार आला । पाण्यानं देश सुपीक केला । आनंदाचा बाग फुलून गेला ॥ जी ॥ चाल ॥ नारळी पौर्णिमा आली जेवण्याची वेळ जवा झाली । तंवा कैक मिष्टान्न केलीं । मुलं बाळं खूष फार झालीं ॥ चाल ॥ जेवणाचा थाट फार केला । रांगोळीचा पट्टा काढला । वर गुलाल शोभे चांगला । कमानीचा थाट फार झाला ॥ पाटांचा थाट बसायाला । उदबत्त्या जळती सळसळा । पाटावरती बसेल मग लहानथोर जेवणाला ॥ चाल ॥ केळींचीं पानं सुंदर । मिष्टान्न वरती भरपूर । आतां सांगतों नांव तुम्हाला । खाण्याचा मोह जर झाला । तर सुटेल पाणी तोंडाला । म्हणून आवरा आपल्या जिभेला । ॥ कटाव ॥ लांब केळींचीं पान पसरलीं । वरणभाताची मूद शोभली । चंद्रासम ती गोड वाटली । दाटी पक्वान्नांची झाली । पहा पहा बासुंदी आली ! पुरी पुरी ! ओरडती सारी । देहभान विसरली मंडळी । मिटक्या मारित खाती सारी । गोड गोड मग लाडू आले । दोंदिल त्यांचे फार वाढले । म्हणुनी पानावर गडगडले । लाल सांडगे पापड आले । किती चिरोटे ते फुगलेले । नानाविध ते भात धांवले । साखर भात, बटाटे भात, वांगीं भात, नारळी भात, रावण भात, तोंडली भात, कोबी भात, भातच भात । भजीं कुरकुरीत नाचत आलीं । चुरचुर करुनी खाती मंडळी । खातांना खूप गम्मत आली । काकडीची कोशिंबीर केली । लोणच्यांतली

मग मिरची चमकली । डाळ वाटुनी केल्या उसळी । खातांना मन घेई उसळी । भाजी मुळ्यांची ठुमकत आली । चिक चिक करुनी भेंडी आली । लचकत लचकत गोवार आली । भाजांची अशी गर्दी झाली । लालबुंद टामाटो फुगला । अहंकार त्याचा सळसळला । माझ्यासारखा कुणि नच झाला । पारावार न त्या गर्वाला । बाईनं त्याचा नक्षा उतरवला । विळीवर नेऊन चरचर चिरला । मटामट मग खाल्लं त्याला । या पुरी-काकू, काहो फुगला । कां तुम्ही एक विहीण झाला । कां तुमचा अप-मान झाला । या पण रुसूं नका या। खाऊन टाकूं आम्ही तुम्हांला । आलं आलं श्रीखंड सावरा । पक्वान्नांचा राजा झाला । वाढा वाढा आग्रह झाला । कां दादांनो चंचल झाला । पाणी सुटलं कां तोंडाला । कां पुरी भजांचा सुवास आला । पण उपयोग कांहीं नाहीं ! शब्दांचा हा खेळ जाहला ॥ चाल ॥ हात धुवून मग दिवाणखान्यांत जमली सारी मंडळी जेव्हां । पंचरंगी किती विडे चघळती लांबरुंद होउनि तेव्हां । पत्ते कुणी, कुणी केरम, कोणी बुद्धिबळें, कुणि चेंडुफळी । खेळ खेळती आनंदानें दंग होउनी या काळीं ॥ जी ॥ सुरपारंगी कुठं लगोरी फुगडी झिम्मा खेळुनिया । विटी, दांडु आणि लपंडावही मुलें खेळती रंगुनिया । आनंदी आनंद चहूंकडे आनंदाचा सण आला । समुद्रकांठीं चला जाऊं या आतां पुढच्या चौकाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

जोराचा वारा सुरू झाला । दर्या खवळला । तुषार गगनाला । पडावं उसळती खालीं वर फार । खलाशाचा जीव झाला बेजार ॥ जी ॥ तुफानाचा संचार झाला चारी बाजुला । मेघ गडगडला । समुद्रानं धरलं रूप विक्राळ । त्यानं पहा केला मोठा संहार । मी मी म्हणणारे झाले बेजार ॥ चाल ॥ तुझं भव्य रूप पाहून । गांगरलं भीतिनं मन ।

मनुष्याला गर्व फार झाला। सागरा! मनुष्य काय म्हणतो सांगतों तुला। तुझ्या अंगावरनं सरसरा। आगबोटी फिरती गरगरा। हज्जारों मैलांचा फेरा। पण भीति कसली ना त्याला। म्हणून गर्व झाला माणसाला। कीं ताब्यांत ठेवलं रे तुला। पण सामर्थ्य तुझें रे जरा। जंवा दावशी थोडं रे त्याला। तंवा धाक वाटतो तुझा त्याला। आम्ही आलों शरण रे तुला। हो शांत आज या वेळा। नारळाचा नैवेद्य तुला॥ चाल॥ घे मानुनीया पूजेला। सागरा! विनंती तुजला। तुज नारळ प्रिय रे झाले। भक्तीनें अर्पण केले। लहानांचे मोठे झालों। तुजवरती खेळूनी खेळ॥ चाल॥ हो शांत जरासा आतां। करि दूर आमची चिंता। जगिं तूंच आम्हांला त्राता। आम्हीं लीन तुझ्या चरणाला। सामर्थ्य तुझें रे कोठें। आमुचें शक्तिबळ कोठें। किती प्रचंड सागरनौका। छिन्नभिन्न तूं करणारा। किती माणिक रत्नें मोती। उदरांत तुझ्या लपलेले। धान्यांचे भव्य ढिगारे। उदरांत तुझ्या पडलेले॥ चाल॥ वडवानल पोटीं दडला। आसरा दिला तूं त्याला। पण नच दाखवूं भय आम्हांला। सागरा! प्रार्थना तुजला। हो सहाय तूं आम्हांला। शत्रूंचा नाश कराया। आम्ही मर्द मराठे वीर। तय्यार शत्रु माराया। तंव अंगावरुनी आतां। जाऊं देच झुंज कराया॥ चाल॥ सैतान खवळले सारे। हिंदभूस लुटतील बा रे। दोन हात आम्ही करणारे॥ चाल॥ हो सहाय तूं आम्हांला। सागरा! विनंती तुजला॥ जी॥

● ●

## (१९) दसरा

### (१)

दसऱ्याचा सण मंगलकारक लहान थोर जगिं सकळाला। घरोघरीं किती तोरण माळा गुढया शोभती नगराला॥ फुलं झेंडुचीं खंडोगणती

आणुनि गुंफुनिया माळा। घोडे गाई बैल सजविती आनंदाचा फड फुलला ॥ मंगलवाद्यें झडति झणाणा फोनो वाजती या वेळा। कुणी रेडिओ लावुन बसती कार्यक्रम ऐकायाला ॥ घरोघरीं बाजाची पेटी काढुन गाती किती बाला। पद दोन चार जी शिकलेली ऐकविती त्या सकळाला ॥ तेल सुवासिक लावून अंगा कैक चालले स्नानाला। नूतन वस्त्रें नेसुनि नटती फेस पावडर तोंडाला ॥ बाळ चिमुकला पाटी घेऊन जातो प्रथमच शाळेला। सरस्वतीची पूजा करुनी येइ घराला या वेळा ॥ कुणी शस्त्रांची पूजा करिती गंध फूल वाहुनि त्याला। चाकू कातरी विळी सुरी कुणि घेती कोयता पूजेला ॥

( २ )

सायंकाळीं शिलंगणाला जाती मंडळी हौसेनं। शिंग वाजती, तासे झडती, सनया वाजति मौजेनं। नवीन कपडे अलंकार किती चढवुनि नटती नरनारी ॥ शमी तरूची पूजा करुनी फिरती लोक मग माघारीं। सोनें लुटुनि येतां येतां देवदर्शनाला करुनि। ओवाळित भगिनी–भावाला पंचारति करिं घेवोनि ॥ काळ पूर्वीचा सुरम्य होता मुहूर्त साधुनि दसऱ्याचा। सेना घेउनि दिग्विजयाला आर्य जातसे भारतिचा ॥ मंगल दिनिं या रामरायानं केली लंकेवर स्वारी। ठार करुनिया दशाननाला फिरली स्वारी माघारीं ॥ मंगल दिनीं या चंद्रगुप्त करि शिकंदराला रणिं जेर। पृथ्वीराज चौहाण नृपानं विजय मिळविले भरपूर ॥ जी ॥ घेऊन शस्त्रें धनंजयानें गोग्रहणाच्या समयाला। दिले पिटाळून कौरववीरा मंगलविजयादशमीला। याच मुहूर्ती कौरव पांडव संगर मोठा सुरुं झाला। विजयी झाले पांडव सारे मर्दुनी कौरव वीराला ! ते शूर मराठे वीर। धीर गंभीर। रणीं खंबीर। स्वारीवर जाती याच मुहूर्ताला। समरांत विजयी होऊन। शत्रु मर्दुन। सोनें लुटुन। येत देशाला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ शिवाजीनं राज्यसंकल्प याच दिनीं केला ॥ बाजीराव छत्र

सालाच्या धावला मदतीला ॥ राघोबा झेंडे घेऊन अटकेपार गेला। उदगीरच्या लढाईला हाच मुहूर्त हो पटला ((जमला)) ॥ चाल ॥ हे वीर मर्दांनो, ऐका सांगतों तुम्हांला ॥ चाल ॥ करा आज सीमोलंघन। आळसाला पार झाडून ॥ परचक्र राष्ट्रावर येईल। हें नेहमीं चला समजून ॥ म्हणून सैन्यांत आतां शिरून। करा भारताचं रक्षण ॥ चाल ॥ आरमार खुलं सर्वांला। तरुणांनो बोटीवर चला। आरमार प्रबल तुम्ही करा। विमानाच्या खात्यांतून शिरा। लढवय्या बाणा दाखवून देशहित करा ॥ **पांडुरंग** शाहीर गातो आतां कवनाला ॥

• •

# (२०) दिवाळी

## चौक १ ला

विक्रम संवत वर्ष संपलें आली दिवाळी या वेळा। आनंदाचे कुंभ घेउनी हासवि नाचवि सकलाला ॥ घरोघरीं किती पणत्या जळती थारा नच अंधाराला। प्रकाश पाहुनि घरोघरीचा चंद्र कसा लाजून गेला ॥ नरकचतुर्दशी जणु म्हातारी आली उठवित सर्वांला। सुगंधी तेलें अंगा लावुनि स्नान घालती सकलाला ॥ बंब पेटले, चुली धडकल्या, हंडे चढले त्यावरती। जाळ धडाडा धडक्या मारी सुई सुई वाजे जळ वरती ॥ भल्या पहाटे चतुर्दशीला गडबड मोठी सुरु झाली। सुगंधि तेलें उटणीं लावुन न्हाणीं चालली या काळीं ॥ कुणी फटाके, कुणी फुलबाजे, फटाकड्या कुणी पेटवितो। कुणी भुसनाळे कुणी तुडतुड्या कुणी चुचंद्रया धडकवितो ॥ चाल ॥ थंडी गुलाबी पडूं लागली। त्यांतच आतां दिवाळी आली। कढत पाणी घेती मंडळी। आंघुळीची खूप गंमत झाली। पूर्व दिशेला चढली लाली। पतिदेवाचं स्वागत करण्या।

पूर्व दिशा जणुं तयार झाली ॥ झाडावरचीं चिल्लीं पिल्ली । चिव् चिव् चिव् चिव् करूं लागलीं । वेली लतांनीं झालर धरली । सृष्टी सुंदरी नटुनी आली । स्वारी रवीची दिसूं लागली । फराळाची मग गर्दी उडाली ॥ चाल ॥ फराळाची मोठी गम्मत । **पांडुरंग** आतां वर्णीत ॥ दूध गूळ पोहे कुणि खात । दही पोहे कुणी भिजवीत । कडबोळीं चकल्या उडवीत । कुणी मारती शिऱ्यावर हात । चहा कॉफी कोकोला ऊत । घटाघटा पिती मौजेंत ॥ कटाव ॥ तिखट मिठाचा सांजा कुणाला । पोहे फोडणीचे कुणा कुणाला । पचडीं खिचडी कुणाकुणाला । इडली डोशावर करती हल्ला । स्लाइस्पाव कुणि, ब्रेड चापती नानकटाई आणि रसगुल्ला ॥ गुलाबजंबु कुणि पसंत केला ॥ भिन्नरुचीचा समाज झाला । थालिपिठाचा खमंग मारा । कुणि कुणि करिती या वेळेला । खमंग काकडी बटाटे चिवडा । कुणि आणवुनी खाती पेढा ॥ चाल ॥ कुणि जाति सिनेमा बघण्याला । कुटुंबाचा घेऊनी मेळा ॥ चाल ॥ गोड गोड मिष्टान्न करती आज भोजनाला ॥ कुठं कुठं पुरणाची पोळी होत या वेळा ॥ कुठं कुठं गुळाची पोळी हजर सेवेला । सांज्याच्या पोळ्या कुणि करती याच सणाला । कुठं भात साखरेचा तयार होतो या काळा ॥ चाल ॥ तयार केली कुणी बासुंदी । खातां खातां येइल सुंदी । श्रीखंडाची कुणास धुंदी ॥ चाल ॥ रांगोळ्याचा केला बहु थाट । बसायला ठेवले पाट । चांदीचे ठेवलं ताट । केळीच्या पानांचा थाट । पदार्थांचा सुटला घमघमाट । लहान मुलांचा चालला खळखळाट । नैवेद्याची वाजली घाट । पदार्थांच्या रांगा घनदाट । वाढणाऱ्यांचा झाला सुळासुळाट ॥ चाल ॥ मुलांची एकच गर्दी उडाली । हातातोंडाची लढाई लागली । हातघाईवर आली मंडळी । भाताचा पुढं ढिगारा आला । क्षणांत त्याचा फडशा उडविला । झणझणीत मारा करण्याला । तोंडली भात सरसावुन आला । पांच बोटांनीं हल्ला केला । घशांत त्याला ठेंचून भरला । कडेलोट मग त्याचा केला । घशाखालीं मग पार

ढकलला ।। चाल ।। मग मिरची ताडकन् आली । जीभेला झोंबून गेली । चटणीनं केली हातघाई । डोळ्यात्नं पाणी मग वाही ।। चाल ।। असा तिखट हल्ला जंवा झाला । तंवा बाळूनं पाण्याचा मारा त्याच्यावर केला । ताईनं ताटाबाहेर लोटलं तिला । मधुकर लालेलाल झाला । अन् बासुंदी पुरीवर केला जोराचा हल्ला । ताईनं गुळ-पोळीचा फडशा उडविला ।। चाल ।। जेवणाचा थाट असा झाला । पान सुपारी वेलदोडा आला । चुना कात त्यांच्या मदतीला । विडे खाऊन तोंडाचा रंग लालेलाल झाला ।।

• •

## चौक २ रा

पत्ते गंजिफा कुणी खेळती । केरम कोणी खेळ खेळती । इथं कसला हा डाव चालला ? । वीस वीस एकेका बाजुला । सोंगट्यांचा पट मधें पसरला । दहा, पंचवीस, सहा, बारा, दोन तीन असा आवाज भरला । कानठळी बसली कानाला । सोंगट्या सोंगट्यावर करती हल्ला । बापू, आप्पा चिडून गेला । दान पडेना मुळींच त्याला । दादा, अण्णा, आप्पा, तात्या, काका, मामा, एका बाजूला । ताई, माई, आक्का, मामी, काकी, वैनी दुसऱ्या बाजूला । हुकमी दान घेण्याच्या कामीं । वैनींचा हातखंडा झाला । म्हणून आप्पा चिडून गेला । लिलू, ताई चिडवीत आप्पाला । आप्पा ढळढळा रडूं लागला । मग तात्या मामानं चकली देऊन गप्प कसंबसं केलं त्याला । रोज असा हा खेळ चालला । चार रात्रींचा दिवसच केला ।। चाल ।। आवसेचा आजि दिवस जाहला लक्ष्मीपूजनाचा रंग । घरोघरीं हा पहा मांडला थाटामाटानं चौरंग ।। दिव्यांनीं लखलखाट केला । लक्ष्मीच्या केलं पूजनाला । बत्तासे लाह्या प्रसादाला । वाजंत्री वाद्य वाजविती मधुर या वेळा ।। फटाक्यांचा कडाका चालला । पानसुपारी अत्तर गुलाब देती सकलाला । पाडव्याचा

दिवस मग आला। जमा खर्च नवा सुरू झाला। मग भाऊबीज आली थाटानं दुसऱ्या दिवसाला। बहिणीनं सैंपाक केला। भाऊ बसले जेवायला। बहिणीनं ओवाळलं भावाला। मग भाऊ घालती ओवाळणीला। कुणी भाऊ चिकू झाला। तो पानसुपारीचं देतो बहिणीला। कुणि करंडा दिला। कुणी खडा दिला। कुणी ब्लाऊजचा तुकडा एक दिला। कुणी अंगठी, कुणी बिलवर जोड दिला। कुणी शाईचा झरा। तर कुणी खेळायचा झारा। कुणी पावडरचा डबा तर कुणी मनी बॅग तर कुणी कॅमेरा। कुणी पुढच्या वर्षीच्या ओवाळणीचा दिला हवाला॥ जी॥ शब्दांची केली गुंफण। **पांडुरंगानं**। मोठ्या हौसेनं। देण्याला दिवाळीचा आनंद। नाना युक्तींनीं जोडिले छंद। देवो नव वर्ष तुम्हां आनंद॥

• •

## (२१) शंखदेवाचा चुटका

शंखदेवानं विचार केला। कीं, पोटाची चिंता लागली मजला॥ राजा नोकरी देतोय कां पहावं या वेळा। म्हणून भोजराजाकडं शंख गेला। शंख तंवा बोलला भोजराजाला। ‘ राजा, हा शंख आलाय भेटायला। नांव जरी शंख ठेवलंय मला। तरी गुणानं शंख नाहीं हा झाला। गुरुजींनीं कांहीं थोडं शिकवलंय मला। राजा, नोकरी दे मला। भोजराजा बोलला शंखाला। “ कीं, नोकरी शिल्लक नाहीं या वेळा। जेव्हां जागा होईल तेव्हां बोलवीन तुला। शंख राजाला बोलला। ‘ राजा, नुसती ऑनररी नेमणूक केलीस तरी चालेल। पण नोकरी दे फुकट करीन तुझ्या नोकरीला। मात्र अधिकार थोडे बहुत दे मला ’। भोज राजानं विचार केला। कीं पैशाविणं नोकरी कशी करतोय अन्

कसं भरतोय ते तरी पाहुं दे मला । भोजराजानं नोकरी दिली त्याला । शंखदेव सर्व्हेयर झाला ॥ ऐकावं ॥ १ ॥

शंख देवानीं एक भला मोठा वाडा पाहिला । जगमल शेठ मालक त्याला । शंखदेव बोलला जगमल शेठाला । " शेठ, वाड्याची मोजणी करायची आहे मला । अन् आजूबाजूला हा बगीचा केला । पण सरकाराची हद्द चोरलीत असा संशय आहे आला " । खराच थोडासा तसा प्रकार होता झाला । म्हणून जगमल बोलले शंखदेवाला । " रावसाब, जवा दोने, आ लेवो खुषी " असे बोलला । रावसाबाचा हात गरम झाला । तोंडाचा पट्टा बंद झाला ॥ ऐकावं ॥ २ ॥

राजा बोलला शंखाला । " महिना झाला नोकरीला । पोटाचा हिशेब काय केला । ? " शंख बोलला राजाला । " अधिकाराचा जोरच असा झाला । पैसा येतोय पळत हाताला । महिन्यांत काय काय केलं सांगतों तुम्हाला । पाटल्या जोड केला बायकोला । अम्रफूल डोक्याला टिक्का गळ्याला । बुगड्या कानाला । आतां गोट तोडे करायचा विचार केला " ॥ ऐकावं ॥ ३ ॥

राजा बोलला आपणाला । हा लाच खात असेल म्हणून असा प्रकार झाला ॥

दुसरे दिवशीं दुसऱ्या कामावर नेमलं त्याला । जनानखान्यांत तास वाजवायचं काम त्याला ॥ राजाला वाटलं, इथं कसा लाच खाईल पाहुं द्या मला । शंखदेवानं विचार केला । कीं इथं सुद्धा कांहीं पाहिजे पराक्रम केला । दासदासी येती रोज कामाला । शंखदेव करतो काय युक्तीला ॥ एकदां पाऊण तासानं वाजवतो घंटेला ॥ अन् एकदां सव्वा तासानं देतोय टोला । एकाला पाऊण तासाचा तास केला । अन सव्वा तासाचा त्रास दुसऱ्याला । पाऊण तासवाला रोज खूष झाला । अन् देती थोडा पैसा रोज त्याला । सव्वा तास वाल्यानीही. लाच दिली-कीं

ठोका जरा जल्दी समजा झाला। असा रोज प्रकार चालला। एक महिना झाला राजा बोलला शंखाला। " काय? आतां कसें पोट भरतोस सांग मला "। शंखदेव बोलला–' हे पहा २०० रुपये मिळवले या महिन्याला। कसे कशाला सांगू तुम्हांला? "। राजा बोलला–हा अगदींच विलक्षण प्राणी झाला। राजानं तिसरंच काम दिलं त्याला। समोरच होता समुद्र त्या वेळा। राजा बोलला शंखाला। " आतां काम बदलायचंय मला। हें बघ तो समुद्र दिसतोय तुला। त्याच्या लाटा मोजावयाच्या हे काम उद्यांपासून तुला। आठ तास केलं पाहिजे ड्यूटीला। आतां पाहूं लांच कशी मिळेल तुला। शंखदेव ' आज्ञा तुमची ' बोलला॥ ऐकावं॥ ४॥

दुसरे दिवशीं लागला लाटा मोजायला। सात आठ दिवस गेले तरी युक्ति सुचेना त्याला। मग एक विचार सुचला त्याला॥ सकाळीं ७॥ च्या टाइमाला॥ शंखदेव लागला लाटा मोजायला। तो मधें कोळी लोकांचे पडाव लागले यायला। शंखदेव बोलला कोळ्याला। कीं, " पडाव बिडाव सारे जमिनीवर घेऊन चला। आजपासून धंदा बंद करा। सरकारचा हुकूम असा तुम्हांला। कोळी हात जोडून बोलले त्याला "। " असा हा कायदा कां केला!! शंखदेव बोलूं लागला "। " लाटा मोजावयाचा हुकूम झालाय मला। तुमचे पडाव मधें मधें येतात–मग लाटा कशा मोजूं बोला?। कोळी बोलले शंखदेवाला। " रावसाहेब, तुमचं खरं पण आमचा धंदा बसला तर पैसा कसा दिसेल या हाताला। तेव्हां कांहीं देऊं रोज खुषी तुम्हांला "। शंखदेवाला आनंद झाला॥ ऐकावं॥ ५॥

एक महिना झाला तंवा राजा बोलला। " काय शंखदेव! कसं काय चाललंय बोला? "। शंखदेव बोलला। " या महिन्याला। ५०० रुपयांचा फायदा झाला "। " ते कसे रे? " " कोळ्यांनीं दिले मला " भोजराजा

थंडगार झाला । अन् बोलला-“ शंखदेव ! हुशार फार झालास । आजपासून प्रधानपद दिलं तुम्हांला अन् पांच हजार रुपये पगार महिन्याला। मग लाच खायची इच्छा होणार नाहींना तुम्हांला ? ” ॥ शंखदेव बोलला—“ राजा—गुणाची कदर करणारा तूं— म्हणून हा प्रकार दाखवला तुला । आतां ५००० रुपये जर महिन्याला तर लाच खायची जरूर काय मला ? इमानानं करीन नोकरीला ” ॥ ऐकावं ॥ ६ ॥

१९३९.
दा. क्र. १६९७८
॥ शुभं भवतु ॥

REFBK-0016978

मनपसंत चोख सोनें-चांदीचा माल व उंची कल्चर्ड

मोती यांचे दागिने यांसाठीं

# काशिनाथ नारायण परांजपे

## सोनें, चांदी व मोत्यांचे व्यापारी

७२, काऊ लेन, घाटकोपरवाला चाळ, मुगभाट,

मुंबई नं. ४

येथेंच भेट द्या.

आमचे येथें उंची कल्चर मोती, तनमणी, लफ्फा, वेगवेगळ्या डिझाइन्सचे रायफूल तोडे योग्य भावांत मिळतील.

तसेंच

सोन्याच्या अनारकली बांगड्या, नेकलेस, लफ्फे व टॉप्स तयार मिळतील.

आपल्या ऑर्डरप्रमाणें वक्तशीरपणें काम करून दिलें जातें.

जुनें सोनें-चांदी योग्य भावांत खरेदी केलें जाईल.